म. ग्रं. सं. ठाणे
विषय गोबंध
सं. क्र. ९८०५
REFBK-0002455

# स्त्रियांचा कर्मयोग.

लेखक

**दामोदर यशवंत कोल्हटकर.**

विद्यार्थी, विलिंग्डन कॉलेज, सांगली.

REFBK-0002455

पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं

छापिलें व दामोदर यशवंत कोल्हटकर यांनीं

सांगली येथें प्रसिद्ध केलें.

---

सन १९२४.

---

किंमत एक रुपाया

श्री



# अर्पणपत्रिका.

ज्या पटवर्धन कुलाचा व कोल्हटकर घराण्याचा
सती पार्वतीनें आपल्या सतीत्वानें पूर्वकालीं उद्धार
केला, त्याच पटवर्धन कुलास सांप्रत आपल्या
सात्विक आचरणानें शोभविणारी श्री. सौ.
सरस्वतीबाई राणीसाहेब, संस्थान सांगली,
यांस त्यांची पतिनिष्ठा, शुद्धाचरण व
स्त्रीजातीच्या उन्नतीची उत्कंठा
वगैरे अमोल गुणांविषयीं अत्यंत
आदर वाटत असलेला लेखक
हें मानसिक अपत्य पूर्व-
संबंधाच्या स्मरणार्थ
समर्पण करीत
आहे.

# प्रस्तावना.

एखादा देवभक्त आपल्या आराध्य देवतेला स्वतः बागेंतून निरनिराळ्या फुलझाडांचीं फुलें निवडून त्यांचा हार गुंफून तो फावल्या वेळीं अर्पण करतो व अशा करण्यापासून त्याच्या मनाला फार आनंद होतो. अर्थात् ही त्याची नैमित्तिक पूजा असते; नित्य पूजा साध्या फुलांची असते; पण असा देवभक्त आपल्या देवतेच्या मंदिराजवळ रहात असला व त्याला देवाची अशी नित्य-नैमित्तिक पूजा करतांना पाहून देवळांत जाणाऱ्या येणाऱ्या माणसाला हा मंदिरांतला पुजारी आहे व हा देवाचा आवडता भक्त आहे असें वाटून जाणारे येणारे लोक आपली हारांची पूजा या देवभक्तामार्फत देवाला अर्पण करतात. अशा तऱ्हेनें अर्पण केलेली पूजा देवाला जास्त प्रिय होईल असें लोकांना वाटूं लागतें. याप्रमाणें स्थिति उत्पन्न झाली म्हणजे हा देवभक्त देवाचा खराखुराच पुजारी होतो. देवाच्या दर्शनाला येणाऱ्या प्रत्येक माणसाची पूजा देवाला अर्पण करण्याचा याचा धंदाच बनतो व मग या देवभक्ताला आपल्या इच्छेप्रमाणें व स्वतःच्या मेहनतीनें केलेले फुलांचे हार देवाला अर्पण करण्याची सवडच होत नाहीं. त्याचा सर्व वेळ दुसऱ्यांनीं आणून दिलेले हार देवाला अर्पण करण्यांत जाऊं लागतो.

हल्लीं माझी स्थिति वर लिहिलेल्या देवभक्तासारखी झाली आहे. मी तरुणपणापासून सरस्वती-भक्त होतों व आहे. इंग्रजी, संस्कृत व मराठी वाङ्मयरूपी उद्यानांतून निवडक फुलें आणून त्यांचे नीटनेटके हार बनवून ते सरस्वतीच्या चरणीं अर्पण करण्याची मला हौस असे व आहे. वाङ्मयरूपी विस्तीर्ण उद्यानांतून निरनिराळ्या ताटव्यांतलीं सुंदर सुंदर फुलें आणून त्यांचे लहान मोठे हार बनविण्याचे मनोमय नकाशे माझ्या डोळ्यांपुढें सारखे घोळत असतात. पण अलीकडच्या अर्धतपाच्या काळांत असा एकच हार गुंफून मला श्रीसरस्वती देवीस अर्पण करतां आला. माझ्या हातून बरेच हार अर्पण झाल्याची माहिती सार्वत्रिक झाल्यामुळें म्हणा किंवा सध्यां एक सरस्वतीमंदिर माझ्या देखरेखीनें तयार होऊन मी त्याच्या शेजारी राहूं लागल्यामुळें म्हणा मला धंदेवाईक

पुजाऱ्याची स्थिति प्राप्त झाली आहे. पुष्कळ लोक आपले वाङ्मयरूपी हार माझ्याकडे आणून ते मीं श्रीसरस्वतीदेवीला अर्पण करावे अशी विनंति करतात. त्यांना वाटतें देवीच्या आवडत्या पुजाऱ्यामार्फत आपण हार अर्पण केल्यास आपल्याला जास्त पुण्य लागेल. पण श्रीसरस्वतीच्या मंदिरांत असले निर्बंध किंवा आपपर भाव नाहींत. तिच्या मंदिरांत सर्वांना मुक्तद्वार आहे. ती देवी "गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः" या सुभाषितप्रमाणें अक्षरशः वागते, तिला हार किंवा पूजा अर्पण करणारा भक्त लहान असो मोठा असो; तो विद्यार्थी असो किंवा विद्यापारंगत असो; तो गरीब असो किंवा श्रीमान् असो; तो स्त्री असो किंवा पुरुष असो, ती सर्वांना सारखाच मान देते व सर्वांचे मनोभावानें अर्पण केलेले हार सारख्याच आनंदानें स्वीकारते. तिच्या दरबारांत रदबदली चालत नाहीं, तेथें खोटें नाणें खपत नाहीं; त्या ठिकाणीं हार अर्पण करण्याचा किंवा पूजा बांधण्याचा कोणाला मक्ता दिलेला नाहीं. परंतु मनुष्यस्वभाव दुरतिक्रम आहे, सामान्य व्यवहारांत जी स्थिति दिसून येते तीच देवदरबारीं असेल असें मनुष्याला वाटतें व म्हणून तो दोन्हीं ठिकाणीं सारख्याच तऱ्हेनें वागतो. असो.

सरस्वतीमंदिरांतील पुजाऱ्याची पदवी मला आली आहे याचें प्रत्यंतर म्हणजे मी या पंधरवड्यांत माझ्या प्रस्तावनारूप हस्तानें श्रीसरस्वतीदेवीस दोन हार अर्पण करीत आहें. पंधरा दिवसांखालीं माझ्या बालमित्राच्या सांगीवरून बकुळीच्या फुलाप्रमाणें पुष्कळ वेळ टिकणाऱ्या जुन्या हाराच्या ओवून काढलेल्या व त्यांतच कांहीं नव्या फुलांची भर घालून तयार केलेल्या 'अमृत तुषार' नांवाच्या वाङ्मयहाराची पूजा श्री सरस्वतीदेवीस अर्पण केली. आज एका विद्वान् मित्राच्या मुलानें—तो माझा विद्यार्थी आहे; तयार केलेला सुंदर हार मी श्रीसरस्वतीदेवीस प्रस्तावनारूप हस्तानें अर्पण करीत आहें. हार गुंफण्यांत दाखविलेलें कौशल्य वाखाणण्यासारखें आहे. पाश्चात्य वाङ्मय व पौरस्त्य वाङ्मय अशा दुहेरी उद्यानांतील सारख्या वासाचीं व सारख्या रंगांचीं पुष्पें वेंचून रा. दामोदर यशवंत कोल्हटकर यांनीं हा हार बनविला आहे. पण त्याची रचना पाश्चात्य हाराच्या धर्तीवर आहे. दोन्हीं ठिकाणच्या फुलांची बेमालूम वीण त्यांनीं घातली आहे. अर्थात् त्यांचा ओढा पौरस्त्य वाङ्मयोद्यानांतील फुलांकडे विशेष आहे व त्यांचा सुवास व रंग त्यांना विशेष प्रिय आहे. पण हारांत पुष्कळ फुलें पाश्चात्य वाङ्मयोद्यानांतीलच आहेत व त्या फुलांची आवड कमी दिसत नाहीं. असो.

उपमा टाकून बोलावयाचें म्हणजे रा. कोल्हटकर यांनीं जें छोटेखानी पुस्तक लिहिलें आहे तें स्माईलसाहेबांच्या 'दानत' व 'स्वावलंबन' या पुस्तकां-च्या धर्तीवर आहे. एका काळीं हीं स्माईल्सचीं पुस्तकें फार वाचलीं जात असत. या पुस्तकांतील विवेचन तात्विक, ऐतिहासिक व उपदेशपर अशा मिश्रस्वरूपाचें आहे. त्याच धर्तीचें रा. कोल्हटकर यांचें पुस्तक झालेलें आहे. त्यांत सर्व-सामान्य धर्माचें विवेचन नाहीं; तर तें पुस्तक स्त्रीधर्मविषयक आहे. समाजा-मध्यें तात्विक दृष्ट्या स्त्रियांचा दर्जा केवढा मोठा आहे; निरनिराळ्या पाश्चात्य व पौरस्त्य समाजांत पूर्वकालीं व हल्लीं स्त्रियांची प्रत्यक्ष स्थिति कशी आहे; माता, पत्नी, भगिनी, कन्या या कुटुंबविषयक व स्त्रीव्यक्तिविषयक निरनिरा-ळ्या नात्यांनीं स्त्रियांचे खरे धर्म व ध्येय कोणतें वगैरेसंबंधाचें तात्विक व ऐतिहासिक अशा दुहेरी दृष्टीनें रा. कोल्हटकर यांनीं विवेचन केलें आहे. आप-ल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ अभिजात ग्रंथांतून उतारे दिले आहेत व अशा उदात्त धर्म व ध्येय यांनीं प्रेरित होऊन वागणाऱ्या पाश्चात्य व पौरस्त्य समाजांतील स्त्रि-यांच्या स्फूर्तिदायक चरित्रांतील प्रसंग यांचें मोहक वर्णन केलें आहे. त्यामुळें सदर पुस्तक तात्विक पुस्तकांप्रमाणें दुर्बोध व कंटाळवाणें वाटत नाहीं. स्त्रीधर्मविवेचनाच्या ओघानें अर्थात् पुष्कळ वादग्रस्त सामाजिक प्रश्नांचा व चालीरीतींचा ऊहापोह रा. कोल्हटकर यांस करावा लागला आहे. पण तो ऊहापोह समतोल मनानें, निःपक्षपात बुद्धीनें व शास्त्रीय भावनेनें केलेला आहे ही वाखाणण्यासारखी गोष्ट आहे. रा. कोल्हटकरांचा स्वाभाविक कल जुन्या मताकडे आहे पण त्या कलाच्या भरांत नव्या मतावर फाजील शिंतोडे टाकलेले नाहींत. पुस्तकाची भाषा एकंदरींत भारदस्त व विषयास साजेशी आहे. मुलींना व बायकांना हें पुस्तक वाचावयाचें आहे हें ध्यानांत ठेवून भाषा कमी संस्कृतशब्दप्रचुर असती तर बरें झालें असतें.

हिंदूसमाज हल्लीं पाश्चात्य सुधारणा, पाश्चात्य वाङ्मय व पाश्चात्य संस्था या त्रिवेणीसंगमाच्या प्रचंड ओघांत सांपडला आहे. त्या समाजाची इच्छा असो वा नसो, तो त्या ओघाच्या अप्रतिहत वेगानें पुढें पुढें ढकलत चालला आहे, अशा वेळीं जुन्या नव्या गोष्टींचा तुलनात्मक विचार अवश्य केला पाहिजे. समाजाची नौका सुकाणू भलत्याच मार्गाला न नेईल अशी खबरदारी घेतली पाहिजे. समाजनौकेच्या सुकाणूवर विचाररूपी नावाड्याचा सारखा हात फिरत राहिला

पाहिजे म्हणजेच गलबत इष्ट दिशेनें नेतां येईल व तो हाल योग्य रीतीनें हालविण्यास नौकानयनाचीं जशीं पुस्तकें अवश्य असतात तशींच समाजास वळण लावणारीं, स्त्रीपुरुषांस सुमार्ग दाखविणारीं पुस्तकें तयार व्हावयास पाहिजेत. अशा दृष्टीनें स्त्रीधर्माच्या बाबतींत रा. कोल्हटकरांचें सुंदर पुस्तक उत्तम मार्गदर्शक होईल यांत शंका नाहीं.

शेवटीं रा. कोल्हटकरांनीं पुष्कळ मेहनतीनें बऱ्याच कौशल्यानें व कळकळीच्या सद्हेतूनें हा जो वाङ्मयरूपी नानाविध पुष्पांचा हार बनविला आहे तो मी त्यांच्या वतीनें सरस्वती देवीस अर्पण करतों व रा. कोल्हटकरांना या वाङ्मयपूजेपासून अपेक्षित पुण्यप्राप्ति होवो अशी इच्छा करून लेखणी खालीं ठेवतों.

विलिंग्डन कॉलेज, जिल्हा सातारा.
ता. ३०।८।१९२४

गो. चि. भाटे.

# आत्मनिवेदन.

सुमारें शंभर वर्षांपूर्वीची गोष्ट. पेशवाईचे अगदीं अखेरचे दिवस- अत्यंत धामधुमीचा काल. क्षणोक्षणीं व्यक्तींचेंच काय पण सर्व देशाचें स्थित्यंतर होत होतें. वीरश्रेष्ठ परशुरामभाऊ पटवर्धन यांची तरवार दक्षिण हिंदुस्थानांत आपल्या पराक्रमानें चमकत होती. श्रीगजाननाची मनो-भावें सेवा करून आपल्या तपश्चर्येनें पटवर्धन कुलाचा उद्धार करणाऱ्या हरभटजींच्या पुण्याईचीं फलें सर्वत्र दिसूं लागलीं होतीं. लढाई मागून लढाई मारून भाऊसाहेबांनीं आपला कीर्तिध्वज महाराष्ट्रांत रोंवला होता. असाच एक विजय संपादून आपल्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें भाऊसाहेब पुळ्याच्या श्री गजाननाचें दर्शन घेण्यास गेले होते. ते नुकत्याच मिळा-लेल्या विजयाच्या आनंदांत होते. मंदिरांत प्रवेश केल्यानंतर श्रींचें दर्शन घेऊन त्यांनीं श्रीगजाननास नैवेद्य दाखविला. नंतर जमलेल्या मंडळीस ते प्रसाद वाटूं लागले. मुलामुलींचा मेळा या वेळीं हजर होताच. भाऊ-साहेब, पितृप्रेमानें प्रत्येकास न्याहाळीत व एक दोन विनोदाचे प्रश्न करीत प्रसाद वांटीत होते. सर्व मुलांमुलींनीं हातीं प्रसाद पडतांच त्याचा स्वाहा केला. पण एक आठनऊ वर्षांची पाणीदार मुलगी इतरांप्रमाणें फारसें पुढें पुढें न करतां शांतपणें प्रसादाची वाट पहात उभी होती. भाऊसाहेबांच्या चाणाक्ष दृष्टीला तिचा हा समंजसपणा पाहून कौतुक वाटलें व त्यांनीं तिला ‘ तूं कोणाची ? तुझें नांव काय ? ’ वगैरे प्रश्न विचारले. प्रश्नांचीं उत्तरें इतकीं सुरेख मिळालीं कीं, भाऊसाहेबांनीं तत्काळ ‘ माधवाचा व हिचा जोडा मोठा फक्कड दिसेल ’ अशी मनाशीं गांठ बांधली. ‘ हा घे प्रसाद ’ असें म्हणून ते प्रसाद देऊं लागले; पण तिनें तो तळहातावर न घेतां, जवळचेंच एक पान घेऊन त्यांत तो प्रसाद घेतला व परकराच्या

शेवटांत बांधून ठेवला. भाऊंना हें पाहून सानंद आश्चर्य वाटलें व त्यांनीं त्या बालिकेस प्रसाद पदरांत बांधण्याचें कारण विचारिलें. " आईला, अण्णाला व बाबांना देण्याकरितां नेतें आहे " असें तिनें मोठ्या गंभीरपणें सांगितलें. 'बरें जा ' असें तिला भाऊसाहेब म्हणाले व स्वतांशीं या गोष्टीचा विचार करूं लागले.

'मुलगी स्वरूपानें तर नक्षत्रासारखी आहे. शिवाय फारच चाणाक्ष व पाणीदार आहे. लहान वय असूनही बरीच समंजस दिसते. गरीबाची असली म्हणून काय झालें ? माझ्या माधवाला ही अनुरूप वधू शोभेल ' इत्यादि विचार त्यांच्या मनांत आले; व त्यांनीं लागलीच भास्करपंत कोल्हटकरांना—त्या बालिकेच्या पित्याला—बोलावून आणविलें. 'गरीबाला कां बोलावणें झालें ?' असें त्यांनीं नम्रपणें विचारलें. भाऊंनीं त्यांस जवळ बसवून घेतलें व मनांतील सर्व विचार त्यांस कळविले. भास्करपंतांना 'मी स्वप्नांत तर नाहीं ना ?' असा क्षणभर भास झाला. भाऊसाहेबांनीं आपला ठाम निश्चय झाल्याचें पुन्हां सांगितलें पुढें भाऊसाहेबांनीं भास्करपंतांना त्यांच्या मंडळीसह कोंकणांतून देशावर आणलें; श्रीऔदुंबरक्षेत्रीं वाङ्निश्चय झाला व लवकरच मोठ्या थाटानें विवाहसमारंभ साजरा करण्यांत आला. मुलीचें सासरचें नांव पार्वती असें ठेवण्यांत आलें. ( माहेरच्या नांवाचा अद्याप तपास लागलेला नाहीं. हिचा जन्म इ. स. १७७९ त झाला. ) माधवपार्वतीचा हा जोडा अनुपम झाला यांत शंका नाहीं. पुढें कांहीं वर्षांनीं पार्वतीबाईस पुत्रसंतान झालें. मुलाचें नांव गोविंद ठेविलें. तोच मुलगा गोविंदराव उर्फ नानासाहेब चिंचणीकर होय. माधवरावास गाड्याघोडीं, धनदौलत, मानमरातब कांहीं कमी नव्हतें. पार्वतीबाईसारखी सात्त्विक व सुशील पत्नी मिळाल्यानें त्यांच्या धनदौलतीस विशेष शोभा आली होती. पण दैवगती विचित्र ! अशा साध्वीच्या सात्त्विक—सहवासांतून निष्ठुर काळानें माधवरावांस ओढून नेलें. पण पार्वतीमाधवाचें प्रेमच असें स्वर्गीय व दिव्य होतें, कीं दैवासही त्यांची

ताडातोड करणें अशक्य झालें. चार दिवसांची ही मृन्मय कुडी काळानें मातीस मिळविली म्हणून पवित्र प्रेमपाशानें बद्ध झालेल्या आत्म्यांची जोडी दैवाच्या देवाला तरी फोडतां येईल का ? नाहीं नाहीं तें कदापि शक्य नाहीं. माधवराव गेले म्हणून पार्वतीबाई रडत बसल्या नाहींत. माधव कैलासास निघोन गेले खरें पण पार्वती त्यांच्या पाठोपाठ अग्नीच्या दिव्य-रथांतून तिकडेच जाण्याला सज्ज झाल्या. माधवाचा कैलासनिवास आम्हां मर्त्यांस काय माहीत ? तो त्या पार्वतीसच ठाऊक. तिच्या मनाची खातरीच कीं, डोळा चुकवून दुसरीकडे कुठं जाणं व्हावयाचं नाहीं. मग ती रडत कशाला बसेल ? कैलासाला अग्नीच्या दिव्यरथांतून ताबडतोब जाण्याचें त्या देवतेनें ठरविलें. या दिव्यं रथावर ती हसतखेळतच चढली असेल तर त्यांत नवल काय ? अत्यंत क्षणभंगुर असें राज्यपद तिला भुलवील काय ? नानासाहेबांसारख्या होतकरू पुत्राची ममता तिला मागें फिरवील काय ? असे किती पुत्र जन्मोजन्मीं तिच्या पवित्र उदरांतून जन्मले असतील ? जन्मोजन्मींच्या चिरंतन समरसतेकरतां अग्निनारायणाच्या साक्षीनें ज्या माधवाच्या चिरसमागमाची तिनें शपथ वाहिली त्याचा विरह क्षणभर तरी तिला सहन होईल काय ? नाहीं. मग ती त्या भिकार धनदौलतीची काय म्हणून किंमत करील ? तिची सर्व धनदौलत, तिचें सर्वस्व म्हणजे माधवराव. ते गेल्यावर तिचा पाय मागें कसा रहाणार ? झालें.

सती जाण्याचें ठरल्याबरोबर माधवरावाचा विगतचेतन देह एका पालखींत घालण्यांत आला. दहनविधी पार्वतीबाईच्या इच्छेप्रमाणें श्री-कृष्णाकांठीं भिलवडीस करण्याचें ठरलें. चिंचणीहून भिलवडी १२-१३ मैलांवर आहे. पालखीबरोबर पार्वती देवी हंसत भिलवडीस चालली. चिंच-णीचे कित्येक लोक प्रेतयात्रेस आले होते. त्यांनीं तिला मेण्यांत अगर पालखींत बसून जाण्याचा आग्रह केला. त्यावर तिनें त्यांस विचारलें:— 'बाबांनो, ही वेळ मेण्यांत बसण्याची आहे का ?' बिचारे या प्रश्नास काय उत्तर देणार ? तिनें पायांतही कांहीं घातलें नव्हतें. ती तशीच अनवाणी १२-१३ मैल शवाबरोबर चालत आली.

भिलवडीस आल्यानंतर गांवांतील सर्व सुवासिनींनीं तिची ओटी भरली. तिनेंही योग्य तो दानधर्म केला. इकडे चिता रचण्याचें काम सुरूं झालें होतें. तिकडे ही देवता सर्वांचा आनंदित मुद्रेनें निरोप घेत होती. सर्वांच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. भिलवडीचा घाट विस्तीर्ण पण आयाबाहिणी लहान–थोर यांनीं तो गजबजून गेला होता. सर्वांना त्या देवतेशीं दोन गोष्टी स्फुंदत स्फुंदत कां होईना बोलाव्या असें वाटत होतें. ती सर्वांचें समाधान करीत होती. ‘ ईश्वरानें पार्वतीस बोलावलें ’ असें ती शांतमुद्रेनें सर्वांस सांगत होती.

ती साध्वी चिता रचणाऱ्यांना विनोदानें म्हणाली:–‘ चिता चांगली ऐसपैस रचा, दोघांनाही निजण्याजोगी ती असूं द्या !’ हाय हाय !! कोण हे शब्द ! अग्निकाष्ठाच्या चितेला शय्या समजणारी ही बाई खातरीनें देवकोटींतीलच होय.

सती जाण्याचे आधीं भावानें वेणी घालावयाची असते. त्याप्रमाणें तिचा भाऊ विनायकराव कोल्हटकर यानें तिची वेणी घातली. या वेळीं प्रेमाची खूण म्हणून तिनें वेणींतील केवडा व हातांतील सोन्याची बांगडी विनायकरावांस काढून दिली. मग त्या खळखळणाऱ्या श्रीकृष्णाबाईचा, जमलेल्या आप्तेष्टांचा व इतर लोकांचा एकदांचा शेवटचा निरोप तिनें घेतला व माधवरावांच्या सन्निध शयन केलें. क्षणार्धांत चित पेटली व श्रीअग्निनारायणानें तिला आपल्या दिव्यरथांतून कैलासवासी माधवरावांकडे नेले. त्यांचे अस्थिपंजर कृष्णेच्या कांठीं एकमेकांत विलीन झालेले दिसले. मातीचीं घरकुलीं फोडून टाकून तीं शकुन्तशकुन्तिका कैलासकुंजाकडे उडून गेलीं. जमलेला जनसंमर्द विव्हल होऊन अश्रुपूर्णनेत्रांनीं आपापल्या घरीं निघून गेला. शाहिरांनीं या प्रसंगाचे पोवाडे गायिले. पार्वती-माधवांचीं नांवें सर्वतोमुखीं झालीं. ही गोष्ट इ. स. १८१८ त झाली. हिंदुस्थानांतील हें जवळ जवळ शेवटचेंच अग्निदिव्य होय व याच वर्षीं सतीच्या मागोमाग जणूं काय तिच्याविना जगणें न आवडून पेशवाईही बुडाली. ही एक विधिघटनाच म्हणावयाची.

नं. 320

भिलवडीच्या त्या विस्तीर्ण नदीघाटावर एका चांदण्या रात्रीं मी मित्रांसह गेलों होतों. चांदण्या रात्रीं तेथील शोभा खरोखरीच अत्यंत रमणीय असत्ये. लांबवरून वहात येत असलेला चकचकीत जलप्रवाह, दुथडी असलेली दाट हिरवळ व त्यांत चांदणें; असा हृदयंगम मिलाफ त्या दिवशीं झाला असल्यानें पांचेच्या पात्रांत हिरेमाणिकें ठेवल्यासारखा भास होत होता. मातोश्री पार्वतीबाईच्या पुण्याईचें व पावित्र्याचें दृश्य स्वरूपच अशा त्या दिव्य देखाव्यामध्यें मित्रांसह मी गोष्टी बोलत असतां मला तिचें चरित्र आठवलें. छातीवर हात ठेवून अत्यंत अभिमानानें मीं सदर ऐतिहासिक प्रसंगाची हकीकत माझे मित्रांस सांगितली. माझे * खापरपणजे भास्करपंत कोल्हटकर यांची कन्या पार्वतीबाई ही परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पुत्र माधवराव यांस दिली होती व ती माझी–आम्हां कोल्हटकर घराण्याची प्रत्यक्ष देवताच आहे असें मीं अभिमानानें व गौरवानें सांगितलें. आतां त्या घाटावर जातांच देवी पार्वतीचें अनन्यभावें स्मरण करून साष्टांग नमस्कार घातल्याविना आम्हां कोल्हटकरांस राहवत नाहीं. "आई, माउली, देवी ! ! ! तूं आम्हां लेकरांस

---

*भास्करपंत
- पार्वतीबाई
- विनायक
  - रामचंद्र
    - व्यंकटेश
      - यशवंत
        - दामोदर ( लेखक )

स्वर्गांत तरी भेटशील कां? भेटलीसच तर तुझे पाय धुवून तें तीर्थ आम्ही प्राशन करून पवित्र होऊं. भिलवडीच्या घाटावरील मृत्तिका तुझ्या पाद-स्पर्शानें पुनीत झाली आहे म्हणून आम्ही ती मस्तकास लावून घेतों, तींत गडबडा लोळतों व त्यांतच सार्थक मानतों, हें तुला ठाऊक आहे काय? काय करूं मन राहवत नाहीं. तुझीं आजच्या पिढीचीं नातवंडें, पणतवंडें तुझ्या प्रेमानें गहिंवरून येतात; येवढें जरी देवी, तुला कळलें तरी आम्ही आपणांस धन्य समजूं. हरभटजींच्या तपश्चर्येनें व पार्वतीमाईच्या अग्निदिव्यानें आज त्यांची पटवर्धन व कोल्हटकर घराण्यांतील संतती सुखांत आहे. पटवर्धनांची व कोल्हटकरांची मायमाउली देवी पार्वती इच्याच उज्वल स्फूर्तीनें या तिच्याच एका लेंकरास प्रस्तुत पुस्तक लिहिण्याची स्फूर्ति झाली."

लेखकाच्या अपक्वबुद्धीनें, आकुंचित ग्रंथावलोकनानें व अत्यल्प अनुभवानें या लहानशा ग्रंथांत पुष्कळच चुका असतील— व त्या आहेत याची जाणीव लेखकास आहे. त्यांतल्या त्यांत प्रमुख म्हटली म्हणजे 'हें कोणाकरितां लिहिलें आहे?' या मार्मिकांच्या प्रश्नास निश्चित उत्तर देण्याची अशक्यता ही होय. कोणास हा ग्रंथ म्हणजे स्त्रीजातीची सोदाहरण व ऐतिहासिक पुराव्यासह केलेली तरफदारी वाटेल. कोणांस स्त्रियांच्या उन्नतीकरितां कांहीं उज्वल उदाहरणें देऊन त्यांस या ग्रंथानें तत्त्वबोध केला आहे असें वाटेल. मला स्वतःला यापैकीं कोणता उद्देश पुढें ठेवला आहे हें सांगतां येत नाहीं. पुस्तक लिहीत असतां एकादें उत्तम स्त्रीचरित्र सांगण्याचा प्रसंग आला म्हणजे मी उद्देशाच्या अनिश्चितत्वामुळें त्या चरित्राविषयीं व त्याच्या अनु-षंगानें एकंदरींत स्त्रीजातीविषयीं मनांत आलेले विचार लिहिलेले आहेत. यांत दोन्ही तऱ्हेचे उद्देश साध्य होत असल्यास बरेंच झालें. पण या दोन प्रकारच्या जिज्ञासू वाचकांनीं एक गोष्ट लक्ष्यांत ठेवावी. पहिल्या प्रकारच्या जिज्ञासूंनीं उपदेशात्मक—वास्तविक पाहातां लेखक उपदेश

करण्यास नालायकच आहे—भाग वाचून दोष देण्यास सज्ज होऊं नये व दुसऱ्या प्रकारच्या वाचकांनीं सर्वसाधारण स्त्रीजातीविषयीं आलेले उद्गार उपदेशपर नसून स्तुतिपर असल्याचें पाहून लेखकांस 'खुशामत्या' ही संज्ञा देण्याचें धाडस करूं नये. सर्वसाधारण स्त्रीजातीविषयीं आलेले उद्गार स्त्रीपूर्णत्व म्हणजे काय हें दाखविण्याकरितांच आहेत हें लक्ष्यांत ठेवावें.

स्त्रीजातीचा 'खुशामत्या' असें म्हटल्यास जितकें मला वाईट वाटेल तितकें अधिकार नसतां भगिनींना उपदेश करणारा असें म्हटल्यास वाटणार नाहीं.

याशिवायही पुष्कळ दोष यांत आहेत, असंबद्धता, एकांगीपणा, अपूर्णत्व, धाडस, भावनाधिक्य वगैरे दोष असतील त्यांची वाचक क्षमा करतीलच.

पुस्तकांत मी जी माहिती दिली आहे ती मराठींत प्रसिद्ध झालेल्या 'स्त्रीरत्नहार,' 'भारतीय युवति रत्नमाला,' वगैरे ग्रंथांतून घेतली आहे. "Women's Influence in the East," नवयुग, मनोरंजन यांच्या फायली वगैरेंचाही बराच उपयोग केला आहे. स्माईलचें 'कॅरेक्टर,' व 'ड्युटी' 'What a Young Woman ought to know' वगैरे ग्रंथांतूनही माहिती घेतली आहे. वरील सर्व ग्रंथकारांचा व लेखकांचा मी अत्यंत ऋणी आहें.

श्री हीं रत्नें ज्या कोंदणांत बसविलीं आहेत तें कदाचित् माझ्या दुर्दैवानें सोन्यारुप्याऐवजीं तांब्यापितळेचें असेल. पण तो दोष सर्वस्वी माझा आहे. मोत्याच्या माळेंतील मोती किती मौल्यवान् व पाणीदार आहेत येवढेंच वाचकांनीं पहावें. ते सुतांत गुंफणारा पटवेगार दरिद्री आहे म्हणून मोत्याला कमीपणा कां यावा? तूं चोरून आणलेले मोती चांगले आहेत येवढें म्हटल्यास मला बस्स झालें. नाहींतर चोर तो चोर व त्यांत पुन्हां मूर्ख चोर असा दुहेरी शहाणपणा पदरीं यावयाचा.

लेखक.

# अनुक्रमणिका.


| प्रकरणें. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ लें.— | मातृदेवोभव. ... ... ... | १–२६ |
| २ रें.— | सती व पति. ... ... ... | २७–५५ |
| ३ रें.— | " भूतदया " अगर विश्वभागिनी. ... | ५६–८५ |
| ४ थें.— | स्त्रिया व राजकारण. ... ... | ८६–११३ |
| ५ वें.— | संकीर्ण सुमनें. ... ... ... | ११४–१४१ |
| ६ वें.— | उषा व संध्या. ... ... ... | १४२–१६८ |
| ७ वें.— | शिक्षण व शील. ... ... | १६९–१९० |

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | १२ | त्यांच्या | तिच्या |
| ३ | १० | यांना | त्यांना |
| ६ | ३ | हस्तानें | हस्तांनीं |
| ७ | १ | असत | असतें |
| ८ | २५ | आहे, | आहे. |
| १४ | २ | त्याचें | त्यांचें |
| १७ | १९ | दिल्या, | दिल्या. |
| १९ | १ | उद्गारावर | उद्गाराविषयीं |
| २० | १ | कोणा सकळणार | कोणास कळणार |
| २० | २ | खळ | खेळ |
| २५ | २४ | पाहा | पहा |
| २७ | ९ | उलटपक्षा | उलटपक्षीं |
| ३२ | १४ | श्वं भवां भव | श्वश्वां भव |
| ३२ | १८ | शंनो भव | शंनो भव |
| ३६ | ७ | चरित्राबद्दल | चरित्रावरून |
| ३७ | ३ | निशीत | निशित |
| ४१ | १८ | शास्त्राकडे | शस्त्राकडे |
| ४६ | ११ | आला | आला. |
| ५७ | ९ | राष्ट्रसंसार | विश्वसंसार |
| ७२ | ५ | करण्याच्था | करण्याच्या |
| ७२ | १७ | त्यांच्या | त्याच्या |
| ७६ | ११ | तीं माणसें जीं | जीं माणसें तीं |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १०६ | २६ | राजरोज | राजरोस |
| १०९ | २७ | एखादें | एखादा |
| ११४ | ३ | वस्तुजातवार | वस्तुजातावर |
| १२२ | ४ | समुद्र | प्रदेश |
| १२२ | २३ | परदेशस्थ | स्वदेशस्थ |
| १२४ | ९ | इंग्लिश | युरोपियन |
| १२४ | २३ | युद्घावर | युद्धांत |
| १४५ | ५ | अस्तां | आतां |
| १७३ | २१ | पदार्थ, | पदार्थ– |
| १९० | १४ | जमानतां | ज़ुमानतां |

सं. नि. ३२०

# स्त्रियांचा कर्मयोग.

## प्रकरण १ लें.

### मातृदेवो भव.

उपाध्यायान्दशाचार्य । आचार्याणा शतं पिता ॥
सहस्रंतु पितुन्माता । गौरवेणातिरिच्यते ॥

भीष्मः—" बा युधिष्ठिरा, पितृभक्तीनें इहलोक व मातृभक्तीनें परलोक तरून जाशील. कारण मातेची योग्यता पित्याच्या अथवा सर्व पृथ्वीच्या दसपट आहे. माते-सारखा दुसरा गुरु नाहीं. "

महाभारत शांतिपर्व अध्याय १०८.

' गमिष्याम्युपहास्यतां ' ही कविकुलगुरु कालिदास यांची उक्ति मनश्चक्षूपुढें सारखी उभी राहात असतां व त्या कविश्रेष्ठाच्या बाबतींत ती जितकी खोटी ठरली तितकीच या मूढाच्या बाबतींत खरी ठरणार ही खातरी वाटत असतां मातेच्या चरणधूलीमध्यें हें लेकरूं आपलें मस्तक अत्यंत नम्रपणें नत करून त्यांच्या हृत्कुंजामध्यें सदैव विकसित असलेल्या आशिःकुसुमांच्या विश्वामध्यें दरवळून गेलेल्या परि-मळानें हरखून जाऊन हें साहस करण्यास प्रवृत्त होत आहे.

माउलींनों, तुम्हांस त्रिवार अत्यंत मनोभावें नमन करून ही लेखणी कधीं कधीं अधिकारबाह्य बरळून गेल्यास तुम्ही तिला क्षमा करालच अशी मनाशीं गांठ बांधून हिला मीं हातांत धरली आहे.

मातेच्या पवित्र उदरांतूनच या अर्भकास या जगाच्या रंगभूमीवर प्रथम यावयाची संधि मिळाली. त्या उपकाराचें स्मरण करून हे मातांनो,

तुमचाच हात धरून व तुमच्या गुणांचें कीर्तन करीत या वाङ्मय जगांत मी प्रवेश करीत आहें.

या जगांत म्यां मूढानें प्रवेश केल्यापासून मी एकेश्वरवादी बराच काल-पावेतों होतों हें मी खात्रीनें सांगतों. एकच पवित्र मूर्ति मी उपास्य समजत होतों. माझें त्यावेळीं या जगांतील ध्येय अगदीं एकच एक होतें. माझें चित्तैकाग्र्य एकाच मूर्तीवर होत असे. मी एकाच देवतेचा अनन्य-भक्त होतों. पुढें मी द्वैतवादी व पुढें पुढें तर अनेकेश्वरवादी कसा झालों हें माझें मला सांगतां येत नाहीं. शैशवावस्थेंतील त्या प्रेममय देवतेच्या गुणांचेंच आख्यान, प्रथम इतर वेदान्ताची प्रस्तावना न करितां, एकदम मी त्या देवतेच्या आशीर्वादानें सुरू करीत आहें.

आई ही गृहदेवता आहे. आपल्या प्रेमपूर्ण दृष्टीनें, मायाळू स्वभावानें, कनवाळू अंतःकरणानें तिनें सर्व दिशा प्रेममय केल्या आहेत. आईविना घरांत कसलीही शोभा नाहीं. आकाशामध्यें चंद्र-सूर्य नसल्यास आकाश कसें दिसेल, सरोवरामध्यें निर्मल जल नसल्यास सरोवर कसें दिसेल, तद्वतच आई घरामध्यें नसल्यास घर कसें दिसेल याची नुसती कल्पना करून पहा. घरांतील सडासारवण करणें, धान्याधुन्याची नीट व्यवस्था लावणें, स्वयंपाक करणें, एकंदरींत गृहव्यवस्था उत्तम राखणें हीं आईचीं वरवर दिसणारीं कर्तव्यें होत; पण यांत आईचें खरें महत्व नाहीं. ‘ आई आई ’ असे शब्द मनामध्यें उच्चारून पहा. मनोमंदिरामध्यें कोण प्रेमाचा प्रकाश पडतो बरें ? मनाच्या पडद्यावर आईची प्रेममय मूर्ति उमटलेली दिसते. आपल्या हातांनीं जी मायेनें मुलाचें मुख कुरवाळते, मुके घेते, पाजविते, जोजविते, लालनपालन करिते, जिच्या आगमनानें व दर्शनानें मुलांचें मुख प्रफुल्लित होतें; सारांश जिच्या सान्निध्यांत मुलास समीपतामुक्ति प्राप्त होते, इतकेंच काय पण केव्हां केव्हां बाह्य जगांतील सर्व वृत्ति मावळून मुलांची तन्मयता समाधिही लागते तीच आई.

'कुटुंब प्रेमाची भूमि आहे. येथें अशी दिव्यदेवता आहे कीं, तिच्या प्रेमाच्या, औदार्याच्या व माधुर्याच्या मोहनशक्तीनें जगांतील सर्व कर्तव्यें हलकीं, आनंदाचीं व गोड होतात असें माझिनी म्हणतो तें सर्वथैव खरें आहे

**हसतां मजला पाहुनि हसते । मुके मटामट कितितरि घेते ॥-**
**कोण करी हें जीवेभावें । ती माझी आई ॥**

भोळ्या भावानें ओथंबलेलें हें गाणें महाराष्ट्र भगिनींनीं कित्येकदां आपल्या कौमार्यावस्थेंत सोत्कंठ गाइलें असेल, व गातां गातां त्यांना त्या गानांतील अर्थाचा प्रत्यक्ष अनुभवही आला असेल; व अजूनही हें गाणें ऐकून यांना आपल्या बालपणीच्या सुखाच्या काळाची आठवण वारंवार होत असेल. बाबा रागावले म्हणजे आईमागें जाऊन वाचकहो तुम्ही कितीदां दडला असाल, व त्या पोरवयामध्यें, आपल्या सर्व अपराधांची माफी करणारी, अगर वडिलांच्या शासनापासून मुक्त करणारी अशी काय ती एकटी आईच असें वाटून, तुम्ही आईच्या गळ्यास कितीदां तरी मिठी मारली असेल. तुमच्या बालपणांतील हजारों गोष्टी तुम्हीं आठविल्यास 'आई आम्हांस मोठी देवता होती, आमची पाठराखी होती, आमची सर्वस्व होती' असें तुम्ही खातरीनें म्हणाल. ज्या आईच्या मायेच्या छायेखालीं, आम्हीं तुम्ही वाढलों तिचें महत्व वर्णावें तेवढें थोडेंच आहे; तिचें उदाहरण आम्हांतुम्हांपुढें होतें. तीच आम्हास भरवीत असे, तिनें दिलेल्या प्रेमाच्या घासानेंच आम्ही लहानाचे थोर झालों. लहानपणीं तिच्याच अंतःकरणाचा आदर्श आम्हांपुढें होता. तिचें बोलणें चालणें, तिचें इतरांशीं संभाषण, तिनें शिकविलेलीं गाणीं, तिनें शिकविलेलीं देवादिकांचीं स्तोत्रें यांनींच आमची दानत बनली. तिचीच शिकवण आम्हा सर्वांस होती. तिनें आमच्या तुमच्या मनोभूमिकेमध्यें जीं जीं बीजें पेरलीं त्यांचींच फळें आज आपण खात आहों. कारण नेपोलियननें म्हटल्याप्रमाणें "मुलाचें बरें

वाईट शील त्याच्या लहानपणीं त्यांस आईनें दिलेल्या शिक्षणावर अव-लंबून असतें. ”

लहानपणीं आमची बुद्धि वेतासारखी लवचीक असते. तिला पाहिजे तो आकार देण्याचें महत्वाचें काम आईच करिते. बुद्धीला सतेज करणें, मनोविकारांना वळण देणें, प्रसंगानुसार अंतःकरण मऊ अगर कठोर करण्यास शिकविणें, वगैरे महत्वाचीं कामें आईचींच होत. मुलांची बुद्धि शिक्षणानें तीव्र करणारी, त्यांचे मनोविकार मायेनें कोमल करणारी व शरीरयष्टि दक्षतेनें बळकट करणारी आई, राष्ट्राचीच बुद्धि, राष्ट्राचे मनोविकार, व राष्ट्राची शरीरयष्टि, तीव, कोमल व बळकट करीत असते.

वर्डस्वर्थनें म्हटल्याप्रमाणें खरोखरीच ‘ मूल मनुष्याचा पिता आहे ’, लहानपणींच मनुष्याच्या अंतःकरणप्रवृत्तीस, व बुद्धीस ज्या तऱ्हेची जितकी मुरड बसेल त्याच तऱ्हेची व तितकीच ती मोठेपणींही कायम राहील. आईच्या–नेत्रांतील प्रेमज्योतीनें जो प्रकाश बालपणीं, आपल्या हृदयाव-काशांत पडतो तोच आपल्या जीवनमार्गावरील अंधेरांत वाट दाखवितो. तिनें जो धैर्याचा दंड आपल्या हातीं दिला असेल, तोच आपणांस मार्गांतील भयादि शत्रूंचा नाश करण्यास उपयोगीं पडतो. तिनें जें शरीर संगोपिलें, तेंच आपणांस आमरणांत उपयोगीं पडतें. या कंटकमय जीवनमार्गांत लागणाऱ्या शिदोरीस तिनेंच आपल्या हस्तांनीं प्रेमाची गांठ बांधलेली असते. मोठमोठ्या विभूतींनीं आपल्या आईच्या ऋणांतून आपण जन्मोजन्मीं मुक्त होणार नाहीं, असें म्हटलें आहे तें सत्य आहे.

जगाची सर्वांत मोठी, अत्यंत महत्त्वाची, अत्यंत उपयुक्त कामगिरी जर कोणी करीत असेल तर ती आईच होय. पुष्कळदा असें होतें कीं, ही कामगिरी जनदृष्टीच्या आड केली असल्यानें तिचें महत्व मनुष्याच्या लक्षांत येत नाहीं. “ विश्वयंत्राच्या चक्रांचें परिभ्रमण निगूढामध्यें उगम पावलेल्या प्रवाहाच्या जोरावरच असतें ” असें हेल्प्स म्हणतो. नदीचा

प्रवाह शांतपणानें वाहात असतो, व तीराचीं सर्व मैदानें, हिरवीं चार दिसतात. पण त्या नदीचा प्रवाह कोठून उगम पावतो हें पाहूं गेल्यास तो निर्जन अरण्यांत, अंधारमय दरींत, दुरारोह पर्वतांच्या शिरोभागीं, अशाच जागेंत आढळतो. वडाचें झाड मोठें झालें म्हणजे, डेरेदार, छायामय व विस्तीर्ण असें होतें. पण त्याचा कोमल अंकुर निसर्ग-देवतेनें खडकांच्या फटींतूनच संगोपून वाढविलेला असतो; तद्वतच चार भिंतींच्या आड या समाजवृक्षाचें घटक मातेच्या प्रेमसिंचनानेंच वाढलेले असतात. माता ही नदीसारखी प्रेमजलांनीं परिप्लुत आहे. ती वृक्षासारखी मायेच्या छायेनें व्रिनटलेली आहे. लहानपणीं तिच्या प्रेमौ-घांत आपल्यास स्नान होतें. याच प्रेममय गंगेंत स्नान करणें, हें मनुष्याचें अत्यंत मोठें भाग्य असतें. हें लहानपणींच घडावयाचें असतें. आयुष्याच्या अरुणोदयांत असें प्रेमगंगेंत स्नान झाल्यानें सूर्योदय, सकाळ, माध्यान्ह, किंबहुना सर्व दिवसभर जीं मनुष्यास जबाबदारीचीं, धाडसाचीं, धैर्याचीं, व प्रेमाचीं कर्तव्यें करावीं लागतात तीं करण्यास त्याच्या अंगीं सामर्थ्य येतें.

रोजच्या दिवसास जसा अरुणोदय असतो तसाच आमच्या आयुष्यांत लहानपण हा अरुणोदय होय. "प्रभात कालावरून जशी दिवसाची तशीच बालपणावरून प्रौढपणाची कल्पना येते" असें मिल्टन कवि म्हणतो, तें फार मार्मिक आहे. भक्त शिरोमणि तुकाराम महाराजांनीं आईबापास श्रीक्षेत्र काशीची उपमा दिली आहे. ती अत्यंत सार्थ आहे. 'आई हीच काशींतील गंगा व पिता हाच काशींतील विश्वेश्वर होय' असें ते म्हणतात.

म्हणूनच मातापितरांची मनोभावें सेवा करणें हें एक मनुष्याचें आद्य कर्तव्य आहे. ज्या मातांच्या उदरीं श्रीरामचंद्रासारखीं रत्नें निर्माण झालीं; श्रीकृष्ण परमात्म्यानें सुद्धां ज्या स्त्री-जातीच्या उदरीं जन्म घेतला; शंकराचार्य, ख्रिस्त, बुद्ध, महंमद पैगंबर, नानक यांसारखे

धर्मवीर, तुकाराम, रामदास, एकनाथ, ज्ञानेश्वर यांसारखे साधुश्रेष्ठ; धर्मार्जुन, भीष्म, द्रोण, चंद्रगुप्त, रघुराजा, शिकंदर, ज्यूलियस सीझर, नेपोलियन, शिवाजी यांसारखे नरपुंगव ज्या मातांच्या हस्तानें वाढविले गेले, त्या माता धन्य होत व त्या सर्व जगास वंदनीय होत; या सर्व विभूतींचें गृहशिक्षण मातेकडूनच झालें. शाळेंतील व विश्वविद्यालयांतील शिक्षणाचा, गृहशिक्षण हाच पाया होय. "सर्व मानवजात घरांतील पाळण्यांतच वाढलेली आहे," असें माझिनी म्हणतो. ज्या प्रमाणांत हा गृहशिक्षणाचा पाया शुद्ध व मजबूत होईल, त्याच प्रमाणांत पुढील शिक्षणाची इमारत टिकाऊ होते. घरांतील शाळेचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा असतो. व या शाळेंतील पंतोजी अर्थात मातेशिवाय कोण असणार? जार्ज हरबर्ट म्हणतो कीं "एक आई शंभर शाळामास्तरांच्या योग्यतेची आहे." ती आपल्या प्रेमाच्या छडीनें बालकास शिकवीत असते. शाळामास्तरांची छडी आपण टाळतों पण आईची प्रेमाची छडी आपण आनंदानें घेतों. या शाळेमध्यें जीं मूलतत्वें आपल्यास कळतात तींच पुढें मनुष्यमात्राचे ठिकाणीं वृद्धिंगत होतात. गृहशिक्षणामध्यें जी व्यक्तिशः काळजी घेतली जाते ती पुढें घेतली जात नाहीं. राष्ट्रवीर, धर्मकर्ते, मुत्सद्दी इत्यादि नररत्नें गृहविद्यालयांतच प्रथम तयार होत असतात. जन्मास आल्यावर बालकाच्या प्रथमोच्छ्वासाबरोबर त्याचें शिक्षण सुरू होतें, असें स्माइल्स म्हणत असे. एका बाईनें एकदां एका धर्मोपदेशकास विचारलें 'मी माझ्या मुलांस शिक्षण देण्याचें केव्हांपासून सुरू करूं? तो आतां चार वर्षांचा आहे,' त्यानें उत्तर दिलें "अजूनही तूं सुरूं नाहीं कां केलेंस? तूं चार वर्षें फुकट घालविलीस. बाई, बालकांच्या गालावर झळकणाऱ्या पहिल्यां हास्याबरोबर त्याचें शिक्षण सुरूं होतें.' जन्मास आल्याबरोबर मुलांची स्थिति हीनदीनच असते. आई त्याकडे पाहून हंसली कीं, तेंही हंसतें. जोसेफ माझिनी म्हणतो कीं, 'मातेच्या पहिल्या चुंबनानें बालकास प्रेमाची

जाणीव होते.' त्यास सर्व जग नवीनच असत. दृष्टि फेकावी तिकडे त्यास नवें नवें दिसूं लागतें. पण त्यास परमेश्वरानें अशी कांहीं उपजत बुद्धि देऊन ठेविली आहे कीं, तें आईस ओळखतें. तिनें त्यास स्तनीं लावतांच त्यास आनंद होतो. एकंदरींत त्यास आईविना कोणीही प्रेमाचें भासत नाहीं.

लॉर्ड ब्रोघमनें या शिशुसंगोपनाचा चांगला अभ्यास केला होता. तो म्हणतो, 'मुलाच्या आठव्या महिन्यापासून ते तेराव्या महिन्यापर्यंत त्यास भौतिक सृष्टीचें सर्व ज्ञान होतें.' लहान मुलांची ग्रहणशक्ति, स्मृति व अनुकरणशक्ति, फार चलाख असते. ज्या तऱ्हेचा ठसा त्यांच्या मनःपटलावर उमटेल, ज्या तऱ्हेचें उदाहरण लहान मुलांच्या डोळ्यापुढें असेल, त्या तऱ्हेची त्यांची पुढील मनःप्रवृत्ति व वागणूक बनते. एका मोठ्या तत्ववेत्त्यानें म्हटल्याप्रमाणें मन ही एक अत्यंत ग्रहणशील अशी प्रतिबिंबधारी कांच आहे. ज्या तऱ्हेचे नमुने त्यापुढें ठेवावे त्या तऱ्हेचे हुबेहुब ठसे त्यावर उमटतात. या दृष्टीनें पाहतां आईची मूर्ति लहान मुलांच्या डोळ्यापुढें सदैव असल्यानें ती जें जें करिते त्यावर मुलांचें लक्ष निसर्गतःच असतें. पुष्कळजण असें म्हणतांना आपण ऐकतों कीं, "बापासारखीं मुलें." पण सत्य पाहूं गेल्यास 'आईसारखीं मुलें' असेंच अनुभवांतीं सिद्ध झालें आहे. मोठ्या तत्वज्ञासही जर आपण दुःखपीडितांच्या, अनीतिमानांच्या, क्रूरांच्या सहवासांत व अतिहीन व निकृष्ट अशा स्थितीमध्यें फार दिवस ठेविलें; तर त्याची सुद्धां प्रवृत्ति वाइटाकडे हळूं हळूं होऊं लागेल; म्हणूनच लहान मुलांपुढें आईनें आपल्या अंतःकरणाचा व आचरणाचा उत्तम आदर्श ठेविला पाहिजे. लहान मुलें मोठीं चौकस बुद्धीचीं असतात. त्यांस 'असें वागावें तसें वागावें' असें सांगितल्यास प्रथमतः तीं स्वस्थपणें ऐकून घेतात. पण जर कां आईबाप आपल्या उपदेशासारखें आपलें स्वतःचें वर्तन न ठेवितील तर एकना एक दिवशीं 'असें कां ?' असें मुलें विचारल्या-

शिवाय राहाणार नाहींत. ज्या घरांमध्यें आईबाप, आपलीं कर्तव्यकर्में ओळखून त्याप्रमाणें वागतात, त्या घरांतील मुलांना सहसा सांगावें लागतच नाहीं. उपदेशापेक्षां उदाहरण दसपट श्रेष्ठ आहे. चाकर-माणसांशीं कसें वागावें, थोरांशीं कसें बोलावें, भिक्षेकरी दारांत आल्यास त्यास कसें वागवावें इत्यादि रोजच्या व्यवहारांत हजारों गोष्टी अशा असतात कीं, त्या वरवर क्षुल्लक दिसल्या तरी, त्या लहान मुलांच्या मनावर इष्टानिष्ट परिणाम सावकाश पण निश्चित रूपानें घडवितात. मुलांना आईबापांच्या वागणुकींतील खरेखोटेपणा ताबडतोब कळतो. त्यांतल्या त्यांत मुलांचा आईशीं संबंध फार येतो, म्हणूनच आईवर फार मोठी जबाबदारी आहे. आईबापांनीं निष्काळजीपणानें, हयगयीनें, भित्रेपणानें, लाडिकपणानें ज्या चुका केल्या असतील त्या राष्ट्रावर परिणाम केल्याशिवाय कधींही राहात नाहींत. इतिहासामध्यें आपल्याला अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतील कीं, आयांच्या वाईट शिक्षणानें पिढीची पिढी, मनानें व शरिरानें अशक्त निपजली आहे. उदाहरणार्थ, इटली देशच घ्या. माझिनी स्वदेशस्थितीचें तात्कालीन वर्णन करीत असतां ह्मणतो कीं, ‘ तीस चाळीस वर्षांमागें ज्या आईबापांनीं आपल्या मुलास सुख हेंच ध्येय आहे असें शिकविलें, तींच आजच्या तरुणांच्या स्वार्थैकपरायणतेविषयीं व देशांतील रक्तपाताविषयीं जबाबदार आहेत.’ अशाच गोष्टी इतर राष्ट्राच्या अवनतीच्या आरंभीं घडलेल्या असतात. याशिवाय त्याला दुसरें सबळ कारणच नाहीं. मिल्ल आपल्या ‘ स्त्रियांची परवशता ’ या ग्रंथामध्यें म्हणतो कीं, ‘ इतिहासकार व तत्ववेत्ते यांनीं निर्विवाद असा सिद्धांत ठरवून ठाकला आहे कीं, कोणत्याही देशाची उन्नति अगर अवनति त्या देशांतील स्त्रियांच्या उन्नत अगर निकृष्ट स्थितीवर अवलंबून आहे.’ ही स्थिति पुष्कळ अंशानें, शिक्षणावर अवलंबून आहे, या विषयाचा आम्ही पुढें विचार केला असल्यानें त्याचा येथें ऊहापोह करण्याचें कारण नाहीं. येथें एवढेंच

सांगितलें म्हणजे पुरें कीं, मातांना इतिहासाचें, शिशुसंगोपनाचें व भागवतधर्माचें ज्ञान असणें अवश्य आहे. अडाणी आईबापांच्या पोटीं अडाणीच मुलें बहुधा निपजतात. विहिरींतच नाहीं, तेथें पोहऱ्यांत येणार कोठून ? नेपोलियन एकदां मॅडम कॅम्पन या बाईशीं बोलत असतां म्हणाला ' जुन्या तऱ्हेचें शिक्षण निरुपयोगी आहे. समाजाला सुशिक्षित करावयास आणखी कशाची बरें जरूर आहे ? ' बाईनें तत्काळ उत्तर दिलें ' सुशिक्षित मातांची '. बादशहास तें बरोबर पटलें, व तो म्हणाला, ' मातांना आपल्या मुलांना चांगल्या तऱ्हेनें शिकवितां येईल असें शिक्षण दिलेंच पाहिजे.' एका कालीं या आर्यभूमीवर अशा सुशिक्षित, सुसंस्कृत आर्यमाता नांदत होत्या. त्या आपल्या पुत्रांना उत्तम तऱ्हेचें शिक्षण देत होत्या. कारण कोवळ्या झाडावर देखील लहानपणींच 'रामराम' अशीं अक्षरें कोरलीं तर तीं वृक्ष मोठा झाल्यावरही जशींच्या तशींच राहतात, इतकेंच नव्हे तर तीं निसर्गतः तशींच आहेत काय असा भास होतो. तशी आईच्या शिक्षणामृताची गोष्ट आहे. आयुष्यांतील पुढील शिक्षक व शिक्षणशाळा आईपुढें तुच्छ आहेत तें याचकरितां. अंकुराचाच पुढें वृक्ष होतो. पण तो अंकूर नाजूक असल्यानें त्याच-वेळीं त्याला नाजूक व मायेच्या हातांनीं वाढवावा लागतो. मगच तो पुढें छायामय वृक्ष बनतो. एका मोठ्या ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें ' आई ही आपल्या जन्मभूमीहूनही श्रेष्ठ आहे व ज्याप्रमाणें अनेक देशांत प्रवास करून आल्यावर शेवटीं आपली जन्मभूमीच आपल्याला स्वर्गापेक्षांही श्रेष्ठ वाटते त्याप्रमाणेंच मराठी शाळेंतील पंतोजी, इंग्रजी शाळेंतील सर व कॉलेजांतील प्रोफेसर हे आईपुढें तुच्छ आहेत. ' प्रत्येक नवीन शिक्षकाचें शिक्षण त्याच्या मागील शिक्षकापेक्षां कमी महत्त्वाचें आहे.' हें एका सुज्ञाचें म्हणणें सर्वथैव खरें आहे. मोत्याला वेज पाडल्यानंतर त्यास सुवर्णतंतूमध्यें गुंफणें जितकें सोपें, तितकेंच आईच्या शिक्षणानंतर या वरच्या शिक्षकाचें शिकविणें सोपें होय. म्हणूनच आई जरी मेली तरी मुलाच्या अंतःकरणांत ती असते म्हणतात तें

कांहीं खोटें नाहीं. पुढील आयुष्यांत देखील, आईची केवळ आठवणं अगर प्रत्यक्ष उपदेश पुष्कळ उपयोगी पडतो. श्रीरामचंद्राचेंच उदाहरण घ्याना:—

श्रीरामचंद्र वनवासास निघण्याची अनुज्ञा घेण्याकरितां कौसल्येच्या मंदिरांत आला. बिचारी पुत्राच्या राज्याभिषेकाच्या व भावी सौख्याच्या मनोराज्यांतच होती. वनवासवार्ता ऐकून त्या माउलीचें हृदय फाटून गेलें, व मीही तुजबरोबर येणार म्हणून ती शोक करूं लागली. स्त्री-वाचकहो! सवतीमत्सर, दशरथाची कैकयीवरची प्रीति, ऐन सौख्याच्या वेळीं आलेला हृदयद्रावक प्रसंग, प्रत्यक्ष आपल्या एकुलत्या, उमलत्या, फुलत्या, श्रीरामचंद्राचा चौदा वर्षें वियोग, यांनीं त्या माउलीच्या मऊ हृदयामध्यें एकच काहूर उठवून दिलें; 'वत्सा, मी जरी थकलेली आहें, तरी गाय थकलेली असतांना वात्सल्याच्या प्रभावानें, पान्हा फुटून ती वत्साच्या मागें पळूं लागते, त्या प्रमाणेंच मी तुझ्या मागोमाग वनामध्यें येतें.' वाचकभगिनींनों, माउलीनों, कौसल्यामाता या वेळीं कोणत्या स्थितींत होती याची कल्पनाही आपल्यास करितां येणार नाहीं. तिनें हंबरडा फोडला व शोकाकुल होऊन म्हणाली, "बाळा रामचंद्रा, धान्याचे कण वेचून तूं कशीरे उपजीविका करशील? वनांतील तापानें तुझे नाजूक अवयव करपून जातील. बाळा मला बरोबर घेच."

पण केवळ पुत्रशोकानें विव्हळ होऊन स्वस्थ बसणारी ती माउली नव्हती. श्रीरामचंद्रानें "मी तुला वनवासानंतर खात्रीनें भेटेन, तोंवर तूं वृद्ध दशरथाची सेवा करून राहा." असें सांत्वन केलें व ती अत्यंत विचारी आणि विवेकी माउली त्यास मंगलकारक शब्दांनीं निरोप देऊं लागली. आईचेंच तें हृदय! क्षणभर तरी वात्सल्यानें व्याकूळ होणारच. पतिसेवा व धर्म या द्वयीनें कौसल्येला विवेक करण्यास बळ दिलें व ती रामास म्हणाली, "बा रामा, देव तुझें कल्याण करो! निसर्ग देवता तुझें पालन करो!

प्रा. नि ३०



हे रामा, तूं इष्ट कार्याकरितां खुशाल अरण्यामध्यें जा. हे वत्सा, तुझें सर्व हेतु सिद्धीस जाऊन तूं अयोध्येस परत ये. वत्सा तुझें सर्वदा कल्याण असो." असें म्हणून आशिर्वाद देत असतां श्रीरामचंद्रानें मातेच्या चरणीं लोटांगण घातलें. त्या माउलीनेंही त्यास पुन्हां पुन्हां कवटाळलें व आशिर्वाद देऊन त्याला निरोप दिला. मातेच्या आशीर्वादानें श्रीरामचंद्र वनवासांतील संकटें तरून गेला.

काय ? हें सर्व पुराण आहे म्हणतां ? नव्हे, खात्रीनें नव्हे. आईच्या आशीर्वादानें, आयुष्याचा अफाट दर्या मनुष्य खात्रीनें तरून जाईल. तिच्या प्रेमाचा जोर मनुष्याच्या दैवापेक्षांही ज्यास्त आहे. एका आधुनिक कवीनें म्हटल्याप्रमाणें—

**आई तुझ्याच ठायीं । सामर्थ्य नंदिनीचें ॥**

**..................................................**

**औदार्य या नभाचें । गांभीर्य सागराचें ॥**

आईला उपमा कसली देणार ? आई आकाशासारखी असते, सागरासारखी असते, वृक्षासारखी असते, गायीसारखी असते, नाहीं नाहीं. कोमल वस्तूंतील कोमलता, अफाट वस्तूंतील औदार्य व गांभीर्य, केवळ प्रेम, आत्यंतिक प्रेम, अस्सल प्रेम यांची ओतलेली आई ही एक देवता आहे. काव्यदेवता आईचें वर्णन कितपत करूं शकणार ? तुकोबाच्या अभंगवाणीनें तिचें असें वर्णन केलें आहे. " तुका म्हणे आई-बापें । अवघीं देवाचीं स्वरूपें. " या अभंगांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आलीच असेल. तुकोबांनी ' बाप व आई ' न म्हणतां ' आईबापें ' असें म्हटलें आहे. एका आधुनिक हरि-भक्तानें म्हटलें आहे. 'आईचें हृदय हें केवढ्याही प्रखर उष्णकाळांत न आटणारें व सर्वदा कांठोकाठ भरून वाहणारें अमृताचें सरोवर आहे.' अशा प्रेमस्वरूप आईची, कित्येक आत्मचारित्रकारांनीं फारच स्तुति केली आहे. जॉन रॅन्डॉल्फ नांवाचा एक अमेरिकन मुत्सद्दी म्हणतो ' मला

जर माझी आई लहानपणीं "बाळा हात जोडून गुडघे टेकून त्या परमेश्वराची प्रार्थना कर" असें न सांगती व मजकडून माझे चिमुकले हात धरून जर तसें करून न घेती तर मी आज खात्रीनें पक्का नास्तिक बनलों असतों.' प्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार स्कॉट याला त्याच्या पुढील आयुष्यांत जो पोवाडे वाङ्मयाचा नाद लागला तो त्याला लिहितां वाचतां यावयाच्या आधीं आईच्या व आजीच्या तोंडून ऐकलेल्या पोवाड्यामुळेंच होय. जिजाबाईंनीं शिवप्रभूंना जर लहानपणीं शिकविलें नसतें, तर शिवाजी महाराज एवढे कार्यकर्ते होतेना. लहानपणीं ऐकलेल्या भारत रामायणांतील वीररसपोषक गोष्टींचे त्यांच्या कोमल अंतःकरणावर जे सुपरिणाम झाले असतील, त्यांचेंच फल पुढील स्वराज्य-स्थापनेंत दिसून आलें. माता कुंतीनें पांडवांना दिलेलें शिक्षण व त्या-पासून झालेला फायदा, गांधारी माउलीनें दुर्योधनास युद्धारंभीं युद्धा-पासून परावृत्त करण्याचा केलेला आटोकाट प्रयत्न व तिनें युद्धारंभींच 'यतोधर्मस्ततो जयः' असा दुर्योधनास दिलेला मार्मिक निरोप, मातेचें न ऐकल्यामुळें पुढें झालेली अनर्थपरंपरा वगैरे सर्व गोष्टींच्या शिक्षणानें शिवाजीची मनोभूमिका, मातृभक्ति, पितृभक्ति, देवभक्ति, राष्ट्रभक्ति वगैरे सद्गुणांच्या बीजांनीं तयार झाली. शिवाजी महाराज प्रत्येक अडचणीच्या प्रसंगीं जिजामातेचा सल्ला घेत असत. या एका गोष्टीवरून मातृशिक्ष-णाचा किती फायदा होतो हें सिद्ध होत आहे.

शाहाजीपेक्षां जिजाबाईच्याच शिक्षणाचा शिवाजीवर ज्यास्त परिणाम झाला. आई ही पित्यापेक्षांही महत्त्वाचें काम करिते, हें कांहीं खोटें नाहीं. पित्याकडे मुलाची बुद्धि तयार करण्याचें काम अधिक प्रमाणावर असतें, पण आईचें काम यापेक्षां कितीतरी नाजूक व महत्त्वाचें असतें. आईच्या हातांत मुलांच्या अंतःकरणवृत्ति असतात. भावना व बुद्धि यांमध्यें भावना केव्हांही श्रेष्ठ आहे. भावना शुद्ध, निस्वार्थी, ओजस्वी व तडफी असते. तर बुद्धि विवेकी, संशयी, फाजील चिकित्सक

अशी असते. भावना आकाशगामी, निर्मल व जिवंत, तर बुद्धि पार्थिव, मलीन व क्वचित् प्रसंगीं आळशीही असते. भावना ही वटवृक्षासारखी व बुद्धि ही तालतरूसारखी असते. वटवृक्षावर नाना रंगी आनंदी विहंगम वास करितात. त्याच्या सावलीमध्यें कोणीही पांथस्थ येऊन खुशाल विश्रांति घेऊं शकतो. वटवृक्षाचें स्वरूप सुंदर व मृदुपल्लवांकित असतें. पण ताल तरूची गोष्ट याहून निराळी आहे. त्याच्या पायथ्याशींच तेवढी सावली असते. केवळ शिरावरच हिरवें दिसतें. दोन पक्षी फारतर आपलें घरटें तेथें बांधून राहातील. वटवृक्षाची छायामय भूतदया, विस्तीर्णतेंतील औदार्य, पल्लवांच्या तकाकींतील स्फूर्ति भावनेमध्यें पूर्णपणें असते. पण तालवृक्षाची तात्पूर्ती अल्प किंबहुना अनुदार छाया, त्याच्या उच्चतेंतील सडेसोटपणा यांचें बुद्धीशीं साहश्य आहे. वटवृक्षाच्या शाखाबाहुल्यांत दिसणारी नानाविधता, भावनेंत दृग्गोचर होणाऱ्या तरलतरंगाप्रमाणेंच होय.

मी ही आईची वटवृक्षाशीं व पित्याची ताल तरूशीं उपमा लांबवीत बसत नाहीं. मातापितरांच्या उभयविध शिक्षणाचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सेंट ऑगस्टाईनचें होय. सेंट ऑगस्टाईनच्या पित्यानें त्याच्या बौद्धिक शिक्षणाविषयीं फारच काळजी घेतली. त्याच्या आईनें त्यास चांगुलपणाचा, औदार्याचा, व पावित्र्याचा उपदेश वारंवार केला. ऑगस्टाईनचा बाप दुर्मार्गी होता. त्यामुळें ऑगस्टाईनचीही प्रवृत्ति दुर्मार्गाकडेच वळली. पुष्कळ दिवसपर्यंत ऑगस्टाईन आपल्या वाईट मार्गापासून परावृत्त होईना. पण अखेरीस त्याच्या मातेच्या सतत उपदेशानें त्याचें मन वळलें. इतकेंच नव्हे तर तिच्या सदुपदेशानें, त्याच्या बापाचें वर्तनही सुधारलें व तिच्या सहनशीलतेचें चांगलें चीज झालें. मुलाच्या पुढील आयुष्यांत देखील तिचा फारच उपयोग झाला.

कधीं कधीं असें होतें कीं, बालपणीं आईबापांनीं केलेल्या उपदेशाचा तात्कालिक परिणाम होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर पुष्कळ वर्षां

नंतर, किंबहुना क्वचित् मातापितरांच्या पश्चात देखील, त्यांच्या उपदेशाचा परिणाम मुलांवर होतो, व त्याचें मन गतकालच्या पर्यालोचनानें, विषण्ण होऊन सन्मार्गी होतें. ज्याप्रमाणें निकस जमिनींत पेरलेलीं बीजें उगवत नाहींत, पण ती जमीन पुन्हांपुन्हां नांगरून साफ केल्यास किंवा कालांतरानें, भूकंपाच्या धक्यानें अगर डोंगरावरून येणाऱ्या प्रवाहांतील मातीचा बराच थर तीवर पडून, तींत पूर्वी पेरलेलीं बीजें उगवून एक प्रकारचें सानंद आश्चर्य वाटतें; त्याचप्रमाणें मानवी मनोभूमिकेची स्थिति आहे. ती निसर्गतः मंद असल्यास त्यांत उपदेशबीजें रुजत नाहींत. तिजवर आयुष्यांतील सुखदुःखांचा, पापपुण्यांच्या बऱ्यावाईट परिणामांचा व प्रत्यक्ष अनुभवांचा प्रवाह वाहात गेल्यानें अगर पश्चात्तापाच्या असह्य धक्यानें ती एकदम भुसभुशीत झाल्यानंतर तिच्यांत सद्वर्तन व सद्विचारांचीं बीजें रुजूं लागतात.

लहानपणीं आईनें प्रेमळ वाणीनें केलेला सदुपदेश स्मृतिकुहरांतून पुन्हा ऐकूं येऊं लागतो व मनुष्याच्या आयुष्यांत एकदम क्रांति घडून येते, अशीं इतिहासांत पुष्कळ उदाहरणें आहेत. रोजच्या व्यवहारांतही अशा गोष्टी घडत आहेत. घरचें अठराविश्वे दारिद्र्य असावें, मुलेंबाळें मुबलक असावीं, बापाची प्राप्ति थोडी असावी, अशा दारिद्र्यांत सुद्धां आईचें धैर्य अलोट असतें. त्यांतल्या त्यांत बाप व्यसनाधीन असल्यास तर त्या बिचाऱ्या आईची स्थिति विचारावयासच नको. अशा नाना आपदांतून केवळ ममतेनेंच आपला संसार गोड करून सुखानें राहाणाऱ्या आया किती तरी सांपडतील? दारिद्र्याला न जुमानणारी, स्वतः अत्यंत कष्ट सोसून मुलांची जोपासना करणारी, पतीला व्यसनपराङ्मुख करण्याचा प्रयत्न करणारी आईशिवाय दुसरी कोण असणार? अमेरिकेंतील मद्यपाननिषेधक चळवळीचा साधारण इतिहास ज्यांनीं वाचला असेल, त्यांची अशी खात्री झाली असेल कीं, आयांनीं जर नेटानें प्रयत्न केला नसता, तर लाखों कुटुंबें अनर्थपरंपरेमध्यें विलयास गेलीं असतीं.

दारुबाज नवऱ्याच्या व्यसनाधीनतेनें होत असलेला पैशाचा अपव्यय, या अपव्ययानें कुटुंबाचे होणारे हाल वगैरे गोष्टींनीं अमेरिकन स्त्रियांचीं हृदयें थरारलीं व त्यांनीं मद्यपानबंदीची प्रचंड चळवळ सुरू केली. आजतागायत त्यांना या चळवळींत उत्तम यश आलेलें आहे. नवरा दारू पिऊन घरीं येई व त्या दारूच्या धुंदींत तो आपल्या पत्नीस फारच छळी व मुलाचे हाल करी अशा प्रकारची पूर्वीची स्थिति आतां जवळ जवळ नाहींशी होत चालली आहे. या राष्ट्रीय कामगिरीचें श्रेय आयांकडेच आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. अशा रीतीनें आपल्या अंतःकरणाच्या सदयतेनें, कौटुंबिक दारिद्य व राष्ट्रीय व्यसनाधीनता, अमेरिकन स्त्रियांनीं नाहींशी केली. वरील उदाहरणावरून आईची योग्यता पित्याहून अधिक आहे हें स्पष्ट कळून येईल. टफ्नेल नांवाच्या इंग्रज ग्रंथकारानें शाळेच्या वार्षिक अहवालांत एका फॅक्टरीच्या म्यानेजरानें, मजूरदार मुलांची लायखी कशावरून ठरवीत असत याची माहिती दिली आहे. तो म्हणतो, मुलाची लायखी पाहातांना पहिल्यानें त्याची आई कशी होती अगर आहे याची पूर्ण माहिती घ्यावी. आई जर सद्वर्तनी, सुशील व शहाणी असेल तर मुलाची पूर्ण लायखी आहे असें समजावें. अशीं पुष्कळ उदाहरणें आपल्यास पहावयास सांपडतील कीं, बाप व्यसनी असूनही आईच्या चांगुलपणानें मुलें चांगलीं निपजलीं आहेत. पण त्याच्या उलट प्रकार मात्र क्वचितच आढळतो. जग जिंकण्यास शिल्लक राहिलें नाहीं म्हणून शोक करणाऱ्या शूर आलेक्झांडराच्या उदाहरणावरून तर आईबापांत कोण जास्ती धोरणी असतें हें कळून येईल. त्याच्या आईनें त्यास लहानपणींच सुशिक्षण देण्याचा प्रयत्न केला व त्याचा परिणाम मुलाच्या पुढील जीवितांतील औदार्यांत व पराक्रमांत दिसून आला. त्याचा बाप फारच दुष्ट होता. आपल्यास जीं जीं व्यसनें आहेत व आपल्यांत जे जे दोष आहेत ते ते आपल्या मुला मध्यें उतरावे अशी त्याची इच्छा होती.

अलेक्झांडरची आई फारच विनयशील व नियमित बायको होती. तीं आपला सर्व वेळ मुलाचें कल्याण करण्याकडेसच खर्च करीत असे. पण तिचें खरें महत्त्व तिनें आपल्या मुलाला साक्षर केलें, यांतच दिसत नसून त्या मुलाच्या पुढील थोर दानतेंत दिसूत येतें. पावित्र्य व चांगुल-पणा हीं सांसार्गिक व्यसनास चांगलीं औषधें आहेत, हें तिनें त्याच्या मनावर चांगलें बिंबवलें.

अलेक्झांडरच्या बापाची त्यावर फार नजर असे. त्यास कोण शिकवितो याची तो बारीक चौकशी करीत असे. पण आईच्या सावधगिरीनें तिनें जें जें त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला त्याची त्याची राजास न कळतांच सिद्धि झाली. एकदां कांहीं बातमी राजाच्या कानांवर गेली. त्यानें हाताखालील लोकांना मुलास विषप्रयोग करावा असा हुकूम सोडला. या दुष्ट प्रयत्नास आईच्या प्रयत्नांमुळें व दक्षतेमळें यश आलें नाहीं. हा इतिहास वाचून कोणत्या आर्य स्त्रीस प्रल्हाद व हिरण्यकश्यपु यांची गोष्ट आठवणार नाहीं ! असो.

अशा तऱ्हेचें पवित्र राष्ट्रीय कार्य मातांकडून होत असतें. घरांच्या आकुंचित स्थलामध्यें जरी तें कार्य घडत असलें तरी तें सर्व-व्यापी राष्ट्रीय कार्य होत असतें. यद्यपि स्त्रियांनीं कांहीं आकर्षण-शक्तीचा शोध लाविला नाहीं, मोठे दिग्विजय केले नाहींत, व्याख्यानें देऊन श्रोतेजनांस डुलविलें नाहीं, शेक्सपियरसारखीं नाटकें लिहिलीं नाहींत, तारागणांचे शोध लाविले नाहींत, गीतेवर भाष्यें लिहिलीं नाहींत, रासायनिक प्रयोग केले नाहींत; तथापि व्यासासारखे वेदांती, वाल्मिकीसारखे कवि, न्यूटनसारखे गणितज्ञ, शिवाजी, नेपोलियन-सारखे वीर, डिमास्थेनिस व सिसरोसारखे वक्ते,* मातांकडून वाढविले

* टीप—अलीकडे जेन ऑस्टेन, मेरी कारेली, जॉर्ज एलियटसारख्या कादंबरीलेखिका व डॉ. ॲनी बिझांट, मिस् अंडरहिलसारख्या विदुषी उत्पन्न होत आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

गेले ही त्यांची कामगिरी तितक्याच महत्वाची आहे असें कोण म्हणणार नाहीं?

साम्युअल जॉनसन यास आपल्या आईविषयीं फारच आदर व प्रेम होतें. तिनें आपल्यास धार्मिक शिक्षण फार उत्तम रीतीनें दिलें असें तो म्हणतो. पुढें जॉनसन मोठा ग्रंथकार झाला. व त्यास आईनें दिलेल्या शिक्षणाचा फारच उपयोग झाला. आईच्या उत्तर संस्काराकरितांच जॉनसननें रासेलस हा ग्रंथ लिहिला.

अमेरिकेचा पहिला योद्धा व मुत्सद्दी सत्यप्रिय जार्ज वाशिंगटन याची आई ही फारच हुषार, व्यवहारचतुर व शीलवती स्त्री होती. तिच्या ताब्यांत मोठी जिनगी असून तिची व्यवस्था पहाण्याचें काम तिच्याकडेच असे. आपल्या मुलांना शिक्षण द्यावयाचें मोठ्या जबाबदारीचें काम तिजवरच होतें. या सर्व कार्यांत तिला यशही आलें. जॉर्ज वाशिंगटन अकरा वर्षांचा असतांच त्याचा बाप निवर्तला होता, तरी या बाईच्या चिकाटीनें, सतत उद्योगानें, धैर्यानें, दूरदर्शीपणानें, तिच्या मुलांना मोठ्या स्पृहणीय अधिकाराच्या जागा मिळाल्या.

क्रॉमवेलचा चरित्रकारही त्याच्या आईची जितकी महती गातो तितकी बापाची गात नाहीं. क्रामवेलची आई फार कष्टाळू होती. स्वतःच्या निढळाच्या घामानें तिनें आपल्या पांचही मुलींच्या लग्नांकरितां बरेच पैसे मिळविले व मुली कुलीन घराण्यांतच दिल्या, हुंडाही खूप दिला. यावरून ती किती कर्तबगार होती हें सहज दिसून येईल.

नेपियर बंधूंची आईही अशीच धैर्यवान् होती. लहानपणापासून उच्च विचार, थोरांच्या थोर कृतींचें मनन, शौर्य यांचा धडा मुलांकडून तिनें गिरविला. त्यांच्या पुढील आयुष्यांतील आणीबाणीच्या प्रसंगीं उत्तेजन देण्यालाही ती जिवंत होती.

केनिंग, वयूरन, वेल्सली, पॅले, बेकन, ब्रोघॅम, प्रेसिडेंट अडॅम्स या सर्वांनीं आईविषयीं धन्योद्गार काढले आहेत. कँटची आई व वडील

सुशिक्षित, प्रामाणिक व सत्यप्रिय अशीं होतीं. विशेषत: आईविषयीं तो फार ममतेचे उद्गार काढी. लहानपणीं मुलाला आपल्या बरोबर फिरावयास नेऊन तिनें त्यास वनस्पतींचीं व तारांगणांचीं नांवें व माहिती हीं शिकविली. ती अत्यंत धार्मिक स्त्री होती. नेमलेल्या वेळीं ईश्वर-प्रार्थना दररोज झालीच पाहिजे अशी तिनें घरीं शिस्त ठेविली होती.

हेगेलची आई सुद्धां मोठी सुशिक्षित होती. तिच्यावर त्याचें फारच प्रेम होतें. प्रामाणिकपणा, मितव्यय, उद्योगप्रियता हे गुण तिच्याच शिक्षणानें हेगेलच्या अंगीं बाणले.

लेबनीझ याच्या आईनें तर आपल्या एकुलत्या एक मुलाला शिक्षविण्याकरितां फार परिश्रम घेतले. बापाच्या अंगच्या गुणापेक्षां आईचेच गुण त्याच्यामध्यें जास्त प्रमाणांत होते, असें त्याचा चरित्रकार म्हणतो. ती सर्वांस क्षमाशीलतेचें व दयेचें प्रत्यक्ष उदाहरण होती. ती सर्वांशीं मिळतें घेऊन सदोदित शांत वृत्तीनें वागत असे. तिच्या मुलानें जे धर्म व राजकारण यांमध्यें सलोखा घडवून आणण्याकरितां ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचे प्रयत्न केले तें सर्व तिच्याचपासून शिकलेल्या शांतपणाचें व उदारपणाचें फल होय.

प्रसिद्ध जर्मन कवि 'गटे' याची आई मोठी कुशाग्र बुद्धीची व तरुण मुलांचीं हृदयें हालविणारी स्त्री होती. कोणी एकजण जर्मनीमध्यें प्रवासास गेला असतां त्याला 'गटे'च्या आईशीं संभाषण करण्याचा प्रसंग आला. तो म्हणतो, 'या प्रसंगानें 'गटे' कसा महान् कवि झाला तें मला उत्तम कळलें.'

'ॲरे सहेफर'च्या आईनें त्यास एक उत्तम उपदेशपर असें पत्र पाठविलें होतें; तें असें—'बाळा, तूं मला तुझ्या चित्राचें चुंबन घेतांना पाहिलेंस व प्रेमातिरेकानें 'बाळा' हे शब्द उच्चारतांना ऐकलेंस तर मी जी तुला कांहीं कांहीं वेळां किंचित् कठोर शब्द बोलतें, ते किती कष्टानें बोलत असेन हें तुला कळून येईल.' या पत्रांतील या माउलीच्या बिन-

ओल उद्गारावर वाचकवर्गांनीं क्षणभर विचार करावा. ‘ मुलांच्या चित्राचें चुंबन ? वेडे ! चित्राचें चुंबन घेऊन तुला काय सुख होत असेल कोणास ठाऊक ? ’ असे कांहीं अरसिक लोक उद्गार काढतील, पण या वरवर वेड्या दिसणाऱ्या कृतीचा सहृदयतेनें विचार करणारास त्यांतील काव्य कळून येईल. यालाच म्हणतात आईचें हृदय. वेडावांचून हृदयाची कोडीं कशीं सुटणार ? वाचकहो, स्त्री वाचकहो, आईच्या प्रेमानें क्षणभरच काय पण अखंड जर वेडेच झालांत तर तुम्हांस जग खात्रीनें दोष देणार नाहीं. आई जर तुमच्या चित्राचें चुंबन घेते, तर तिच्या चरणाचें चुंबन तुम्हीं घेतल्यास तुम्हांस कोणी वेडे म्हणणार नाहीं.

स्थलांतरानें मायलेकरांचा वियोग झाला म्हणजे त्या मायलेकरांच्या परस्पर हृदयांचीं स्पंदनें एकाच तालामध्यें नैसर्गिक रीत्या चालू लागतात, हें अतींद्रियरीत्या होणारें सहसंवेदन असो अगर विचारसंक्रमण असो, त्याबद्दल आपल्याला विचार करण्याचें कारण नाहीं. पण या चमत्कारांत एक गोड जादू आहे हें खास. ती जादू शरीरास संवर्धक व मनास मोहक व पोषक आहे. एक विद्यार्थी आपल्या आईस सोडून विद्यार्जनाकरितां परगांवीं गेला होता. एका खोलींत तो प्रवासाच्या दगदगीनें श्रांत होऊन निजला असतां ‘ आई आई ’ अशी झोपेंत हाक मारूं लागला. सकृद्दर्शनीं ही गोष्ट फारशी महत्वाची वाटणार नाहीं. पण त्यांत काय काव्य भरलें आहे, हें एक माझ्या रसिक भगिनीनांच ठाऊक. अशा मुलास पाहून कवि लिहितोः

‘ बा बाहिलें मज कशास निजेंत बाळा ॥
भ्यालासिरे ! ’ म्हणुनि घेतिच चुंबनाला ॥
‘ माझा पुता करित काय असेल आतां ॥
कोठें असेल निजला हरि तूं पहाता ॥
तो काय हाय इतुक्यांतचि दूर जावा ॥
नाहीं तयास अजुनी परवास ठावा. ॥’

प्रत्यक्ष अनुभवाशिवाय ही गोष्ट कोणा सकळणार नाहीं. हृदयाचा खेळ असाच कोमल विकारतंतूंशीं चालतो. त्यास तर्काचा पीळ भरलेल्या दोरखंडांशीं काय करावयाचें आहे? माता ही आपल्या नैसर्गिक प्रेमानें वागत असल्यामुळें तर्कशास्त्राच्या बंधनाविरहित तिची वागणूक निर्दोष व निःसीम असते. 'अंटनी ट्रोलोप' आपल्या आईविषयीं म्हणतो, 'तिचें हृदय इतकें कोमल, तिची दुसऱ्याच्या हिताविषयींची इच्छा इतकी थोर, तिचा स्वार्थत्याग इतका जबर कीं तिच्या वागणुकीची तऱ्हा स्वाभाविकपणेंच तर्कशास्त्राशीं तंतोतंत जुळत असे.' 'माझें हृदय आईशींच मोकळेपणानें खेळे' असें कार्लाईल म्हणतो. यांतील मर्म वाचकांस समजलें असेलच. कार्लाईलची आई मोठी धार्मिक होती. तिला आपल्या मुलांच्या बुद्धीविषयीं, कर्तबगारीविषयीं, मोठा विश्वास होता व त्या तऱ्हेनें ती त्यांस उत्तेजन देई. कार्लाईलच्या आईसारखी रस्कीनची आईही अत्यंत धार्मिक होती. तिनें मुलाकडून लहानपणीं अथपासून इतिपर्यंत सर्व बायबल वाचून घेतलें, इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं उत्तम भाग पाठ करून घेतला. याचा परिणाम रस्कीनच्या भाषाशैलीवर फारच उत्तम झाला.

आमच्या देशांत वर्णाश्रमधर्माप्रमाणें आठ नऊ वर्षें आईबापांच्या सहवासांत घालवून नंतर गुरुगृहीं विद्यार्जनाकरितां मुलास पाठविण्याची चाल होती. त्यावेळीं केवढा मायेचा पाश तोडावा लागत असेल? आठ नऊ वर्षांचें पोर तें काय व तसल्या कोंवळ्या वयामध्यें त्यास गुरुगृहींच्या खडतर सेवेस व तपश्चर्येस पाठवावयाचें तें काय? पण आर्य माता 'माझा बाळया, माझा सोन्या, कसा बरें मी तुला पाठवूं.' असें म्हणत बसत नसत. मुलांचें शिक्षण उत्तम व्हावें याकरितां त्या केवढा बरें मनोनिग्रह करीत! हा कठोरपणा असें कोण म्हणेल? रत्नांना पैलूदार करण्यास त्यांस बरेच घाव बसावे लागतात. मोत्याला वेजें पाडतांना तीक्ष्ण शस्त्राचें अग्र त्यांत भोसकावें लागतें. बालपणीं आई मुलांस सर्व

संकटांपासून व बाह्य उपाधीपासून रक्षण करण्यास झटते. पण ही बाल्यावस्था संपली कीं मानवी संसारास पुढें लागणारी सामुग्री-मग ती शारीरिक असो, मानसिक असो,-ज्याची त्यासच तयार करावी लागते. म्हणून माता सोडून गुरुगृहीं मुलांस पाठविण्याचा परिपाठ असे. अशा वेळीं आईबापांनीं दाखविलेला तात्पुरता वाटणारा कठोरपणा, कठोरपणा नसून तो एक प्रकारचें दूरदर्शित्वच आहे. अशा दूरदर्शी माता या भरतखंडांत आर्यांच्या काळीं पुष्कळ होत्या. अलीकडे सुद्धां अशा धैर्याच्या स्त्रिया थोडयाबहुत होत आहेत.

हिंदुस्थानचे आधुनिक भीष्माचार्य दादाभाई नवरोजी यांची माता माणेकबाई यांनीं दादाभाईस पांचव्या वर्षींच शाळेंत घातलें. दादाभाईचे वडील मुलाच्या चवदाव्या वर्षींच वारले. अशा वेळीं जर दूरदर्शीपणानें व धैर्यानें दादाभाईस शिकविण्याचा माणेकबाईनें निश्चय केला नसता तर हिंदुस्थान एका पहिल्या प्रतीच्या धुरीणास कदाचित् पारखें झालें असतें. कदाचित् दादाभाईचें तें बौद्धिक तेज अज्ञानाच्या दडपणाखालीं दडूनच राहिलें असतें व त्याचा प्रकाश दडपणाखालील अंधारांतच केवळ दबून राहिला असता.

महात्मा गांधींना आईनें लहानपणीं उत्तम धर्मशिक्षण दिलें होतें. पण पुढील शिक्षणानें, त्यांचे मनांतील विचार बदलून गेल्यानें ते नास्तिक बनले. मांसभक्षणापर्यंत त्यांची मजल गेली. पण आश्चर्य हें कीं, शेवटीं मातृभक्तीनेंच त्यांचा उद्धार झाला. त्यांनीं ज्या दिवशीं मांस भक्षण केलें, त्या दिवशींचा आपला अनुभव त्यांनीं सांगितला आहे. ते म्हणतात ' त्या दिवशींच्या त्या कृष्ण कृत्याची आठवण रात्रीं काळ्या कुट्ट अंधारांत पिशाच्चासारखी मला भेडसावीत होती. त्या रात्रीं निमिषार्धही मला झोंप लागली नाहीं. पुढें पुढें रोज नवीन लबाड्या रचून आईस फसविणें बरें वाटेना ' शेवटीं त्यांनीं वाईट संगति सोडून दिली. अखेर त्यांचा सुनिश्चय मातृभक्तीनेंच तडीस नेला. पुढें महात्मा

गांधींना विलायतेस जाण्याचा प्रसंग आला, त्या वेळीं त्यांच्या आईनें त्यांस एका स्वामीकडे नेलें व त्यांच्यां देखत मुलाकडून एक शपथ घेवविली ती अशी 'मद्य मांस व स्त्री या त्रयीपासून मी दूर राहीन ! ! !' पुढें गांधी लंडनला गेले. तेथें किती मोहजाल पसरलेलें असतें तें साधारण मुंबईची ज्याला कल्पना आहे, त्याला सांगावयासच नको. पण त्यांनीं स्वतःच म्हटलें आहे कीं 'अशा इंद्रजालास मी भुललों नाहीं, याचें कारण माझ्या आईनें मजजवळून घेतलेलें वचन होय. पाप प्रवृत्ति मनांत उत्पन्न होतांच आईचें वचन ताबडतोब मनांत येई व मन एकदम माघार घेई.' आईनें घेतलेल्या शपथेचा कोण हा जोर ! पापपुण्यांच्या ओढाओढींत आईच्या वचनांचा जोर सत्याकडे, पुण्याकडे, पावित्र्याकडे, असल्यानें पापप्रवृत्ति व षड्रिपु हे तोंडघशीं पडले. महात्मा गांधींना आजची परमयोग्याची स्थिति त्या माउलीच्या पुण्याईनेंच प्राप्त झाली यांत काय शंका आहे ! भारतसेवक ना. गो. कृ. गोखले यांच्या ठाई आपल्या आईविषयीं अत्यंत आदर व प्रेम वसत असे. आई ज्या खोलींत निवर्तली त्या खोलीकडे ज्या वेळीं ते पाहात त्यावेळीं त्या खोलीस ते मातेचें चिंतन करून साष्टांग नमस्कार घालीत असत. प्रेमाचें वेड तें हेंच. ह्या प्रेमानें वेडे होणारे गोखल्यासारखे महाभाग फारच विरळा निपजतात.

उलटपक्षीं नीरोसारखे प्रत्यक्ष आईचा खून करणारे नराधम, जगाच्या इतिहासांत सांपडतात. रोमन इतिहासांत नीरो हा एक अद्वितीय क्रौर्याचा पुतळा होय. आईस मारेकऱ्यांच्या हातीं ठार करणारा नीरो कोणत्या हृदयाचा असेल हें केवळ कल्पनेनेंच कळणारें आहे.

खून करण्याच्या उद्देशानें ज्यावेळीं मारेकरी तिच्या खोलींत आले त्या वेळीं तिला त्यांच्या उद्देशाची कल्पनाच होईना. इतक्यांत एका दुष्टानें मागून येऊन तिच्या मस्तकावर एका काठीनें जोराचा तडाखा दिला. तेव्हां तिच्या मनांत हें कृत्य नीरोशिवाय कोणाचेंही नाहीं असें

पक्कें वाटलें. हाय ! हाय ! हा हृदयभेदक विचार मनांत आल्याबरोबर तिच्या हृदयांत कोण कालवाकालव झाली असेल ! ज्युलियस सीझरास त्याच्या जिवलग ब्रूटसनें मारलें. मारेकऱ्यामध्यें ब्रूटसचें तोंड पहातांच अत्यंत दुःखानें सीझरनें आपलें तोंड झग्यानें झांकून घेतलें. शेक्सपीयरनें वर्णन केल्याप्रमाणें ब्रूटसची कट्यार ज्या क्षणीं सीझरच्या हृदयांत खुपसली गेली त्याक्षणीं ज्यूलियसचें रक्त 'काय ही ब्रूटसची कट्यार' या आश्चर्यानें जणूं त्या गोष्टीची सत्यताच पहाण्याकरितां त्या कट्यारीबरोबरच वर उडून बाहेर आलें. जिवलगांनीं एखाद्याचा जीव घेतला व प्रत्यक्ष मुलांनीं आईचा जीव घेतला तर या दोन्ही कृतींत पुष्कळ अंतर आहे. नीरोची आई मारेकऱ्यांस म्हणाली, 'बाबांनों, कोणीच मजवर कृपा करीत नाहीं काय ?' कसली कृपा ? वाचकहो त्या व्याकुळमनस्क माउलीनें, 'जीवदानाची कृपा करा' असें म्हटलें असेल अशी कल्पना देखील तुमच्या मनास न शिवो. ती म्हणाली, 'बाबांनों, माझ्या शरीराच्या इतर भागावर मागाहून प्रहार करा. पण आधीं माझ्या पोटांत कट्यार भोसकण्याची कोणी तरी मजवर कृपा कराल काय ? ज्या माझ्या दुष्ट उदरांतून नीरोसारखा दिवटा निपजला, त्यांतच पहिल्यानें कट्यार खुपसणें योग्य होईल.' इतकें ती बोलते तोंच चारपांच जणांनीं आपल्या कट्यारी तिच्या पोटामध्यें भोसकल्या. व ती मरून पडली. वाचकहो, ज्या मातेच्या तोंडून वरील शब्द येतात त्या मातेचें पोट दुष्ट होतें काय ? नाहीं नाहीं, खात्रीनें नाहीं. नीरोसारखें विष त्या अमृतमय उदरांत कसें उत्पन्न झालें, हें एका परमेश्वरासच ठाऊक.

आईच्या लेकरांनों, मातेच्या पुत्रांनों, माउलीच्या छकुल्यांनों, ही गोष्ट ऐकून तुमच्या नेत्रांतून जर अश्रुधारा वाहिल्या नाहींत तर तुम्हीं सहृदय नाहीं असेंच मी खात्रीनें म्हणेन. भगिनींनों, तुमच्या नेत्रांतून अश्रूंचा पूर वाहूं लागलाच असेल. नीरोनें मारेकऱ्या हातीं, आपल्या आईस ठार केलें असें म्हणण्यापेक्षां जन्मतःच तो आईचें पोट फाडून तिचा प्राण घेऊनच बाहेर आला असें कां न म्हणावें ?

पण हीं मानवी स्वभावास अपवादात्मक उदाहरणें आहेत, तीं केवळ तुलनेकरितांच द्यावयाचीं असतात. अंधकाराशिवाय प्रकाशाची कल्पना येत नाहीं, तद्वतच नीच मनोवृत्तीची व उच्च मनोवृत्तीची गोष्ट आहे. पण नीरोच्या घोर पातकाचा उच्चार करून विटाळलेल्या या लेखणीस पुण्यात्म्यांच्या नामोच्चारानें शुद्ध केली पाहिजे असें मला वाटतें. म्हणून आतां पुन्हां आपण चांगल्या उदाहरणांकडे वळूं. श्रावणाची रामायणांतली कथा व अलीकडील पुंडलिकाची कथा, या सर्वश्रुतच आहेत. याकरितां वाचकवर्गास या पुण्य-कथांचें मनन करून नीरोच्या कथास्मरणाचें पाप धुवून काढण्याची मी विनंति करितों.

श्रीरामचंद्राची कौसल्या, श्रीकृष्णाची यशोदा, शिवाजीची जिजाई, किंबहुना सर्व तत्त्वज्ञांच्या, शूरांच्या, मुत्सद्यांच्या, कारागिरांच्या, गवयांच्या माता सुशिक्षित, सुशील अशा होत्या हें आपण पाहिलें भगिनींनों, भवितव्यतेच्या उदरांतून येणारे भावी आत्मे, भावी कालाच्या खाणींतील दिव्य रत्नें, कालरूप सदाफुलीस येणारा मनोहर मोहोर, कालाकाशांत उगवणारे तेजोमय तारक, जन्मरूप अरुणोदयकालीं जगास आत्मोदयानें विस्मित करणारे, आत्मतेजानें दिपविणारे, स्वगुणगंधानें दरवळून सोडणारे अनेक आत्मे, पवित्र दवबिंदूंच्या पडद्याआड योग्य काळाची, योग्य कोंदणाची वाट पाहात बसले आहेत.* त्यास आपल्या शुद्धा-

---

*टीपः–हिंद महिलांस अर्पण केलेल्या एका कवितेंत जेम्स स्कॉट म्हणतोः–

" Souls of unborn millions waiting,
Patient at the gates of birth,
Ever cry ' Oh give us bodies ',
Mother-women of the earth
Let us in, that we may grow
To the greater things that we are,
Not delay us on our journey
As we pass from star to star. "

चरणानें, निर्मल मनानें, प्रेमपूर्ण अंतःकरणानें व जाज्वल्य पातिव्रत्यानें तुम्ही आपल्या पवित्र उदरांमध्यें ठाव द्या. म्हणजे आपली हल्लींची कष्टद स्थिति नाहींशीं होण्यास विलंब लागणार नाहीं.

मुलांमुलींनो, आपल्या मातेची मनःपूर्वक सेवा करून तिला संतुष्ट ठेवा; कारण तिची सेवा हीच देशाची सेवा व देवाची सेवा होय, हें पक्कें लक्षांत ठेवा. मातृप्रेम सर्व प्रेमांत श्रेष्ठ आहे. देशभक्त आपल्या देशाला मायदेश अगर मायभूमि ( मदरलँड ) असें अत्यंतिक प्रेमानें म्हणतो. देवभक्ताची तर गोष्ट प्रसिद्ध आहे. ' विठाई माउलीचा धावा करणाऱ्या तुकारामाला मातृप्रेमाचा व सेवेचा लाभ झाला असलाच पाहिजे. त्याविना त्याच्या तोंडून देवाला आईची उपमा देण्याचें झालेंच नसतें. आईला देवाची उपमा देण्यांत फारसें महत्व नाहीं. पण देवाला मातेची उपमा देणें यांतच तिची खरी योग्यता आहे.

> **माझी विठ्ठल माउली । प्रेमपान्हा पान्हाइली ॥ १ ॥**
> **कुर्वाळुनी लावे स्तनीं । नवजे दुरी जवळूनी ॥ ध्रु० ॥**
> **केलीं पुरवी आळी । नव्हे निष्ठुर कोंवळीं ॥ २ ॥**
> **तुका म्हणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥ ३ ॥**

अशा रीतीनें, विठाई माउलीचा टाहो तिच्या लाडक्या लेकरानें फोडला आहे. बाळपणांतील निःसीम मातृप्रेमाची जगन्माउली विठाबाईच्या अंतिम प्रेमांत परिणति झाली. मुग्ध प्रेमाचा पान्हा ब्रह्मरसाच्या पान्ह्यांत परिणत झाला. सूक्ष्मामध्यें स्थूल सूक्ष्मरूपानें वास करितें व स्थूलामध्यें सूक्ष्म बीजरूपानें भरलेलें असतें. सूक्ष्मतेला गोजिरवाणें बाळसें असतें, ती गुटगुटीत टवटवीत दिसते. स्थूलतेंत भव्यपणा व रूबाब असतो. ती विशाल–विस्तृत दिसते. दोहोंतही मनोहारित्व आहे. असें पाहा कीं, नदी उगमाजवळ करांगुळीएवढी असते. पण त्या सूक्ष्मपणाभोंवतीं जी वनश्री असते ती पुढील प्रवाहाभोंवतीं क्वचितच

असते. तेथें जो शांत, रम्य व निर्मल देखावा असतो तो पुढें गंभीर, विस्तृत व गढूळ झालेला दृष्टीस पडतो.

मातृप्रेमाची व विश्वमाता विठाईच्या प्रेमाची अशीच स्थिति आहे. येथें हीं गोजिरवाण्या सूक्ष्माचीच भव्य स्थूलांत परिणति झाली आहे. निःसीम व निर्व्याज मातृप्रेमाचा सुवर्णी स्रोत आपल्या अंतिम विस्तृततेमध्यें ब्रह्मांडासही कवळतो. मातृप्रेमाचीच सरिता अखंडैकरस ब्रह्मानंद-सागरांत विलीन होते.

अशा त्या सच्चिदानंदमय मातृप्रेमाचे घुटके मानवास सतत मिळोत अशी जगदीशाची प्रार्थना करून हें लांबलेलें प्रकरण पुरें करितों.

‘ वंदेमातरम् ’

# प्रकरण दुसरें

## सती व पति.

अर्धं भार्या मनुष्यस्य, भार्या श्रेष्ठतमः सखा.
—( व्यास ).

अखिल दृश्यजातावर क्षणभर दृष्टि फेंकल्यास आपल्याला तें द्वैतमय आहे व याचे द्वैताच्या दुव्यानें तें अनाद्यनंत कालापासून संबद्ध आहे, असें दिसून येईल. हें द्वैत या ब्रह्मांडमालेचें मुख्य सूत्र आहे व त्यामुळेंच या देखाव्यास सुसंबद्धता आली आहे. इतकेंच काय, पण या अनाद्यनंततेंत व सुसंबद्धतेंत एक हृदयंगम जादू भरलेली आहे.

भेदात्मक विश्वांत जी गोडी भरलेली आहे, ती या द्वैतामुळेंच होय. भेद अगर भिन्नता हीं कांहीं निसर्गनियमांच्या विरुद्ध नव्हत. उलटपक्षा, तीं निसर्गाचींच मूलतत्त्वें असून त्याच्या संवर्धनास तीं पोषकच आहेत. ‘ भेद ’ शब्द विरोध या अर्थीं आम्ही योजीत नाहीं. त्याचा जर विरोध अगर वैर असा अर्थ केला तर द्वैतामधील माधुरी नष्ट होईल. व गोडीच्या जागीं कटुता व सुसंबद्धतेच्या जागीं असंबद्धता दिसूं लागेल. कोणतीही जीवसृष्टि घ्या. प्राणिमात्र, वनस्पतिजात, व मनुष्यमात्र या सर्वांमध्यें सामावून राहिलेलें द्वैत महत्त्वाचें तर खरेंच पण हृदयंगमही आहे. किंबहुना हृदयंगमता हें त्याचें मुख्य लक्षण आहे.

जगताची नित्यता या हृदयंगम द्वैतानेंच राखिली जाते. नभोमंडलांत पहा, वातावरणांत पहा, भूपृष्ठावर दृष्टि फेंका, जलसंचयाचें निरीक्षण करा, सर्वत्र, वर, खालीं, मध्यें द्वैतानेंच विश्व विभूषित असून तें विविध व विचित्र झालें आहे. अंबरांतील तारकांची प्रदक्षिणा

या द्वैतमय मोहिनीनें चालली आहे. सूर्यासभोंवार पृथ्वी पिंगा घालीत आहे. सुधाकराच्या केवल दर्शनानें दर्या दिङ्मूढ होऊन उचंबळत आहे. यच्चयावत् सर्व जीवजात परस्पर दर्शनानें प्रफुल्ल झालेलें दिसतें, तें याच द्वैतामधील मोहिनीनें होय. सकृद्दर्शनीं निर्जीव दिसणाऱ्या निसर्गामध्यें जें द्वैत तेंच जीवसृष्टीमध्यें दिसून येतें. मनुष्य-मात्राची उत्क्रांति कशी झाली, हें न पाहतां त्या सर्व उत्क्रांतावस्थेपूर्वी हेंच द्वैतत्त्व होतें, हें सिद्ध आहे. कारण मनुष्यमात्राचा प्रथमोद्गमही यापासूनच आहे. या द्वैतविचारांत मी द्वैताऽद्वैतांच्या तत्वविचारगर्तांत आपणा स्वतःस व वाचकांस नेत आहे, अशी समजूत होऊं नये, यासाठीं मला येथें सांगितलें पाहिजे कीं, मीं या ठिकाणीं द्वैताऽद्वैतांचा पुरस्कार केला आहे, तो तत्त्वजिज्ञासेकरितां नसून पतिपत्नीच्या पवित्र दांपत्यभावाचें अस्तित्व जगास व्यापून आहे, हें दाखविण्याकरितांच फक्त आहे. मानवजातीच्या धर्माच्या बुडाशींच द्यावापृथिवींचें दंपत्य निर्माण झाल्याचें आपणांस दिसून येतें. देवाबरोबर देवीची कल्पनाही सर्वत्र दिसून येतें. निरीश्वरवादांतही प्रकृतिपुरुषाचें मैहुण आहेच. या द्वैतांतूनच सृष्टीची उत्पत्ति झाली आहे. हा दंपत्यभाव जितका निर्मल, सत्त्वशील,सत्यनिष्ठ असेल तितकीच पुढील सृष्टि निर्मल व सत्त्वगुणसंपन्न होत असते. तेव्हां हें नातें सर्वतोपरी नैसर्गिकच असल्यानें त्याची मीमांसा न करणेंच चांगलें. या नैसर्गिक नात्यांत बऱ्याच सद्गुणांचा परिपोष होतो. परस्पर साहाय्य करण्याची निःस्वार्थबुद्धि असणें, परस्पर सुखदुःखांचे सारखेच भागीदार होणें व उभयतांमध्यें झालेली चूकभूल सांहजिकरीत्या विसरून जाणें, संकटकालाच्या अधिक प्रमाणावर एक-मेकांस जास्त जास्त प्रिय होणें वगैरे जे अनेक सात्विक स्वभावधर्म आहेत, त्यांची वृद्धि व पोषण पतिपत्नीभावामध्यें होत असतें. हीच या मनुष्यद्वयांतील एकता होय. यानेंच मनुष्यसमाजाची सुखवृद्धि होते. पतिपत्नी हें नातें समाजांत केव्हां उत्पन्न

झालें, याचा एथें फारसा विचार करण्याचें कारण नाहीं. एवढें ठाम व निश्चित म्हणतां येईल कीं, विवाहनिर्बंध हा समाजाबरोबर उत्पन्न झाला आहे. जगांतील कोणत्याही देशाचा इतिहास पाहिल्यास आधीं या ' विवाह ' नामक संस्थेच्या उत्पत्तीपासूनच त्याचा आरंभ झाला आहे, असें आढळून येईल. विवाहसंस्थेपूर्वी अनाचार होता अशी कल्पना किंवा अनुमान काढणें माझ्या मतें अप्रस्तुत व अप्रयोजकही आहे. कारण तशा काल्पनिक स्थितींत समाजाचें अस्तित्व होतें, असेंच म्हणतां येत नाहीं. जर ही काल्पनिक स्थिति खरी असेल तर त्या वेळीं मनुष्यसमाज अस्तित्वांत नसून पुच्छविषाणहीन पशूंचे कळपच हिंडत होते असें मानलें पाहिजे. तेव्हां समाजाच्या उत्पत्तीपासून विवाहसंस्था उत्पन्न झाल्या आहेत, असेंच आपण धरून चालूं. सर्वांत जुनें वाङ्मय म्हणजे ऋग्वेद. ऋग्वेद काळीं सुद्धां विवाहसंस्थेचें फार महत्त्व मानीत असत. याचा विस्तृत विचार योग्यस्थळीं मी पुढें करीत आहेंच. तथापि या ठिकाणीं स्त्रीजातीबद्दलचा आदर इतर किरकोळ प्रमाणांनीं मी सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहें. केवळ शाब्दिक पुरावा जरी असला तरी मनुष्य भाषा वापरण्यामध्यें कांहीं तारतम्यबुद्धि दाखवीत असल्यानें भाषेचें महत्व कांहीं नाहीं, असें कदापि होणार नाहीं. उच्चनीचतेच्या कल्पनेप्रमाणेंच मानवी विचारावर शब्दांची कमी अधिक किंमतीची शाल आपण टाकितों. बरें त्या शाब्दिक प्रमाणावर जर फार भिस्त ठेवितां येत नाहीं, असें कोणी म्हणेल तर त्यास निदान येवढें तरी कबूल करावें लागेल कीं कोणतेंही वाङ्मय तत्कालीन विचारांचें कांहीं अंशानें तरी द्योतक असतें. मग तें प्राचीन असो अगर अर्वाचीन असो, पौर्वात्य असो अगर पाश्चात्य असो, त्यामध्यें स्त्रीचा त्या त्या वेळेचा दर्जा काय काय होता, हें आपल्याला अल्पांशानें कां होईना पण पहावयास मिळेल. आपलें प्राचीन संस्कृत वाङ्मयच घ्या. 'श्री'शिवाय त्यांत कोणताच आरंभ होत नाहीं. देवादिकांचीं नांवें घेतांना आधीं स्त्रीजातीसच

महत्व दिलें जातें. 'सीताराम' 'राधाकृष्ण' 'लक्ष्मीनारायण' 'पार्वतीपरमेश्वर' इत्यादि शब्द स्त्रियांचे उच्चतादर्शक नाहींत, असें कोण म्हणेल ? नित्य व्यवहारांतसुद्धां आपण आईबाप, बहीणभाऊ, स्त्रीपुरुष हे शब्द वापरतों. त्यांत उघडपणें स्त्रीसच महत्त्व दिलें आहे. "वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये । जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥" या कालिदासाच्या मंगलचरणामध्यें फारच खुबी आहे. उपमान व उपमेय अत्यंत समर्पक साधिलीं आहेत. वाक् म्हणजे वाणी, ही स्त्रीलिंगी आहे. अर्थ म्हणजे त्या वाचेपासून मनांत पडणारा प्रकाश. वाक् व अर्थ हीं दोघें परस्परांशीं जशीं संलग्न आहेत, त्याचप्रमाणें पार्वतीपरमेश्वर हीं परस्पर-संलग्न आहेत. शंकराला आपण अर्धनारी नटेश्वर म्हणतों. त्यांतील रहस्य तरी हेंच. प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो म्हणतो'—"स्त्रीपुरुष हे एकाच पेशीपासून उत्पन्न झाले आहेत." विकासवादी तसेंच म्हणतो. उपनिषदांत ब्रह्मदेवच अर्ध्यारूपानें स्त्री झाला, असें आहे. बायबलांतही पुरुषाच्या अर्ध्याभागापासून स्त्री निर्माण केली, असें वचन आहे. या सर्व वाङ्मय पुराव्यावरून आपली अशी खात्री होईल कीं, एके काळीं स्त्रियांना पुरुषांपेक्षांही जास्त मान देत असत. द्रौपदीच्या पातिव्रत्यानें महाभारतास विशेष शोभा आली. सीतेच्या पातिव्रत्यानें रामायणांत जास्त सात्विकता आली. गोपींच्या निःसीम भक्तीनें भागवतास महत्त्व आलें. कालिदासानें शकुंतलेसाठीं शाकुंतल, भवभूतीनें मालतीसाठीं मालतीमाधव लिहिलें. युरोपियन वाङ्मयांतही हीच गोष्ट दृष्टीस पडते. प्रसिद्ध रोमन कवी डान्टे यानें तर एक महाकाव्य स्त्रीकरितांच लिहिलें. तो स्वतः दुर्मार्गप्रवृत्त होत असतां त्यापासून पराङ्मुख करून सन्मार्गी लावण्याचें श्रेय डान्टेनें तिजकडेच दिलें आहे. शेक्स्पीयरच्या बहुतेक नाटकांत नायिकेचें प्राधान्य आहे. रस्किन त्याच्या नाटकांविषयीं म्हणतोः—शेक्स्पीयरच्या नाटकांत नायिकांचेंच प्राधान्य आहे. इतकेंच काय पण त्याच्या नाटकांतील पुरुषपात्रांची ज्या ज्या वेळीं अवनति होते, त्या त्या वेळीं त्याना स्त्रीनेंच वांचविलें आहे. त्याचीं नाटकें बहुशा

पुरुषांच्या हेक्यानें दुःखपर्यवसायी होतात. स्कॉटच्या कादंबऱ्याही अशाच तऱ्हेच्या आहेत. रस्किननें हें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. अशा तऱ्हेनें सर्व वाङ्मयभक्तांनीं स्त्रीयांच्या गुणगायनाकरितां आपली लेखणी सज्ज केली आहे. यूरोपांतील मध्ययुगामध्यें स्त्रीविषयींचा आदर फारच होता. सरदार लोक आपल्या पत्नींच्या इच्छेबाहेर कधींही वागत नसत. कारण स्त्रीचें न ऐकणें अगर स्त्रीवर विश्वास न ठेवणें हीं खऱ्या प्रेमाचीं लक्षणें नव्हत, असें ते मानीत. या मध्ययुगामध्यें युद्धास जाण्याचे आधीं कमरेचा पट्टा पत्नीच्या हातानें घट्ट बांधून घेण्याची चाल असे. यास कोणी खुळेपण म्हणोत पण तसें तें खात्रीनें नव्हे. प्रियेनें प्रेमपूर्ण हस्तानें कमरेस आवळलेला पट्टा वीरास जितका स्फूर्तिदायक होतो, तितका तो प्रेमरहित हस्तांनीं बांधलेला होत नाहीं.

आतां आपण प्राचीन वाङ्मयाच्या भक्कम पुराव्याकडे वळूं. वैदिककालामध्यें स्त्रीपुरुषांच्या परस्परसंबंधाविषयीं काय मतें होतीं तें आपण पाहूं. ऋग्वेद हजारों वर्षांमागें झाला. एवढेंच आपण एथें म्हणूं. कारण तज्ज्ञ पंडितांत याविषयीं बराच मतभेद आहे. इ० स० पूर्वीं २००० ते १०००० वर्षांमध्यें वेद झाले, अगर होत असावेत, इतका तो मतभेद तीव्र आहे. अर्थात् असें साहजिकच वाटण्याचा संभव आहे कीं इतक्या प्राचीन काळीं हल्लीं सारख्या उच्च कल्पना, उच्च भावना व उत्तम तऱ्हेची समाजरचना असणें संभवनीय नाहीं. पण या वेदांमध्यें स्त्रीजातीविषयीं, विवाहकल्पनांविषयीं किती प्रागतिक मतें होतीं, हें त्या वेदांचें मार्मिक परिशीलन करणारांना सहज कळून येईल. ऋग्वेदांतील कांहीं मंत्र स्त्रियांनींच म्हटले आहेत. त्यांना मंत्र-द्रष्ट्या स्त्रिया असें त्या वेळीं म्हणत. अलीकडे ज्याला प्रतिभापूर्ण काव्य ( Inspired poetry ) म्हणतात, त्यांसच प्राचीन काळीं देवनिश्वसित असें म्हटलें आहे. अशी स्फूर्ति कांहीं स्त्रियांना होऊन ( ऋग्वेदामध्यें ) त्यांनीं म्हटलेलें मंत्र आहेत. यावरून त्यावेळची स्त्रीशिक्षणाची कल्पना येणार आहे.

वेदकालीं स्त्रियांची वागणूक कशी होती, हें खालील मंत्रावरून समजून येईल.

अधः पश्यस्व मोपरी । सन्तरां पादकौ हर

( खालीं बघून चाल, वर बघून चालूं नको, पाय जुळवून चालत जा. ) सच्छील स्त्रियांना ( व मनुष्यस्वभावांच्या नैसर्गिक प्रवृत्तीच्या बरे-वाईट परिणामाचा विचार ज्यांनीं केला आहे त्यांना ) वरील उपदेश खात्रीनें पटेल, यांत बिलकूल शंका नाहीं. पण वरील उपदेश हा अगदींच व्यवहारांतील झाला. याहीपेक्षां जास्त महत्त्वाचा उपदेश अगर आशीर्वाद स्त्रियांना दिलेले आढळतात. हल्लींसारख्या सासूबाई अगर सासरेबुवा त्या वेळीं खात्रीनें नव्हते, असें दिसून येतें. नणंदाही पण तशा नव्हत्या. उलटपक्षीं त्या वेळीं नवपरिणित वधूला असा आशीर्वाद दिलेला आढळतो.

सम्राज्ञी श्वशुरे भव
सम्राज्ञी श्वश्र्वां भव
ननान्दरि सम्राज्ञी भव
सम्राज्ञी अधिदेवृषु

याहीपुढें जाऊन वेद म्हणतो.

वीरसूर्देवकामास्योना शंनो भव
द्विपदे शं चतुष्पदे

तूं वीरजननी हो, देवभक्त हो. व सर्व तऱ्हेच्या जीवांचें रक्षण कर. हा आशीर्वाद कांहीं थोडा असामान्य नाहीं. वेदकाळीं अशा तऱ्हेचे अत्यंत स्पृहणीय व मननीय आशीर्वाद वधूस दिले जात असत. हें कोणास खरें देखील वाटणार नाहीं. ज्या वेळीं सर्व जगतावरील इतर राष्ट्रें पाशवी अवस्थेमध्यें रानावनांत श्वापदांसारखीं हिंडत होतीं; समाज

म्हणजे काय ? परमेश्वराशीं ऐक्य म्हणजे काय ? स्त्रीचा दर्जा काय ? तिचे हक्क काय? तिची कौटुंबिक सौख्यांत कोणती महती आहे ? ती काय राष्ट्रकार्य करूं शकेल ? या उच्च कल्पना कशाशीं खाव्या हें देखील त्यांना ठाऊक नव्हतें त्या वेळीं आर्यावर्तांतील आर्यस्त्री आपल्या तपानें, तेजानें व स्फूर्तीनें समाजामध्यें मोठ्या मानास पात्र झाली होती, हें स्पष्ट आहे. वरील तऱ्हेची स्त्रीव्यवहारनीतिच केवळ वेदांमध्यें सांगितली आहे, असें नाहीं. याहीपेक्षां विवाहसंस्थेविषयींची अत्युच्च कल्पना आपणांस वेदांमध्यें पहावयास मिळते.

" समंजन्तु विश्वे देवाः समापो हृदयानि नौ ।
संमातरिश्वा संधाता समुदेष्ट्री दधातुनौ "

वाचकहो, या कल्पनेइतकी बहारीची कल्पना तुम्हांस कोठें पहावयास मिळेल काय ? काव्य काव्य तें यापेक्षां निराळें कोठें असतें काय ? या मंत्रांतील माधुर्य प्रत्येक शब्दामध्यें दृग्गोचर होतें. ' समञ्जन्तु ' हा शब्द केवळ मधुर आहे. जरी त्यांतील संगीत क्षणभर सोडून दिलें, तरी ही कल्पनाच किती मनोरम आहे, पहा. सर्व ' विश्वेदेव ' तुमच्या हृदयांचें संमीलन करोत. वायु, जल, पृथ्वी सर्वच जग तुमच्या ऐक्यास मदत करोत. असा हा आशिर्वाद आहे.

लग्नाविषयीं कोणत्याही आधुनिक ग्रंथकारांची अगर कवींची कल्पना पहा, ती या वेदकल्पनेपासून उगम पावली आहे, असें तुम्हांस दिसेल. भवभूति आपल्या उत्तर रामचरित्रामध्यें हेंच म्हणतो.:—

" सुखे वा दुःखे वा क्वनु खलु तदैक्यं हृदययोः "

बा नव वधूवरांनो, तुम्हीं एकमेकांस केवळ आपलीं शरीरें अर्पण केलीं नाहींत, केवळ धनाच्या देवघेवीच्या उद्देशानें तुम्हीं एकरूप झाला नाहीं, केवळ लग्नविधींतील मंत्रतंत्रांनीं तुम्हीं बद्ध झालां नाहीं तर तुमच्या हृदयांची समरसता झाली पाहिजे. हृदय हेंच प्रेमाचें कोंदण

आहे. प्रेमबिंदूंनीं ओथंबलेलें तें कमळ आहे. अशा दोन हृदयांचा समागम म्हणजे किती महत्वाचा आहे ? या हृदयांच्या एकतानतेपासून निघणारें तेज अरुणतेजाहून रम्य आहे.

या तऱ्हेच्या काव्यमय कल्पना वेदकालानंतरही पौराणिक संस्कृत वाङ्मयामध्यें दृष्टोत्पत्तीस येतात. पुराणांमध्यें जायापतींच्या परस्पर प्रीतींचीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात. रामायण महाकाव्यामध्यें तर सीतारामांचें प्रेम किती सात्विक होतें, निःसीम होतें हें फारच काव्यमय भाषेमध्यें सांगितलें आहे.

श्रीरामचंद्र वनवासास जातेवेळीं सीतेनें बरोबर येण्याचा हट्ट धरिला रामानें तिला पुष्कळ समजून सांगितलें. तरी ती कांहीं केल्या ऐकेना. ती म्हणाली, ' आपल्याबरोबर वनामध्यें येणें म्हणजे कांहीं श्रम नाहींत. स्वामिन्, कुश, काश, शर, लव्हाळे आणि जे जे कांहीं कंटकवृक्ष मार्गामध्यें असतील, त्या सर्वांचा स्पर्श मला कापसाच्या अगर कृष्णाजिनाच्या स्पर्शासारखा होईल. आपल्याबरोबर जी स्थिति मला प्राप्त होणार असेल, तोच माझा स्वर्ग होय. ' हें ऐकून सीतापति राम म्हणाला, ' हे देवि, तुला माझ्या वियोगानें दुःख होत असेल, तर मला स्वर्गाचीही अभिरुचि नाहीं. सीते, तूं जो हा अत्युत्कृष्ट निश्चय केला आहेस, तो तुझ्या स्वतांच्या व माझ्या कुलाला अनुरूप असाच आहे. तुजवांचून मला आतां स्वर्गही रुचणार नाहीं. " ( अयोध्याकांड सर्ग २९-३० )

रावणाची मंदोदरी ही मोठी पतिव्रता, देवभक्त, पापभीरु स्त्री होती. सीतेचें हरण करूं नको, रामचंद्र हा विष्णूचा अवतार आहे' वगैरे गोष्टी तिनें रावणाला सांगितल्या. ही तिची पतिकल्याणाविषयीं व्यक्त होणारी दूर दृष्टि खरोखरच आश्चर्याची आहे. इंद्रजिताची सुलोचना ही सुद्धां याच योग्यतेची स्त्री होती.

पातिव्रत्यासाठीं प्रसिद्ध अशा पांच कन्यांपैकीं चार केवळ रामायणांतच सांपडतात. यावरून रामायण जणूं कांहीं स्त्रीधर्मविवेचनाकरितांच

रचिलें आहे काय ? असा क्षणभर भास होतो. द्रौपदीची पतिनिष्ठा कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. माता गांधारीची तर गोष्ट प्रसिद्धच आहे. धृतराष्ट्र हा फार सद्गुणी व राजकारणपटू आहे व त्याला राज्यपदारूढ केल्यास गांधार देशाचें फार कल्याण होईल या दूरदर्शीपणानेंच गांधारीनें तो अंध असतांही त्याच्या अंगच्या गुणासच किंमत देऊन त्याच्याशीं विवाह केला. व आपले डोळे जन्मभर बांधून घेतले. शंभर पुत्रांच्या जन्मोत्सवाच्या सोहाळ्यांतही तिनें नेत्र उघडले नाहींत. ती म्हणाली:— " ज्याप्रमाणें आराध्य देवता सोन्याची अगर मातीची असो, भक्ताला त्यांत कांहींच वाटत नाहीं. त्याप्रमाणें माझा पति कसलाहि असला तरी त्याची पत्नी झाल्यावर त्याच्या अंगच्या वैगुण्यानें माझ्या स्त्रीधर्माला कोणतीही अडचण येत नाहीं. "

पुढें भारतीय युद्धानंतर पांडवांस राज्यप्राप्ति झाली व गांधारी व धृतराष्ट्र यांनीं वानप्रस्थाश्रम घेतला. वनामध्यें हीं वृद्ध माणसें राहिलीं असतां पर्णकुटीला एक दिवस आग लागली. बाहेरील लोक " आग लागली बाहेर या " म्हणून ओरडूं लागले. धृतराष्ट्रास म्हातारपणाच्या अत्यंत अशक्ततेमुळें उठतां येईना; तेव्हां तो गांधारीस म्हणाला "प्रिये, मला उठवत नाहीं, तेव्हां तूं तरी या आगींतून बाहेर जा व आपले प्राण वांचीव.' गांधारीला गहिंवर आला व ती म्हणाली ' प्रिया, ज्या अग्नि-नारायणासमक्ष आपण दोघांनीं आजन्म एकमेकांपासून दूर राहणार नाहीं, अशी शपथ वाहिली, त्या अग्निनारायणासमक्षच ती शपथ मोडूं काय ? हें शक्यच नाहीं. ' असें ती म्हणते तों दोघांसही गहिंवर आला. व परस्परांस आलिंगून त्यांनीं आपले देह अग्निनारायणासच अर्पण केले. गांधारीचें कोण हें पतिप्रेम ! अशा तऱ्हेचीं जोडपीं खरोखरच जगभर उत्पन्न व्हावीं, असें कोण म्हणणार नाहीं !

वेदकालीन अगर पौराणिक कालीन उदाहरणें मी फारशीं देत बसत नाहीं. पौराणिक कालीन स्त्रियांचीं चरित्रें आर्यभगिनींना बहुधा सर्व

ठाऊकच आहेत. बुद्धाच्या काळामध्येंही स्त्रियांनीं अलौकिक समाजकार्यें केलीं आहेत. गौतमी, क्षेमा, सकुला, नंदा वगैरे स्त्रियांनीं भूतदयेचीं जीं उदाहरणें घालून दिलीं आहेत तीं अलौकिकच होत. या भगिनीविषयीं प्रो. भागवत म्हणतातः—या बुद्धभिक्षुणी आधुनिक काळांतील पाश्चात्य स्त्रियांची बरोबरी करितात, व्यक्तिस्वातंत्र्य, पतीच्या बरोबरीनें हक्क असल्याची जाणीव, संसारदक्षता, व्यवहारचातुर्य, समाजांत वावरण्याचें स्वातंत्र्य वगैरे गोष्टी या चरित्रांबद्दल दृष्टीस पडतात. अशा तऱ्हेनें जगाच्या इतिहासाच्या आरंभापासून आपल्या सात्विक गुणांनीं स्त्रीनें मानवजातीच्या उन्नतीकरितां खटपट केली आहे. प्रेमाच्या मोहनीनें तिनें सर्व जगावर आपली सत्ता बसविली आहे. ही प्रेमाची चीज अर्थात् हृदयपेटिकेमध्यें आहे. म्हणून

' समञ्जन्तु विश्वे देवा...... '

असें वेदांनीं म्हटलें आहे. वेदकालीन लग्नाची कल्पना आपण पाहिली. नंतर पौराणिक विवाहकल्पनाही सोदाहरण पाहिली. आतां विवाहाविषयीं कोण कोण ग्रंथकारांचें काय काय मत आहे, तें पाहूं.

विवाह म्हणजे परस्परशुद्ध प्रेमानें घडून आलेली ऐक्य-स्थिति. ही स्थिति चिरस्थायी रहावयास प्रेमग्रंथी बळकट असावी लागते. दोन रत्नें जर सुताच्या दोऱ्यांत गुंफिलीं तर तीं केव्हां गळून पडतील याचा नेम नाहीं. पण तीं जर सुवर्णतंतूमध्यें ओंवलीं गेलीं तर जास्त खुलतात व एकरूप होऊन राहतात. खऱ्या प्रेमाशिवाय विवाहबंधन सुखकर होत नाहीं. स्वार्थ किंवा भीति यांची व्याप्ति फार वेळ टिकत नाहीं. प्रत्येकाचें निःस्वार्थी प्रेम जितकें दोघांना सुखमय व सोईस्कर होईल, तितके वरील दोन्ही विकार होणार नाहींत, हें उघड आहे. असें निःस्वार्थी प्रेम जोडप्यांत असणें हेंच विवाहविधींतील ध्येय आहे. प्रेमाची निर्दोष व समर्पक व्याख्या कोणासही करितां येणार नाहीं. परंतु प्रेमाच्या निर-

निराळ्या स्वरूपाचें वर्णन मात्र अनेक कवींनीं केलेलें आहे. महाकवी शेक्स्-पीयर म्हणतो: —" प्रेम हें काळाच्या हातांतील क्रीडामृग किंवा खेळणें नव्हे. कालाचें निशीत शस्त्र सौंदर्ययुक्त अवयवास छिन्नविच्छिन्न करूं शकेल. कालाच्या बदलणाऱ्या घटका-पलांबरोबर तें बदलत नाहीं. तें कालाचा अंतही पाहतें. म्हणजे कालास अंत आहे, पण प्रेमास नाहीं.' अशा तऱ्हेच्या शाश्वत, शुद्ध प्रेमानें मानवी संसार शाश्वत, सुखकर व विशुद्ध होतो. नाहींतर कांहीं लोकांची अशी पद्धति असते, व पाश्चात्य समाजामध्येंही ती एका काळीं बरीच होती. ती ही कीं लग्न होण्याच्या आधीं स्त्रीशीं फारच विनयानें, अदबीनें, लाडिकपणानें वागावयाचें व लग्न झाल्यानंतर ती आतां केवळ आपली झाली म्हणून तो विनय व ती नम्रता सोडून देऊन तिला गुलामासारखें मानावयाचें. पण हें अत्यंत अश्लाघ्य व अप्रामाणिक नव्हे काय? रस्किन अशा लोकांस उद्देशून म्हणतो:– लग्न अगर विवाह या शब्दांचा अर्थ या लोकांस मुळींच कळत नाहीं. पूर्वींच्या तात्पुरत्या नम्रतेची व प्रीतीची शाश्वत नम्रतेंत व प्रीतींत परिणाति होणें म्हणजेच खरें लग्न होय. दोन युवयुवतींचें प्रेम म्हणजे परस्परांविषयीं लग्नाआधीं उत्पन्न होणाऱ्या निःस्वार्थी सहानुभूतीची उत्क्रांति होय. अशा तऱ्हेनें प्रेमग्रंथीनें हृदयें ग्रथित करणें यासच खरें लग्न म्हणतात. एका आधुनिक कवीनें विवाहाची व्याख्या फारच मार्मिक रीतीनें केली आहे.

**पूर्ण विकसित जाहल्यावरी दोन ।**
**मनें प्रेमाच्या बंधनें करून ॥**
**एक करुनी अर्पणें ईश्वराला ।**
**म्हणे युवती उद्वाह नाम याला ॥**

वरील व्याख्या कवीच्या 'सुशीला' या मनोरम काव्यामध्यें आहे.

**शुक्ति नलगे मज हवें खरें मोती ।**
**रूप नलगे मज हवी खरी प्रीति ॥**

अशा तऱ्हेचीं प्रेमाचीं प्रमेयें या काव्यांत पुष्कळ आहेत, व खरा प्रीतिविवाह कोठला हें या काव्यांत कवीनें उत्तम तऱ्हेनें दाखविलें आहे. केवळ शारीरिक सौंदर्यामध्यें प्रेमाची उत्पत्ति होत असेल, तर तें प्रेम क्षणभंगुर होय. दिव्य प्रेम हें कांचेसारखें निर्मल व पारदर्शक असलें तरी तें कांचेसारखें ठिसूळ मात्र नाहीं. जगांतील संकटरूपी खडकावर आदळण्याबरोबर तें फुटत नाहीं. त्यास पोंचा येत नाहीं. उलट तें जास्त तेजस्वी होतें. व पहिल्याहूनही जास्त धक्का सहन करण्याची त्यांत शक्ति येते.

आम्रवृक्षावर निःशंकपणें स्वांगानें वळसे घालणारी लता वादळामध्यें व पावसामध्यें त्यास जास्तच बिलगते. तसेंच शुद्ध प्रेमाच्या ग्रंथीनें एकरूप झालेली जायापती संकटकालीं परस्परांचा जास्त जास्त आश्रय घेतात; व ही प्रेमाची गांठ अधिकच दृढ करितात. स्त्री ही एक प्रेमलता आहे.

**ममत्वाचें खालतीं आलवाल ।**
**वरुनि विरहाचें ऊनही विलोल ॥**
**आसवांचें जल सदा भिजत राहे ।**
**प्रीतिलतिका जगतांत वाढताहे ॥**

ह्या प्रीतिलतिकेनें अखिल ब्रह्मांडाला वळसे घातले आहेत. प्रीतीची सदाफुली वेली ब्रह्मांडावर पसरली आहे. एक प्रसिद्ध ग्रंथकर्त्री म्हणते:–

"प्रेम ही एक निर्जन व ओसाड प्रदेशावर आपला हिरवा शालू पसरणारी, पर्वताच्या उत्तुंगबर्फाच्छादित शिखरावरही उमलणारी, अहोरात्र फुलणारी, निम्न प्रदेशासही नटविणारी, विनाशस्थळीं बिलगणारी, शीतोष्ण व अवर्षण सहन करणारी अशी अत्यंत चिवट वेली आहे.'

प्रेम ही एक अजब चीज आहे. व स्त्रीजाति ही प्रेमानें परिपूर्ण आहे. स्त्रिया प्रेमाच्या केवळ पुतळ्या आहेत. मानवी संसार किंबहुना सर्व

परमेशाचा संसार या प्रेमानेंच नटला आहे. गडकरी म्हणतात 'मातारूपानें आम्हांस जन्म देणाऱ्या, पत्नीरूपानें आम्हांस सुख देणाऱ्या, भगिनी-रूपानें आम्हांस मदत करणाऱ्या व कन्यारूपानें आनंद देणाऱ्या अशा स्त्रिया खरोखरच धन्य होत.'

आयुष्याच्या सोपानावर चढण्यास निरनिराळया रूपानें स्त्री मनुष्यास मदत करीत आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मनुष्याची बरी वाईट दानत देखील स्त्रीवरच अवलंबून आहे. निसर्गानें दोघांचा मार्ग अगदीं निराळा घालून दिला आहे. प्रत्येकास त्याच्या अगर तिच्या योग्यते-प्रमाणें कार्य लावून दिलें आहे. त्यांना त्यांत फेरबदल करितां येणार नाहीं. स्त्रीचें कार्य पुरुषाहून निराळें आहे. पण एकंदर मानवजातीच्या कल्याणाकरितां दोघांसही आपआपलें काम एकमेकांच्या साहाय्यानें व सहानुभूतीनें करावयाचें आहे. दोघांचीं शरीरें, मन, बुद्धि व अंतःकरणें हीं बरींच भिन्न असतात. पुरुषाचें शरीर निसर्गतः वळकट व राकट असतें. व स्त्रीचें नाजुक व सुंदर असतें. पुरुषाची बुद्धि जास्त तर स्त्रीच्या अंतःकरणाची कोमलता जास्त. पण त्यांना जीं कर्तव्यें मानवी जातीकरितां करावयाचीं आहेत, त्यांस आवश्यक अशीच मनोरचना, बुद्धिरचना व शरीरयोजना आहे. स्त्रीच्या हृदयाचा कनवाळूपणा हाच तिचा गुण-विशेष आहे. आणि तिचीं मोठमोठीं कामें याच सद्गुणाचीं द्योतक आहेत. परंतु प्रेमांत सुद्धां फरक आहे. शुद्ध प्रेम व अशुद्ध प्रेम असे दोन प्रकार आहेत. शुद्ध प्रेमांत स्वार्थ नसतो. अशुद्ध प्रेमांत तो असतो. स्वार्थप्रेरित प्रेम चिरकाल टिकणारें नसतें. स्वार्थसिद्धि होईपर्यंत तें असतें. स्वार्थास विरोध येऊं लागल्याबरोबर तें प्रेम नष्ट होतें. नीतिमत्तेस शुद्ध प्रेम असावें लागतें. नीतिमत्ता अशुद्ध प्रेमाच्या पायावर तगत नाहीं. खऱ्या नीतिसौंदर्याची जाणीव व स्वार्थाची तुच्छता हेंच शुद्ध प्रेम होय. शुद्ध प्रेम म्हणजे मानवी स्वभावांतील निःस्वार्थतेचा स्वार्थपरायणतेवरील विजय होय! मनुष्य प्रेममय झाला म्हणजे स्वार्थ विसरतो. आणि शुद्ध प्रेमाची फेड

शुद्ध प्रेमाशिवाय कशानेंही होत नाहीं. या प्रेमानें बुद्धीलाही प्रेरणा होते, अंतःकरण विस्तृत होतें व आत्म्याची पुरोगति होते. अशा तऱ्हेनें प्रेमापासून पुष्कळ सात्विक गुणसमुच्चयास चालन मिळतें. अशा प्रेमाची चीज मनुष्याला विवाहापासून प्राप्त होते. विवाहित स्थितीनें मनुष्य एका नवीन तेजोमय प्रदेशांत प्रवेश करितो. त्याबरोबरच त्यास मोठी जबाबदारीही अंगीकारावी लागते. विवाह म्हणजे पाशवी वृत्तिनाशाची प्रतिज्ञाच होय. मनुष्याच्या स्वैरवृत्तीस निर्बंध घालण्याकरितांच विवाहपद्धति निर्माण झाली आहे, असें म्हणतात, तें खोटें नाहीं.

लोके व्यवायामिषमद्य सेवा
नित्यास्तु जन्तोर्नहि तत्र चोदना ॥
व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञ ।
सुराग्रहैरासु निवृत्तिरिष्टा ( भागवत ११।५।११ )

शमदमादि साधनांची विवाह ही पहिली पायरी आहे. यांतच मनुष्याचें निःस्वार्थी प्रेम कसोटीस लागतें व वृद्धिंगत होतें. स्वतःवरचें स्वार्थी प्रेम पत्नी व मुलें यांच्यावर पसरूं लागतें. व तें असें मर्यादित देशावर पसरतां पसरतां पुढें त्याहीपेक्षां जास्त प्रदेशावर पसरण्याची त्यांत शक्ति येते. ल्यूथर आपल्या पत्नीविषयीं म्हणतो, ‘ ती मजजवळ असली म्हणजे अठरा विसवे दारिद्र्य जरी असलें, तरी त्याची मला किंमत वाटत नाहीं. पण ती मजजवळ नसतां कुबेराची संपत्ति जरी मिळाली तरी ती मला कःपदार्थ आहे.’ ल्यूथर विवाहाविषयीं म्हणतो:— परमेश्वर मनुष्याला जर कोणती सर्वांत मोठी देणगी देत असेल तर ती, जिच्या संगतींत तो सुखानें नांदूं लागेल व जिला तो आपलें अंतःकरण खुलें करण्यास बिलकूल कचरणार नाहीं, जिच्या हातांत आपले पंचप्राण तो निःशंकपणें देतो, अशी सुगृहिणी होय. सर हेन्री टेलर यानें विवाहाविषयीं फार मार्मिक विवेचन केलें आहे. सुगृहिणी कशी असावी हें तो सांगतो—“ घरामध्यें पूर्ण समाधान ठेवण्याची तिच्यामध्यें कुवत

पाहिजे. पतीला होईल तितकें कौटुंबिक व्यवस्थेच्या त्रासापासून अलिप्त ठेवणें हा गुण फार महत्त्वाचा आहे.' विवाहित स्थितीमध्यें परस्पर सहनशीलता हा एक अत्यंत महत्त्वाचा गुण आहे. बर्नस्कवीनें पत्नीच्या गुणांत दहा भाग कल्पिले आहेत. तो म्हणतो, दहा भागांपैकीं चार भाग सहनशीलता, दोन भाग व्यवहारचातुर्य, एक बुद्धि व एक सौंदर्य आणि बाकीचे दोन इतर म्हणजे आनुवंशिक संस्कार, शिक्षण इत्यादि गुण होत. बर्नसूनें सहनशीलता या गुणास किती महत्त्व दिलें आहे, पहा. थोड्याशा विचारान्तीं सहनशीलता हा खरोखरीच गृहिणीमध्यें अत्यंत महत्त्वाचा गुण आहे, याची खातरी पटेल, अर्थात् सहनशीलता म्हणजे जनावराप्रमाणें मार दिल्यास तो खावा असा नाहीं. चांगले वाईट दिवस संसारामध्यें येणारच. त्यावेळीं पतीपेक्षांही पत्नीवर जास्त जबाबदारी असते. ज्याची जबाबदारी जास्त त्याचें महत्त्वही जास्त. पत्नीवर राष्ट्राची जबाबदारी आहे. मातृवात्सल्य या प्रकरणामध्यें आपण ही जबाबदारी किती अगाढ्य आहे हें दाखविलेंच आहे. ही जबाबदारी ज्या स्त्रीनें अत्यंत उत्तम रीतीनें पार पाडली त्या स्त्रीनेंच इतर बोलक्या देशभक्तांपेक्षां दसपट राष्ट्रसेवा केली, असें म्हणण्यास कांहींही हरकत नाहीं.

भगिनी निवेदिता आपल्या पद्मिनीवरील लेखांत म्हणतेः— 'जन्मघटिकेंत मुलाचे नेत्र शास्त्राकडे आकर्षिले जातात व मुलीचे दिव्याकडे आकर्षिले जातात! कारण असें पहा कीं, पुरुषांच्या जीवित-रणामध्यें समशेर हीच त्यांची अर्धांगी असते. व स्त्रीच्या जीवितामध्यें अग्निनारायण हाच तिचा सत्वरक्षक असतो. तरवारीच्या जोरावर शत्रूपासून स्वदेश राखणें हाच रजपूत वीराचा जन्महेतु, व अब्रूकरितां अग्निदिव्य करणें हाच रजपूत स्त्रियांचा पातिव्रत्यधर्म होय. मनूनें जी पतिव्रता स्त्रीची व्याख्या केली आहे, त्या व्याख्येच्या पूर्ण कसोटीस उतरणाऱ्या हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासामध्यें, रजपूत स्त्रियांखेरीज कोण आहेत बरें?

पतिं या नाभिचरति मनोवाग्देहसंयुता ।
सा भर्तृलोकानाप्नोति सद्भिः साध्वीति चोच्यते ॥

मन, वाणी व शरीर यांच्यायोगानें पतीव्यतिरिक्त पुरुषाची जी इच्छा करीत नाहीं, ती पतिव्रता होय. सावित्रीनें सत्यवानास मनानें वरल्यावर पित्यानें तो अल्पायु आहे, असें सांगितल्यावरही "एकदां मनानें वरिलेल्या सत्यवानाशिवाय मी कोणाशींही लग्न करणार नाहीं" म्हणून तिनें निक्षून सांगितलें व यमराजाकडून आपल्या पावित्र्याच्या जोरावर त्यास आयुष्य मागून घेतलें. याचप्रमाणें रजपूत स्त्रियांचाही पातिव्रत्याचा जोर होता. क्षत्रियास रणमैदान हीच चिता, अशी रजपुतांची श्रद्धा होती व त्याचप्रमाणें रजपूतवीर वागतही असत. पतीच्या रणामधील आत्मयज्ञाच्या पाठापाठ सतीचा आत्मयज्ञ रजपूत कुलांमध्यें ठरलेला असे. दोघांवर सारखीच जबाबदारी असे. असमतेचा अंशही या तत्त्वामध्यें आपल्याला पाहावयास मिळणार नाहीं. रजपूत योद्ध्यांची अशी प्रतिज्ञाच कीं 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीं' यांमधील अवस्था त्यांना ठाऊकच नव्हती. एक धारातीर्थी देहपात अगर विजयश्रीनें मंडित होऊन राज्योपभोग. शत्रूस पाठ दाखवावयाची नाहीं. त्याचे वार छातीवरच घेऊन लढाई करावयाची. अशा निधड्या छातीच्या क्षत्रियाची स्त्रीही तशीच सात्त्विक व धैर्यशाली असावी लागते. रजपुतांचा इतिहास अशा साध्वीरत्नांनीं सुशोभित झाला. त्यांच्या इतिहासमंदिरामध्यें पुष्कळ स्त्रीदेवता पावित्र्याच्या तेजोवलयांत अधिष्ठित झालेल्या दिसतील. प्रत्येकीचें शुद्धांतःकरणानें व भक्तिभावानें जर आपण ध्यान करूं तर आम्हां आधुनिकांचें जन्मसाफल्यच होणार आहे, असें म्हटल्यास फार गैरशिस्त दिसणार नाहीं. आधुनिक समाजशास्त्राचा चष्मा घालून जर या देवींकडे तुम्ही पाहाल, तर कदाचित्, त्या दिसणारही नाहींत. दिसणारही नाहींत म्हणण्यापेक्षां त्यांचीं तेजःकिरणें इतकीं देदीप्यमान आहेत कीं त्या चष्म्याच्या काचेस दिसणारही नाहींत. हें रजपूत स्त्रियांचे दिव्य

आधुनिक भौतिक शास्त्रदृष्टीस भयंकर पातका सारखें दिसेल; परंतु, शुद्ध, निःस्वार्थी व निःसीम प्रेम प्रयोगशाळेंतील टेबलावर मांडतां येण्याजोगें नाहीं. पतिनिधनानंतरचें आयुष्य जर स्त्रीला नरकवासासारखें असह्य होईल, तर तिचें जगणें चांगलें कां मरणें चांगलें? अर्थात् जी केवळ समाजाच्या जुलमाकरितांच दिव्य करिते, तिची कृति निंद्य होय. परंतु खरोखरीच पुढील आयुष्य जर एखादीस अत्यंत असह्य वाटत असेल तर त्या यातनेचा अंत दिव्यानें करून प्रेमाची ज्योत पुढें जाणाऱ्या पतीच्या प्रेमज्योतींत मिळविणें सहृदयतेच्या दृष्टीनें योग्य नाहीं काय? असो, एथें या विषयाचा विस्तार करणें नलगे. आपण या रजपूत स्वर्गांत प्रवेश करितांच त्यां ठिकाणीं जेथें तेथें पवित्रतेचा सडा घातला आहे, शांततेचे दीप लाविले आहेत, प्रेमपुष्पें प्रफुल्लित झालीं आहेत, सद्गुणांचीं तेजोवलयें चकाकत आहेत, असें दिसेल. पुढें तुम्हांस काय दिसतें पहा. पहिल्याच सिंहासनावर भीमसिंगाची पद्मिनी बसलेली तुम्ही पहाल. भीमसिंगासह बसलेली तिला पाहून तुम्हांस तिनें आपली कुडी सोडतांना उच्चारलेले शब्द तुमच्या लक्षांत येतील. "महाराज मला येण्यास उशीर लागतो नव्हे? आपणाला राग आला असेल नाहीं? ही पहा मी आलेंच." हे शेवटले हृदयस्पर्शी शब्द मुक्तकंठानें जणू काय पतीशींच बोलत आहे, असें सर्वांस वाटलें, व तिनें अग्निप्रवेश केला. वाचकहो, अल्लाउद्दीनाच्या कैदेंतून सोडविण्याची मोठ्या मुत्सद्यांसही न सुचविणारी अशी युक्ति पद्मिनीनें शोधून नाहींका काढिली? शिवाजीची पेटाऱ्याची युक्ति व पद्मिनीची पालखीची युक्ति यांत साम्य नाहीं काय? संकटकाळीं साध्वीची बुद्धि जास्तच सतेज होते, असें मीं मागें म्हटलें आहे, तें खरें नव्हे का? अशा वेळीं तिच्यांतील दैवी शक्ति जागृत होते. पद्मिनीच्या पतीवर आलेल्या संकटामध्यें तिला नामी युक्ति सुचली. "चितोरच्या किल्ल्याभोंवतीं वारें जोंपर्यंत गुंगारा घालीत राहील तोंपर्यंत तिचा कीर्तिध्वज अक्षय फडकत राहील व चितोरांतील प्रत्येक वस्तु तिच्या दिव्य शक्तीची साक्ष देत राहील."

स्त्री केवळ भावनाप्रधान असते, हें जरी कांहीं अंशीं खरें असलें तरी तिच्या अंतःकरणप्रवृत्ति शुद्ध असल्यानें तिच्या हातून घडणारी कृति साहाजिकच दूरदर्शीपणाची होते. उज्ज्वल भावनेची प्रेरणा ही सत्कृतीची माता आहे. पद्मीनीनें भीमसिंगावरील शुद्ध प्रेमाच्या भावनेनें प्रेरित होऊन त्यास कैदेंतून सोडवून आणण्याचा फार खुबीदार उपाय शोधून काढिला. तिनें तो शोधून काढला म्हणण्यापेक्षां तिच्या निःसीम व निर्व्याज प्रेमानें तिला तो दाखविला, असेंच म्हणणें सयुक्तिक होईल. पहा बरें कीं, भीमसिंगाला आपले सुटकेविषयीं कांहीं विचारच सुचले नाहींत. आपण आपल्या प्रियपत्नीस आंचवलों, अशीच त्याची पक्की समजूत झाली. संकटकालीं हृदयास ऊब देणारी, मेघांच्या अंधारांतून सूर्याचें किरण दाखविणारी, मानवास धैर्य व उत्साह देऊन त्यास कर्तव्याभिमुख करणारी एक स्त्रीशिवाय कोण आहे बरें? इतिहासांत अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात कीं, जेथें स्त्रीच्या भावनेनें पुरुषाच्या बुद्धिबलापेक्षां फारच महत्त्वाचें काम केलें आहे. इतकेंच काय पण पुरुषाच्या बुद्धीला तिच्या भावनेनें पवित्रही केलें आहे. जोधपूरच्या यशवंतसिंगाच्या राणीचें उदाहरण आपल्याला ठाऊकच असेल. नर्मदेच्या तीरावर यशवंतसिंग औरंगजेबाच्या प्रचंड सेनेशीं शौर्यानें लढत होता. यशवंतसिंग मोठा योद्धा खरा, पण जरा उतावीळा होता. आपलें सैन्य फारच खर्च झालें, आतां आपला टिकाव लागत नाहीं, असें वाटून तो जोधपुरास परत आला. त्यास तो दुरून येत असतांच राणीनें त्यास पाहिलें होतें. तिनें आपल्या विश्वासु सरदारास किल्ल्याचीं दारें बंद करा असा हुकूम दिला. त्याप्रमाणें त्या हुकुमाची अमलबजावणी झाली. राणा पराजय पावून परत आला आहे, याची अजून तिला खात्री नव्हती. तिच्या स्वप्नांतही कधीं अशी गोष्ट आली नाहीं. ‘यशवंतसिंगाची स्वारी आली आहे, किल्ल्याचीं दारें खुलीं करा’ असा राजाकडून निरोप आला. तिनें उत्तर पाठविलें, ‘माझे पति पराजय पावून परत आले, हें सपशेल खोटें आहे.

परत आलेले रजपूत मला फसवीत आहेत. माझे पति पराजय पावून परत येणें शक्यच नाहीं. ते रणांगणांतच पडले असतील. याहीउप्पर जर खरोखरच महाराज परत आले असतील, तर मी दरवाजा साफ उघडीत नाहीं. अशा पळपुट्यांना जोधपूरच्या किल्ल्यामध्यें एक क्षणभर ठाव मिळणार नाहीं. माझे पति परत आले असल्यास मी त्यांस मृतप्राय समजून सती जाण्याच्या तयारीस लागतें.' या निरोपानें यशवंतसिंगाच्या मनांत कोण चलबिचल उडाली असेल याची नुसती कल्पनाच करणें बरें. यशवंतसिंग या निरोपानें प्रथम संतापला. पण विचारांतीं आपल्या शूर पत्नीचा त्यास अभिमानच वाटला. पण पुढें काय? कांहीं उपाय चालेना. शेवटीं तिच्या मातेनें तिची कशी तरी समजूत घातली व राजा सैन्याची भरती करण्याकरितां आला आहे, भिऊन पळून आला नाहीं, अशी वकिली केली. यापुढील प्रत्येक लढाईवर राजासह ती आपणही युद्धास जात असे.

रजपूत स्त्रियांमध्यें आपल्या पतीसही धैर्य देण्याची स्फूर्ति होती व दीन, दुबळ्या, भित्र्या, पळपुट्या पतीचा त्यांना मनापासुन तिटकारा होता. रजपूत कन्यांना असें बाळकडूच पाजविलेलें होतें. मी वीरपत्नी होणार, वीरजननी होणार, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा असे. व या त्यांच्या करारानेंच रजपूतवीरांचें शौर्य, त्यांची युद्धांतील धडाडी, वीर्य व सामर्थ्य दुप्पट होत असे. आपल्या पत्नीच्या इच्छेप्रमाणें खरोखरीच रणमैदानीं जीव अर्पण तरी केला पाहिजे, अगर जय मिळवून तिच्या गळ्यांत कीर्तिसुमनमाळा तरी घातली पाहिजे, असें प्रत्येक रजपुतास वाटत असे. व तिचीही अशीच प्रतिज्ञा असे कीं, जर आपल्या पतीचें शिरकमळ शत्रूच्या समशेरीनें प्रभूच्या पायीं धाडलें तर अग्निनारायणास आत्माहुति करून आपणही त्याच ठिकाणीं लीन होण्यास सज्ज असावयाचें. तोही पत्नीप्रेमाकरितां समशेरीचेंही धैर्यानें चुंबन घेण्यास सज्ज होत असे. तर ती पतिप्रेमाच्या खातर अग्निज्योतीस

निःशंक कवटाळी. पण तें समशेरीचें चुंबन व हें अग्नीचें आलिंगन त्या दोन आत्म्यांच्या परस्परालिंगनचुंबनांतच परिणत होतें, अशी या निःसीम पतिपत्नीप्रेमाची मीमांसा आहे.

करमदेवीची गोष्ट तर सुप्रसिद्धच आहे. तिच्या पित्यानें तिला मंदोराच्या राठोडास देण्याचें ठरविलें होतें. त्याजवर तिची प्रीति नव्हती. साधुसिंग नांवाच्या एका शूर व तेजःपुंज सरदारावर तिची प्रीति होती. व त्यास तिनें मनानें वरिलें होतें. 'करमदेवी, मी वचनभंग कसा करूं ?' असें तिच्या पित्यानें तिला विचारिलें. तिनें असा निक्षून जबाब दिला कीं, मी एकदां ज्यास मनानें वरिलें, त्याव्यतिरिक्त दुसऱ्याशीं लग्न करण्याची माझी इच्छा नाहीं. व माझ्या विशुद्ध प्रेमापुढें कोणतीही सबब मी ऐकणार नाहीं. पुढें त्या सरदाराशीं तिचा विवाह करण्यांत आला इकडे राठोडच्या राण्यास अत्यंत त्वेष आला, व त्यानें साधुसिंगावर स्वारी केली.अत्यंत हातघाईची लढाई होऊन दोघेही रणभूमीवर मरून पडले. युद्ध चाललें असतांना करमदेवीनें पतीस निरोप पाठविला. आपला पराक्रम आनंदानें चालूं द्या. मी आपलें युद्धसामर्थ्य पहात येथेंच उभी आहें. देहपात झाला म्हणून काय झालें ? नंतरही मी आपलेजवळ आहेच. वाचक हो ! ऐन रणमैदानांत "नंतरही मी आपणाजवळ आहेंच" हे शब्द ऐकून साधुसिंगास कोण उत्साह आला असेल बरें! पति धारातीर्थी पडल्यानंतर तिनें चिता पेटविली. व चितेंत उडी टाकण्याचे आधीं तरवारीनें आपला एक हात तोडून त्यास दुसऱ्या हातानें फेंकून दिलें व सांगितलें; "जा, माझ्या श्वशुरांना सून अशी होती म्हणून सांग." सहगमनाच्या वेळीं ती ऐन तारुण्यांत होती. पण शुद्ध प्रेमाखातर तारुण्याचा होम करण्यास तिला दिकत वाटली नाहीं. कनोजच्या राजकन्येची गोष्ट अशीच नाहीं काय ? या राजकन्येच्या ठिकाणीं बुद्धीचा चलाखपणा व सौंदर्य यांचा उत्तम मिलाफ झाला होता. तिच्या पित्यानें राजसूय यज्ञ करून सर्वांस मांडलिक करण्याचा बेत केला. व त्याप्रमाणें पृथ्वीराजाखेरीज सर्व

जणांनीं त्याचें सार्वभौमत्व कबूल केलें. या प्रसंगीं त्यानें दाखविलेल्या अलौकिक शौर्यानें संयोगितेचें मन पृथ्वीराजावर बसलें. पृथ्वीराजाच्या मनांतही तिजविषयीं प्रेम वसत होतें. पण जयचंदास या गोष्टीचा फार राग आला व त्यानें आपल्या मुलीस कैदेंत घालण्यासही मागें पुढें पाहिलें नाहीं. हें हरएक युक्ति करून तिनें पृथ्वीराजास कळविलें. पृथ्वीराज मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें आला व तिला घेऊन गेला. जयचंद्र फारच संतापला. व त्यानें शहाबुद्दिनाच्या साहाय्यानें पृथ्वीराजावर स्वारी करण्याचा घाट घातला. पृथ्वीराजही युद्धास सिद्ध झाला. दोन्ही फौजा लढाईस सज्ज झाल्या. युद्धास जातेवेळीं संयोगितेनें त्यास निरोप दिला. "जा बरें, माझी बिलकूल आठवण करूं नका. आपला देहपात होईल इतकेंच. तुमच्या आत्म्याची व माझी ताटातूट होणें शक्य नाहीं. मी ताबडतोब येऊन आपणांस गांठीन." त्या दिवशीं पृथ्वीराज विजयी होऊन परत आला. दुसरे दिवशीं युद्धास जातेवेळीं संयोगितेनें पतीच्या अंगावर युद्धाचा पोषाख स्वतः चढविला. अंगावर चिलखत घालतांना तिचे हात कापूं लागले, प्रियपत्नीचा निरोप घेऊन पृथ्वीराजानें सैन्यासह रणमैदानांत सिंहासारखी उडी घातली. तो अत्यंत शौर्यानें लढला. पण शत्रूचें सैन्य फारच मोठें असल्यानें त्याचें कांहीं चाललें नाहीं. शत्रूच्या हातीं सांपडून त्याचा अंत झाला. इतकें झाल्यावर संयोगिताही सती गेली. अशा तऱ्हेचें पतिपत्नीप्रेम कोणत्याही देशाच्या इतिहासांत आपणास सांपडणार नाहीं. अशा पावित्र्याचा व पातिव्रत्याचा परमेश्वर वाली आहे. या दोन्ही गुणांचें रक्षण करण्यास तो सदैव तयार असतो. याच पावित्र्याचा व पातिव्रत्याचा भंग करण्याच्या इच्छेनें ज्या उग्र दुष्टांनीं आपली तरवार वर उचलली, ती वरच्यावरच त्या प्रभूनें हिसकून घेऊन त्या दुष्टांच्या मानेवर घातली आहे. एका धार्मिक व्रताकरितां रात्रीच्या अंधारांतून, रानावनांतून अगळीची राणी शत्रूच्या मुलखांतून गंगास्नानाकरितां मैत्रिणीसह गेली असतां शत्रूस बातमी लागून तिजवर हात

टाकण्याकरितां तो टपून बसला. व परत येतेवेळीं तिला त्याच्या लोकांनीं घेरलें. त्या वेळीं तिच्या तोंडून जे उज्ज्वल शब्द बाहेर आले ते ऐकून वाचकांच्या अंगावर रोमांच उभे राहतील. " नामर्दांनो, माझ्या गौतमसिंहाशीं झुंज खेळण्याची हिंमत नाहीं, म्हणून मजवर हात टाकण्यास बेशरमपणें तुम्ही पुढें आलां काय? धिक्कार असो तुमच्या पौरुषाला." इतकें बोलून ती जवळच्याच एका खडकावर उभी राहून पुनः त्वेषानें बोलूं लागली. ' गौतमसिंह कोणासही शरण गेले नाहींत व मीही पण जाणार नाहीं. पण मी आधीं विचारतें, एथें कोणताच रजपूतमाउलीचा पूत नाहीं काय? कीं जो माझ्यासारख्या आर्यस्त्रीचें पातिव्रत्य रक्षण करण्यास या वेळीं पुढें येणार नाहीं? नामर्दांनों, तो एकटा जरी असला, तरी तुम्हां सर्वांची डोकीं उडविण्यास समर्थ होईल. ' काय चमत्कार पहा. अभयचंद व निर्भयचंद या नांवाचे दोन रजपूत राणीच्या मदतीस याच वेळीं धांवून आले. ते शत्रूची छाटाछाट करीत राणी जेथें झगडत होती तेथपर्यंत त्यांनीं वाट काढिली. अभयचंद बिचारा शौर्यानें लढत लढत ठार झाला व निर्भयचंद सारखा लढत होता. राणीही आपल्या हातून होईल ती खटपट करीत होती. दैव-योगानें ही बातमी पसार होऊन गौतमास कळली व त्यानें ताबडतोब येऊन राणीस सोडविलें व शत्रूस बरीच तंबी दिली. राणीच्या पातिव्रत्या-च्या जोरानें अभयता व निर्भयता या दोघींस तिच्या साह्यार्थ प्रभूनें पाठ-वून दिलें. मग तिचें कोण काय करणार? राणीचें प्रसंगावधान व शौर्य मात्र सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आलें.

पति दुर्मार्गप्रवृत्त होत असतांना त्यास सन्मार्गींही लावण्याचे प्रयत्न कित्येक स्त्रियांनीं केले आहेत. आपल्या भावाचा मत्सरानें खून करण्यास प्रवृत्त झालेल्या पतीचें मन राणी जरसेश्वरीनें वळविण्याचा प्रयत्न नाहीं का केला?

एकदां विवाह झाला कीं पतिप्रेमापुढें माहेरचें नातें जास्त न समजतां पतिप्रेमामध्येंच विलीन होणाऱ्या स्त्रियांपैकीं जाधवरावांच्या जिजाईचें उदाहरण सर्वांस महशूरच आहे. सासरेजांवई या परस्परांत वैमनस्य पडलें होतें. एकदां जाधवराव शहाजीचा पाठलाग करीत असतां शिवनेरी येथें शहाजीस त्यानें गांठलें. जिजाबाई या पाठलागामध्यें शहाजी राजाबरोबरच होती. बिचारी गरोदर असल्यानें तिला फार त्रास झाला. जिजा त्यास म्हणाली, "त्यांच्याऐवजीं मी आतां तुमच्या हातीं सांपडलें आहे. जें कांहीं करून घ्यावयाचें तें करून घ्या." हें ऐकून जाधवराव कन्यावात्सल्यानें गहिंवरले व कंठ दाटून येऊन तिला म्हणाले, "होणाऱ्या सारखी बुद्धि सुचून वैमनस्य पडलें. त्याचा कांहीं इलाज नाहीं. तुला कोठें जावयाचें तें सांग. शिंदखेडास यावयाचें असल्यास चल." पण जिजाबाईनें उत्तर दिलें, "मला एथेंच राहावयाचें आहे. माहेरीं यावयाचें नाहीं." यावरून तिची पतिनिष्ठा सहज कळून येईल. व "अन्याय तुमच्याकडे आहे. माझ्या पतीकडे नाहीं. सबब मी आपल्या घरीं येणार नाहीं" असाही रोख ठोक जबाब दिला. असो, न्यायापुढें नात्याचें प्रेम काय उपयोगी? जें खरें दिसेल, तेंच केलें पाहिजे. अशा तऱ्हेची करारी बायको शिवाजीसारखें रत्न प्रसवली यांत नवल तें काय? "शुद्ध बीजापोटीं, फळें रसाळ गोमटीं".

राजपुतान्याचा इतिहास पद्मिनी, संयोगिता अशा स्त्रीरत्नांनीं विभूषित झाला, तर महाराष्ट्राचा इतिहास जिजाईसारख्या वीरपत्नीनें सजविला. रजपूत स्त्रियांचें आदर्श पुढें ठेवून जर स्त्रिया आपलें शील ठेवतील व रजपूत वीरांचा आदर्श डोळयापुढें ठेवून जर पुरुष आपलें चारित्र्य बनवितील, तर समाजरचना अद्वितीय होईल, यांत शंका नाहीं. पण केवळ कल्पनामय समाजरचनेचा विचार करावयाचा नाहीं. व त्याचें हें स्थळही नव्हे. आतां आपण कांहीं पाश्चात्य पतिपत्नींचें पवित्र प्रेम कसें होतें ते पाहूं. कारण स्त्रीजात ही येथून तेथून सारखीच असते. पौर्वात्य

स्त्रिया या प्रेमाकरितां प्राणत्याग करण्यासही तयार होत्या. पण पाश्चात्यांमध्यें मात्र कोठेंही असें उदाहरण सांपडत नाहीं. पण अगदीं सोळा आणे जरी नाहीं, तरी निदान चौदा आणे तरी या प्रेमाला वाहून घेणाऱ्या स्त्रिया पाश्चात्यांमध्येंही आहेत. त्यांची समाजरचनाच कांहीं विशेष तऱ्हेचा असल्यामुळें म्हणा, अगर सतीसारख्या उच्च कल्पनाच त्यांच्याकडे नव्हत्या म्हणून म्हणा, त्यांच्या इतिहासांत पवित्र प्रेमाखातर देहाचा होम केलेलें एकही उदाहरण सांपडत नाहीं. हें केवळ तुलनेच्या दृष्टीनें म्हणावयाचें. बाकी तिकडे सुद्धां पवित्र प्रेमाचीं व उत्कृष्ट दांपत्यसुखाचीं उदाहरणें बहुत सांपडतात. डी टॉक्वे व्हिली याची पत्नी शीलानें व स्वभावानें फार चांगली होती. यानें आपल्या पत्नीविषयीं फारच उत्तम उद्गार काढले आहेत. एका मित्राला त्यानें लिहिलें कीं, माझ्यावर परमेश्वरानें केलेल्या सर्व उपकारांमध्यें मला Marie मेरीसारखी पत्नी दिल्याचा उपकार अत्यंत महत्त्वाचा आहे. संकटाच्या वेळीं तिचें मला किती साहाय्य होतें, हें तुला कदाचित् कल्पनेनेंही कळणार नाहीं. एरवीं मोठी गरीब दिसणारी पण अशा वेळीं ती फारच मोठें धैर्य व खंबीरपणा दाखविते. मला न कळतच माझीं संकटें निवारण्याचा ती प्रयत्न करिते. जरी तिच्या मनावर माझी बरीच सत्ता आहे, तरी मी तिला फार भिऊन असतों आणि जोंपर्यंत ती जिवंत आहे तोंपर्यंत माझ्या हातून कांहीं चूक होईल असें मला वाटत नाहीं. गिझोची बायकोही त्यास संकटकाळीं अशीच उपयोगी पडली. जगामध्यें त्याजवर जे जे कांहीं बिकट प्रसंग आले, त्या सर्वांचें आपल्या पत्नीप्रेमामुळें त्यास कांहींच वाटत नसे. गिझोच्या लग्नाआधींची हकीगत मोठी मनोरंजक आहे. लग्नापूर्वीं गिझोची पत्नी पारीसमध्यें पब्लिसिस्ट नांवाचें पत्र काढीत असे. पण कांहीं कौटुंबिक आपत्तीमुळें व आजारामुळें तिला हें काम बंद करण्याची पाळी आली. अशा वेळीं तिजकडे कांहीं निनांवी लेख छापण्याकरितां आले. लेख उत्तम असल्यानें ते छापण्यांत आले. ते विविध विषयांवर लिहिलेले असून विद्वत्ताप्रचुरही होते. कांहीं दिवसांनीं ती बरी झाली.

ग्रं. क्र. २४५५

व ज्या गृहस्थानें निनांवी लेख पाठविलेले होते त्यानें आपली तिला ओळख दिली. इतकें झाल्यानंतर थोड्याच दिवसांत दोघांचें लग्नही झालें. परमेश्वर जर आम्हां दोघांसही भरपूर आयुष्य देईल, तर कोणत्याही तऱ्हेच्या कालांत मी व माझे पति अत्यंत सुखानें राहूं असें मिसेस गिझो म्हणे. गिझोच्या दुर्दैवानें त्याची पत्नी लवकरच वारली. व त्यानें आपला सारा जन्म एकांतवासांत घालविला. बर्कची बायकोही अशीच होती. तिची त्यानें अत्यंत उदात्त भाषेमध्यें स्तुति केली आहे. तिचें सौंदर्य हें तिच्या अवयवसौष्ठवांत नाहीं, तर तिच्या गोड स्वभावांत, औदार्यांत, मुग्धपणांत व सहृदयतेंत आहे असें त्यानें म्हटलें आहे. स्त्रीनें पुरुषास नीतिभ्रष्टतेपासून परावृत्त केलेलीं इतिहासामध्यें बरींच उदाहरणें आहेत. पत्नीच्या शीलाचा पतीच्या शीलावर फार मोठा परिणाम होतो. दारूच्या व्यसनापासून अगर इतर कित्येक व्यसनांपासून नवऱ्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न पुष्कळ स्त्रियांनीं केला आहे. इतर कोणत्याही तऱ्हेच्या शक्तीपेक्षां स्त्रीची शक्ति फार बलवत्तर आहे. तिनें मनांत आणिलें तर ती पाहिजे तें करूं शकेल. जॉन बनियन हा भला मोठा दारुड्या होता. कर्मधर्मसंयोगानें त्याला एक कुलीन व हुषार अशी पत्नी मिळाली होती. या मनुष्याचा उद्धार त्याच्या पत्नीनेंच केला. असली बायको मला मिळाली, हें माझें अत्यंत मोठें भाग्य होय. जरी आम्ही अत्यंत दरिद्री होतों, तरी माझ्या बायकोच्या बापानें तिला दिलेलीं 'दि प्लेन मॅन्स पाथवे टु हेव्हन' व 'दि प्रॅक्टिस ऑफ पायटी'—हीं दोन पुस्तकें आम्हांस फार उपयोगी पडलीं. अशा तऱ्हेच्या पुस्तकवाचनानें व अन्य तऱ्हेनें त्याच्या बायकोनें त्यास व्यसनमुक्त केलें. सर आल्बर्ट मॉर्स्टन मेल्यानंतर केवळ त्याच्या ध्यासानें थोड्याच दिवसांत त्याची पत्नीही निवर्तली. तिच्या थडग्यावर वॅाटोननें खालील दोन ओळी लिहिल्या आहेत: "तो प्रथम दिवंगत झाला. तिनें मागें जगण्याचा यत्न करून पाहिला, पण व्यर्थ. थोड्याच वेळांत तीही दिवंगत झाली."

वॉशिंगटनच्या बायकोचीही अशीच गोष्ट सांगतात. नवऱ्याची निधन-वार्ता ऐकल्याबरोबर ती म्हणाली, 'आतां माझें सर्वस्व गेलें. मी लौकर पाठोपाठ जाणार. यापुढें मला संकटें अशीं कांहीं राहिलींच नाहींत.' पतिनिधनानंतर त्याच्या पाठोपाठ आपल्यालाही देवानें लौकरच न्यावें अशी इच्छा करणाऱ्या स्त्रिया पूर्वेकडे व पश्चिमेकडेही पुष्कळ आढळतात. पतीच्या निधनानें हृद्रोग लागून जीव गेलेलीं उदाहरणें आपल्या हिंदुस्थानांत तर बरींच सांपडतील. पत्नीचा हृद्रोग लागून मरण आलेले पुरुष मात्र क्वचितच आढळतील. ही झाली आत्यंतिक प्रेमाची गोष्ट.

आगस्टसला ड्रु सुझ नांवाचा एक मुलगा होता. तो मोठा पराक्रमी होता. असाच एकदां दिग्विजयासाठीं तो गेला असतां, जय संपादून तो अकस्मात् मरण पावला. तो शुद्धाचरणी, सात्त्विक व पराक्रमी होता. त्याची पत्नी ॲन्टोनिया हिच्या दुःखास या पतिनिधनामुळें पारावार राहिला नाहीं. ज्या रोमन राजवाड्यांतून राजरोस बदफैलीपणा चालत असे, त्याच वाड्यांत या दोघांसारखें पवित्र व प्रेमी दंपत्य अजन कधींही झालें नव्हतें. आजूबाजूची हवा दूषित असूनही ज्याअर्थी अशीं स्त्रीरत्नें रोममध्यें सांपडतात, त्याअर्थी अशांची कीर्ति दिगंत प्रसिद्ध व्हावी, यांत नवल नाहीं. पाश्चात्यांमध्यें एक नवरा मेला कीं लगेच दुसरा करावयाचा अशी पद्धति सररहा आहे हें विदितच आहे. अशा संस्कृतीमध्यें वाढलेली असतांही पुनर्विवाहाचा तिरस्कार करणारी ॲन्टोनिया तेथें होती, यावरून खरें प्रेम हें सामाजिक रूढींना बाजूस ठेवून आपली उज्ज्वलता कशी प्रगट करितें, हें दृष्टोत्पत्तीस येतें. पतीच्या चिंतनामध्यें तिनें आपलें पुढील सर्व आयुष्य घालविलें.

कित्येक शास्त्रज्ञांना मोठमोठे शोध लावण्यास त्यांच्या बायकांनींच मदत केली. जिनोव्हा एथील प्रसिद्ध स्थावरजंगमवादी ह्यूबर याची पत्नी अशाच तऱ्हेची बाई होती. हा सत्तराव्या वर्षीं अंध झाला, तरी

आपल्या पत्नीच्या साहाय्यानें त्यानें स्थावरजंगमज्ञानाच्या एका शाखेचा इतक्या पूर्णत्वानें व कसोशीनें अभ्यास केला कीं त्यानें लिहिलेलें पुस्तक फारच लोकप्रिय झालें. त्यांत निसर्गनिरीक्षण इतक्या मार्मिकतेनें केलेलें होतें कीं लोकांना हें पुस्तक आंधळ्यानें लिहिलें आहे, याचें मोठें आश्चर्य वाटलें. या अभ्यासामध्यें तो आपल्या पत्नीच्या उत्तेजनानेंच इतका पुढें आला. डोळे गेल्यानें झालेलें दुःख ता कांहीं दिवसांनीं विसरला. इतकेंच नव्हे, " पण माझी दृष्टि मला पुनः न येईल तर बरें. कारण माझी बायको मला सदैव तरुण आहे, ही गोष्ट कांहीं थोड्या महत्त्वाची नाहीं " असें तो म्हणे. अशा रीतीनें मनुष्याच्या प्रत्येक व्यवसायामध्यें त्यास स्त्रीनें अनन्यभक्तीनें मदत केली आहे. इतकेंच काय पण पतीचे प्राणही वांचविले आहेत. विन्सबरी येथील किल्ल्यास वेढा पडला असतां, तेथील स्त्रियांनीं शत्रूजवळ एक मागणी मागितली. 'आम्ही आमची चीजवस्त घेऊन बाहेर निघून जातों, मग किल्ला तुम्ही खुशाल घ्यावा.' शत्रूनें परवानगी दिली मात्र कीं स्त्रियांनीं आपापल्या नवऱ्यास खांद्यावर घेतलें व बाहेर निघून गेल्या. चीजवस्त न नेतां हें काय नेतां ? असें विचारल्यावर त्या स्त्रियांनीं उत्तर केलें, " खांद्यावर घेतलेली हीच आमची चीजवस्त. " सर्वांत उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ग्रोटिसच्या बायकोचें होय. ग्रोटिस यास कांहीं राजकीय अपराधाबद्दल जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली होती. बायकोनेंही आपण त्याजबरोबर तुरुंगांत राहाणार असा निश्चय केला व तशी सरकारकडून परवानगीही मिळविली. आठवड्यांतून दोनदां तिला गांवांत जाण्याच परवानगी देण्यांत आली. ग्रोटिस हा मोठा वाचनप्रिय असल्यानें त्यास वाचण्यास पुष्कळच पुस्तकें लागत. शेवटीं असें झालें कीं पुस्तक फारच लागूं लागलीं. तेव्हां एका मोठ्या पेटीमध्यें तीं घालण्यांत येंऊ लागलीं. ही पेटी डोक्यावर घेऊन ग्रोटिसची बायको गांवांत जाऊन दुसरीं पुस्तकें आणीत असे. पेटी रोज तपासून पाठवीत असत. पण पुढें पुढें तपास करण्याचें बंद झालें. तेव्हां एके दिवशीं मिसेस ग्रोटिसनें आपल्या

नवऱ्यास पेटीमध्यें बसण्यास सांगितलें. तो प्रथम कचरला, पण तिच्या आग्रहानें तो पेटींत बसला. पहारेकऱ्यांनीं ती उचलून पाहिली तों जड लागली. 'अरे, या पेटींत काय ग्रोटिस बसला आहे काय' 'छे! त्याची पुस्तकें त्यांत बसलीं आहेत.' असें तिनें विनोदानें उत्तर दिलें. पुढें सर्व व्यवस्थितपणें झालें व तीं दोघेंही शत्रूच्या तावडींतून सुटून गेलीं.

कोणत्याही प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र उघडून पहा. त्याच्या जीवितामध्यें त्याच्या सहधर्मचारिणीनें त्यास आयुष्याच्या आपत्तीमधून आपल्या अद्भुत प्रेममोहिनानें, आनंदानें, व उत्साहानें वाट काढण्याची स्फूर्ति दिलेली आहे. दारिद्र्याच्या दावानलज्वाला सात्त्विक सहनशीलतेनें शीतल करणारी, भवशीत भीत प्राण्याला प्रेमाच्या पांघरुणानें ऊब देणारी, व्यसनाधीनतेनें पापमय झालेल्या शरिरास पावित्र्याच्या पुण्यजलाचें प्रोक्षण करणारी, काळजीचा रोग लागलेल्या कुडीस, नैराश्यानें कर्तव्यपराङ्मुख झालेल्या विषण्ण मनास, दुःखाच्या दंशानें व्याकूळ झालेल्या हृदयास, आपल्या आनंदित मुद्रेनें निरोगी करणारी, उल्हासपूर्ण व प्रेमळ शब्दानें कर्तव्याभिमुख करणारी, प्रेमसुधेचें सिंचन करून आनंदोद्रेकानें नाचविणारी अशी त्या स्त्रीदेवतेखेरीज कोण असणार? एक प्रसिद्ध ग्रंथकार म्हणतो, 'सुगृहिणी हा परमेश्वराचें अत्यंत अमोलिक असें पारितोषिक—अनंत आशींची प्रत्यक्ष देवता—भगवंतानें दिलेला रत्नमय करंडक होय. तिचा मंजुळ आवाज म्हणजे स्वर्गीय गान, तिचें हास्य म्हणजे आयुष्यांतील अत्यंत तेजोमय दिवस, तिचें चुंबन म्हणजे मानवी मुग्धपणाचें पोषक अन्न, तिचे बाहु हे मानवी शरिराचें कवच, तिचा उद्योग हीच माणसांची संपत्ति, तिचा मितव्यय हाच त्याचा अत्यंत विश्वासू मित्र, तिचे ओंठ हेच त्याचे विश्वासू उपदेशक."

स्त्री ही प्रेमाची पुष्करणी आहे. ती प्रेमसुधाबिंदूंनीं भरलेली पुष्पवाटिका आहे. ती जगद्रंगभूमीवर प्रेमजल सिंचन करणारी दिव्य देवता आहे.

स्त्रीच्या अंगीं नानाविध व अमोलिक गुण असल्यानें त्यांचें वर्णन कधींच संपणार नाहीं.

शेवटीं आपण प्रकृतिपुरुषांमध्यें विनटलेल्या सती व पती यांस नमन करून हें प्रकरण आटपतें घेऊं.

# प्रकरण ३ रें.

## " भूतदया " अगर विश्वभगिनी.

" मर्यादेच्या अंधारीं
प्रीति वसे कां कधींतरीं ?
अफाट जगताचें रान
प्रीतीला अडवी कोण ?
दिव्य ज्योति
स्फुरतां चित्तीं
विश्वें हीं स्फुरती बाई
प्रीति दिव्य एके ठायीं ॥ ! ॥

-- बालकवि--

प्रेम, दया, शांति इत्यादि कोमल विकार हृत्कमलांतील अत्यंत कोमल तंतू आहेत. याच कोमल विकारतंतूंवर परमेश्वराचें वीणावादन चालूं आहे. याच वीनेच्या तारेचा झंकार सर्व जगाला झुलवीत आहे. भूतदया हा त्या तारेचा कर्णमधूर झणत्कार आहे. ज्याप्रमाणें गृहसंसार, मातृवात्सल्य, बंधुप्रेम, भगिनीप्रेम, पितृप्रेम वगैरे सुवर्णतंतूनें निगडित झाला आहे; राष्ट्रसंसार ज्याप्रमाणें देशभक्ति, परोपकार, कळकळ, राष्ट्र-बंधुत्व, स्वार्थत्याग अशा बिनमोल गुणांनीं बद्ध झाला आहे, त्याच-प्रमाणें पण त्याहून मोठ्या प्रमाणावर. विश्वसंसार सुयंत्रित केला आहे. गृहसंसारांत निकट सांनिध्यानें अगर आप्तभावानें मनुष्य क्षणभर स्वतःस विसरून आप्तहिताकरितां झटतो. पिता पुत्राकरितां द्रव्यद्वारा, श्रमद्वारा झीज सोसतो व निकट आप्तत्व भावनें व नैसर्गिक प्रेमानें स्वतःस

क्षणभर विसरून जातो. यास आपण स्वार्थत्याग असें म्हणत नाहीं. हा शुद्ध स्वार्थत्याग नव्हे, हा स्वार्थसाधुपणा जरी नसला तरी यास नैसर्गिक स्वार्थत्याग असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अपत्यवात्सल्यानें प्रेरित असे जे सद्गुण ते निसर्गतः मनुष्याच्या अंगीं असतात; तसे ते नसतील तरच आश्चर्य. पण राष्ट्रसंसारांत लागणारे गुण नैसर्गिक नसतात म्हणून ते विरळा असतात. स्वकुटुंबवात्सल्य हा राष्ट्रसंसाराच्या दृष्टीनें स्वार्थच मानला पाहिजे. अनेक कुटुंबांचें एक राष्ट्र बनतें. किंबहुना यांतही आपणास बरेच भाग पाडतां येतील:—ग्रामसंसार, देशसंसार, व राष्ट्रसंसार. इटालियन देशभक्त माझिनी म्हणतो, "स्वतःस मध्यबिंदु कल्पून स्वार्थांच्या निरनिराळ्या लांबीच्या त्रिज्येनें जर आपण आपल्या भोंवतीं वर्तुळें काढिलीं तर आपल्यास या स्वार्थाची त्रिज्या किती लांब वाढावितां येते हें कळून येईल." वनस्पतिजात व मानवेतर जीवजात स्वतःच्या अगर अपत्याच्या पुढें धांव घेत नाहीं. मानवाचें हृदय ज्ञानकिरणांनीं विस्फारित झालें असल्यामुळें त्यास व्यक्तिस्वार्थापलीकडे कांहीं तरी आहे हें कळतें, इतकेंच नाहीं, तर त्यांतच मानव जन्माचें सार्थक आहे असें तो मानतो. आपल्या भोंवतीं ज वर्तुळ आहे त्या वर्तुळाच्या त्रिज्येच्या लांबीवर मानवी प्राण्याची अंतिम उन्नति किती झाली आहे हें दिसणार आहे. व्यक्तिस्वार्थ हा इतर सर्व स्वार्थाआधीं या मृण्मय कुडीस सर्पाप्रमाणें वेढे घालून बसला आहे. आपल्या जिवावर बेतलें कीं, पुत्र नाहीं, पिता नाहीं, माता नाहीं, पत्नी नाहीं, कोणी नाहीं, स्वतःपुढें सर्व त्याज्य. जोंपर्यंत आपल्या शारीरिक सुखास व इंद्रियसुखास आप्तेष्ट कारणीभूत होतात तोंपर्यंतच ते आपले. तसेंच दुसऱ्याचा जीव धोक्यांत असून त्यानें मदतीकरितां आपला धावा केल्यास स्वतःचा जीव धोक्यांत न घालतां आपण त्यास मदत करूं. पण स्वतःचा जीव गेला तरी बेहेत्तर पण दुसऱ्याचें संरक्षण करीन असा मनाचा घडा करून संसाराच्या क्षुब्ध

र्यांत उडी घालणारा विरळा. शेंबड्या लेंबड्या पोरांनाही मोठ्या प्रेमानें हृदयाशीं कुरवाळणाऱ्या आयांना पाहून मातृत्वाचें मोठें कौतुक वाटतें. पण सुखलालसेकरितां पोटच्या पोरावरही मारेकरी घालण्यास तयार झालेल्या स्त्रियांचींही कांहीं उदाहरणें इतिहासांत सांपडतात. ‘यशवंत’ कवीचा ‘अस्थींचा सवाल’ हें त्यांतलेंच एक उदाहरण होय.

गृहसंसाराची ही गत, मग ग्रामसंसार व राष्ट्रसंसार यांची काय कथा? ‘एकमेकावर प्रेम करा’ ‘शेजाऱ्याशीं आत्माप्रमाणें वागा’ वगैरे साधीं तत्त्वें हीं मनुष्याच्या वागणुकींत दिसत नाहींत, मग भूतदया अगर विश्वसंसारांतील आत्यंतिक प्रेम याची वार्ता कुठली? दुर्गुणाच्या दुर्गंधींत लोळणाऱ्यांना व असूयामत्सरादि विकारांनीं प्रेरित होऊन कोत्या कल्पनांच्या पत्रावळी चाटणाऱ्यांना तर हा विश्वात्मैक्यभाव कशाशीं खातात हें देखील कळणार नाहीं. गृहसंसाराचे नाजुक रेशमी पाश, ग्रामसंसाराची सोनेरी सांखळी व राष्ट्रसंसाराचें बिसतंतूंचें जाळें यांच्या तावडींतून सुटून, विश्वात्मैक्यभावाच्या आत्यंतिक स्वातंत्र्यरूपी प्रेमावकाशांत, ज्या तेजोमय विभूतींनीं प्रवेश केला व आपलें जीवितसर्वस्व अर्पण करून जेथें जेथें आर्तांचा करुणारव ऐकूं आला तेथें तेथें तांतडीनें धाव मारली त्यांची धन्य होय. एकाच देवाचीं आपण सर्व लेकरें आहों हीच भावना जागृत ठेवून सदैव वागणारीं माणसें फारच विरळा.

**“सत्यधर्म निरहंकार**
**चोहींकडे आत्माराम”**

ही बालकवींची उक्ति थोड्यांनींच सार्थ केली असेल.

भूतदयेची छाया विस्तृत व महती उच्च आहे. भूतदया ही भावनेची सख्खी बहीण. हृदय हें भावनेचें मंदिर. तेंच भावनेच्या निर्झराचें उगमस्थान. स्त्रीपुरुषांमध्यें स्त्री ही जात भावनामय म्हणूनच जगांत भूतदयेची मोठमोठीं कार्यें तिच्याच हातून झालेलीं आढळतात.

ज्याप्रमाणें गृहसंसारांत स्त्रीचें काम फार नाजूक असतें. त्याचप्रमाणें विश्वसंसारांतील तिचें काम फार नाजूक आहे यांत शंका नाहीं. रस्किन म्हणतो, "स्त्रीमुळें गृहसंसार जसा व्यवस्थित, सुखकर व सुंदर होतो, तसाच विश्वसंसारही स्त्रीच्या कोमल हस्तपल्लवांनीं व्यवस्थित सुखकर व सुंदर होतो." पुढें तो म्हणतो, "उंबरठ्याच्या आंत ज्याप्रमाणें सुव्यवस्थितपणाचें केंद्र, आर्तांस शांति व सौंदर्याची खनी, तद्वतच उंबरठ्याच्या बाहेरही–ज्या ठिकाणीं व्यवस्था दुष्कर असते, आर्तत्वाचा अतिरेक असतो व सौंदर्य विरळाच मिळतें–ती त्याच गुणांनीं मंडित असते."

हें रस्किनचें स्त्रियांच्या उच्चनीच कर्तव्याचें विवेचन फार मार्मिक आहे. रणांगणावर आपला पति देशाकरितां हातावर शीर घेऊन शत्रूंशीं टक्कर देत असतां स्त्रियांनीं राष्ट्रसंसारांतील व्यवस्था शिरावर घ्यावयास नको काय? रणमदानें बेहोष होऊन, देशाभिमानानें प्रेरित होऊन, हातांत समशेर घेऊन पति लढत असतां राष्ट्रांतील शांतता राखणें, इतर सुव्यवस्थितपणा राखणें, उघड्या पडलेल्या कुटुंबांस मदत करून त्यांच्याअत्यर्थ झटून काम करणें, अनाथ मुलांचें संगोपन करणें वगैरे पुष्कळ परोपकाराचीं कृत्यें करण्यास स्त्रियांनीच पुढें आल्याशिवाय कसें भागणार? रणबहादुराची तलवार पोलादाची असते तर सात्विक शूरत्वानें विनटलेल्या स्त्रीची समशेर, दयामृतानें ओथंबलेल्या प्रेमाची असते. शत्रूंचीं अनंत शिरकमलें कट्यारीनें उडवून देणें जितकें अवघड त्याच्या शतपटीनें छिन्नविच्छिन्न झालेल्या अवयवांची सांधासांध व प्रेमयुक्त जोपासना करणें अवघड आहे, हें निःसंशय आहे. म्हणूनच स्त्रीची राष्ट्रीय जबाबदारी फार मोठी आहे.

रस्किन तर स्त्रियांवरील सार्वराष्ट्रीय अगर आंतरराष्ट्रीय जबाबदारीचें महत्व सांगतांना युरोपांतील स्त्रियांस कर्तव्यपराङ्मुखतेबद्दल दोषही देतो. स्त्रीनें मनांत आणलें तर जगांतील रक्तपात बंद होईल अशी त्याची उमेद आहे. तो म्हणतो:—धनलालसेमध्यें जीवितसर्वस्व घालवून हातांत

सुवर्णाची नाणीं असतां असतां एखादा कद्रू जर निजधामास गेला तर त्यांत मला आश्चर्य वाटणार नाहीं. रेल्वेच्या दिवे मालविलेल्या डब्यांत अगर एखाद्या निर्जन पाणतळींत राक्षसी व्यक्तींनीं केलेल्या खुनांत मला आश्चर्य वाटणार नाहीं. राष्ट्राराष्ट्रांत दुरभिमानानें कवडीमोल मौक्तिका-करितां होणाऱ्या असंख्य लढायांतून कोट्यवधी राजेरजवाडे, असंख्य सेनानायक मरणाच्या भक्ष्यस्थानीं पडत असल्याचें पाहून मी दिङ्मूढ होत नाहीं; पण मला जें आश्चर्य वाटतें तें हें कीं, आपल्या बाळाला स्तनपान देणाऱ्या मृदु व नाजुक स्त्रीमध्यें जी गगनांतील शीतल वायूच्या लहरी-पेक्षांही पवित्र व कोमल पण तुफान दर्याच्या लाटेपेक्षांही जोरदार अशी शक्ति आहे तिचा उपयोग आपल्या अर्भकाच्या व त्याच्या पित्याच्या हृदयांतील अमानुष कठोरता नाहाशी करण्याकडे तिला करितां येऊं नये ! !

कोणतेंही उच्च वाङ्मय घ्या, त्यामध्यें अशा तऱ्हेचे उच्च विचार सांपडतातच. पौराणिक ग्रंथांकडे दृष्टि फेंकल्यास आपणांस तीच गोष्ट आढळते. जगास वंदनीय झालेल्या भगवद्गीतेंतही हेंच भूतदयेचें तत्त्व प्रतिपादिलें आहे. ‘ सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ’ सर्वत्र आत्मा सारखा भरला आहे. मला जशी दुःखवेदना होते तशी ती इत-रांसही होते. स्मरणींतील मण्याप्रमाणें आपण एकाच आत्मतत्त्वाच्या सुवर्णरश्मीनें बांधले गेलों आहों. यापेक्षा नैसर्गिकरीत्या हृदयस्थ असलेल्या विकारांना चलन देण्यास दुसरें महत्त्वाचें कारण कोठलें आहे ? भूतदया ही नैसर्गिकच असते; पण ती सुप्त असल्यानें तिला जागृत करावी लागते. कोणत्याही तऱ्हेचें दान सत्पात्रीं करणें हें समाजाचें कर्तव्य आहे. समाज तें न करील तर त्यांत त्याचा दोष आहे व त्याकरितां तो जबाब-दारही आहे. अपात्रीं दान हें मात्र दान नसून पाप आहे. जसें सत्पात्रीं दान करणें उपकार नसून कर्तव्य आहे तसेंच अपात्रीं दान करणें हें दान नसून पाप आहे. जगांमध्यें आप्तेष्ट नसल्यानें, सखेसोयरे मदत करीत

नसल्यानें, अत्यंत कष्टमय दशेमध्यें खितपत पडलेले रोगी, अंध, अनाथ, पंगु असंख्य आहेत. अशा लोकांच्या हांकेस ओ देऊन त्यांचें दुःख हरण करणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे. अशा सात्विक किंवा बिकट कामास आपल्यास वाहून घेणें हें वाटतें तितकें सोपें खास नाहीं. याला मनाची अत्यंत तयारी लागते. अशी मनाची तयारी असलेलीं माणसें फारच विरळा.

भूतदया हा शब्द कांहीं केवळ मनुष्यदया या संकुचित अर्थानें योजलेला नाहीं. त्यांत प्राणिदयेचासुद्धां समावेश होतो. मुक्या प्राण्यास चावडींत फिर्याद करितां येत नाहीं, त्यास वाचाच नाहीं, म्हणून कांहीं त्यास दुःखच नाहीं असें होत नाहीं. मनुष्य आपल्या बुद्धिबलानें त्यावर हुकमत चालवितो; पण मनुष्याची बुद्धीच त्याला असें सांगते कीं, तुझ्या हातांत जी शक्ति आहे ती तूं न्यायानेंच चालविली पाहिजे. हें भूतदयेचें तत्त्व आम्हां हिंदुस्थानी भागवतांना अपरिचित नाहीं. भागवत धर्म हा धर्मच आधीं प्रेमाचा व भूतदयेचा आहे. भागवतधर्म पृथ्वीवरील यच्चयावत् सर्व भूतांवर प्रेम कर असें कंठरवानें सांगतो. विवेकबुद्धीला मनुष्या-मनुष्यांतील प्रेम जर पटतें तर सर्व भूताठायीं ईश्वर आत्मरूपानें वास करितो असें जें भागवतधर्माचें तत्त्व आहे तें कां पटूं नये ?

असो. आम्ही भूतदया म्हणजे मनुष्यदया व प्राणिदया असें समजतों. या कार्यास कित्येक विभूतींनीं हातभार लावला आहे; किंबहुना जगांत जर सर्वांत मोठें कार्य असेल तर तें दुसऱ्याकारितां, इतकेंच काय तर सर्व भूतमात्राकारितां कळकळीनें झटणें हेंच होय. इतिहासामध्यें स्वयंस्फूर्तीनें प्रेरित होऊन, अलौकिक स्वार्थत्याग करून, लोकसेवा करणाऱ्यांमध्यें स्त्रियांचीच संख्या जास्त आहे. अशा लोकसेवा करणाऱ्या स्त्रिया पूर्वेकडे व पश्चिमेकडेही झाल्या आहेत.

प्रथम आपण पश्चिमेकडील स्त्रियांविषयीं विचार करूं. या स्त्रियांतील मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेल ही अग्रगण्य होय. ही १८२० मध्यें जन्मास आली. 'स्त्री ही शुश्रूषा करते व रोगी स्त्रीच्या मायाळू वागणुकीनें बरा होतो' असें म्हणणारांचें आश्चर्य करणारी मिस नाइटिंगेल पुढें या शुश्रूषेच्या कामामध्यें कशी बावनकशी उतरली हें तिच्या चरित्रावरून स्पष्ट होतें. भूतदयेनें व कर्तव्यनिष्ठेनें प्रेरित होऊन तिनें केवढें सत्कार्य केलें पहा. तिला खरें पाहिल्यास कांहींही कमी नव्हतें. पोट भरण्याला तिला अन्य साधनें होतीं. तिजवर बऱ्याच लोकांची प्रीति होती. एकंदरींत पहातां तिला संसारांत सुखानें रहाण्यास सर्व कांहीं साधनें होतीं, पण स्त्रीजातीचा तिला फार मोठा अभिमान होता. तिनें गरिबांच्याकरितां शिक्षणाची सोय केली, पण तिची महती संकटकालींच जास्त कळून येई. अशा तऱ्हेचे प्रसंग तिजवर पुष्कळ आले व त्यांतच तिचें धैर्य दृष्टोत्पत्तीस आलें.

या बाईच्या घरची स्थिति उत्तम, त्यांत तारुण्याच्या भरांत असलेली. अशा स्थितीमध्यें कोणती स्त्री नानातऱ्हेच्या मोहांत गुरफटणार नाहीं ? नटावें, मुरडावें, बागबगीच्यांतून हिंडावें, पोपट मैनांशीं खेळावें, उंचीं वस्त्रें नेसावीं, एक ना दोन, या सर्व सुखांचा त्याग करून फ्लॉरेन्स नाइटिंगेलसारखी परोपकाराकरितां देह झिजविण्याची तयारी करणारी स्त्री फारच विरळा ! तिनें शिक्षणक्रम संपविला. रुग्णालयामध्यें जाऊन शुश्रूषा कशी करावी वगैरे माहिती तिनें मिळविली. ३–४ महिने त्या कामाचा प्रत्यक्ष अनुभवही तिनें घेतला. बराच प्रवास करून तुरुंग, रेफॉर्मेटरी संस्था, रुग्णालयें तिनें बरींच पाहिलीं. 'हॉस्पिटल फॉर दी सिक गव्हर्नेसिस्' ही संस्था मोडकळीस आली आहे असें पाहून आपल्या शिरावर सर्व भार घेऊन तिनें ती संस्था सुयंत्रित चालविली. प्रकृति फार बिघडली असतांही, मोकळी हवा, स्वैर सहल, घरांतील सौख्य हीं सर्व सोडून तिनें रुग्णालयांतील आपल्या भगिनींची सेवा करण्याकडे आपली

शक्ति खर्च केली. इतक्यांत १८५४ सालीं क्रिमियाची लढाई सुरू झाली. तेथें जखमी शिपायांची योग्य व्यवस्था होत नसल्यानें पुष्कळ शिपाई मरूं लागले. स्वयंसेवकांची यावेळीं फारच जरूरी होती. मिस नाइटिंगेल अशाच वेळीं धैर्यानें वागणारी स्त्री असल्यानें तिनें प्रथमच २३०० जखमी शिपायांची शुश्रूषा स्वतः करण्याची जबाबदारी घेतली. इंग्लंडहून जाते वेळीं समुद्रप्रवासाचा तिला अतोनात त्रास झाला. समुद्रप्रवासांत बरींच संकटें व धोकेही आले; पण तिनें प्रवासाचा त्रास झाला म्हणून क्षणभरही विश्रांती घेतली नाहीं. कर्तव्यनिष्ठेच्या भव्य ऊर्मीपुढें व्यक्तिस्वार्थाच्या क्षुल्लक वीचींची काय मातबरी ? तेथील सर्व व्यवस्था स्वशिरावर घेऊन तिनें आपलें काम सुरूं केलें. रात्रौ तिची दिव्य मूर्ती सेवेस हजर असलेली पाहून जखमी व जीविताविषयीं हताश झालेल्या शिपाई गड्यास आशा वाटूं लागे. तिचें नांव कोणांसही ठाऊक नव्हतें. रोग्यांची शुश्रुषा ती रात्रंदिवस करीत असे. रात्रीं सदोदित दिवा घेऊन ती सेवेकरितां हजर असे. म्हणून तिला रोगी ' लेडी ऑफ धि लँप '- ( दिव्याची बाई ) असें म्हणत. खरोखरच ती सांगेल त्याप्रमाणें वागण्यास रोगी तयार असत. तिला ते एका शब्दानेंही दुखवीत नसत; " धैर्य, शांती, चांगुलपणा, सहनशीलता, व्यक्तिस्वार्थ अजिबात विसरून जाऊन दुसऱ्याकरितां झटणें हे सद्गुण ज्याच्या ठायीं आहेत त्याला जपतपादि साधनें करण्याचें कांहीं कारण नाहीं " असें ती म्हणे. क्रिमियाची लढाई संपल्यानंतर ती परत आली. तिचा देशामध्यें अत्यंत बहुमान झाला. तिच्या श्रमाचें पारितोषिक म्हणून तिला ५ लक्ष देणगी देत असतां तिनें ती नाकारली. शत्रूच्या हातीं जरी जखमी शिपाई सांपडला तरी त्यास औषधपाणी द्यावें असा जो सुधारलेल्या राष्ट्रांत कायदा पास झाला तो तिच्याच परिश्रमाचें फळ होय. वाचकहो, स्त्रीवाचकहो, जोंपर्यंत मनुष्य लिहीत असतो व बोलत असतो तोंपर्यंत सर्व ठीक आहे. पण कृतीची वेळ आली कीं हे लेखक व वाचक घाबरून जातात. आईबापांची सेवा करणें मनुष्यस्वभावांत

आहे. नातेवाईकांचीही सेवा करणें शक्य आहे. पण इतर नानातऱ्हेच्या अनोळखी रोग्यांची शुश्रुषा मोठ्या आनंदानें व प्रेमानें कर्तव्य म्हणून करण्यास तयार होणें ही मनुष्याच्या स्वभावाबाहेरची गोष्ट आहे. अशा देवकोटींतील माणसेंही जगांत होऊन गेलीं हें इतिहासवाचकांस माहीत आहे. रोग्यांचें भेसूर कण्हणें, तेथील रोगांची घाण व दुर्गंधी, अशी एकंदर भयानक परिस्थिति लक्षांत आणून पहा, म्हणजे आपल्यास खात्री वाटेल कीं, हें काम करण्यास मनाची फार मोठी तयारी झाली पाहिजे. नानातऱ्हेचे रोग झालेल्या माणसांची सेवा निष्काम मनानें, प्रेमानें व कर्तव्य म्हणून करणें हें थोर विभूतींचें काम आहे. खोकणाऱ्या, ओकणाऱ्या बडबडणाऱ्या रोग्यांची किती तऱ्हेनें सेवा करावी लागते हें कल्पनेनेंच केवळ जाणलें पाहिजे. मिस नाइटिंगेलनें ज्या रोग्यांना स्पर्शजन्य रोग जडला होता अशा रोग्यांचीही शुश्रूषा केली. सामान्य मनुष्याच्या मनांत आपल्याला रोग होईल म्हणून आपण त्याची सेवा करूं नये असाच विचार येईल. इतकेंच काय, पण अशा तऱ्हेच्या रोग्यास पाहिल्याबरोबर दूर पळणारे लोकही कित्येक सांपडतात. पण आपल्याला रोग होईल हें किंतूही मनांत न आणतां केवळ त्या रोग्यांचे अवर्णनीय हाल पाहून हृदय कळकळून त्यांचे दुःखशमनार्थ रात्रंदिवस खटपट करणारीं माणसें देवकोटींतीलच होत. या दयेच्या देवीविषयीं एक आधुनिक कवी म्हणतोः—

तूं तारा अंधारीं
 संतापां माझारीं
अमृतांची तूं झारी
 मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेल
प्रेमार्णवी नामी
 उठलेली उर्मी
आली गेली धामीं
 मिस फ्लॉरेन्स ... ...

असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, या बाईनें जीं आपल्या जीविता-मध्यें मानवी जातीकरितां कार्यें केलीं त्या कार्यांच्या उज्वलतेनेंच तिचा सांप्रदाय राखिला. मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या हाताखालीं ब-याच सेविका तयार झाल्या व त्यांनीं तिचा सांप्रदाय अव्याहत चालू ठेवला. याच सांप्रदायांतील सिस्टर डोरा ही अत्यंत प्रमुख होय. आर्त जनांवर आपल्या हृदयांतील प्रेमगंगा लोटून ज्यांनीं त्यांचा उद्धार केला त्या स्त्रियांपैकीं सिस्टर डोरा ही मूर्तिमंत प्रेमरसानें ओतलेली पुतळीच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही आपल्या वयाच्या चवदाव्या वर्षीं मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या हाताखालीं काम करण्याचा हट्ट धरून बसली; पण आईबापांनीं तिच्या वयाकडे पाहून तिला जाऊं दिलें नाहीं. पण या लहान वयांतही तिची परोपकार करण्याची इच्छा फारच तीव्र असल्यानें ती एके दिवशीं बापास न विचारतांच घरांतून चालती झाली. ‘ मजकडून तुला शिक्षणाकरितां एक पैही मिळणार नाहीं, आपलें आपण च तुला पोट भरावें लागेल असें तिच्या निष्ठुर पित्यानें निक्षून सांगितलें. चवदा वर्षांपर्यंत तिल लिहितां वाचतां येऊं लागलें होतेंच. तेव्हां तिनें लहान मुलींना शिक्षण देण्याचें काम सुरूं केलें. याच मिळकतीवर ती पोट भरीत असे. पण पुढें ‘ परोपकाराश्रम ’ नांवाच्या मठांत जाऊन तिनें जोग घेतला. तेथें जोगिणींनां फारच कडकपणें वागवीत असत. प्रथम तिला तेथें रोज सर्व जोगिणींचीं अंथरुणें घालण्यास सांगितलें. पुढें पुढें तिची परीक्षा पाहण्याकरितां म्हणून अंथरुणें घातल्याबरोबर विस्कटून टाकावयाचीं व पुन्हां तिजकडून नवीं घालवावयाचीं हा क्रम सुरूं झाला. कांहीं दिवसांनीं तिला वालसाल येथें पाठविण्यांत आलें. तेथें तिनें आपलें काम इतकें चोख करून दाखविलें कीं तेथील लोकांमध्यें तिची फारच कीर्ति झाली. या ठिकाणीं असतांना, आपला बाप आजारी आहे असें तिला कळल्यावरून तिनें त्यास भेटण्यास जाण्यासाठीं रजा मागितली. अशा आणीबाणीच्या प्रसंगींही तिला रजा नाकारण्यांत आली. या व अशा

तऱ्हेच्या पुष्कळच त्रासदायक गोष्टी तिला सोसाव्या लागत. म्हणूनच तिला त्या संस्थेचा अत्यंत तिटकारा आला, व १८७५ सालीं तिनें त्या संस्थेचा संबंध पूर्ण तोडला. या तिच्या राजिनाम्याविषयीं एका मित्रानें तिला विचारिलें असतां तिनें मोठें मार्मिक उत्तर दिलें 'मी स्त्री म्हणजे मनुष्यप्राणीच आहें, कांहीं चीजवस्तु नाहीं.'

एकदां एक प्रश्न असा आला कीं, 'रोग्याचा हात तोडल्याशिवाय तो जगणार नाहीं.' पुष्कळ डॉक्टरनीं हात तोडल्याशिवाय तो रोगी बरा होणार नाहीं व त्याच्या वेदना कमी होणार नाहींत असें सांगितलें. व हात न तोडल्यास तो रोगी क्षय लागून सडून सडून मरेल, असेंही सांगण्यांत आलें. सिस्टर डोरानें मीं त्याचा हात तोडल्याशिवाय उत्तम तऱ्हेची शुश्रूषा ठेवून बरें करण्यास तयार आहें असें सांगून त्याप्रमाणें करूनही दाखविलें. पुढें त्या रोग्यास लोक विनोदानें 'सिस्टर डोराचा हात' असें म्हणत. हा रोगी आपली कृतज्ञता दाखविण्यास दर रविवारीं ११ मैल तिच्या गांवीं तिला भेटण्यास येई. तो तिला आईप्रमाणें मानीत असे. ती घरीं नसल्यास सिस्टरला 'तुमचा हात आला होता' असें सांगा म्हणून निरोप सांगून जात असे. कोणताही त्रास झाला तरी शुश्रूषेच्या कामांत ती बिलकूल कसूर करीत नसे. जागरणाचा त्रास व जवळच्या रोग्यांची दुर्गंधी यानें तिचें मन कधींही विटलें नाहीं. एकदां अकरा बारा माणसें एका गिरणींत भाजून निघालीं होतीं. त्यांची स्थिति इतकी भयंकर झाली होती कीं त्यांस ओळखतां येणेंही कोणास शक्य नव्हतें. भाजलेलें मांस गळूं लागलें होतें व त्यांस अत्यंत दुर्गंधीही सुटली होती. अशा रोग्यांचीही तिनें फारच त्रास घेऊन सेवा केली. रोग्यांस आनंदांत ठेवण्यास ती फारच झटत असे. त्यांच्याशीं विनोद करून ती त्यांस हसवीत असे. पण सगळ्यांत अत्यंत मोठेपणाची व आश्चर्याची गोष्ट म्हटली म्हणजे तिनें प्रत्येक रोग्याजवळ एक एक घंटा देऊन ठेविली होती. 'कांहीं लागल्यास घंटा

वाजवा' असें तिनें त्यांस सांगून ठेविलें होतें. हाक मारण्यास त्यांस त्रास होऊं नये व ती मारल्यास कदाचित् ऐकूं येणार नाहीं असें वाटून तिनें ही व्यवस्था केली होती. कोण ही स्वसुखाची निरभिलाषिता ! पुष्कळदां असें होई कीं, रोगी सारा वेळ घंटा वाजवीत असत. कांहीं रोगी उगीच्या—उगीचच घंटा वाजवीत. इतर रोगी त्यांस बरेच बोलत. तरी त्यांचें आपलें सुरूंच असे. असें होत असल्यानें डोरास झोंप अशी बरेंच दिवसांत मिळत नसे. परंतु तिनें कधीं एका शब्दानेंही कोणा रोग्यास दुखविलें नाहीं. उलट जे रोगी उगीच घंटा वाजविणारांस बोलत त्यांस ती सांगे ‘ बाबांनों, नका, त्यांस तुम्हीं बोलूं नका. त्या घंटेचा नाद ऐकून मला फार समाधान होतें. स्वतःच्या घरांत कोपऱ्यांत खोकत पडलेल्या म्हाताराम्हातारीस ‘ उगीच काय कटकट लाविली आहे ’ असें म्हणणारीं माणसेंच घरोघरीं सांपडतात. पण अनोळखी रोग्याची सेवा आपल्या हातून त्यांच्या मनासारखी व्हावी अशी इच्छा करून त्याप्रमाणें रेसभरही न ढळतां वागणारीं माणसें कितीशीं सांपडतील याची कल्पना वाचकांनींच करावी. ‘बाळ्या सोन्या,’ करून बाळाला पाजविणाऱ्या आया पुष्कळ आहेत. पण रोग्यांना सुद्धां ‘ दादा पुता ’ करून त्यांची समजूत घालून, त्यांशीं विनोद करून त्यांस औषधोपचार करणारी सिस्टर डोरासारखी लोकमाता फारच विरळा ! एकदां एका रोग्यास भयंकर ‘ काळदेवी ’ येऊन तो अत्यवस्थ झाला. सर्व नातलग पळून गेले. त्याच्या शुश्रूषेकरितां नातलगांमध्यें एकही तयार झाला नाहीं. तिनें हे सर्व पाहिलें व स्वतः सर्व कांहीं सेवा तीच करूं लागली. रात्रीची वेळ व रोगी तर अत्यंत अत्यवस्थ झालेला ! तशांत खोलीमध्यें दिवाही नव्हता. म्हणून पदरचे पैसे ताबडतोब देऊन एका बाईस तिनें मेणबत्ती आणण्यास सांगितलें. ती आणण्यास म्हणून जी गेली ती पुन्हां आलीच नाहीं. वेळ तर फार कठीण ! अंधार पडलेला. रोगी वाटेस लागलेला ! अशा वेळीं डोराची स्थिति काय झाली असेल ! दुसरी एखादी लेच्यापेच्या हिमतीची व तत्त्वाची स्त्री असती तर पळूनच गेली असती. पण ती त्याजवळ शेवटपर्यंत होती.

शेवटचा क्षण जवळ आला व 'सिस्टर डोरा माझा मुका घेशील काय ?' असें तो म्हणाला. भगिनींनों, कल्पना करा, तुमचे असे कित्येक बंधु भगिनी प्रेमाविना मृत्यूच्या दाढेमध्यें पडले असतील. तुमच्या भावाच्या शेवटच्या क्षणामध्यें त्यास शांतपणें मरण यावें म्हणून त्यास 'भगवन्नामोच्चारण कर' असें सांगणारी एखादी ताई पाहिजेना ? "ताई तुझ्याविना मला कोणी नाहीं बरें. प्रभू, तुझें भलें करो" असा त्या मरणोन्मुख भावानें दिलेला आशीर्वाद तुम्हांस इतर हजारों मानांच्या चिन्हांपेक्षां अधिक फलदायी नाहीं का वाटत ? भगिनी डोरा हिनें असेंच नाहीं कां केलें ? डोराताईसारखी बहीण ज्या भावास मिळेल त्याची धन्य होय. त्या रोग्यानें वरील शब्द उच्चारल्याबरोबर तात्काळ तिनें त्याच्या इच्छेप्रमाणें केलें व म्हणाली 'घाबरूं नको. मी तुझ्यापासून दूर जायची नाहीं. काळजी करूं नको.' अशा दैवी आश्वासनानें त्या रोग्यास त्या शेवटच्या क्षणींही जीविताची आशा खात्रीनें वाटली असेल. यासारखें उदात्ततेचें उदाहरण कोठेंही सांपडणार नाहीं. स्त्रीवाचकहो, त्या रोग्याचें तोंड काळ्या देवीच्या मोठमोठ्या फोडांनीं भरलेलें होतें. असें असतांही डोराताईनें त्याचा मुका घेतला ! आपल्या धाकट्या भावाचे एकच काय पण असंख्य मुके तुम्हीं घेत असाल व तुमचे असे असंख्य बंधु दुःखांनीं घेरलेले, दारिद्र्यानें पोळलेले व रोगांनीं ग्रासलेले असे असतील. त्यांच्या तोंडावरील जीविताची निराशा तुमच्या आशामय व अमृतपूर्ण स्पर्शानें तुम्हीं घालविली आहे काय ? या दिव्य देवीच्या पदाला पोहोंचण्याची महत्त्वाकांक्षा धरा. त्यांत तुम्हांस ईश्वर यश देईल व तुमच्या भावांच्या तुम्ही खऱ्या बहिणी व्हाल. बरें असो. आपण दोराताईचेंच चरित्रामृत चाखूं व मग बोलूं. एक रोगी एकदां वायु होऊन पळूं लागला असतां त्याच्या अंगावर भयंकर कीड उठली असतांही 'तो आतां कोणीकडे तरी जाऊन स्वतःचा जीव धोक्यांत घालणार या भीतीनें त्याचे अंगास बिनद्दिकत पटकन विळखा घालून तिनें त्यास दाबून बिछान्यावर दडपून

धरलें. डॉक्टर येईपर्यंत ती अशाच स्थितींत होती. डॉक्टर आल्यानंतर सर्व व्यवस्था झाली.

रोग्यांमधील घाणींतच ती सदोदित असल्यानें तिच्या चहासुद्धां दुर्गंधी येत असे. सणवार असो अगर कांहींहि असो, तिला त्याचें कांहींहि वाटत नसे. लेन्टचा सण होता तरी ती त्याच कामांत गर्क होती. 'ते माझे दिवस अत्यंत सुखाचे गेले होते. लेन्टसारख्या पवित्र सणामध्यें अत्यंत योग्य अशा कामीं मीं गुंतलें,' असें ती मोठ्या अभिमानानें म्हणे. परमेश्वरानें मला अशा रीतीनें जन्म घालविण्यास बुद्धि दिली याबद्दल मीं त्याचे आभार मानावे तितके थोडेच आहेत, असेंही ती म्हणत असे. तिच्या चरित्रांतील आणखी एक गोष्ट पहा.

एकदां एका दारूच्या गुत्त्यापुढें मोठी मारामारी चालली होती. पण दोराताई आलेली त्यांनीं पाहिल्याबरोबर मारामारी बंद झाली व त्यांनीं आपापल्या अपराधाची क्षमा मागितली. यावरून तिचें वजन किती होतें हें सहज कळून येईल. तिच्या हाताला संसर्गानें एक रोग जडला होता हें तिनें किती दिवस तरी कोणासही कळविलें नव्हतें. हात बराच सुजला होता तरी त्यास ती विनोदानें 'ढमालेराव' असें म्हणत असे. या रोगानें तिचें मरण जवळ जवळ येऊं लागलें. डॉक्टर तिची अजमासाबाहेर जगल्याबद्दल थट्टाच करीत असत. अशा रोगानें पीडिली असतांही निरनिराळ्या शहरीं हिंडून तिनें शस्त्रक्रियेविषयीं माहिती मिळविली. शेवटीं १८७८ सालीं ती मरण पावली. तिच्या मरणानें सर्व लोकांस अत्यंत दुःख झालें. वालसाल शहरच्या मध्यभागीं तिचा संगमरवरी पुतळा उभा केला आहे.

अशाप्रमाणें फ्लॉरेन्स नाइटिंगेलचा लोकसेवेचा संप्रदाय अव्याहत चालू ठेवणाऱ्या दोराताईसारख्या गुरूवरही ताण करणाऱ्या स्त्रिया एकामागून

एक झाल्या. दिव्यानें दिवे लागत गेले व या दिव्य देवतांची रांगच्या रांग इतिहास मंडपास दीपावलीसारखी सुशोभित करूं लागली.

## मिस स्टॅन्ले.

मिस स्टॅन्ले ही स्त्रीही नाइटिंगेलच्या मागोमाग पन्नास स्वयंसेविकांनिशीं क्रिमियाच्या रणांगणावर गेली. तेथून तिनें एक पत्र लिहिलें होतें. त्यांत ती म्हणते " धडधाकट शरीराचे योद्धे अतिश्रमानें व्याकूळ होऊन मरणोन्मुख झालेले पाहून माझें हृदय कळकळून येतें व कंठ दाटून येतो. " क्रिमियाची लढाई संपल्यानंतरही युद्धामध्यें पडलेल्या वीरांच्या निराश्रित कुटुंबास सहाय्य करण्याकरितां इनें स्वयंस्फूर्तीनें आटोकाट प्रयत्न केले. लोकसेवा हा तिचा जणूं स्वभावच बनला होता. " परमेश्वराची इच्छा तडीस नेण्याचा मला प्रयत्न करूं दे. तो माझ्या हातून होण्याचा असल्यास ठीकच आहे. इतरांच्या हातून तो तडीस जावा अशी त्याची इच्छा असल्यांस तेंही कांहीं वाईट नाहीं. " हे ऑरनॉल्डचे शब्द ती वारंवार जपीत असे. पुष्कळ स्त्रिया याच लोकसेवाधर्माचें अनुकरण करूं लागल्या. प्रत्यक्ष उदाहरणानें जीं फलें प्राप्त होतात तीं हींच.

## मिस फ्लॉरेन्स लीज.

मिस फ्लॉरेन्स लीज हिचा लाडका भाऊ चीन देशामध्यें मरण पावला. या एकाच प्रसंगानें तिनें लोकसेवाव्रत अंगिकारण्याचा निश्चय केला. लोकांनीं तिला पुष्कळ तऱ्हेनें सांगितलें. ' तूं अजून कोंवळी पोर आहेस, तुझ्या मनाचा व शरीराचा अजून बराच विकास झाला पाहिजे. ' परंतु या मुलीचा निश्चयच फार बिकट असल्यानें तिनें आपला गुरु नाइटिंगेल इचा सल्ला घेऊन जरूर त्या तऱ्हेचें शिक्षण घेण्यास सुरवात केली. फ्रान्स, जर्मनी, डेन्मार्क, हॉलंड इतकेंच काय, सर्व युरोपभर प्रवास करून हिनें सशास्त्र अभ्यास केला. पॅरिस येथें आपल्या रोमन कॅथॉलिक भगि-

नीसह लोकसेवाव्रताचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यांनींही धर्मभेद विसरून जाऊन तिला सर्व कांहीं शिकाविलें. रोग्यांची शुश्रूषा करणें, म्हणजे केवढें जबाबदारीचें काम आहे, त्यास धैर्य, दक्षता व परिश्रम किती करावे लागतात याची कल्पना तिला येथें आली. ईश्वरावर पूर्ण विश्वास. संकटें जीं आलीं तीं ईश्वरप्रेषित आहेत व यांतून धैर्यानें वाट काढणें यांतच खरें मनुष्यत्व आहे हें तिच्या मनावर याच ठिकाणीं बिंबविण्यांत आलें. फ्रेंच लोकांच्या लष्करी रुग्णालयांतही तिनें शिक्षण संपादन केलें. इतकी सर्व सामुग्री झाल्यानंतर ती इंग्लंडमध्यें आली. तोंच इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें युद्ध सुरू झालें. जेथें तलवारीचा खणखणाट तेथें रक्ताचाही खळखळाट असावयाचाच. लढाई तुफान सुरूं झाली. हजारों शिपाई जखमी झाले. अशा रोग्यांचीं रुदनें ऐकून फ्लॉरेंस लीज तेथें दाखल झाली. तिची नेमणूक एका अत्यंत गलिच्छ जागीं झाली होती. तेथें अन्नपाणीही भरपूर नव्हतें. औषधपाण्याचाही पुरवठा चांगला नव्हता. टायफीस फीव्हर या नांवाच्या तापाची सांथही अशा प्रसंगीं सुरू झाली. अशा नानातऱ्हेच्या अडचणी असतांही निरपेक्षपणें केवळ मदतीकरितां धावून येणें हें सामान्य मनुष्याच्या स्वभावाच्या बाहेरचें आहे. शिपाई खंदकांत पडत त्यास आणून स्वच्छ धुवावें लागे व नंतर औषधें लावावीं लागत. रोगी, वायु झाला म्हणजे पाहिजे तें बरळूं लागत. या ठिकाणीं आपले दिवस कसे गेले हें तिनें लिहून ठेविलें आहे. वायूच्या झटक्यानें एके दिवशीं एक शिपाई उठून मी घरीं जातों म्हणून ओरडूं लागला. मोठ्या कष्टानें दुसऱ्या शिपायाची थोडी मदत घेऊन त्यास तिनें स्वस्थ बसविलें. एक रोगी एकदां चाकू हुडकूं लागला तें तिच्या लक्षांत येऊन तिनें तो लपवून ठेविला. असें कांहींना कांहीं तरी रोगी करीत असल्यानें रात्रींच्या रात्रीं तिला झोंप नसे. तिचा सारा जन्म रोग्यांच्या शुश्रूषेमध्यें गेला.

पुढें अमेरिका व कॅनडा येथें जाऊन तिनें तेथील रुग्णालयें तपासलीं. मिस वॉकर, मिस ऑक्टेव्हिया, मिसेस व्हिकर्स वगैरे स्त्रियांनींही अशीच लोकसेवा केली.

लोकसेवेच्या मंदिराला जाण्याचे अनेक मार्ग आहेत. जनतेची सेवा करण्याच्या अनेक तऱ्हा आहेत. लोकसेवेच्या शृंगाटकास चोहोंकडून मार्ग येऊन मिळतात.

## मेरी कार्पेंटर.

मेरी कार्पेंटर हिनें कुमार्गी झालेलीं मुलें सन्मार्गी केलीं. याकरितां तिनें पुष्कळ संस्था स्थापिल्या. तीव्र इच्छा असली म्हणजे मार्ग आपोआपच सुचतो, असें म्हणतात तेंही कांहीं खोटें नाहीं. लोकसेवा करावयाची एवढें ठरल्यावर ती कशी करावी अगर ती करणेस जागा कोठें आहे हा प्रश्नच क्षुल्लक होतो. मेरी कार्पेन्टरनें कैदी लोकांच्या मनाची विकृत स्थिति सुधारण्याकरितां बरीच खटपट केली. मनुष्य हा प्राणी निसर्गतः दुष्ट नाहीं. चांगुलपणा हा नैसर्गिक असून वाईट कल होणें हें परिस्थितीवर अवलंबून आहे असें आधुनिकांचें मत आहे. खून करणारा अगर चोरी करणारा मनुष्य त्या त्या परिस्थितीमध्यें येतो म्हणूनच त्यांच्या मनाचा कल तसा होतो; एरवीं साधारण मनुष्य हा चांगल्या कलाचाच असतो. न्यायदेवता प्रत्येक हृदयांत थोडी तरी निसर्गतः जागृत असते! पण तिची वाढ परिस्थितीवर अवलंबून आहे. मानवी मनोभूमींत निसर्गतः असलेल्या सत्यप्रीतीच्या अंकुरास सदुपदेशाचें जल मिळालें नाहीं व सत्संगतीचा सात्त्विक व पौष्टिक प्रकाश मिळाला नाहीं तर तो वाळून जाईल. म्हणूनच परिस्थितीला आधुनिक तत्त्वज्ञ जास्त महत्त्व देतात. अमेरिकेमध्यें आज कोणीं खून केला तर त्यास फांशी न देतां त्याच्यामध्यें सत्बीजारोपण करून त्यास उत्तम नागरिक बनविणें हेंच कर्तव्य समजलें जातें, व फांशी देणें हें पाप समजलें जातें. अत्यंत

दुष्ट मनुष्य देखील खात्रीनें सन्मार्गी होईल अशी अमेरिकन तत्त्वज्ञांची ठाम समजूत आहे व त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्नही सुरू आहेत. बरें असो.

अशा तऱ्हेचे प्रयत्न करणाऱ्यांपैकींच कार्पेन्टर ही स्त्री होती. वयोमानानें शिक्षेंत तारतम्य असावें असें तिचें मत होतें. अमेरिकेंतील गुलामांच्या व्यापाराबद्दल तिला अत्यंत तिटकारा होता. तो बंद व्हावा म्हणून तिनें बरीच खटपट केली. ब्रिटिश असोसिएशन्स, पार्लमेंट व इतर सामाजिक व शिक्षणसंस्था या सर्वांपुढें लेखनद्वारा व भाषणद्वारा या सत्कार्यासाठीं कळकळीनें प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांत हिला बरीच वर जागा मिळेल असें वाटतें.

बालोद्यान पद्धतीच्या शाळा काढण्यासाठीं तिनें फार परिश्रम घेतले. छडीचा उपयोग करणें हें अत्यंत अविचारीपणाचें व खुळेपणाचें आहे असें ती म्हणे. आपल्या वयाच्या साठाव्या वर्षी पाश्चात्य शिक्षणपद्धति कशी आहे व तिच्यायोगें कोणकोणते फायदे होतात हें सांगण्याकरितां ती हिंदुस्थानांतही आली होती. तिनें आपल्या परिश्रमानें एक पिढीच्या पिढी उद्धरली व आपल्या म्हातारपणीं आपल्या श्रमाचीं गोडफळेंही पाहिलीं, असें तिचा चरित्रकार म्हणतो.

स्वार्थत्याग हा स्त्रीजातीचा स्वभावधर्म आहे असें वरील उदाहरणांवरून कोणीं अनुमान काढूं लागल्यास त्यांत फारसें वावगें आहे असें कोण म्हणेल ?

## मिसेस चिझहोलम.

मिसेस चिझहोलम या स्त्रीनें परदेशीं जाणाऱ्या स्त्रियांना मदत करण्याकरितां आपल्या आयुष्यांतील बराच काळ घालविला. तिला लहानपणापासून दुःखाची पर्वा नसावी असें आईचें शिक्षणच होतें. ती म्हणते माझ्या स्वभावांतील जोमदारपणा माझ्या आईचे शिक्षणामुळेंच मजमध्यें आला, कारण तिचा मला नित्य उपदेश असा असे कीं, 'बाळे अश्रुपात

केव्हांही करूं नये किंवा कर्तव्यापासून कोणत्याही भीतीनें पराङ्मुख होऊं नये.

आपल्या नवऱ्यास तिनें लग्नाच्या आधीं असें सांगून ठेवलें कीं, 'मी मानवी जातीस दुःखापासून मुक्त करण्यास झटणार म्हणून मला त्या कार्याकडे सर्व लक्ष पुरवावें लागणार.' नवऱ्यानेंही तें कबूल केलें. हिनें हिंदुस्थानांत येऊन युरोपीयन सैनिकांच्या मुलींकरितां उद्योगसंस्था काढिली. हिंदुस्थानांतून आस्ट्रेलियास गेल्यावर तेथें तिला स्त्रिया आळशी आहेत असें आढळलें. काम नसल्याकारणानें नीतिभ्रष्टताही वाढलेली तिनें पाहिली. पाणी स्वच्छ आहे खरें पण तें कांहीं दिवस संथ राहिल्यास त्यांत किडे होऊन तें घाण होतें. वाहतें पाणी स्वच्छ व जिवंत असतें. यंत्रें चालू असतांनाच चकाकत असतात. कांहीं दिवस जर तीं बंद ठेविलीं तर गंजतात. आळसाचा मनुष्यावर असाच परिणाम होतो. आस्ट्रेलियांतील स्त्रियांची अशी स्थिति पाहून तिला वाईट वाटलें व त्यांच्या उन्नतीप्रीत्यर्थ तिनें फारच श्रम केले. या कामांत तिला प्रथम सर्व बाजूनें निराशा दिसूं लागली, पण अखेर तिला त्यांत यश आलें. तिनें तेथें एक मोठें विद्यालय स्थापन केलें. या ठिकाणीं या आळशी स्त्रियांस जमवून त्यांस कांहींतरी उपयुक्त काम सांगितलें जाई. या कार्या-करितां तिनें पदरचा पैसा खर्च केला. जवळ जवळ एक हजार स्त्रियांना तिनें अशा रीतीनें सन्मार्गी उद्योगरत बनविलें. नेपोलियनच्या शौर्यानें, बर्कच्या वक्तृत्वानें, न्यूटनच्या शोधानें जगावर जे उपकार केले आहेत, त्यापेक्षां अशा स्त्रियांच्या लोकसेवेनें खात्रीनें जास्त झाले आहेत असें म्हणण्यास काय प्रत्यवाय आहे ?

विद्वत्ता व कर्तृत्व यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. विद्वत्ता ही केवळ दिव्यासारखी तात्पुरती व स्वतां उजेड देणारी ज्योत आहे पण कर्तृत्व ही नभोमंडळांतील ताऱ्यासारखी स्वयंप्रकाश व स्फूर्तिदायक तेजोमालिका आहे. म्हणूनच एखाद्यानें इतकीं पुस्तकें वाचलीं या शेखीपेक्षां एखाद्यानें

परोपकारार्थ अमुक स्वार्थत्याग केला याचेंच आम्हांस जास्त कौतुक व मोठे-पणा वाटतो. अॅब्राहॅमलिंकन अमेरिकेचा प्रेसिडेंट होता म्हणून आम्हांस मोठें आश्चर्य वाटत नाहीं. कारण आजपर्यंत अमेरिकेचे अनेक प्रेसिडेंट झाले. त्यानें प्रेसिडेंट असूनही एक डुक्कर चिखलामध्यें रुतला असतां त्यास वर येतां येईना, खटपट करून एक पाय वर काढावा तोंच दुसरा जास्त आंत जाई अशी त्याची स्थिति पाहून, चिखलांत उडी घेऊन त्या डुकरास उचलून त्यानें जमिनीवर आणलें, याचेंच आपणास खरें आश्चर्य वाटतें, व लिंकनच्या मनाची थोरवी व त्याच्या अंतःकरणाची कोमलता पाहून त्या थोर कृत्याचा अचंबा वाटूं लागतो.

## एलिझाबेथ फ्राय.

एलिझाबेथ फ्राय हिनें तर आपलें देहसर्वस्व व वित्तसर्वस्व परोप-कारार्थ खर्च केलें. लहानपणीं इनें वुइल्यम सेव्हरी या धर्मोपदेशाकाचें गरीबलोक व परोपकार, या विषयावरचें व्याख्यान ऐकून रडण्यास ‘सुरवात केली व त्याच वेळेपासून गरीबांच्या उन्नतीप्रीत्यर्थ आपला देह झिजविण्याचा तिनें निश्चय केला. पोरकीं मुलें व आजारी मुलें यांकरितां तिनें फार कष्ट केले. न्यूगेटच्या तुरुंगांतील स्त्रियांची उन्नति हिनेंच केली. याच तुरुंगांत मिस फ्रायबरोबर सिडने स्मिथ एकदां गेला होता. तेथील देखावा पाहून त्याच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. ईश्वराच्या अस्तित्वावर एलिझाबेथ फ्राय बोलत असतां कैद्यांचीं मनें मोहून जात. व निरपेक्षतेनें व कळकळीनें उपदेश करणाऱ्या त्या माउलीचा सर्वांस अभिमान वाटे. या कार्यांत पुष्कळांनीं तिला निराश केलें, पण तिचा उद्योग सतत चालूं राहिला. “अनाथस्त्रीसुधारक” नांवाची तिनें एक संस्था काढिली. पार्लमेंटच्या एका कमिटीपुढें स्त्रीगुन्हेगारांवर स्त्रियांचाच पहारा असावा याबद्दल तिनें जोराची साक्ष दिली. तिनें पुष्कळ शाळाही स्थापिल्या. शेतकरी, मजूर, धनगर या लोकांची स्थिति सुधारण्याकरितां तिनें बरेच श्रम घेतले. हीं सर्व कामें करीत असतांही तिनें संसार उत्तम

तऱ्हेनें चालविला होता. तिला बारा मुलें झालीं; पण संसार व परोपकार या दोन्हीं कार्यांमध्यें तिनें यत्किंचितही कमी पडूं दिलें नाहीं. ती अत्यंत मायाळू आई होती. या बाईपासून घेण्याचा अत्यंत महत्त्वाचा गुण म्हटला म्हणजे आपण जें सत्कार्य हातीं घेतलेलें आहे त्याचा बभ्रा अगदीं होऊं नये म्हणून काळजी घेणें हा होय. साधारण व्यवहारामध्यें आपण पाहातों कीं प्रत्येक मनुष्यामध्यें अशी एक मनापासूनची इंच्छा असते कीं आपण जो कांहीं थोडाबहुत स्वार्थत्याग करतों तो लोकांस कळावा. अर्थात् हा गुण अगदीं सामान्य माणसांचाच आहे. विभूतींची गोष्ट याहून फार निराळी आहे. मी अमूक करीत आहें असें लोकांस कळावें अशी त्यांची इच्छा नसते. अशा असामान्य माणसांपैकींच इलिझाबेथ फ्राय होती. उलटपक्षीं ज्यामध्यें हा गुण नसतो, म्हणजे तीं माणसें जीं अमुक संस्थेला अमुक पैसे दिलें दुसऱ्यांनीं ते आपल्या खाजगी कामाकरितां लावले असेंही सांगण्यास शरमत नाहींत त्यांसही कित्येक वेळां विभूतिपूजेचा मान मिळतो. पण अशा लोकांनीं हें खूप लक्षांत ठेवावें कीं, आपला स्वार्थत्याग भासविण्यास दुसऱ्यानें स्वार्थ साधला असें सांगणें ही अत्यंत सामान्य मनुष्याची प्रवृत्ति आहे. विभूतींच्या दर्जाचे लोक कोणत्याही कारणानें अगर सबबीवर अशी परनिंदापर आत्मस्तुति करीत नाहींत. आपण मोठें सत्कार्य करीत आहों, अशी बढाईही ते मारीत नाहींत. असो. तात्पर्य इतकेंच कीं, हा अमोलिक गुण या स्त्रीमध्यें पूर्णपणें वसत असे.

अशा तऱ्हेची निरपेक्ष लोकसेवा करणारांपैकींच सारामार्टीन ही होती. हिनें, हरिभजन व परमेश्वरभक्ति यानीं मनःशांति मिळते व मनुष्य सन्मार्गी होतो अशा दृढ श्रद्धेनें कैदीलोकांमध्यें जाऊन त्यांस हरिभजनरत करण्याचा प्रयत्न केला. दर रविवारीं तुरुंगामध्यें जाऊन कैद्यांस एकत्र गोळा करून ती भजन करीत असे. तिला बरेच नास्तिकही भेटत. त्यांस ती सांगे, "तुमच्याशीं वितंडवाद घालण्यांत मला कांहींही मिळणार नाहीं. मी फक्त इतकेंच सांगतें कीं, हरिभजनापासून माझा फायदा झाला

आहे, त्याच्यापासून माझ्या मनांस शांति व समाधान मिळालें आहे." भोळया भावानें तिनें केलेलें कीर्तन फारच हृदयद्रावक होत असे. कॅप्टन बुइल्यम्स तिजविषयीं म्हणतो 'तिचें कीर्तन साधें, गोड व भक्तिरसानें ओथंबलेलें असे. सर्व कैदीलोक तिचें कीर्तन एकचित्तानें व प्रेमानें ऐकून घेत. स्वतःच्या पोटाकरितां म्हणून तिनें लोकसेवा कधींच केली नाहीं. ती म्हणे 'मला परमेश्वरानें जन्मास घातलें म्हणून तो मला पोटास हें देईलच, ही निःसीम व निर्व्याज सेवा पाहून म्युनिसिपालिटीनें तिला पगार देऊं केला असतांही तिनें तो नाकारला. हें माझें आवडीचें काम आहे याबद्दल मी एक पैही घेत नाहीं असें तिनें सांगितलें. अगदीं मरणसमयीं तिनें त्रिवार नामस्मरण केलें व अत्यंत शांतपणें प्राण सोडला. हिजविषयीं डॉक्टर स्टॅन्ले म्हणतो, जगांतील साधुसंतांची यादी करण्यास मला जर कोणीं सांगितलें तर मी या बाईचें नांव त्यांत खात्रीनें घालीन.

परमेश्वरावर दृढविश्वास ठेवून त्याच्याच भजनद्वारां, अत्यंत घोर अपराध करणाऱ्या हृदयाची देखील कशी उन्नति करतां येते याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. म्हणूनच आम्हीं वर लोकसेवेच्या गंगेस अनेक नद्या येऊन मिळतात असें म्हटलें आहे.

## एलिझाबेथ गिलबर्ट.

एलिझाबेथ गिलबर्ट हिचे लहानपणींच डोळे गेले. तरी तिची बुद्धि तक्ष्ण असल्यानें ती आपल्या बहिणीबरोबर फ्रेंच, लॅटिन व जर्मन ह्या भाषा शिकली. ही अंध असून मोठी स्वावलंबी होती. अंध असल्यानें तिच्या लग्नाची पंचाईत पडली. तिच्या बहिणींचीं लग्नें होऊन त्या सुखानें नांदूं लागल्या. 'आपली मात्र अशी वाईट स्थिति नां' हा विचार बिचारीच्या मनास रात्रंदिवस त्रास देत असे. ती आपल्या जिवास फारच कंटाळली आणि एके दिवशीं बापाच्या खोलींत जाऊन रडत बसली. तिनें देवाची दीनवाणीनें करुणा भाकली. आपलें पुढें कसें होणार वगैरे

विचारांचें काहूर तिच्या मनामध्यें उठलें. तोंच तिनें एक मोठा निश्चय केला. 'मी अंध असलें म्हणून काय झालें? माझ्या सुखाकरितां मी थोडीच जन्माला आलें आहें. मी आपला देह व वित्त परोपकारार्थ खर्च करणार' असा तिनें आपल्या मनाशीं निश्चय केला. दैवयोगानें बॅथर्स्ट नांवाच्या विदुषीचा तिजशीं स्नेह जमला व तिनें तिला लिहावयास शिकविलें. या विदुषीनें तिला फारच उत्तेजन दिलें. विवाह करण्यांतच कांहीं स्त्रीचें ध्येय नाहीं. विवाह हाच कांहीं स्त्रीजातीचें सर्वस्व नाहीं म्हणून अविवाहित राहून लोककल्याणार्थ आपला देह झिजविणें यांत तिळमात्रही दोष नाहीं. अशा तऱ्हेचा आशाजनक उपदेश त्या विदुषीनें केल्यामुळें त्या जन्मांध असल्यांमुळें निराश झालेल्या अबलेचा जविन-मार्ग आशाकिरणांनीं प्रकाशित झाला व तिनें आपला सारा जन्म आंधळ्यांच्या उन्नतिप्रीत्यर्थ खर्च केला. त्यांतच एक महत्त्वाची गोष्ट त्या-वेळीं झाली. ती म्हणजे फोकाल्टनें आंधळ्यास लेखनकला शिक-विण्याची पद्धती शोधून काढली. या शोधाचा तिला फारच मोठा उप-योग झाला. एलिझाबेथ या शोधानें फार आनंदित झाली, व तिला कर्म-धर्मसंयोगानें लेव्ही नांवाचा एक अंध गृहस्थ भेटला. त्या दोघांनीं मिळून एक आंधळ्यांची शाळा काढिली. यांतच एका फाएर नांवाच्या मोठ्या वाकबगार सुताराची भर पडली. तो सुतारकाम शिकवीत असे.

जें कां आपुल्या कष्ट बळें
हो कां साजुक अथवा शिळें

असें स्वकष्टार्जित अन्न आंधळ्यांना मिळूं लागलें. मनुष्याला एक इंद्रिय जर नसलें तर त्याचें दुसरें कोणतें तरी इंद्रिय फार तीक्ष्ण असतें असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आंधळे उत्तम तऱ्हेचें वीणकाम करूं शकतात. त्यांस वाद्य वाजवितां येतें. अशा तऱ्हेचे आंधळे आज हिंदुस्थानांत कित्येक असतील पण त्यांस कोणी शहाण्यानें अजून अशी संस्था स्थापन करून भिक्षावृत्तीपासून परावृत्त करण्याचा व त्यांचें

जीवित उदात्त करण्याचा प्रयत्न केला नाहीं. एलिझाबेथ गिलबर्टसारखी एकादी सहृदय भगिनी हिंदुस्थानांत जन्मास येवो व हें पवित्र कार्य हातीं घेवो !

नाइटिंगेलच्याच शाळेंत तयार झालेली एलिझाबेथ जोन्स हिनेंही लिव्हरपूल येथील इन्फरमेटरींत सतत तीन वर्षे रोग्यांची कळकळीनें शुश्रूषा करण्यांत घालविलीं. ही अत्यंत थोर मनाची बाई होती. एकदां तिनें आपलें स्वतःचें आंथरूण एका रोग्यास निजण्यास दिलें. त्यास दुसऱ्या आंथरुणाची व्यवस्था झाल्यानंतरही आपण त्याजवरच निजूं लागली. यायोगें तिला दूषित ताप आला व बिचारीचा त्यांतच अंत झाला. या गोष्टीच्या उदात्ततेबद्दल मीं फारसें लिहावें अशांतील गोष्ट नाहीं. आपल्यास अमुक रोग संसर्गानें लागेल म्हणून तिनें कधींही विचार केला नाहीं. तिच्या निर्मल व साध्या मनांत इतका हलका विचार येणें शक्यच नव्हतें.

## मेरी ॲनिक्रुव्ह.

मेरी ॲनिक्रुव्ह इनें तर आपला सर्व जन्म वखारींतील मुलांच्या मानसिक उन्नतीप्रीत्यर्थ घालविला. वखारींतील मुलांस वाईट संगतींतून काढून त्यांची दानत उज्ज्वल करण्याकरितां ती रात्रंदिवस झटत असे. 'मी त्यांस ईश्वरभजनास लावण्याचा व कार्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करीन,' असें ती म्हणे. हिच्या प्रयत्नानें पुढें मोठमोठ्या संस्था स्थापन झाल्या. त्याचपैकीं ग्लासगो येथें एक संस्था आहे. या संस्थेमध्यें आजकाल १४००० विद्यार्थी, १५०० सेक्रेटरी व ३४० शिक्षक आहेत. याच नमुन्यावर पॅरिसमध्यें 'सिस्टर्स ऑफ मर्सी' या नांवाची संस्था निघाली. ही व अशा अनेक संस्था आज मानव जातीला हरएक तऱ्हेची मदत करीत आहेत व कित्येक दुःखपीडितांकडून दुवा घेत आहेत.

## मिसेस टॅटनेल.

या बाईनेंही कित्येक गुन्हेगारांस सन्मार्गी लावलें व उद्योगानें मिळवून खाणें यांतच खरें मनुष्यपण आहे असें त्यांस शिकविलें.

अशा एकामागून एक शेंकडों स्त्रियांनीं तन-मन-धन अर्पून लोकसेवा केली. सामाजिक सुधारणेचें काम एखाद्या व्यक्तीनें धैर्यानें, श्रमानें व दीर्घोद्योगानें केलें तर अखेरीस समाज थोडासा प्रतिकूल असतांही सरकारच्या मदतीनें ती सुधारणा कायद्याच्या रूपानें समाजावर लादतां येते व बऱ्याच काळानें अप्रिय परंतु परिणामीं पथ्यकर अशा सुधारणेचें महत्त्व भावी पिढीस उपभोगावयास मिळतें.

अशा तऱ्हेचा युरोपचा इतिहास अनेक स्त्रीरत्नांनीं सुशोभित झाला आहे. या स्त्रीरत्नांतील पहिलें रत्न म्हणजे फ्लॉरेन्स नाइटिंगेल. त्याच देवीची परंपरा कित्येक निःस्वार्थी स्त्रियांनीं सतत उज्ज्वल राखिली, याकरितां मानवी जात त्यांची ऋणी आहे. प्रत्येक देशाच्या इतिहास-क्षेत्रामध्यें संकटकाळीं भूतदयेचे अंकूर स्त्रीहृदयामध्यें फुटलेले दिसतात व त्यांचीं फळेंही आज ते ते देश खात आहेत. हिंदुस्थानांतही अशा तऱ्हेचीं देदीप्यमान स्त्रीरत्नें होऊन गेलीं आहेत. बुद्धाच्या कालामध्यें केवळ लोकसेवेकरितां संसारत्याग करून अत्यंत कष्ट सोसणाऱ्या शेंकडों स्त्रिया होऊन गेल्या. त्यापैकीं प्रमुख प्रमुख स्त्रियांचीं चरित्रें प्रो. भागवत यांनीं नुकतींच प्रसिद्ध केलीं आहेत. ते म्हणतातः—

"राष्ट्रांत हिंडून समाजाशिक्षकाचें पवित्र कार्य करावयाचें व त्याचकरितां समाजाचें अन्न खावयाचें असा गौतम बुद्धाचा आज्ञेचा अर्थ होता व त्याचे श्रावक व श्राविका तो समजून घेऊन आपल्या अर्हत्प्राप्तीनंतर जगतीतलावर हिंडून एशियाटिक तार्तरीसारख्या डोंगराळ प्रदेशांत जाऊनही तेथील रानटी, क्रूर व बहुतेक पाशवी स्थितींत असलेल्या जनतेला मानवकोटींत आणण्याचें पवित्र कार्य करीत असत. हें त्यांचें कार्य हिंदुस्थानांतील आमच्या बांधवांना जरी ठाऊक नसलें तरी फ्रेंच संशोधकांनीं तें जगताच्या निदर्शनास आणलेलें आहे."

या बुद्धभिक्षुणींचीं चरित्रें वाचून पहा. संसारामध्यें कटु अनुभव आल्यानंतर विरक्त होऊन प्रव्रज्या झालेल्या कित्येक स्त्रिया त्यांमध्यें

आहेत. लोकसेवा करण्याची कोण ही जबर इच्छा ! गौतमीस तर गौतमास पाहून एकदम विरक्ती झाली व पुरुषासारखें ब्रह्मचारी राहण्याचा विचार तिच्या मनामध्यें आला. धर्मप्रसार व पतितोद्धार या उदात्त विचारांनीं प्रेरित होऊन गौतमीसह ५०० कुमारिका गौतमाकडे गेल्या. त्यांचा पहिल्यानें आशाभंग झाला पण निश्चयाच्या बळानें त्यांस दीक्षा मिळाली व त्यांनीं लोकसेवाव्रत सुरूं केलें. प्रव्रज्या होण्याचे आधीं स्त्रीचा नैसर्गिक अलंकार जो केशकलाप त्याचें त्यांनीं अवहरण करणें व चीवर व पीत वस्त्रें परिधान करणें वगैरे गोष्टी त्यांना कराव्या लागत. हें करण्यास मनाची अत्यंत मोठी तयारी लागते. कृशा गौतमीचा निष्कपट मुग्धपणा व जगाचा अपुरता अनुभव, भद्राकाञ्चना व भद्राकपिला यांचें अस्सल पतिप्रेम, सोणा इला आलेला आपल्या अपत्यांच्या कृतघ्नतेचा कटू अनुभव, पटाचारा इचा कंटकमय व दुःखमय जीवनवृत्तांत, तिचें उत्कट पतिप्रेम, तिचा पतिसह अरण्यवास व परत येते वेळीं व घरीं आल्यानंतर

दोन्ही पुत्र ते मृत झाले
मार्गीं माझा पति मेला
आईबाप मम ते बंधू
एका चितेवरी ते जळती.

अशा दुर्दैवाच्या अत्यंत निष्ठुर परंपरेचा अनुभव, उत्पलवर्णा इनें बापाच्या सुखाकरितां कृष्णाकुमारीप्रमाणें केलेला संसारसौख्याचा होम, या सर्वांची परिणति अखेर प्रव्रज्या योगांत होऊन त्यांच्या हातून पुढें अखंड लोकसेवा घडून आली. कुंडलकेशा तर प्रव्रज्या झाल्यानंतर ५० वर्षें देशांत हिंडून राष्ट्रपिंडावर उपजीविका करून राष्ट्राला जागवीत होती. पतीनें संन्यास घेतल्याबरोबर पत्नीनेंही संन्यास घेतलेलीं पुष्कळ उदाहरणें या भिक्षुणी रत्नांमध्यें आहेत. शारीरिक सुखाचा लेशही न भोगणें, इंद्रियदमन करणें, तपश्चर्या करणें, अंगीं वैराग्य वाढविणें या गोष्टी

सामान्य आहेत असें कोण म्हणेल ? पण अशा तऱ्हेच्या दृढ निश्चयानें अर्हत्प्राप्ती करून घेतलेल्या अनेक स्त्रिया या बुद्धाच्या काळांत होऊन गेल्या.

पुढील इतिहासामध्येंही राणी भवानीसारखीं स्त्रीरत्नें सांपडतात. हा बंगालमधील राजशाही परगण्यांतील आत्माराम चौधरी यांची कन्या. राजारामपंत हा तिचा पती. पतिनिधनानंतर इनें कित्येक लोकोपयोगी कार्यें केलीं. अशा दानशूर व धार्मिक राण्या जगाच्या इतिहासांत फारच थोड्या सांपडतात. देवळें बांधणें, तळीं बांधणें, विहिरी खोदणें, अन्नसंतर्पण, वस्त्रदान, मंगलकार्यास मदत, रोग्याकरितां सर्व सोयी असलेलीं रुग्णालयें बांधणें वगैरे अनेक लोकोपयोगी कामें इनें केलीं. हिचा दरसाल १ लक्ष ८० हजार रुपयांचा दानधर्म असे. २०-२५ हजार पंडितांस अध्ययन व अध्यापन करण्याची सोय हिनें केली होती. विद्यार्थ्यांची जेवणाची उत्तम सोय असे. इनें कंपनी सरकारकडे ३ लक्ष रुपये व्याजानें ठेवले आहेत. त्यांतून हल्लीं देखील शेंकडों विद्यार्थ्यांची सोय होत असते. कमींत कमी ५ लक्ष बिघ्यांचें भूमिदान तिनें केलें असें म्हणतात. काशी, गया, राजशाहा व बडानगर या ठिकाणीं बरींच देवालयें तिनें बांधलीं. धर्मशाळा, विहिरी, घाट काशी येथें बांधले. प्रत्येक धर्मशाळेमध्यें एक छायामय वृक्ष व एक उत्तम विहीर असे. कित्येक ठिकाणीं सदावर्तेंही आहेत. तेथें आठ मण धान्य अद्यापही वांटलें जातें. अन्नपूर्णेच्या मंदिरांत २५ मण धान्य दान केलें जात असे. १०८ जणांस इच्छाभोजन घातलें जाई. पशुपक्ष्यादिकांवरही राणीची अत्यंत कृपा असे. पक्षी जेथें रहात तेथें धान्य वगैरे घातलें जात असे. लोक तिला 'अन्नपूर्णा' असें म्हणत. मुंग्यांच्या वारुळावरही साखरेचा ढीग पडत असे. तिनें आपल्या पदरीं कित्येक वैद्य ठेविले होते. गरीब गुरीबास औषध ती फुकट देत असे. एकदां तिनें ३ लक्ष दानांचा संकल्प केला, पण पैसे नव्हते म्हणून अंगावरील दागिने

विकून तिनें आपला संकल्प पार पाडला. तिला हिंदूराजे, मुसलमान नबाब व इंग्रजसरकार हे फार मान देत. तिची दिनचर्या एखाद्या तपस्व्या-सारखी असे. ब्राह्मण ब्रह्मचाऱ्याची दिनचर्या ती फार निक्षून पहात असे.

रूपनगरच्या राजकन्येची गोष्ट तर सर्वांस ठाऊक असेलच. मध्यंच्या दुष्काळाचे दिवसांत तिनें सरकारी धान्यांची कोठारें उघडीं केलीं व लोकांमध्यें स्वतः फिरून अन्न वांटलें. आजाऱ्यांस औषधोपचार केले. तिनें क्षणभरही विश्रांति घेतली नाहीं. सर्व जणांनीं राणीस दुवा दिला. तिनें मेवाडच्या राजधानीपासून २५ मैलांवर एक उत्तम सरोवर बांधविलें. बाराही महिने वाहणाऱ्या गोमती नदीच्या प्रवाहास तीन बाजूंनीं धरण बांधून हें सरोवर बांधलें आहे. तें शुभ्र संगमरवरी दगडांचें आहे असें म्हणतात. त्याच्या बांधणावळीस २ कोट रुपये खर्च आला अशी आख्यायिका आहे. अगदीं अलीकडील आपल्या महाराष्ट्रांतील उदाहरण म्हणजे इचलकरं-जीच्या हल्लींच्या अधिपतींच्या "माईसाहेबांचें" होय. या भल्या पहा-टेस उठून पंचगंगेस स्नानास जात. परत येते वेळीं वाटेवर आपला मेणा थांबवून गोरगरिबांच्या घरीं जात व तेथें कोणीं आजारी अगर बाळंतीण असल्यास त्यांस स्वतः पाहून समाचार घेत. कोणत्याही जातीची बाई 'अडली आहे' असें समजतांच जेवीत असल्या तरी उठून तिची सुटका करण्याकरितां धांव घेत. रोग्यांस पथ्याचेंही पाठविण्याची सोय त्यांनीं केली होती. पूजा झाल्यानंतर देवळांत अगर धर्मशाळेंत कोणी पांथस्थ, गरीब, दुबळे, निराश्रित उतरले आहेत कीं काय याचा शोध करून त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करीत असत. नंतर स्वतः पोथ्या, पुराणें वाचून बायकांस सांगत असत. आहिल्याबाईचें दानशूरत्वाचें व कनवाळू-पणाचें उदाहरण सर्वविश्रुतच आहे.

अशा रीतीनें सर्व देशांमध्यें या दयेच्या देवी जन्मास येऊन त्यांनीं समाजाची भरीव उन्नति केली आहे. या दयेच्या देवींचें काम खरोखरच सर्वांत श्रेष्ठ दर्जाचें होय. वाणी व करणी यामध्यें बराच फरक आहे.

आपण वाङ्मयामध्यें पुष्कळ काव्य, नाटक, इत्यादि पुस्तकें वाचतों व त्या त्या ग्रंथकर्त्यांची प्रतिभा, कौशल्य, बुद्धि व कल्पना पाहून चकीतही होतो. या वाङ्मयामध्यें मोठमोठ्या व्यक्तिविषयक, नीतिविषयक, समाजविषयक वगैरे विषयांवर मार्मिक विवेचनेंही आढळतात. तीं वाचल्यानंतर मनावर सुपरिणाम होतो. पण वाङ्मयांत तरी वस्तुतः काय असतें हें पाहूं गेल्यास तें थोर थोर विभूतींनी जीवितामध्यें काय काय पाहिलें, त्यांस काय काय अनुभव आले, व त्यापासून त्यांनीं काय तत्त्वें बाहेर काढिलीं, यांचेंच सार असतें असें आढळेल. सर्व वाङ्मयाच्या मुळाशीं जर हीच कल्पना आहे तर वर आलेल्या दयेच्या देवींचीं चरित्रें म्हणजे वाङ्मयांतील अत्यंत महत्त्वाचा, स्फूर्तिदायक व कार्यप्रवर्तक भाग आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें बिलकुल होणार नाहीं. सर्व शास्त्रें व सर्व तऱ्हेचें वाङ्मय अखेर तत्त्वज्ञानामध्यें परिणत होतात. तत्त्वज्ञान म्हणजे मानवी जीविताचें मर्म काय आहे, मनुष्यानें कसें वागावें, त्यानें कोणत्या तऱ्हेनें वागल्यास त्यास शाश्वत सुखप्राप्ति होईल, आनंद होईल व आत्यंतिक समाधान होईल याची भावना व चिकित्सा यांची सांगड घालून केलेलें विवेचन होय. या दृष्टीनें पाहतां हीं चरित्रें अगर त्या चरित्रांतील हृदयस्पर्शी प्रसंग म्हणजे तत्त्वज्ञानाचा सोदाहरण बोधच असें म्हटल्यास चालेल. अशा तऱ्हेचे महत्त्वाचे प्रसंग ज्या स्त्रियांच्या चरित्रांमध्यें आहेत, त्या किती उच्च दर्जाच्या आहेत हें सहजच कळून येईल. मग त्यांनीं काव्यें लिहिलीं नसोत अगर शोध लावले नसोत. त्यांचीं काव्यें कागदावर लिहिलीं गेलीं नाहींत. त्यांचे शोध शास्त्रशाळेंतील मेजावर ठेवले गेले नाहींत. तथापि त्यांचें काव्य त्यांच्या विधायक व चिरस्थायी संस्थांच्या रूपानें काळाच्या शाश्वत पडद्यावर सर्व जगास सर्वकाळीं सहज वाचतां येईल अशा भडक शाईनें लिहिलें गेलें आहे; व त्यांचे शोध, त्यांची परंपरा अव्याहत चालू ठेवणाऱ्या विभूतींच्या रूपानें जगास स्पष्टपणें दिसत आहेत. पुढें मागें जर विश्वशांतता व विश्वबंधुत्व यांचें दैवीसाम्राज्य

जगतीतलावर प्रगट होणार असेल तर तें या विश्वमातांनीं अविरत श्रमानें रचलेल्या पायावरच होय. त्यांनीं अनेक जीवांस कंटाळलेल्या रोगग्रस्तांस आपल्या अमृतमय अनुरागाच्या औषधीनें आशामय केलें, जिव्हाळ्याच्या जिवलगापासून अलग झालेल्या प्राण्यास प्रेमानें प्रोत्साहन देऊन कार्य-प्रवृत्त केलें. घोर व घातकी अंतःकरणें सुनीतीचीं सौगंधिक जलें घालून मृदु व सुवासिक केलीं. अज्ञानी व निरक्षर जनतेस सज्ञान व साक्षर केलें, इतकेंच काय पण आजकाल दिसणाऱ्या व भविष्य कालीं होणाऱ्या मानवी प्राण्यांचीं हरएक तऱ्हेचीं दुःखें निवारण करणाऱ्या अनेक संस्थांचा पाया घालून एकंदर मानवी उत्क्रांतीची मजल कित्येक शतकांनीं पुढें नेली.

म्हणूनच या विश्वमातांस दयेच्या देवी म्हटलें आहे व या देवपणास त्या पूर्ण अधिकारी आहेत.

# प्रकरण ४ थें.

## स्त्रिया व राजकारण.

" गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वयः । "

ज्ञानाचा व कर्तबगारीचा प्रदेश जसा अफाट व अनंत आहे तसाच तो अनियंत्रित आहे. तेथें लिंगभेद व वयोभेद असा पंक्तिप्रपंच मुळींच नाहीं. या दिव्य प्रदेशावर कोणाही स्त्रीपुरुषांस मनास वाटेल तसें हिंडण्याची पूर्ण मुभा आहे. ज्ञानक्षेत्रांत जसे अनेक भाग आहेत, तसेच कर्तव्यक्षेत्रांतही आहेत. आपआपल्या नैसर्गिक मनोवृत्तींच्या व शक्तींच्या स्फूर्त्यनुरूप स्त्रीपुरुषांनीं त्या त्या क्षेत्रामध्यें प्रवेश करावयाचा आहे. येथें निसर्गाशिवाय कोणी कोणासही अडथळा करूं शकणार नाहीं. झांशीच्या राणीची तरवारबहादुरी कोणास नाकबूल करितां येणार नाहीं; तर भवानीराणीचें राजकारण व मुत्सद्दीपणाही सर्वांस कबूल करणें भाग आहे. लेडी सामरव्हिलचें पदार्थविज्ञानशास्त्राचें ज्ञान जसें प्रसिद्ध आहे, तसेंच मानव बुद्धीची अंतिम कसोटी पहाणारा जो गणित विषय त्यांत सवाई सीनियर रँगलर अशी पदवी मिळविणारी मिस फॉसेट ही जगप्रसिद्ध आहे. एकंदरींत सर्व विषयांत लिंगभेदास न जुमानतां स्त्रीनें पुरुषाइतकाच दर्जा मिळविण्याची पात्रता सिद्ध करून दाखविली आहे, हें आपण मागील प्रकरणांत पाहिलेंच आहे. आतां राजकारणामध्यें स्त्रीनें केवढा अतुल प्रभाव दाखविला आहे हें पाहूं.

राजकारणामध्यें पुष्कळ प्रकार आहेत. त्यांत निवळ मुत्सद्दीगिरी निराळी व प्रत्यक्ष जिवावर उदार होऊन आपल्या देशाकरितां तनमन-

धन अर्पून गुप्तपणें आपला छळ करणाऱ्यावर हल्ला करणें व अशाच क्रांतिकारक उपायांनीं देशाची सेवा करणें निराळें. इतिहासामध्यें दोनही प्रकार दृष्टीस पडतात. कोणत्याही देशाचा इतिहास घ्या. त्यामध्यें या दोन्ही प्रकारांनीं स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न केलेला आढळेल. मनुष्यावर शारीरिक अगर मानसिक कोणत्याही प्रकारचा दाब अगर जुलूम होऊं लागला कीं, त्याविरुद्ध चळवळ करून त्याचा प्रतीकार करणें, अगर नाश करणें ही मनुष्यस्वभावाची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. मानवी मन हें स्वातंत्र्यप्रिय आहे. या स्वातंत्र्यावर जर कोणी गदा आणील, तर त्याविरुद्ध तें साहजिक रीत्याच उचल खातें. ही भावना फारच उज्वल आहे. या उज्वल भावनेच्याच प्रभावानें इतिहासास शोभा आली आहे व तो स्फूर्तिदायक बनला आहे. मुत्सद्देगिरी रणशौर्य, व कारस्थान, अशा अनेक तऱ्हेच्या मार्गांनीं स्वातंत्र्यमंदिराकडे जाण्यासाठीं केलेली जिवापाड धडपड इतिहासामध्यें नमूद आहे. स्वातंत्र्यमंदिराचा मार्ग अत्यंत कठिण व कंटकमय असल्यानें त्यावरून जावयाचें झाल्यास धैर्य, स्वार्थत्याग, आत्यंतिक सहनशीलता, दृढनिश्चय व कळकळ इत्यादि गुण अंगीं अवश्य असावे लागतात. या गुणांशिवाय हा मार्ग चोखाळणें शक्यच नाहीं. मुत्सद्देगिरी ही एक त्या मंदिराची वाट आहे; पण ती बहुजनसमाजाकरितां नाहीं. ती बुद्धिप्रधान व युक्तिप्रधान मेंदूचें कार्य आहे. पण रणशौर्य व कारस्थान हीं भावनाप्रधान लोकांचीं कार्यें होत. भावनाप्रधान असलीं म्हणून तीं सर्वांसच साधतील अगर शक्य आहेत अशी बिलकूल गोष्ट नाहीं. भावना एकटीच कांहीं करूं शकणार नाहीं. ती अत्यंत उज्ज्वल पाहिजे व तिची ज्योत स्वार्थत्यागानें, दृढ निश्चयानें, सहनशीलतेनें तेवत ठेविली पाहिजे व हे गुण बहुजनसमाजांत असणें शक्य नाहीं. ज्या हृदयामध्यें स्वातंत्र्योर्मीनें इतर स्वार्थांच्या सर्व ऊर्मि जिंकल्या, त्याच हृदयाच्या उज्वल भावनेनें मोठीं कार्यें होतील. इतरांच्या हातून तीं कधींही होणार नाहींत. अशा

जाज्वल्य भावनेनें स्वातंत्र्याकरितां, दुष्टबुद्धीच्या निर्दय, आपमतलबी व स्वार्थी सत्तेची मुंडी, कारस्थानानें दबा धरून, मुरगळली तरी त्यांतल्या भावनेच्या उज्ज्वलतेला कालिमा कधींही येणार नाहीं. निर्दयतेला, स्वार्थाला, अमानुषपणाला अंधारांत गांठूनही त्याची चामडी लोंबविणें हें मनुष्याचें कर्तव्यकर्मच आहे. गरीब लोकांच्या मुंड्या मुरगाळून दुलदुलीत झालेल्या मदांध धनवंताची हवेली दिवसाढवळ्या लुटली तर ती चोरी होत नसून तें पवित्र कर्तव्य आहे. असें करतांना कोणत्या रीतीनें अगर युक्तीनें हें कार्य केलें हें बघण्यांत हंशील नाहीं. तेथें केवळ भावनेच्या उज्ज्वलतेकडेच पाहिलें पाहिजे. नराधम अफजुलखानाच्या पोटांत शिवाजीनें वाघनखें खुपसलीं तर त्यांत वाईट तें काय केलें ? महाराष्ट्रांच्या स्वातंत्र्याखातरच ना ? मी निर्भेळ सत्यानें वागेन असें म्हणणारे व त्याप्रमाणें वागणारे जितके वंदनीय तितकेच ते दुर्मिळही आहेत. असे महात्मे जगाच्या इतिहासांत फारच थोडे सांपडतील व अशा एखाद्या महात्म्याच्या हातून निर्भेळ सत्याच्या एकच एक शस्त्रानें, केवळ प्रीतीच्या एकच एक मंत्रानें, एकाद्या राष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून दिलें, असें इतिहासांत एकही उदाहरण सांपडत नाहीं. सत्याचा वाली परमेश्वर आहे खरा; पण तो मेल्यानंतर व स्वर्ग दिसूं लागल्यावर. कारण परमेश्वर हा स्वर्गांत आहे व तेथें सत्य हाच न्याय आहे. मृत्यूनंतरची स्वर्गसृष्टि निराळी व जिवंत असतांना प्रत्यक्ष अनुभवास येणारी सृष्टि निराळी. ह्या सृष्टीमध्यें सत्य-प्रातिपादनार्थ क्रॅन्मरसारख्या लोकांस जिवंतपणीं जाळून घेण्याची शिक्षा झाली. सत्याकरितांच ख्रिस्ताला चौकटीवर खिळून टाकण्यांत आलें. या व अशा अनेक सत्यदेवीच्या निःसीम भक्तांना देहांत शिक्षा भोगावी लागली. ब्रह्मांडकटाहांत दडून बसलेला परमेश्वर निरपराधी, स्वातंत्र्यप्रिय, सत्यप्रिय कोरियनांचे अमानुष तऱ्हेनें होत असलेले हाल पाहून सत्याची बाजू राखण्याकरितां धावून आला नाहीं. उलटपक्षीं सत्याकरितां, स्वातंत्र्याकरितां उत्कटतेनें ज्या ज्या दे-

शच्या लोकांनीं कारस्थान करून, प्राणावर पाणी सोडून निर्दय सत्तेस झुगारून देण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या शस्त्रांच्या तकाकीमध्यें व भावनेच्या उत्कटतेमध्यें—परमेश्वरस्वरूप म्हणा पाहिजे असल्यास—जें सामर्थ्य दिसलें त्यानेंच यशप्राप्ति झाली. सत्याकरितां—म्हणजे सत्य हें साध्य म्हणूनच त्याच्या पावित्र्याचें रक्षण करण्याकरितां, त्याचें माहात्म्य सिद्ध करण्याकरितां भावनेनें हातांत शस्त्र घेऊन असत्याच्या काळोखामध्यें दबून बसलेल्या सैन्यावर कारस्थानाचा चोरकंदील हातांत घेऊन सत्याच्या शत्रूंची टेहळणी केली व त्यावर गनिमी काव्यानें छापा घालून त्यांस जिंकलें तर त्यांत दोष तो काय ?

असत्याच्या हातांत सत्ता जाते हाच आधीं जगाचा विपरीत न्याय आहे. अशा विपरीत न्यायाचा जाब कोणीं द्यावयाचा ? इतिहास आम्हांस असें वेळोवेळीं सांगतो कीं, मानवीजातींतील मुख्य मुख्य म्होरपे सत्याचें शिंग फुंकून गेले खरे; पण असत्याचाच जय होत गेला आहे. सत्याचा नैतिक जय होत आहे हें म्हणणें पटत नाहीं. कारण हा नैतिक जय परमेश्वराच्याच साम्राज्यांत रुजूं असून या जड सृष्टीमध्यें त्याला दृश्य फल नाहीं. म्हणूनच सत्य प्रस्थापित करण्यास असत्याच्या सैन्याचा त्यांच्याच शस्त्रास्त्रांनीं मोड केला पाहिजे. याच दृष्टीनें मी जो रशियन स्त्रियांनीं स्वातंत्र्यास्तव केलेल्या लढाईचा इतिहास देणार आहें त्याचा विचार करावा.

बऱ्याच दिवसांपूर्वीं रशियामध्यें निहिलीस्ट म्हणून एक पंथ निघाला होता. या पंथाचे लोक समान हक्क, समान दर्जा अशा तत्त्वांचे पुरस्कर्ते होते. त्यांनीं रशियाभर आपल्या गुप्त मंडळ्या स्थापून आपला पंथ वाढविण्याचे प्रयत्न केले. एका विख्यात ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें या पंथाच्या संस्थापकांनीं सार्वजनिक समानतेचा व बंधुत्वाचा उद्देश ठरवून रशियाची एकतंत्री अंमलापासून सुटका करण्यासाठीं पाऊणशें अगर १०८ वर्षांमागें ज्या वेळीं रशिया अज्ञानांधकारामध्यें होता त्या

वेळीं ही चळवळ सुरू केली. जवळ जवळ शेंकडा ८५ लोक त्या वेळीं आशिक्षित होते. पश्चिम युरोपमध्यें सुद्धां यावेळीं सोशिॲलिस्ट ( socialist ) मतें कांहीं थोड्या विचारी लोकांसच पटूं लागलीं होतीं. हा पंथ वाढत वाढत आजकाल बराच पसरला आहे, पण त्याच्या समग्र इतिहासाशीं आम्हांस येथें कांहीं कर्तव्य नाहीं. ह्यांच्या पंथामध्यें ज्या ज्या स्त्रियांनीं अतुल व अनुपमेय कामें केलीं त्यांच्या चरित्रांतील बोधप्रद व हृदयस्पर्शी प्रसंग आपण पाहूं.

क्रिमियाच्या लढाईनंतर रशियामध्यें एक न भूतो न भविष्यति अशी बौद्धिक चळवळ झाली. अज्ञानांधकारांतून ज्ञानप्रकाशांत प्रवेश करण्याची इच्छा सर्वत्र प्रबल होऊं लागली. कोणत्याही परिस्थितीस न जुमानतां जो तो विद्यामंदिराकडे धांव घेऊं लागला. इतक्या जोराची लाट आल्यामुळें अर्थातच रशियन स्त्रियांनींही त्यांत भाग घेतला. पुरुषांच्या शिक्षणाच्या आड येणारा दारिद्र्याशिवाय दुसरा शत्रु नव्हता. पण स्त्रियांच्या शिक्षणाच्या आड मात्र अनेक शत्रु होते. त्यांच्या भोंवतीं सामाजिक, धार्मिक व नैतिक अशा बंधनांचीं इतकीं जबर वेष्टनें पडलीं होतीं कीं, त्यांनीं ज्ञानप्राप्तिकरितां जरा ओढ खाल्ली कीं तीं बंधनें जास्तच दृढ होऊन स्त्रियांस अतिशय छळ सोसावा लागे. मुलींनीं लहानपणीं सुखांत घरीं राहावें व योग्य काळ येतांच विवाहित होऊन पतीच्या घरीं जावें एवढाच काय तो त्यांचा जीवितेत्यर्थ असें आईबाप समजत असत. पण रशियन तरुणींनीं अत्यंत दृढनिश्चय करून आपल्या ज्ञानार्जनाची तीव्र इच्छा प्रगट केली. त्यांस प्रथमतः कोणीच सहानुभूति दाखविली नाहीं. आईबाप तर त्यांच्या अगदीं विरुद्ध होते हें सांगितलेंच आहे. त्यांचे खरे सहाय्यकर्ते म्हणजे रशियन तरुणच होते. आपणासारखें आपल्या भगिनींनाही ज्ञानामृत मिळावें अशी त्यांची तीव्र इच्छा होती. हा पवित्र हेतु साध्य करण्यास्तव त्यांनीं एक उत्तम युक्ति शोधून काढिली. ती अशी:—

आईबाप आपल्या मुलीस शिक्षण देण्यास नाखुष होते. त्यांना

फक्त मुलगी नवऱ्याच्या घरीं सुखानें नांदूं लागली म्हणजे बस्स होतें. तेव्हां बाहुलाबाहुलीचीं जशीं लुटुपुटीचीं लग्नें लावतात त्याचप्रमाणें खोटीं लग्नें लावून घेऊन आपल्या भगिनींस शिक्षण देण्याचा प्रयत्न राशियन तरुणांनीं केला. या लग्नास ( Nihilist Marriage ) निहिलिस्ट लग्न असें म्हणत. अशा विवाहामुळें वधूवरांचा परस्परांच्या शरिरावर अगर जिनगीवर कोणत्याही प्रकारचा हक्क मानला जात नसे. झारचें चर्च व त्याचा कायदा यांविषयीं त्यांना अत्यंत तिटकारा असे. या तऱ्हेचें शिक्षण मिळविलेल्या एका तरुणीचें आपण चरित्र पाहूं.

(Viataka) व्हिएटकाच्या राज्यांत फादर (Vasili Tehemodanoff) व्हॅसिली टेहेमोडेनॉफ नांवाचा एक धर्मोपदेशक रहात होता. त्याची **सोनिया** नांवाची एक सद्गुणी व शहाणी कन्या होती. एका शिक्षकिणीनें हिला स्वतंत्र विचार व समाजसेवा अशीं उदात्त ध्येयें डोळ्यांपुढें ठेवून कळकळीनें शिकविलें. ही शिक्षकीण अत्यंत लोकप्रिय झाली होती. **सोनिया** हिनेंही गरिबांस मोफत शिक्षण देण्याचें उच्च ध्येय स्वीकारून त्या दृष्टीनें प्रयत्न करण्याचें ठरविलें. ही तिची महत्त्वाकांक्षा आईबापांस बिलकूल पसंत नव्हती. आपल्या कन्येचा एका सुखवस्तु गृहस्थाशीं विवाह करण्याचा त्यांचा ठाम बेत झाला होता. इकडे **सोनियानें** पळून जाण्याचें ठरविलें. तिला वाटचालीकरितां लागणारे पैसे तिच्या मैत्रीणीनें पुरविले. ती इष्टस्थानीं आई-बापांची नजर चुकवून, जाण्यास निघाली. **सेंटपीतर्सबर्गाला** जातांना व्हिएटका ही नदी ओलांडावी लागते. थंडीचे दिवस असल्यानें नदीपार जाणें फार कठीण होतें. कारण हिमवर्षाव सारखा सुरू होता. रात्र झाली असल्यानें एका धीवरच्या घरीं तिनें त्या रात्रीं झोंप घेण्याचें ठरविलें. कांहीं वेळ होतो न होतो तोंच कोणीसे त्या धीवराच्या दारावर धक्के देऊं लागले. दार उघडतांच पाहते तों आपला बापच तेथें आहे असें तिला आढळून आलें. ती आश्चर्यानें दिङ्मूढ झाली व गुडघे टेंकून

"बाबा मला सेंटपीटर्सबर्गला जाण्याची परवानगी द्या." अशी अत्यंत नम्र व केविलवाण्या स्वरानें त्यास विनंति करूं लागली. या विनंतीचा उपयोग कांहींही झाला नाहीं. त्यानें तिला घरीं ओढून नेलें. घरीं तिचा अत्यंत छळ होऊं लागला. एके दिवशीं मोठ्या शिताफीनें आपल्या पहिल्या शिक्षकिणीचा सल्ला घ्यावा म्हणून ती बाहेर पडली. तिनें खोटें लग्न करून घेऊन कार्यभाग साधल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें सांगितलें. ही युक्ति तिला नामी वाटली. तिच्या शिक्षकिणीनें सेंटपीटर्सबर्गला एक पत्र पाठविलें. एका धैर्यवान् व स्वार्थत्यागी तरुणाशीं पत्रव्यवहार करून तिनें **सोनियाचें** लग्न ठरविलें. या तरुणाचें नांव **सिगब**. यानें **सोनियाच्या** बापास भेटावें असें ठरलें. माझें **सोनियावर** अत्यंत प्रेम आहे असें त्यानें सांगण्याचें ठरविलें. त्याबरोबरच तिच्या बापाचें व **सिगबचें** संभाषण चाललें असतां तिनें **सिगब** यांस येऊन मिठी मारावी असें ठरलें होतें. ठरल्याप्रमाणें गोष्टी झाल्या व दोघांचें खोटें लग्न होऊन तिचें शिक्षण पूर्ण झाल्यावर परस्परांच्या इच्छेनुरूप त्यांनीं खरें लग्न करूनही टाकिलें. याप्रमाणें एका उच्च ध्येयाकरितां लुटुपुटूचीं लग्नें लावून तें साध्य करून घेणें ही खरोखरीच बिनतोड युक्ति होय. त्या वेळीं रशियामध्यें आपल्या भगिनींची मानसिक उन्नति व्हावी एतदर्थ अशीं लग्नें करण्यास हजारों तरुण तयार होऊन त्यांनीं आपल्या भगिनींना ज्ञानामृतप्राशनाचा लाभ करून दिला. हीं खोटीं लग्नें स्त्रीजातीच्या मानसिक उत्कर्षाकरितां होतीं ही गोष्ट सतत लक्षांत ठेवल्यास त्यामध्यें घाणेरडेपणाचा लेशही नव्हता, तर उलटपक्षीं तीं अत्यंत पवित्र उद्देशानें केलीं जात असत असें प्रामाणिक वाचकांस कबूल करावें लागेल

**मेरिया कॉनस्टँनटिनोव्हिया टेब्रिलोफ** हिचे आईबापही अत्यंत कर्मठ होते.पण बापाच्या मनांत स्त्रीशिक्षणाचें महत्त्व बिंबल्यामुळें त्यानें तिला शिक्षण देण्याचें ठरविलें. घरची अत्यंत गरिबी होती पण कौटुंबिक स्थिति चांगली झाल्यावर तिला घरीं शिकविण्यास मास्तर ठेवण्यांत आला.

ही मुलगी ज्ञातीचीच अत्यंत हुशार होती. तिनें बराचसा अभ्यास शिक्षकाच्या मदतीशिवाय केला. शिक्षकानेंही तिला राजकारणाची बरीच माहिती दिली. पार्लमेंट, उदारमतवादी, पुराणमतवादी, निवडणूक, मताधिकार वगैरे राजकीय परिभाषा तिला कळूं लागली. या राजकीय शिक्षणानें तिच्या मनांत तेजस्वी कल्पनांचें काहूर करून सोडलें. तिनें बायरन्, गटे, शेक्स्पीयर, व शिलर हे कवि उत्तम तऱ्हेनें वाचून काढले. ती क्रांतिकारक मताची नव्हती, तरी सरकारचा तिच्यावर अत्यंत रोष होता. माझ्यापेक्षां पुष्कळ विद्वान् ग्रंथकार ग्रंथ लिहीत असतांना माझ्यावरच तेवढा सरकारचा इतका राग कां? असें तिनें एका संपादकाला विचारलें. तो म्हणाला, "तुमची लेखणी अत्यंत तीक्ष्ण आहे म्हणून." असें असतांही उदारमतें तिच्या हाडींमासीं खिळलीं होतीं. तिचीं मतें उदारमतवाद्यांशीं तंतोतंत जुळत. स्त्रियांच्या उच्च शिक्षणाविषयीं तिनें अत्यंत परिश्रम घेतले. सरकारकडे एक अर्जही पाठविला, पण तो नाकारण्यांत आला. या बाबतींत सरकार कांहींही करीत नाहीं अशी खातरी झाल्यानें सर्व विद्वान् स्त्रियांनीं मिळून '**प्रौढ स्त्रियांकरितां उच्च शिक्षणक्रम**' ही संस्था काढली. यांत गणितविषय, वनस्पतिशास्त्र व इतिहास वगैरे विषयांवर स्त्रियाच व्याख्यानें देत. ही संस्था चालवीत असतां **मेरिया** ३-४ वर्तमानपत्रेंही चालवीत असे. इतकेंच काय पण तिनें पुष्कळ ग्रंथही लिहिले. तिची सर्वांत मोठी व धाडसाची कामगिरी म्हणजे तिनें **झार अलेक्झांडर** यांस पाठविलेलें पत्र होय. हें पत्र अत्यंत मुद्देसूद व हृदयस्पर्शी असें आहे. त्यांत

१ भाषणस्वातंत्र्य
२ उदार मतें
३ राजकीय कैद्यांची मुक्तता

वगैरे मुद्यांचें विवेचन फार जोरदार व मार्मिक भाषेंत केलें होतें. पण या पत्राचा कांहींही उपयोग झाला नाहीं. राजानें उत्तर दिलें "ती म्हणते तें सर्व खरें असेल, पण तिला या राज्यकारभाराशीं काय करा-

वयाचें आहे ?" इतकें बोलून तो थांबला नाहीं, तर त्यानें तिला पकडून हद्दपार केलें व तुरुंगांत ठेविलें. ती आपल्या तुरुंगवासाविषयीं म्हणते " शाश्वत दुःख व दैन्य यांचें जेथें साम्राज्य आहे व ज्या ठिकाणीं स्वातंत्र्येच्छु असे माझे बंधु खितपत पडले आहेत त्या ठिकाणीं मी गेलें." तिचे तुरुंगामध्यें फारच हाल करण्यांत आले. या निहिलिस्ट चळवळीमध्यें राशियांतील पुष्कळ स्त्रीपुरुष तुरुंगांत पडले. ही चळवळ केवळ सत्याकरितां व न्यायाकरितां असून सरकारनें त्याकडे लक्ष तर दिलें नाहींच पण उलट राजकीय कैद्यांना अमानुषपणें वागविलें. ही स्वकीय सरकारची स्थिति! न्यायप्रियता व प्रजावात्सल्य हे गुण मनुष्याच्या जातीवर अगर देशावर अवलंबून नसतात. ते नैसर्गिक असावे लागतात. राशियाचें सरकार अस्सल रशियन होतें, रशियन रक्ताचें व रशियन हाडामांसाचें होतें. पण आपल्याच लोकांचा छळ करण्यास त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं. त्यावेळीं राशियामध्यें " **काराचा** " तुरुंग फार प्रसिद्ध होता. तेथें राजकीय कैद्यांचे फारच हाल होऊं लागले. ज्या इलाख्यांत हा तुरुंग होता त्याचा **वॉरन कॉर्फ** हा मुख्याधिकारी होता. एकदां ही स्वारी तुरुंगतपासणीच्या कामावर म्हणून **कारा** येथें आली. या तुरुंगामध्यें **एलिझाबेथ कॉहल काया** नांवाची स्त्री राजकीय कैदी म्हणून होती. **काराच्या** कारागृहांत उपरीनिर्दिष्ट अधिकारी तपासणीकरितां आले असतां ही उठून उभी राहिली नाहीं म्हणून त्यास अपमान झालासा वाटून, तो म्हणाला "मी या इलाख्याचा मुख्य अधिकारी असून तूं मी येतांच कां उठली नाहींस ? " बाईनें शांतपणानें उत्तर दिलें. 'आपण ज्या बड्या अधिकाराच्या जागेवर आहां, त्या जागेवर आपल्यास नेमतांना माझें मत घेतलें नव्हतें. ' या जाज्वल्य, स्वाभिमानपरिपूर्ण तेजस्वी वाग्बाणानें त्यास शरम वाटावयाची राहून रागच आला व त्यानें तिला दुसऱ्या तुरुंगांत घाडण्याचा हुकूम केला; तिलाही या जागेचा कंटाळा आला होता. पण सर्वांदेखत तिला नेल्यास बराच दंगा होईल असें त्यास वाटून त्यानें त्या

दिवशीं तिला तेथेंच ठेविलें; व एके दिवशीं रात्रीं तिच्या खोलीमध्यें शिरून रात्रीच्या पोषाखांतच तिला त्या नराधमानें बाहेर ओढून काढण्याबद्दल कमांडरला हुकूम केला. त्या अधमाच्या पापमय स्पर्शानें तिला अत्यंत चीड आली. पण बिचारी अबला ओरडण्याशिवाय काय करूं शकणार ? तिनें मोठ्यानें किंकाळी फोडली तेव्हां सर्व स्त्रिया जाग्या झाल्या व आपल्या मैत्रिणीस वाईट वागविल्याबद्दल त्यांनीं अन्नत्यागाचा सत्याग्रह सुरू केला. या अन्नत्यागानें तो अधिकारी घाबरला व त्यानें सर्वांदेखत त्या कमांडरास माफी मागण्यास सांगितल. पण नुसत्या माफीनें काय होणार ? त्याची बदली करावी, असा त्यांनीं हट्ट धरला. बरें, कांहीं दिवसांनीं करूं, असें म्हणतां म्हणतां पुष्कळ दिवस लोटले, तरी त्याची बदली होईना. पुन्हां अन्नत्यागाची मोहीम सुरू झाली. त्यास बदलण्याचा हुकूम झाला आहे, तो कांहीं दिवसांत जाईल असें सांगण्यांत आलें. पण त्याही सांगण्याचा प्रत्यय त्यांस येईना. शेवटीं **मॅडम सिनीडा** नांवाची स्त्री त्याजकडे भेटीला म्हणून गेली. खोलींत गेल्याबरोबर तिनें त्याच्या तोंडावर जोराचा तडाखा दिला व म्हणाली 'हें घ्या आपणांस कंमाडंटच्या हुद्याचें वेतन' ही बातमी सर्वत्र पसरली. सरकारास राग आला. अपमान झालेला अधिकारी बदलणें व गुन्हेगारास ठार मारणें, असा सरकारचा नेहमींचा शिरस्ता असे. त्याप्रमाणें ह्या बाईस ठार मारण्याचा हुकूम झाला. पुन्हां अन्नत्याग सुरू झाला. पण त्याची बदली न होतां कैद्यांसच दुसऱ्या तुरुंगाकडे रवाना करण्यांत आलें. तेथें गेल्यावर हिला फटक्यांची शिक्षा देण्यांत आली. फटके मारण्याची पद्धत वर्णन करून सांगण्याचें कारण नाहीं. स्त्रीजातीस फटक्यांच्या शिक्षेसारखी शिक्षा देणें म्हणजे कोण अमानुषपणा. बरें बिचारीनें अपराध तरी काय केला होता ? एका अन्यायी, आपमतलबी, निर्दय अशा पाप्याच्या तोंडावर तडाखा दिला. पाप्याचें तोंड फोडलें म्हणून या सत्य-प्रिय बाईला चवाठ्यावर फटक्यांची शिक्षा भोगण्यास लावावी ना ? यापेक्षां सत्यप्रियेतेचें दुर्दैव

तरी कोणचें ? ' निर्भेळ सत्याची तेजस्विता, आत्यंतिक भगिनीप्रेम, उज्ज्वल स्वाभिमान, या पवित्र गुणांच्या रक्षणार्थ धडपडणाऱ्या एका अबलेनें, सत्याची, प्रेमाची, स्वाभिमानाची लाज राखण्याकरितां सात्विक संतापानें जळजळणाऱ्या हातांनीं, पापमय निष्ठुर, अमानुष अशा मांगाचें तोंड फोडलें म्हणून न्याय, सत्य, कायदा यांच्या रक्षणार्थ स्थापन झालेल्या सरकारानें, बेशरमपणें तिला फटक्यांची शिक्षा करावी यापेक्षां माणुसकीला लाजविणारी गोष्ट कोणती हवी! पण अशी शिक्षा त्या अबलेला देण्यांत आली व या अपमानामुळें तिनें व तिच्या सर्व मैत्रिणींनीं आत्महत्या करून घेतली व आपली अब्रू बचावली. त्या तुरुंगांतील पुरुषांनींही विष पिऊन आत्महत्या केली. असा याचा परिणाम झाला तरीही सरकारचें डोळे उघडले नाहींत. ऐश्वर्यमदानें धुंद झालेले नेत्र तीक्ष्ण अंजनानेंच उघडावयास पाहिजेत. मॅडम सिजिडा-सारख्या कित्येक स्त्रियांना काराच्या तुरुंगांतील हाल व अपमान सोसावे लागले. हें सर्व कशाकरितां तर सत्यरक्षणार्थ, असे कित्येक बळी या सत्याकरतां मानवजातीनें आपखुषीनें दिले आहेत. सेन्चरी मासिकानें मि. जार्ज केनान यास सैबेरियामध्यें पाठविलें होतें. त्यांस बॅबुशका या नांवाची बाई भेटली. तिला रशियन क्रांतिकारक मंडळीची 'आजी' असें म्हणत असत तिनें आपल्या चळवळीची माहिती जॉर्ज केनान यास सांगितली. ती त्यास म्हणाली " आम्ही तुरुंगांत मरूं, आमचीं मुलें तुरुंगांत मरतील. नातवंडेंही तेथेंच मरतील पण शेवटीं यांतून कांहीं तरी निष्पन्न होईलच होईल. "

हिचे आईबाप सुशिक्षित होते. लहानपणीं एके दिवशीं हिनें आपला नवा झगा नुकताच घातला होता, तो तिनें थंडीनें कुडकुडत असलेल्या एका शेतकऱ्याच्या मुलास देऊन टाकिला. आई तिला असा अविचारी स्वार्थत्याग कां करतेस म्हणून रागे भरली. ती सोळा वर्षांची झाली तेव्हां तिनें व्हॉलटेअर, रूसो यांचे ग्रंथ व फ्रान्सच्या राज्यक्रांतीचा इतिहास

वाचला होता. हा इतिहास वाचून फ्रेंच शेतकरीवर्गाबद्दल तिला अत्यंत सहानुभूति वाटूं लागली. राजकीय चळवळीकरितां आपलें आयुष्य खर्च करण्याचें तिनें ठरविलेंच होतें. त्या निमित्तानें तिनें बराचसा प्रवासही केला. राजकीय चळवळीमध्यें भाग घेण्याचा बेत तिनें आपल्या नवऱ्यास कळविला. त्याला तिचें म्हणणें पटलें; तरी तो तसें करण्यास प्रवृत्त होईना, ह्मणून तिनें त्याचा त्याग केला. आपला पेहरावही तिनें साधा व जाडा-भरडा ठेवण्याचा निश्चय केला व शेतकरी जो पोशाख वापरीत तोच ती वापरूं लागली. यांत तिनें दोन हेतु साध्य केले. एक तर तिच्या पोषाखावरून पोलिसास कळून येत नसे व दुसरा म्हणजे शेतकरी तिज-वर फार खूष असत. येथेंच ती थांबली नाहीं तर, निसर्गदत्त सौंदर्यामुळें आपल्याला ध्येयप्राप्तीच्या मार्गांत अडचणी येतील म्हणून तिनें आपल्या तोंडास आसिड फासलें व तें कुरूप करून घेतलें. केवळ साधेपणा हा स्त्रीत्वाचा अलंकार आहे, असें समजून साधा अकृत्रिम असा पोषाख करणारी स्त्री अत्यंत विरळा आढळते. उलट नैसर्गिक सौंदर्याची कृत्रिम नटवेपणानें सजावट करण्यांतच त्यांचें अर्धें आयुष्य खर्च होतें. या गोष्टीविषयीं **जॅकप प्रीलुकर** म्हणतो ‘ जगांतील सत्याच्या वेदिकेवर आत्मयज्ञ करून घेतलेल्या कोणत्याही नरपुंगवापेक्षां रशियन स्त्रियांची नैतिक उज्वलता जास्त तेजस्वी भासते. व स्त्रीजातीची नैसर्गिक दिमा-खाची व छानछुकीची आवड याविषयींच्या आपल्या रूढ कल्पना पार नाहींशा होतात. शारीरिक सौंदर्यापेक्षां नीतिसौंदर्य किती उच्च दर्जाचें आहे हें या उदाहरणावरून सहज कळून येईल. शारीरिक सौंदर्य कालाच्या कठोरगतीनें सुकून जातें. तें केवळ मातीच्या चित्रावर दिलेल्या उजळ्या-प्रमाणें असतें. पण खरें नीतिसौंदर्य कालाच्या कराल दाढेंतून, विपरीत परिस्थितीच्या अग्नींतून बावन्नकशी बाहेर पडतें व त्याचा जयघोष वर्त-मान व भविष्यकालांतून तसाच दुमदुमून राहतो व इतिहासाच्या चित्र-पटावर सोनेरी अक्षरांनीं रंगविला जातो.

वाबुष्शकानें शेतकऱ्यांमध्यें फिरून त्यांस शिक्षण दिलें. तिचें झोंपडें म्हणजे एक अत्यंत साधी अशी पर्णकुटी होती. तिची एकंदर रहाणीच एखाद्या तपस्व्यासारखी होती. ती कधींही वेळ फुकट घालवीत नसे. ती आपल्या देशबांधवांकरितां अविश्रांत श्रम घेत असे. रशियन सरकार हें प्रजेचें हितशत्रु असल्यानें त्यांनें तिला पकडून कैद केलें. आपल्या बंदिवासाचें तिनें वर्णन केलें आहे. “मला ज्या खोलींत घातलें होतें ती अंधारकोठडी होती. तेथें डांस, पिसवा, व ढेंकूण यांची बरीच समृद्धि होती. पायाखालीं चिंध्या व गुडघाभर केर होता. बसण्यास अगर निजण्यास कांहींही दिलें नव्हतें. भिंतीस लोणा असल्यानें टेकून उभें रहाणें शक्य नव्हतें. खालीं घाण, बाजूंस ओल व चोहोंकडे अंधार, अशा खोलीमध्यें जनावरांस जरी ठेविलें तरी तें दोन दिवसांत मरून जाईल. मग मनुष्याची काय कथा!” पण तिचें मन वज्रासारखें असल्यानें व सहनशीलता आत्यंतिक असल्यानें अशा नरकामध्यें तिनें कित्येक दिवस काढिले. पुढें मोठा उपकार व माणुसकी म्हणून तिला सेंटपीटर्सबर्गला नेण्यांत आलें. तेथें ज्या खोलींत तिला ठेविलें होतें तिची लांबी ९ फूट, रुंदी ५ फूट, उंची ७ फूट अशी होती. शेवटीं तर तिला एका अत्यंत थंड प्रदेशामध्यें हद्दपार करण्यांत आलें. तेथील उष्णतामान शून्याच्या खालीं वीस तें पन्नास अंश असे. अशा ठिकाणीं भयंकर थंडीमध्यें बिचारीची काय अवस्था झाली असेल बरें ! तिनें आपल्या स्थितीचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे, “मला एकलकोंडेपणानें अगदीं वेड लागल्यासारखें झालें. हिमप्रस्तरावर मोठ्या आवेशानें ओरडत भटकावें असें मला वाटे. व केव्हां केव्हां त्या निर्जीव अतएव मुग्ध व अरसिक श्रोतृजनांपुढें प्रेमार्द्र असे गाण्याचे आलाप काढीत बसावें असें वाटे.”

तेवीस वर्षांनंतर तिला रशियामध्यें आणण्यांत आलें, पण ती स्वस्थ बसली नाहीं. तिनें पुनः चळवळ सुरू केली. सहा वर्षेंपर्यंत तिनें अत्यंत परिश्रम घेतले. देशांत अशा रीतीनें चळवळ केल्यानंतर परदेशा-

मध्यें प्रवास करून आपल्या देशांतील गरीब लोकांची केविलवाणी स्थिति सर्व लोकांस कळविण्यासाठीं ती अमेरिकेमध्यें फिरूं लागली. अमेरिकेमध्यें थोड्याच कालामध्यें ती अत्यंत लोकप्रिय झाली. जेथें जेथें ती जाई तेथें तेथें तिचें अंतःकरणपूर्वक व थाटानें स्वागत होत असे. थोड्याच दिवसांत अमेरिकन लोकांच्या मनांत रशियन स्वातंत्र्याविषयीं अतोनात सहानुभूति तिनें उत्पन्न केली; तिच्या व्याख्यानाची झोड सारखी चालू होती. अमेरिकेमध्यें तिनें पुष्कळ संस्था स्थापिल्या व रशियन क्रांतिकारक चळवळीकरितां बराच फंडही संपादन केला. जो तो तिला रशियाची 'महनीय मातामही,' असें म्हणे. तिला इंग्लिश येत नव्हतें, तरी तिला रशियन लोकांकरितां वाटत असलेली कळकळ व त्याकरितां ती करीत असलेलें कार्य यांनीं अमेरिकेंतील मोठमोठे मुत्सद्दी, छापखानेवाले इतके मोहून गेले कीं, तिच्या प्रत्येक भाषणाचें ते स्वतः भाषांतर करीत. मोठमोठ्या सभा भरवून त्यांमध्यें झारशाहीचा तीव्र निषेध केला जाई. अमेरिकेंतील तेराही संस्थानांनीं "आमचें राज्य राज्यक्रांतीच्या हक्कावर उभारलें आहे व हें तत्त्व त्रिकालाबाधित आहे." असे ठराव केले. अमेरिकेमध्यें तिला एकंदर दहा हजार डॉलर मिळाले. नंतर तिनें युरोपखंडभर प्रवास केला; व ती अखेर आपल्या मायभूमीस आली. तिचें वय या वेळीं चौसष्ट वर्षांचें होतें. इतकें म्हातारपण झालें असतांही तिनें आपलें कार्य तसेंच चालू ठेविलें. देशभक्तीची जागती ज्योत तिच्या हृदयामध्यें आमरण तेवत राहिली. शारीरिक सौख्यावर लाथ मारून परदेशचा अत्यंत त्रासदायक असा प्रवास करून, अत्यंत खडतर असे तुरुंगवास भोगूनही तिचें आपल्या देशावरचें प्रेम व अढळ कर्तव्यनिष्ठा हीं कधींही कमी झालीं नाहींत. आश्चर्याची गोष्ट ही कीं, एवढें कार्य एका अबला समजल्या जाणाऱ्या मनुष्यप्राण्यानें केलें. आपल्या इकडील देशभक्ताशीं या साध्वीची तुलनाही न करणें बरें. लक्षांत घ्या कीं, जेथें शून्याखालीं २० ते ५८ अंशाइतकी थंडी होती इतकेंच काय, पण जेथें औषधासही

कोणी मनुष्य नव्हतें, तेथें मनुष्यास जगणें शक्य आहे काय ? पण वातावरणांतील दंश करणाऱ्या हिमकणांनीं या साध्वीचे विचार जास्तच प्रज्वलित केले व तिची देशभक्ति जास्तच उज्वल झाली. ती ज्या तुरुंगामध्यें होती तेथें तिला कोणी लायब्ररी दिली नाहीं. रात्रींच्या रात्रीं अंधार कोठडीमध्यें तिला उभें रहावें लागलें इतका छळ केला तरी तिचें देशावरील प्रेम रेंसभरही कमी झालें नाहीं; इतकेंच नव्हे, पण तें द्विगुणित होऊन तिनें आपल्या देशबांधवांची केविलवाणी स्थिति जगापुढें मांडून सर्वत्र सहानुभूति मिळविली. धन्य तो देश कीं जेथें, अशा स्त्रिया जन्मास येतात ! ‘ प्रेम हें मृत्युलाही जिंकतें.’ **कॅथराईनची** शरीरघटना सामान्य मर्त्यांच्या शरीरघटनेपेक्षां फार निराळया तऱ्हेची होती.

अशा धैर्याच्या स्त्रिया त्या क्रांतीच्या कालामध्यें बऱ्याच झाल्या. त्यावेळचे राशियन पोलिस प्रजेच्या सुखाकरितां नव्हते. ते प्रजेचा छळ उत्तम रीतीनें कसा होईल, तिच्या स्वातंत्र्यावर कशी गदा येईल याच विचारांत सदोदित गर्क असत. पण अशा निष्ठुर पोलिस अधिकाऱ्यांच्या पोटींही कित्येक राशियन क्रांतिकारक स्त्रीपुरुष जन्मास आले. **सोफिया-बॉराडिना** ही अशांपैकींच एक होती. हिचा बाप अत्यंत निर्दय अंतःकरणाचा होता. तो लोकांस फार त्रास देत असे. इतकेंच नव्हे तर आपल्या कुटुंबासही फार छळीत असे. असें असूनही मुलगी मात्र फार हुशार निघाली. ती मास्को एथें शिकण्याकरितां गेली. तेथें इतर व्यवसायी बंधुभगिनींच्या संगतीमुळें सोसिॲलिस्ट व निहिलिस्ट कल्पना तिच्या मनांत रुजल्या व ती आपल्या मैत्रिणींना ‘पुढील कार्याचे तयारीकरितां पुष्कळ वाचा व शिका’ असा उपदेश करूं लागली. तिनें वैद्यकीचा अभ्यास केला. इतकी पूर्व तयारी झाल्यानंतर तिनें आपल्या मैत्रिणींसह लोककल्याणार्थ प्रयत्न सुरू केले. राशियन फॅक्टरीमध्यें मजुरांची स्थिति फार भयंकर होती. त्यांची नीति अत्यंत खालावलेली होती. अशा लोकांस उत्तम शिक्षण देण्याचें हिनें व हिच्या मैत्रिणींनीं मनांत आणिलें. पण तेथील लोक शिक्षण घेण्यास नाखूष असत. १६ तास काम करून

2845

त्यांस वेळ कसा मिळावा ? पण या स्त्रियांनीं खोटीं नांवें धारण करून कसलाही त्रास सोसण्याचा निश्चय करून या गिरणीमध्यें आपला शिरकाव करून घेतला. व आपलें काम नेटानें व सावधगिरीनें सुरू केलें. हळुहळू गुप्त रीतीनें उपदेश करणें, चांगल्या चांगल्या भावनाप्रधान कादंबऱ्या वाचून दाखविणें व जाहिराती वांटणें अशा उपायांनीं तिनें आपलें गरिबांस राजकीय शिक्षण देण्याचें काम सुरू ठेविलें. पण ही गोष्ट गिरणीच्या मालकास कळली असें समजतांच ती तेथून निसटून सेंटपिटर्सबर्ग येथें गेली. तेथें तिला पकडून तुरुंगांत घालण्यांत आलें. चौकशीकरितां दोन वर्षें तुरुंगवास भोगावा लागला. पुढें तिची जबानी घेण्यांत आली. तिनें मुद्देसूद, विद्वत्ताप्रचुर अशी उत्तम जबानी दिली. आपण चळवळ्यांच्या संघांत सामील आहों असें तिनें स्पष्ट सांगितलें. पण मी माझ्यावर दया करा असें कधींही मागणार नाहीं, असेंही तिनें बजाविलें. " माझा देश कधीं तरी ऊर्जित अवस्थेला येईल. तुमच्या लष्करी सामर्थ्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. कारण त्या सामर्थ्यानें तुम्हीं कितीही शारीरिक त्रास दिला तरी आमच्या बाजूचा सदोदित नैतिक जय होत आहे. आमच्या बाजूनेंच इतिहास साक्ष देत आहे व आजपर्यंत जसें सत्याच्या सामर्थ्यापुढें संगिनीचें सामर्थ्य हटत आलें तसेंच तें या बाबतींत खात्रीनें हटणार व आमचा विजय होणार." अशा तऱ्हेनें अत्यंत धैर्याचे व जळजळीत उद्गार तिनें काढिले. न्यायाधिशानें तिला नऊ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली. तेथूनही ती मोठ्या शिताफीनें निसटली व तिनें पुन्हां चळवळ सुरू केली. तिनें अठरा महिने सारखा प्रवास केला. पण तिची आपल्या कार्यांत अत्यंत निराशा झाली व तिनें आपल्याला पिस्तुलानें जखम करून घेतली.

याच कटामध्यें **मॅडम गुडाझिंका** ही सांपडली होती. अंगोरा नदीच्या बर्फामध्यें एक विवर काढून त्यांत तिला ठेवण्यांत आलें. तेथें तिला मिठाचीं पोतीं धुण्यास देत असत. गारठलेल्या नोटांवर क्षणभर

फुंकर घातल्यास जवळचा शिपाई धमकी देत असे. ही रूपानें फार सुंदर होती. तिच्या सौंदर्यास भुलून एका सेनापतीनें ‘ आपल्या घरीं नोकरीस रहातेस काय ? ’ असें तिला विचारलें पण तिनें अत्यंत तिरस्काराची मुद्रा करून नाकारिलें. तिचे अत्यंत हाल करण्यांत आले. व ती अखेर झिजून झिजून मेली. व्हेराफिंगरे ही मोठ्या कुलीन व श्रीमंत घराण्यांत जन्मास आली. उच्च विचार व आचार ह्यांनीं ती फार उत्तम मार्गास लागली. ज्यूरिच येथें शिकत असतां ती मोठमोठ्या वादविवाद सभेमध्यें बोलत असे, एथेंच शिकत असतां पुष्कळ स्त्रीपुरुषांस कैद केलेलें तिनें स्वतः पाहिलें. त्यांत तिची सख्खी बहीणही होती. मोठ्या युक्तीनें रोज कैदखान्यांत जाऊन ती सर्वांची चौकशी करी. सरकार राजकीय कैद्यांची छळणूक फारच करूं लागलें, असें पाहून ती क्रांतिकारकांस जाऊन मिळाली. तिच्या वक्तृत्वाविषयीं प्रसिद्ध रशियन ग्रंथकार मिक्हेलोव्हनी म्हणतो ‘ तिच्या बोलण्यांत अशी कांहीं अप्रतिम जादू व मोहनशक्ति असे, कीं तें ऐकून सर्व लोक तिच्या मताकडे वळत.” पुढें तिला पकडण्यांत आलें. आरंभीं तिला देहांत शिक्षा झाली होती, पण ती रद्द होऊन वीस वर्षें तुरुंगवास भोगावा लागला. त्या दिवशींच्या कोर्टांतील देखाव्याचें वर्णन चरित्रकारानें खालीलप्रमाणें केलें आहे. ‘ ती निधड्या छातीची स्त्री न्यायासनापुढें छातीठोकपणें उभी होती. तुरुंगावरील अधिकारीसुद्धां तिच्या नीतिप्रभावानें दिपून गेल्यामुळें तिला स्वाभाविक रीत्याच पूज्य मानूं लागले. तिच्या मुखांतून येणारा प्रत्येक शब्द विद्यमान सरकारांच्या पुरस्कर्त्यांच्या कानावर त्यांच्या भावी अधःपतनाचा इषारा देत होता.’

‘ आई मी आनंदांत आहें. तूं रडतेस कां ?’ असें तिनें आईचें सांत्वन केलें. ‘मृत्यूच्या द्वारीं उभी राहून मी स्वातंत्र्य व प्रेम या द्वयींचा माझ्या रशियन लोकांकरितां त्रिवार जयघोष करितें.’ असे तिनें उद्गार काढले.

वाचकहो, या शब्दद्वयीमध्यें केवढें दैवी सामर्थ्य भरलें आहे ! ज्या राष्ट्रस्वातंत्र्याखातर व प्रेमाखातर व्हेरा आजन्म लढत राहिली

त्याच ध्येयद्रुवीचा आपल्या देशबांधवांस तिनें शेवटचा संदेश दिला. स्त्रीजातीच्या कोमल हृदयाला पीळ पडून स्वातंत्र्यास्तव तें कसें कळकळीनें व बिनदिक्कत लढलें याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. चिकित्साबुद्धीला एकादी गोष्ट पटली कीं, त्यानंतरचीं सर्व कार्यें हृदयाचीं असतात. चिकित्सेचें अगर चिकित्सेनें पटलेल्या तत्त्वांचें समाधान होण्याकरितां हृदयामध्यें विकार वास करीत असतात. एकादी गोष्ट पटल्यानंतर ती आचरणांत उत्तम रीतीनें येण्याला स्वयंस्फूर्ति, स्वार्थत्याग, स्वदेशप्रीति, सहृदयता या गुणांचें साहाय्य लागतें. त्याशिवाय चिकित्सेची चलाखी स्वप्नवत् होते. त्याशिवाय चिकित्सेच्या ताजव्यांत तत्त्वें घालून तीं सरस अगर निरस ठरल्यानंतर या तत्त्वांस चिकटून राहण्यास व तीं आचरणांत आणण्यास निश्चयशक्ति, स्वार्थत्याग व कळकळ हे गुण असले पाहिजेत. नाहीं तर नुसत्या शाब्दिक नाचानें कधींही फायदा होणार नाहीं. रशियन सरकार हें जुलमी आहे, मानवीजातीचे नैसर्गिक हक्क तुडविणारें आहे, अशी खातरी पटल्यानंतर रशियन स्त्रियांनीं प्राणावर उदार होऊन सर्व देशभर 'न भूतो न भविष्यति' अशी चळवळ करून जगाला स्वातंत्र्याचा, समतेचा व बंधुत्वाचा धडा घालून दिला.

**सोफिपेरिहोका** हिचा बाप मोठा अधिकारी होता. तो स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध असे. तो बायकोसही फार छळीत असे. पण 'भांगेंत तुळस' या नात्यानें त्याच्या पोटीं तिनें जन्म घेतला. **सोफी** व तिची बहीण यांनीं पुष्कळ खटपट करून शिक्षण मिळविलें. **सोफी** तर निहिलिस्टांत तात्डतोब जाऊन मिळाली. तिनें जन्मभर कितीतरी कारस्थानें केलीं. इतकीं कारस्थानें करूनही उजळ्या माथ्यानें देशभर बेधडक फिरण्यासही ती भ्याली नाहीं. पुढें तिला पकडून देहांत शिक्षा दिली. ' त्यावेळीं तिची मुद्रा अत्यंत सतेज, शांत, गंभीर, करारी अशा तऱ्हेची होती. ' असें सरकारी अधिकाऱ्यांनीं लिहून ठेविलें आहे. तिला फांशीची शिक्षा दिल्यानंतर तिची तसबीर काढून गांवभर फिरविण्यांत आली. त्या चित्रा-

खालीं असें लिहिण्यांत आलें होतें. 'पुरुषासारखें सुळावर चढण्यास जर माझी स्त्रीजात आड येत नाहीं, तर पुरुषासारखें पार्लमेंटांत जाण्यास ती कां आड यावी' ! ! !

मिन नांवाच्या सेनापतीला ठार मारणारी जिनाडा याच तऱ्हेची बाई होती. मिननें मास्कोशहरभर केवळ लष्करी सामर्थ्यानें कित्येक अनाथ, अज्ञानी व निर्दोषी लोकांची कत्तल केली होती. अशा नराधमाचे कोणी राई राई एवढे तुकडे जरी केले असते, तरी त्यांत कोणासही वाईट वाटण्याचें कारण नव्हतें. पण जिनाडास सरकारनें पकडलें व तिची चौकशी चालली असतां तिनें खालील उद्गार काढिले. "मला तुम्ही सुळावर चढवाल, फांशी द्याल, अंधार खाणीमध्यें काम करण्यास लावाल अगर होईल तितकें छळून छळून माझे हाल कराल पण त्याची मला किंमत नाहीं." पुढें आपल्या देशबांधवांस उद्देशून ती म्हणाली 'माफ करा, प्रियबंधूहो माफ करा, माझ्या हातून तुमची सेवा फारच कमी घडली. काय करावें ! परमेश्वरानें मला फार थोडें आयुष्य दिलें, पण माझा देश थोड्याच दिवसांत स्वातंत्र्याच्या सिंहासनावर आरूढ होईल व या सरकारचें सिंहासन उलथून पडून माझे राशियन बांधव स्वातंत्र्यसुख अनुभवतील अशी माझी पक्की श्रद्धा आहे, व याच दृढ विश्वासानें मी प्राण सोडितें" या तिच्या शेवटच्या उद्गाराबद्दल तिचा चरित्रकार म्हणतो. 'सत्याग्नींत प्राणाहुति टाकणाऱ्या साधुसंतांखेरीज इतरांना मृत्यूस इतक्या शांत व गंभीर मुद्रेनें कवटाळणें शक्य नाहीं.'

स्वातंत्र्याच्या भव्य व टोलेजंग इमारतीचा पाया मांसाच्या चिखलानें, हाडांच्या चिपांनीं व रक्ताच्या जलांनींच भरलेला असतो. मगच हा स्वातंत्र्याचा मनोहर मनोरा चिरस्थायी होतो, व जगतामध्यें आपल्या देदीप्यमान व उत्तुंग शिखरांनीं झळाळत राहतो. देवाच्या घरचा न्याय किती कठोर आहे पहा. रक्तांनीं भिजलेल्या भूमींतूनच उद्यान उमलतें. तर

उद्यानांतून विषवल्ली बहरून वातावरण विषमय होऊन जातें. उकिरड्यावर हिरे सांपडतात, तर फुलांच्या गुच्छामध्यें सर्पाचें पिलूं आढळतें. चांगल्यांतून वाईट व वाईटांतून चांगलें उत्पन्न होतें. निसर्गाचा नियमच असा आहे त्याला कोण काय करणार! स्वातंत्र्याच्या सुंदर मनोऱ्याखालीं अशी कित्येक सत्यप्रेमी आत्म्यांची आहुती पडली असेल? अशा सत्यप्रेमी आत्म्यांची आहुति पडली म्हणूनच त्यास पाया धरतां आला नहून तो केव्हांच कोसळला असतां. निसर्गाच्या खुल्या राज्यामध्यें खुलेपणानें व स्वच्छंदानें हिंडणाऱ्या स्वातंत्र्यप्रिय मानवास कोणती जुलमी सत्ता कह्यांत ठेवील? या जुलमी सत्तेची इमारत इस्पिटाच्या बंगल्यासारखी असते. जुलमीसत्ता, अमानुष सरकार व कायदे यांच्या दावणींतून निसटून जाण्याला धडपडणारें जनतेचें हृदय एकदां सत्यरक्षणाकरितां जळूं लागलें कीं त्या ज्वालांनीं जुलमी सत्तेच्या इमारती कोसळून पडूं लागतात. त्या जुलमी सत्तेला स्वतःच्या अधःपतनाकडे पाहून धाय धाय रडविल्याशिवाय जनतेचें प्रक्षुब्ध मन थंडावत नाहीं. अशीच स्थिति रशियामध्यें झाली होती. जुलमीसत्ता म्हणजे तरी काय? आधीं कांहीं विशिष्ट लोकांच्या हातीं सत्ता जाते, याचा तरी अर्थ काय? ती जाते म्हणण्यापेक्षां परस्पर सहानभूतीनें अनेक कमी अधिक जोरदार शक्ति एका विशिष्ट परिघामध्यें केंद्रीभूत झालेल्या असतात. याचा उद्देश काय? सर्वांचें सुख. सर्वांचें सुख म्हणजे काय व तें कसें संपादावयाचें? कायद्यानें. परस्परघर्षणाचा अगर विरोधाचा प्रकार न व्हावा म्हणून कांहीं नियम करणें व त्यांसच जास्त प्रमाणभूत मानून त्यांची अंमलबजावणी करण्यास वेगवेगळाले अधिकारी नेमणें यांसच सरकार म्हणतात. हे अधिकारी जनतेनेंच नेमावयाचे असतात. असें जर न झालें तर ती खरी सत्ता नव्हे. बरें अशा विशिष्ट अधिकाऱ्यांच्या दर्जासही कांहीं मर्यादा असावीच लागते. इतकेंच नव्हे तर अधिकाऱ्यांनीं जर जनतेच्या मनाविरुद्ध गोष्ट केली तर त्यांना पदच्युत करण्याची जनतेमध्यें शक्ति पाहिजे. अशा तऱ्हेनें ज्या सत्तेची उभारणी झालेली असते,

ती सत्ता कधींही जुलमी होऊं शकत नाहीं; व झालीच तर ती जनतेच्या शिथिलतेमुळें होय. जनता अज्ञानी, अशक्त व आळशी झाली कीं, सत्ता मदान्ध, क्रूर व बेइमान होऊं लागते. तिच्या क्रूरतेनें व मस्तीनें जनतेस त्रास होऊं लागला, कीं पुन्हां जनमनाची जागृति होऊन ती सत्ता उलथून पाडण्याचे प्रयत्न सुरूं होऊं लागतात. आतां अशा झगड्यामध्यें सहाजिकच असा प्रकार होतो कीं, जरी जनतेनें आपल्या कल्याणार्थ विशिष्ट सत्ता विशिष्ट जागीं आपखुषीनें केंद्रीभूत केली असली तरी कालांतरानें जनता अज्ञानी व आळशी होते. व साहजिकच या आपखुषीनें व केवळ विश्वासाची ठेव म्हणून दिलेल्या सत्तेचा उपयोग ते ते सत्ताधारी अयोग्य रीतीनें व अन्यायानें करूं लागतात. ही जुलमी सत्ता जितक्या जोरानें जनतेचा चावा घेते तितकी जनतेमध्यें जागृति उत्पन्न होते व मग स्वतःची शक्ति काय आहे हें कळूं लागून ती झगडूं लागते. कालगतीनें सत्तेचीं केंद्रें अभेद्य होऊन बसल्यामुळें त्यास उडवून देणें फार मुष्किलीचें होतें. हें काम करण्यास जनतेचे पुढारी पुढें सरसावतात व त्यांस अत्यंत त्रास सोसावा लागतो. अशा तऱ्हेचा झगडा प्रत्येक इतिहासामध्यें नमूद आहे व या झगड्यामध्यें सत्याचा व स्वातंत्र्याचा विजय झालेला आढळतो. या स्वातंत्र्याच्या झगड्यामध्यें स्त्रियांनींही पुष्कळ भाग घेतला आहे. रशियन जुलमी सत्तेविरुद्ध झालेल्या झगड्यांत मात्र जगाच्या इतिहासांत इतरत्र कोठेंही न दिसणारा असा अभूतपूर्व देखावा दिसतो. स्त्रियांनींच जणूं कांहीं ही कामगिरी आपल्याच शिरावर आपण होऊन घेतली असें दिसते. यामध्यें त्यांनीं प्रगट केलेली सहनशीलता, अलोट धैर्य, असामान्य स्वार्थत्याग इतरत्र फार कमी सांपडतो. या झगड्यामध्यें स्वातंत्र्यास्तव आत्यंतिक तळमळ लागलेली स्त्री म्हणजे **मेरीया स्पिरी डोनावझा** ही होय. रशियामध्यें एकोणीसशेंपांच सालीं **टॅमबॉफ** येथें मोठा दंगा झाला. अर्थात् लोकांनीं स्वातंत्र्यार्थ केलेला प्रयत्न असह्य होऊन सरकारानें येथें राजरोज कत्तल सुरूं केली. दुय्यम

सत्ताधिकारी ल्यूनेन व्होस्के या नराधमानें कित्येक लोकांस चाबकाचे तडाखे देऊन ठार केलें. आपल्या कोसॅक लोकांना गांवांमध्यें पाहिजे तें करण्याची त्यानें परवानगी दिली. लष्कर हें वस्तुतः लोकांचेंच बनलेलें असतें. त्यास लोकांनींच पोसलेलें असतें. शिपायांचीं पथकें जनतेंतून तयार झालेलीं असतात. देशामध्यें जनतेला सुख कशानें मिळेल; शांतता, न्याय, सुरक्षितता कशी राहील या गोष्टी पाहणें हें सरकारचें कर्तव्य असतें. ही सुरक्षितता राखण्याचें काम सरकार आपल्या लष्कराकडून करवितें; पण जें सरकार, सरकार या नांवास अपात्र होऊन आपलें कर्तव्य न्यायानें करीत नाहीं, त्या सरकाराच्या लष्करांतील शिपाईही आपलें खरें कर्तव्य विसरून जातो व आपली लष्करी सत्ता अन्यायानें वापरूं लागतो. मदांध झालेलें रशियन सरकार व त्यांचें पशुवत् असलेलें लष्कर असा मिलाफ झाल्यावर मग काय विचारतां? अधिकाऱ्यानें हुकूम सोडण्याची फुरसत कीं त्या पशुवत् पोसलेल्या जनावरांनीं गांवभर यमपुरीची आठवण करून द्यावी. कित्येक माणसांस डोक्यावर एकसारखे तडाखे बसल्यानें तीं वेडीं झालीं; कित्येक स्त्रियांनीं अब्रूकरितां आत्महत्या करून घेतली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मनुष्याच्या कल्पनेला जी क्रूरता व जो अमानुषपणा करितां येणें शक्य होतें तो सर्व त्यांनीं केला. मग बिचाऱ्या अबलांची या यमदूतां हातीं सांपडून काय दशा झाली असेल याची कल्पनाच करणें बरें. अलेखनीय असे हिडीस प्रकार त्यांनीं केले, इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे. हा कशाचा परिणाम? तर एका गव्हर्नरच्या बेअकली, बेजबाबदार हुकुमाचा. या राक्षसास ठार करण्याची मेरियानें प्रतिज्ञा केली. व त्या दृष्टीनें ती कारस्थान करूं लागली. ती सारखी त्याच्या पाळतीवर असे. बिचारीला स्वतःचें काय होईल याची कल्पना नसेल काय? जिनें सर्व देशभर होणाऱ्या कहराचा प्रत्यक्ष देखावा पाहिला होता, तिला पुढें काय काय हाल सोसावे लागतील याची कल्पना आली असलीच पाहिजे. पण कांहींही होवो. या नराधमाचा खून करा-

वयाचा असा तिनें दृढनिश्चय केला. सकृद्दर्शनीं वाघशेळीचीच झुंज होती. पण निश्चयाच्या बळानें व अन्यायाच्या चिडीनें मनुष्य असत्याचा सूड उगविण्याच्या कार्यांत कोणत्याही संकटाची पर्वा करीत नाहीं. हा सात्त्विक संताप आहे. याचा भडका पेटला कीं, मनुष्य बेभान होतो. ध्येयप्राप्तीच्या मागें लागणारे लोक बेभान, बेफिकीर झाल्याशिवाय त्यांस ध्येयप्राप्ति होत नाहीं, अशा सात्त्विक संतापानें जळणारी मेरिया प्राणाची पर्वा काय म्हणून करील ? कित्येक दिवस ती त्याच्या पाळतीवर होती आणि अखेर तिनें त्यास एका स्टेशनवर गांठलें. तो आपल्या लवाजम्यासहच होता. सेनापतीची बडदास्त ठेवण्याकरितां लोकांस बाजूस ढकलून देऊन वाट काढणें वगैरे प्रकार नित्याचेच असतात. मेरियाही त्याच गर्दींत होती ती बाजूस सरली नाहीं. सेनापतीस येतांना पाहून जवळ येतांच तिनें त्यावर उडी घातली व पिस्तुलांत असलेल्या चारही गोळया त्याच्या छाताडांतून तिनें पार उतरविल्या. एका गोळीनें तो मेलाच असता पण त्या हलकट व राक्षसी हृदयाचे राई राई एवढे तुकडे केल्याशिवाय तिला कसें समाधान होणार ? याप्रमाणें चारही गोळया त्याच्या छाताडापार करून ती आपल्यावर पिस्तूल झाडून घेणार–पण दैवगति किती विचित्र पहा!–बिचारीचा नेम चुकला व ती त्या राक्षसांच्या हातांत सांपडली ! ! आधींच मस्ती आलेली. त्यांत आपल्या सेनापतीचा खून. मग काय विचारितां ? त्या मुग्ध अबलेच्या शरिरावर पाहिजे त्यानें व पाहिजे तेथें तडाखे देण्यास सुरवात केली. नाहीं. यावेळीं नृसिंह स्तंभ फोडून बाहेर आला नाहीं. गोपाळकृष्ण तिची लाज राखण्यास धांवला नाहीं. येशु ख्रिस्तानें या संकटकाळीं उडी घेतली नाहीं. " पशूंनो, अधमांनो, मला गोळी घालून ठार करा " अशी केविलवाण्या मुद्रेनें तिनें विनंति केली. पण व्यर्थ. जो तो शिपाई मनास वाहील तसें मारूं लागला, एका नीचानें तर–नको, भगिनींनो नको, पुढील गोष्ट ऐकणें तुम्हांला शक्य नाहीं–तिचे केंस एका मुठींत

धरून तिला गरगर फिरवून स्टेशनवरील शिलातलावर जोरानें आपटलें. चमत्कार असा कीं, बिचारीचा प्राण कासावीस होई; पण कुडींतच घुटमळे; वयानें लहान असल्यानें तिच्या कोमल शरीराला कोण असह्य वेदना झाल्या असतील ? येथेंच ते थांबले नाहींत, तिच्या पायास धरून त्यांनीं रस्त्यावरून तिला फरफटत नेलें. डोक्याला कित्येक खोंचा पडल्या; तिच्या मृदु अंगाला कित्येक ठिकाणीं जखमा झाल्या, पण त्या दगडांनां, त्या जनावरांनां, तिची दया आली नाहीं. तुरुंगांत नेल्यानंतर तिचा पद्धतशीर रीतीनें छळ करण्यांत आला. स्पॅनिश लोकांनीं आपल्या इनक्विझिशनमध्यें इतका अमानुष छळ कधींही केला नसेल. ती लहान असल्यानें चेंडूसारखी तिला इकडून तिकडे व तिकडून इकडे जमिनीवर आपटण्यांत येई. बिचारीच्या अंगावर वस्त्रही नव्हतें. तिचें कातडें सिगारेटनें हंसत हंसत जाळण्यांत येई. हातांनीं एक एक केंस उपटीत. पण तिनें एक शब्दही तोंडांतून काढला नाहीं. इतकेंच काय ! अमानुषता येथेंच थांबली नाहीं, ती याहीपलीकडे गेली. आपल्या नालांच्या बुटांनीं तिच्या पोटावरून जो तो शिपाई मजेखातर म्हणून चालत असे. ‘ कल्पनासृष्टीपेक्षां सत्यसृष्टी जास्त भयानक आहे, असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. तो सेनापती तिकडे मरून गेला. हीही मरणाच्या दारांतच होती. पण नाहीं. दयाळू सरकार तिला कां मरून देईल ! अशा अबलेला मरण आलेलें त्यास कसें खपणार ! त्यानें तिला तावडतोब इस्पितळांत पाठविलें. ज्या शिपायानें तिला नेलें, तो तर पशूंचा राजा होता. कोणत्या नरकांतून ही वल्ली बाहेर आली कोणास ठाऊक ! इतक्या अमानुष रीतीनें छळ झालेल्या अबलेवर दयेनें डबडबलेल्या नेत्रांनीं एकाद्यानें अश्रूंचा पाऊस पाडला असता. अशा देवीचा छळ झालेला पाहून एकाद्यानें तिची कड घेऊन सरकारी हुकूम धाब्यावर बसविले असते व ही आत्यंतिक सहनशीलतेची पुतळी पाहून हृदयांत सांठविलेल्या अस्सल रक्तानें तिला न्हाऊ घातलें असतें. तिची पायधूळ मस्तकीं घेऊन देवाच्या नांवाचा घोष करीत एखादें

त्रिखंड नाचत सुटला असता. तिची लोकसेवेची दैवी कळकळ पाहून आपली मान तोडून तिच्या चरणीं वाहिली असती. तिच्या पावित्र्याखातर अगर तिची सुटका करण्याखातर आपल्या रक्ताचीच काय पण–सर्व देशभर तिच्या धीरोदात्ततेचा डंका वाजवूत मृत आत्म्यांनाही जागें करण्यास लावणारे तिच्या चरित्राचे पवाडे गाऊन जनतेचें हृदय उचंबळवून जुलमी सत्तेशीं एकदिलानें लढत लढत–अखिल जनतेच्या रक्तांच्या नद्या वाहविल्या असत्या; एकना दोन या अबलेकरितां एकाद्यानें पाहिजे तें केलें असतें, पण नाहीं, इतकी माणुसकी त्या शिपायामध्यें नव्हती. उलट कल्पनातीत अमानुषता रोमरोमीं असलेला तो पशु होता. त्यानें तिची रेल्वेच्या डब्यांत कल्पनातीत क्रूरतेनें अब्रू घेतली. त्यास असलेला रोगही त्या अबलेला लागला. परमेश्वरा, कोण ही क्रूरता तुझ्या राज्यांत ! स्त्रीपावित्र्याचा तूं सदैव रक्षक असतां राष्ट्रस्वातंत्र्याखातर तळमळणाऱ्या एका अबलेची अब्रू एका सैतानानें घेतली तरी तूं स्वस्थ होतासना ? कर्म त्या राष्ट्राचें व अभागी अबलेचें ! तिच्या आईला तिला भेटण्याची परवानगी देण्यांत आली. त्या माउलीनें आपली गुटगुटीत व टवटवीत असलेली पोर अमानुष हलकटपणाच्या डागांनीं निस्तेज झालेली पाहून हंबरडा फोडला. मेरियाच्या अंतःकरणाचें यावेळीं पाणी पाणी झालें असेल. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या व ती आईस म्हणाली ‘ आई, मी मोठ्या आनंदानें मरेन ! पण या पशूंच्या हातांत जिवंत सांपडलें याचें मला अत्यंत दुःख होतें ! ’ पुढें ती बरी झाल्यानंतर तिची कोर्टामध्यें चौकशी करण्यांत आली. बेशरमी सत्तेला लाज वाटली नाहीं. चौकशीच्या आधींच तिला यथेच्छ शिक्षा देऊन मग कोर्टामध्यें तिनें काय गुन्हा केला व त्याकरितां तिला काय शिक्षा द्यावी याचा सरकार ठराव करूं लागतें !! यापेक्षां न्यायाचे व सत्याचे धिंडवडे ते काय निघावयाचे ! कल्पनातीत छळ केल्यानंतर तिला इस्पितळांत पाठवून बरें केलें. व तिचा पुनर्जन्म झाल्यानंतर तिला चौकशीकरितां कोर्टांत आणिलें. कोठला हा न्याय ! अन्याय, अमानुषता, सैतानाच्या राज्यांतील झाडून सर्व दुर्गुण सरकारांत

त्यावेळीं एकवटले होते. न्यायासनासमोर आल्यानंतरही त्या देवीच्या अंगांत खालील शब्द उच्चारण्याची शक्ति होती. "सभ्य गृहस्थहो, सभोंवार दृष्टि फेंका. एकाद्या तरी हंसऱ्या, शांत व संतुष्ट मनुष्याचा चेहरा तुम्हांस दिसतो काय? कोठेंही नाहीं. इतकेंच नव्हे! पण ज्यांना या क्षणीं आपण विजयी आहों, असें वाटतें आहे त्यांच्या चेहऱ्यावरसुद्धां-आपला विजय क्षणिक आहे आणि लवकरच सर्वजनता निर्जीव कण्हणें व निःसत्व किंकाळ्या फोडण्याचें सोडून देऊन आपणास उलथून पाडणार या विचारानें —म्लानता आली आहे. मजविषयीं म्हणाल तर मी आतां मृतवत् आहें व जरी यापुढें देहांत शिक्षा दिली अगर अत्यंत क्रूरतेनें माझा छळ केला, तरी आजपर्यंत केलेल्या अनन्वित छळांपेक्षां तुम्ही जास्त तें काय करणार? मला ठार करा. पण लक्षांत ठेवा कीं, माझा आत्मा व माझी दृढश्रद्धा तुम्हांस कधींही मारतां येणार नाहीं. अशी माझी खातरी आहे कीं, लवकरच, सर्व जनता स्वतंत्र व सुखी होईल. सत्य, न्याय, सरळपणा यांचा जिकडे तिकडे विजय होईल आणि समता, बंधुता व स्वातंत्र्य हीं केवळ स्वप्नें न राहतां तीं सत्यसृष्टीमध्यें फैलावूं लागतील. या दिव्य भविष्य काळाखातर स्वतःच्या प्राणाचा होम करणें खरोखर भाग्याचें नाहीं कां? यापेक्षां मला जास्त बोलावयाचें कांहीं नाहीं."

तिच्यातर्फे जो वकील होता त्यानेंही 'हिला देहांत शिक्षा देणें अत्यंत अन्यायाचें आहे. हिनें अधिकाऱ्यास ठार मारिलें म्हणण्यापेक्षां त्या अधमाच्या क्रूर कृत्याबद्दल सर्व रशियन जनतेनें त्याचे तुकडे केले, हें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे.' असें ठासून भाषण केलें. 'हिचा शिरच्छेद केल्यास सर्व देश भीतीनें रोमांचित होईल,' असेंही सांगितलें. पण त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. फांशीची शिक्षा कायम करण्यांत आली. सर्व देशभर लोक अत्यंत चवताळले. पुढील कोर्टांत फिर्याद करण्यांत आली. युरोप खंडांतही तिच्या मुक्ततेकरितां बरीच

चळवळ करण्यांत आली व अखेर फांशीची शिक्षा रद्द करून जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली. सैबेरियाच्या तुरुंगांतच तिचा अंत झाला. तिचा आत्मा सर्व देशभर आपल्या तेजानें इतरांस स्वातंत्र्याचा मार्ग दाखवीत होता.

अशा रीतीनें राशियांतील जुलमी झारशाहीचा बीमोड करण्याकरितां कित्येक स्त्रियांनीं आपले प्राण खर्ची घातले. ह्या निहिलिस्टांच्या चळवळींत स्त्रियांनीं काय काय कामगिरी केली एवढेंच आम्हीं वर पाहिलें. इतकीं हृदय उचंबळवून सोडणारीं स्त्रीचरित्रें जगाच्या इतिहासांत खरोखरच फार थोडीं सांपडतील. या निहिलिस्टांच्या चळवळींत पुष्कळ ढोबळ चुका झाल्या. त्यांनीं पुष्कळच अदूरदर्शीपणा केला. पण त्यांचा जो अदूरदर्शीपणा झाला अगर ज्या ज्या कांहीं चुका झाल्या त्या एका उच्च ध्येयाकरितां झाल्या असल्यानें व तळमळणाऱ्या हृदयाकडून त्या नैसर्गिक रीत्याच होऊन गेल्या असल्यानें बहुतेक सर्व क्षम्य आहेत. याकरितां त्यांच्या चुकांकडे अगर त्यांच्या परिणामाकडे न पाहतां आपण उद्देशाकडे पाहिलें पाहिजे. अशा देवींच्या अंतःकरणप्रवृत्तींच्या पावित्र्याकडेच आपण लक्ष दिलें पाहिजे. न होऊन मुत्सद्याच्या आरामखुर्चीवर पडून त्यांची तर्कशास्त्राच्या दृष्टीनें छाननी करावयाची नाहीं. शुद्ध अंतःकरणाकडून झालेलें आचरण कितीही अदूरदर्शी असलें तरी अन्यायी खास नाहीं. व अशा कृतींचा देशाच्या राजकारणावर कांहींही परिणाम होत नाहीं असें प्रामाणिकपणें म्हणतां येणार नाहीं. जुलमाच्या जुन्या कडेकोटास बत्ती लावण्यास त्यांचाही अंशतः उपयोग होतो. लहरी व जुलमी जुन्यासत्तेचे तुकडे करणें म्हणजेच नव्यांचा पाया आरंभणें होय. याविषयीं जेकॉफ धिलुकर म्हणतो:— "त्यांनीं जुनी इमारत उलथून पाडिली हें तरी खास—अन्य त्यांनीं कांहीं केलें नसो आणि नवी इमारत बांधण्यापूर्वीं जुनी इमारत ज्यांनीं जमीनदोस्त केली त्यांना ही नवी इमारत बांधण्याचें अंशतः श्रेय दिलें पाहिजे."

या दृष्टीनें पाहतां या राशियन स्त्रियांची स्तुति करावी तेवढी थोडीच. मात्र अशी चळवळ इतरत्रही खात्रीनें यशस्वी होईल असें म्हणतां

येत नाहीं. कारण भिन्न भिन्न परिस्थितीमध्यें भिन्न भिन्न तऱ्हेच्या शक्तींचा व पद्धतींचा उपयोग होतो. जगांतील प्रत्येक देशाचा इतिहास भिन्न आहे. त्यांच्या संस्कृति भिन्न, आनुंवशिक संस्कार भिन्न, विशिष्ट गुणावगुण भिन्न असल्यानें प्रत्येक देशाच्या परिस्थित्यनुरूप त्याचा इतिहासही भिन्न भिन्न बनला गेला आहे. पण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं भिन्न देशांच्या विशिष्ट परिस्थितीमध्यें स्त्रीपुरुषांनीं एखादें उच्चध्येय डोळ्यापुढें ठेवून स्वीकारलेली कार्यपद्धति, गाजविलेले पराक्रम व मिळविलेले जयापजय या सर्वांमागें हृद्यप्रवृत्ती म्हणून कांहीं असतात. व त्या सात्विक असून त्या सत्याकरितां, न्यायाकरितांच मनुष्यास कार्यप्रवृत्त करितात. ज्या वेळीं विघातक कामगिरीची अत्यंत जरूरी असते, त्या वेळीं ती नैसर्गिक रीत्या अवश्यमेव होतेच होते. ती टाळतां येत नाहीं. ज्यावेळीं विधायक कामगिरीची जरूरी असते त्यावेळींही ती साहजीक घडून येते. रोग्यांच्या शुश्रूषेकरितां, कैद्यांच्या उन्नतीकरितां, अज्ञानी जनतेस साक्षर व सज्ञान करण्याकरितां, एकंदरींत लोकांच्या हिताकरितां, **फ्लारेन्स नाइटिंगेल, मेरीकार्पेटर, इलिझाबेथ फ्राय** यांसारखीं स्त्रीरत्नें उद्भवलीं तर स्वातंत्र्य, न्याय, समता, बंधुता यांची स्थापना करण्याकरितां, जुलमी सत्तेचे कोट उडवून देण्याकरितां, **मेरियासारख्या** स्त्रिया जन्मास आल्या. म्हणूनच कोणतेंही कार्य; मग तें विघातक असो अगर विधायक असो, त्यास स्वार्थत्याग, धडाडी, धिमेपणा, धैर्य व सहनशीलता इत्यादि गुण अवश्य आहेत. हे सर्व गुण अंगीं बाणवून जर आधुनिक आर्यस्त्री तिच्यापुढें असलेली विधायक कामगिरी करूं लागेल तर तिला, 'जिकडे तिकडे कामाचा डोंगर पडला आहे व तो उचलण्यास हजारों स्त्रियांनीं अहर्निश झटलें पाहिजे,' असें खात्रीनें वाटेल. वरील अमोलिक गुण आंगीं बाणवून योग्य मार्गानें जी हिंदुस्त्री आज कार्य करण्यास प्रवृत्त होईल तिच्या हातून फार मोठी राष्ट्रसेवा होईल यांत कांहींही शंका नाहीं. तसें करण्याची परमेश्वर त्यांस बुद्धि देवो, अशी इच्छा प्रदर्शित करून हें प्रकरण आपण पुरें करूं.

# प्रकरण ५ वें.

## संकीर्ण-सुमनें.

आपणाभोंवतीं पसरलेल्या अफाट व अनंत वस्तुजातवार दृष्टि फेंकल्यास, तें आपणास नानारंगी आहे असें दिसेल. तें एकरंगी असतें, तर, मानवी प्राण्यास क्षणभरच पाहायाची शक्ति दिली असती तरी भागलें असतें; पण तें नानारंगी आहे; इतकेंच नव्हे, तर तें सारखें बदलत आहे. म्हणूनच मनुष्यप्राण्यास या जीविताचा कंटाळा येत नाहीं. मानवी स्वभाव हीसुद्धां अशीच एक ईश्वरनिर्मित चीज आहे. त्यामध्यें जसजसें आंत जाऊन पहावें, तसतसें पडद्यामागें पडदे असलेले दृष्टीस पडतात. नाटकांमध्यें जशी पडदेपालट झाली, म्हणजे एक प्रकारचा विशुद्ध नेत्रानंद होतो, त्याचप्रमाणें निरनिराळ्या मानवी स्वभावांचीं चित्रें पाहून होतो.

मनुष्यस्वभावांतील बरेवाईट कल आरंभीं सुप्तच असतात, त्यांचा प्रकाश कांहीं तरी प्रसंगाशिवाय पडत नाहीं. **दोरा-ताईनें**, विश्वबंधुत्वाच्या नात्यानें रोग्याची वात्सल्यानें सेवा केली म्हणून आपल्या मनांत तिजविषयीं प्रेम वाटतें. **संयोगितेनें** व इतर रजपूत स्त्रियांनीं पतिप्रेमाखातर आत्माहुति दिली म्हणून आपल्याला त्यांविषयीं पूज्यभाव वाटतो. **लेडी सोमरव्हील, क्यॅरोलाईन हर्शल, मेरी वुलस्टोन कॅफ्ट** यांचीं अलौकिक विद्वत्ता पाहून आपणांस सादर कौतुक वाटतें. पण जगामध्यें अशींही कित्येक उदाहरणें आहेत कीं, त्यांत उत्कटता व चित्तवेधकता एकदम दिसून येत नाहीं; तथापि त्यांतील उपयुक्तता मात्र त्यामुळें कमी होत नाहीं. हातांमध्यें खड्ग घेऊन स्वातंत्र्याकरितां व न्यायाकरितां बिन-दिक्कत लढणारी **झांशीची लक्ष्मीबाई**, लढाईंत जखमी झालेले शिपाईगडी

पाहून विव्हळ झाली नसती अगर त्यांची तिनें सेवा केली नसती असें म्हणवत नाहीं. उलटपक्षीं, गुन्हेगारांचीं काळी अंतःकरणें प्रेमकिरणांनीं पवित्र करणारी **सारामार्टीन** प्रसंग आला असता तर **ताराबाई**सारखी मोहरमच्या गर्दीतून शिरून शत्रूंच्या उरांत बाण मारण्यांत कचरली असती, असें म्हणवत नाहीं. तात्पर्य इतकेंच कीं, सर्वसाधारणपणें चरित्रांतील लहानमोठ्या प्रसंगांवरून त्यांतील तारतम्यभाव ठरविण्याचें धाडस कोणीही करूं नये. कारण प्रसंग व परिस्थिति हीं सर्वस्वीं मनुष्य-निर्मित असतात असें ठाम विधान कधीं कोणीही शहाणा करणार नाहीं. अर्थात् निरनिराळीं चरित्रें वाचल्यानंतर आपल्या मनावर निरनिराळ्या तऱ्हेचे परिणाम होणें अपरिहार्य आहे. कोणास **पन्नादाई** जास्त आवडेल तर कोणास **हीराताई** जास्त आवडेल.

मानवी स्वभावाचीं किरणें त्या त्या प्रसंगाच्या कांचेंतून बाहेर पडल्यानंतर रंगी बेरंगी होतात. मूलतः तीं एकाच रंगाचीं असतात. पण परिस्थितीच्या भिन्न भिन्न कांचेतून तीं भिन्न भिन्न दिसतात इतकेंच. अर्थात् इतिहास हा भूतकालीन परिस्थितींचा आदर्श असल्यानें त्यांतील व्यक्तींचे पराक्रम दृश्य फलावरूनच लहानमोठे ठरतात. म्हणूनच तत्त्वदृष्टीनें जें एक तेंच व्यवहारदृष्टीनें नानात्मक होतें. एवढें लक्षांत ठेवून आतां आपण स्त्रीस्वभावाच्या, परिस्थितीच्या लोलकांतून पडलेल्या नानारंगी इंद्रधनुष्याचें अवलोकन करूं. असें करतांना कधीं विद्वत्तेचे धवल किरण, कधीं शूरत्वाचे रक्त किरण, कधीं मुत्सद्दीपणाचे बदलते रंग, तर कधीं साधुत्वाचा प्रशांत प्रकाश आपल्याला पहावयास सांपडेल.

एकंदरींत या संकीर्ण प्रकरणामध्यें आपण स्त्रियांनीं प्रत्येक कर्मक्षेत्रावर काय काय कर्तबगारी केली हें पहाणार आहों.

## ( १ ) कांहीं विखुरलेलीं स्त्रीरत्नें.

वरील तत्त्वदृष्टी लक्षांत ठेवून आपण प्रथम कांहीं स्त्रियांच्या चरित्रांतील अत्यंत अद्भुत प्रसंग पाहूं. असें करतांना आपणास कधीं खवळ-

लेल्या दर्यावर, तर कधीं तुमुल रणकंदनांत जावें लागेल. कधीं हातांत शस्त्र घेऊन रणांगणांत उतरलेली अबला पाहूं तर कधीं बुडत्यास वांचविण्याकरितां आपली होडी समुद्रामध्यें ढकलून भराभर वल्हीं मारीत असलेली एखादी तरुणी पाहूं. बरें असो.

## मिसेस रेडसन.

चला आपण पहिल्यानें फ्रान्स देशामधील कॉडिझ शहराचा वेढा पाहण्यास जाऊं. १८१२ सालीं फ्रेंच शिपायांनीं याच शहरास वेढा देऊन रस्त्यावर, घरीदारीं, शहराच्या कोन्याकोपऱ्यांत सुद्धां प्रेतांचे ढीग पाडले. या वेढ्यांच्या दंगलींत एका स्त्रीनें एक अद्भुत पराक्रम केला. **मार्टागार्डा** नांवाच्या लहान किल्ल्यामध्यें कांहीं इंग्लिश व स्पॅनिश शिपाई बचाव धरून होते. पण फ्रेंचांच्या प्रचंड तोफांनीं त्यांवर भडिमार केल्यानें, त्या छोटेखानी किल्ल्याची तटबंदी ढांसळली. तरी आंतील धैर्यशाली शिपाई धैर्यानें सारखें लढतच होते. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं एक धैर्यवान् बाई जखमी शिपायांची शुश्रूषा करण्यांत चूर झाली होती. हिचें नांव **मिसेस रेडसन**. ही एका डॉक्टरची बायको होती. एका जखमी शिपायांस फार तहान लागली म्हणून तिनें जवळच असलेल्या एका मुलास पाणी आणण्यास सांगितलें. गोळ्यांचा सारखा वर्षाव चाललेला होता. विहीर जरा बाजूला असल्यानें पाणी आणणें फार धोक्याचें होतें. साहजिकच तो मुलगा कचरला. हें तिच्या लक्षांत येतांच तिनें भांडें घेऊन विहिरीकडे धांव मारली. पाणी वर आणते तोंच एक गोळी नेमकी हातांतील दोरीवर पडली. पण ती डगमगली नाहीं. तशीच धांवत धांवत पाणी घेऊन ती रोग्याकडे गेली. गोष्ट साधीच पण त्यामध्यें तिचें प्रसंगावधान, धैर्य व दयाळुत्व इत्यादि गुण प्रकट झाले. अशा रीतीचें प्रसंगावधान इतिहासांत फार विरळा सांपडतें. केवळ कंटाळवाण्या ऐतिहासिक

हकीकतीमुळें मन त्रासलें कीं, अशा तऱ्हेच्या चटकदार गोष्टीनें तें उल्हसित होतें.

## ग्रेस व्हरनॉन रसेल

याच बाईची गोष्ट घ्याना! एकदां 'पर्थच्या' किनाऱ्यावरून एका बोटींतून कांहीं बायका मुलें निघालीं, पण कांहीं अंतरावर जातात तोंच वादळ सुरू झालें, समुद्राच्या लाटा उचंबळूं लागून बोट हेलकावे खाऊं लागली. आतां या संकटांतून पार पडणें अशक्य, अशी बोटींतील माणसांची खातरी झाली. जिवंत माणसाच्या डोळ्यापुढें मूर्तिमंत मृत्यु नृत्य करूं लागला कीं त्याची स्थिति काय बरें होईल? कोणी त्या बुडत्या बोटीसच लोंबकळत होते. कोणी रुदन करीत होते. असा हा करुण देखावा समुद्रालगतच्या एका टेंकडीवरील एका तरुणीनें पाहिला. ती घोड्यावर बसली होती. 'अरेरे या बायका मुलांचे प्राण आतां कसे वांचणार' इतकें मनाशीं बोलते आहे तोंच तिनें घोड्यास टांच मारली व त्या टेंकडीवरून ती ताबडतोब खालीं आली. काय बाईचें धैर्य पहा! तिला पोहावयास येत नव्हतें, म्हणून तिनें घोड्यासच समुद्रांत लोटून त्या बुडत्या माणसास आधार देऊन बेताबातानें त्यांस किनाऱ्यावर आणून सोडलें. किनाऱ्यावर येते न येते तोंच तिनें पुन्हां एक मनुष्य बुडत असलेला पाहिला, व पुन्हां घोडा समुद्रांत फेकून त्यास तिनें वांचविलें. अशा रीतानें चार तासांत ती पन्नास लोकांस किनाऱ्यावर घेऊन आली. हें काम तिनें उत्साहानें केलें खरें पण ती फार दमली. तिचें गांव तेथून बारा मैलांवर होतें. कशी बशी ती आपल्या गांवीं पोहोंचली, व आपल्या बहिणीस त्यांच्या मदतीकरितां तिनें पाठवून दिलें. चहा, दूध, साखर व पीठ अशी सामुग्री घेऊन तिची बहीण किनाऱ्यावर आली. भुकेलेल्यांस खावयास देऊन, नंतर ती त्या सर्वांस आपल्या घरीं घेऊन गेली. मंडळी पूर्ण बरी होईतों तेथेंच होती. अशा रीतीनें परहिताकरितां तळमळणाऱ्या या दोन बहिणींची स्तुति करावी तेवढी थोडीच. भिक्षे-

करी दारांत आल्यास 'पुढच्या घरीं जा' असें उर्मटपणें सांगणारे महात्मे आपण व्यवहारांत हरघडी पाहतों. पण पन्नास लोकांस धैर्यानें समुद्रांतून वांचविणें, त्यांस औषधोपचाराकरितां घरीं नेणें, व बरें होईतों त्यांस आश्रय देणें हें काम सामान्य मनुष्याचें खातरीनें नव्हे. भाराभर द्रव्य मिळत असतांना त्यांतील अंशही, परोपकारार्थ खर्च करण्यास मनुष्य कचरतो हा कित्येकांचा अहर्निश अनुभव आहे. अशा सामन्यांतील सामान्य माणसांनीं या दोन देवतांचीं चरित्रें रोज पठण करावींत म्हणजे त्यांस कधींना कधीं तरी परोपकाराची बुद्धि होईल.

## हेलन पेट्री.

शेटलंडांतील ' अन्स्ट ' नांवाच्या बंदरावरील कांहीं जहाजें समुद्रावर फिरत होतीं. इतक्यांत मोठें वादळ सुरू झालें. एका खेरीज सर्व जहाजें वादळांतून कशींबशीं सुटून आलीं. वादळ अद्यापि तसेंच जोरानें सुरू होतें. तें जहाज हेलकावे खातां खातां एकदम पालथें झालें व त्यांतील खलाशी जीव वांचविण्याकरितां धडपडूं लागले. हा सर्व देखावा किनाऱ्यावरील लोक स्वस्थपणें पहात उभे होते. आपला जीव धोक्यांत घालून त्यांस वांचविण्याचा प्रयत्न करण्यास कोणीही धजेना. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं पेट्री नांवाच्या एका धैर्यशाली स्त्रीरत्नानें आपल्या तेजानें सर्वांस खालीं मान घालण्यास लाविलें. तिनें एक लहानशी नाव घेतली व आपल्या थोड्या बापास मदतीस घेऊन ती वल्हे मारीत जाऊं लागली. दोन खलाशी आधींच बुडून मेले. दोन अजून जिवांत जीव धरून होते. त्यांस वांचविण्याकरितां पेट्रीची नाव आली न आली तोंच त्यांतील एक खलाशी लाटेसरसा जाणार तोंच पेट्रीनें त्याच्या केंसास धरून ओढलें. अशा रीतीनें तिनें मोठ्या प्रयासानें हे दोन बुडते जीव वांचविले. किनाऱ्यावर इतकीं माणसें उभीं असतां पेट्रीसारखें एकही त्यांत निघूं नये ही गोष्ट खरोखरच आश्चर्याची होय. घरगुती काम करण्यांतच जिचा जन्म गेला अशा बाईनें हें धाडसाचें काम केलें

हें कोणास खरेंही वाटणार नाहीं; म्हणूनच मानवी स्वभावांत अनेक गुण सुप्त असतात असें आम्हीं वर म्हटलें आहे.

## ग्रेस डारलिंग.

लॉंगस्टोन लाइट हौस येथील शूर स्त्री **ग्रेस डारलिंग** हिनेंही असेंच एक धाडसाचें काम केलें. **फर्नबेटें** हीं खडकाळ असून समुद्राच्या लाटा त्याभोंवतीं सदैव क्रीडा करीत असतात. त्यापासून बरेच मैल लांबीवर एक दीपस्तंभ उभा आहे. या दीपस्तंभावर दोन वृद्धमाणसें, दोन स्त्रीपुरुष व एक तरुणी अशीं पांच माणसें रक्षक म्हणून नेमलीं होतीं. सन १८३८ सप्टेंबरच्या एका भयाण रात्रीं एक जहाज 'हल' नांवाच्या बंदरावरून निघालें. हें जहाज जुनें व मोडकळीस आलेलें असें होतें. त्यांतील आगीचे बंब नादुरुस्त असल्यानें त्यांतील अग्नि विझून गेला. कसें तरी रडतखडत तें 'ॲबीजहेड' जवळ आलें. पण समुद्रावर वादळ असल्यानें तें पुन्हां मागें लोटलें गेलें. रात्रभर समुद्राच्या डोंगरलाटांनीं तें लहान जहाज इकडे तिकडे फेंकलें जाई. अशा दैन्यवाण्या स्थितींत असतांना 'हॉकर्स' नांवाच्या खडकावर तें आदळलें व त्याचे दोन तुकडे झाले. अशांतूनही एका सुरक्षित मार्गानें नऊ खलाशीं एका लहान नांवेंत बसून किनाऱ्यावर आले; पण कित्येक उतारू धक्का बसल्यानें समुद्रांत बुडाले. आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या जहाजाचा पुढील भाग खडकांतच घुसून राहिल्यानें नऊ खलाशी त्यास लोंबकळत असलेले दृष्टीस पडले. ते मदतीकरितां ओरडत होते. त्यांचीं करुणरुदनें **ग्रेस डारलिंग** हिला ऐकूं आलीं. तुफान जोरानें चाललें होतें. वारा तसाच सोसाट्याचा होता. दाट धुक्यानें कोणास कोणी दिसेना. **डारलिंगला** त्यांचें रडणें ऐकून कळवळा आला व तिनें आपल्या बापास ही गोष्ट कळविली. "बाळे, त्यांस वांचविण्यास जाणें म्हणजे मृत्यूच्या जबड्यांत आपण होऊन जाणें आहे" असें त्यानें सांगितलें. पण तिनें हट्टच धरिला म्हणून त्यानें एक लहानशी नाव तातडतोब सज्ज केली. वादळ तर कमी होईना. अशा वादळांत जाणें म्हणजे आपल्या जिवाची

आशा सोडणें हें स्पष्ट दिसत होतें. तरी पण त्या संकटांत त्या दोघांनीं उडी घातली. डार्लिंगच्या हातांत परमेश्वरानें त्या वेळीं जोरानें वल्हें मारण्यास सामर्थ्य दिलें. निरानिराळ्या खडकांमधून नाव सावधागिरीनें वल्हवीत ती तरुण स्त्री त्या करुण देखाव्याजवळ आली. अशा वेळीं आपल्या रक्षणार्थ ही तरुणस्त्री धांवून आलेली पाहून त्या खलाशांस किती आनंद झाला असेल बरें ? खरोखरीच परमेश्वरानें आपल्या रक्षणार्थ सागरकन्याच पाठविली असा क्षणभर त्यांस भास झाला असल्यास नवल नाहीं. या नऊ खलाशांस घरीं घेऊन आल्यावर डार्लिंगच्या आईनें त्यांची शुश्रूषा केली. ही गोष्ट लवकरच सर्व इंग्लंडभर पसरली व तिजवर देणग्यांचा भडिमार झाला. तिचें चित्र काढून घेण्याकरितां तिच्या घरीं चित्रकार येऊं लागले. वर्डस्वर्थनें तिजवर एक कविता लिहिली व तिची कीर्ति सर्व देशभर दुमदुमून राहिली.

## स्त्रियांनीं संघरूपानें अशीच कामगिरी केली.

१६२२ सालीं ऑस्ट्रियाच्या बादशहानें स्वित्झरलंडवर स्वारी केली. प्रॅटीगच्या दरीमध्यें सैन्य येऊन ठेपलें. ही दरी चोहोंकडून पर्वतांनीं झांकलेली आहे. तेथील पुरुष नित्याप्रमाणें आपले जनावरांचे कळप घेऊन टेकड्यांवर राखण करीत होते. स्त्रिया घरांत काम करीत होत्या. ऑस्ट्रियन सैन्य चाल करीत आलेसें पाहून आपल्या नवऱ्यांचीं शस्त्रें घेऊन त्या घराबाहेर पडल्या. स्वित्झरलंडमध्यें अशा कांहीं दऱ्या आहेत कीं थोडे लोकसुद्धां त्यांच्या तोंडाशीं हजारों लोकांस थोपवून धरूं शकतात. अशा दरीच्या तोंडाशीं उभें राहून त्यांनीं नुसता दगडांचा वर्षाव करूनच ऑस्ट्रियनांस मागें परतविलें.

रोमच्या राज्यपदाविषयीं ज्यावेळीं तंटे चालले होते त्यावेळीं स्त्रियांनीं अशाच तऱ्हेची उत्कृष्ट कामगिरी बजावली. राज्यपदाबद्दल सेनेट व लोक यांमध्यें हा तंटा होता. सेनेटनें एकास राज्यपद देण्याचें ठरविलें, व लोकांच्या मनांत दुसऱ्यासच राज्यपद देण्याचें होतें. अखेर सेनेटला

माघार घ्यावी लागली व त्यांनीं लोकनायकासच राजा केलें. पण सेनेटनें प्रथम राज्यपद दिलेल्या सरदारानें युद्ध करायाचें ठरविलें व रोमवर स्वारी करण्याचाही बेत केला. पण सेनेटचा सूड उगविण्यापूर्वीच 'अॅकीलिया' येथेंच त्याला लोकांनीं आडविलें; युक्तिप्रयुक्तीनें, लांचेनें, धमकीनें कांहीं होत नाहीं असें पाहून त्यानें शहर उध्वस्त करण्याचें ठरविलें. लोकांस अत्यंत चेव आला व त्यांनींही आमरण लढण्याचें ठरविलें. तुमुल युद्ध चाललें असतां अगदीं आणीबाणीवर येऊन ठेपलें. तोफांच्या दोऱ्या जुन्या असल्यानें तुटूं लागल्या. इतक्यांत नव्या राजाच्या बायकोस एक उत्तम युक्ति सुचली. तिनें आपले केंस तोफेस बांधावयास सांगितलें. इतर स्त्रियांनींही तसेंच केलें. युद्ध संपल्यानंतर सेनेटनें या शौर्याच्या स्मरणार्थ एक देवालय बांधिलें. मनुष्याच्या अंगीं प्रसंगावधान हा गुण असल्यास त्याचा फार उपयोग होतो. व्यवहारांत तर त्याचा हरघडी उपयोग आहे. या एकाच गुणानें जगांतील कित्येक महात्म्यांनीं अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली आहे. इतकेंच नव्हे पण जगाचा इतिहास आज जो मनोरंजक दिसत आहे, तो कदाचित् ह्या गुणाव्यतिरिक्त दिसलाही नसता. कारण इतिहासांत व्यक्तींच्या, समाजाच्या अगर राष्ट्राच्या जिवावर बेतलें असतांना या गुणांचें फारच चीज झालेलें अनेक ठिकाणीं आढळतें. विशिष्ट तऱ्हेचा प्रसंग पाहून मनुष्यास स्फूर्ति होते व त्या हृदयस्फूर्तींचा परिणाम एकाद्या अलौकिक पराक्रमांत दिसून येतो.

## जोन ऑफ ऑर्क

याच प्रकारचें प्रत्यक्ष उदाहरण म्हटलें म्हणजे जोन ऑफ ऑर्कचें होय. इंग्लंड व फ्रान्समध्यें रणें माजलीं होतीं. अशा वेळीं ह्या साध्या, सुशील आणि धार्मिक तरुणीला फ्रान्सला मदत करण्याची स्फूर्ती झाली. ती स्वभावाची अत्यंत कोमल व भावनेची अत्यंत उज्ज्वल असल्याकारणानें स्फुर्ति झाल्याबरोबर ती भावी कालच्या गोड गोड स्वप्नांत निमग्न होत असे. पहिल्यानें तिला खूळ तर लागलें नाहींना, असें प्रत्येकजण म्हणूं

लागला. पण तिच्या भावनेची प्रामाणिकता लक्षांत घेऊन तिच्या हाताखालीं थोडेंसें सैन्य देऊन तिला रणांगणावर पाठविण्याचें फ्रेंच कॅप्टन बॉड्रीवर्ट यानें वचन दिलें. हें तिला कळतांच दीडशें मैलांचा समुद्र ओलांडून ती महत् प्रयासानें फ्रान्सच्या रणभूमीवर दाखल झाली. तेथें पाहते तों इंग्लिशांची जिकडे तिकडे सरशी होत चालली होती. फ्रेंचांनीं स्वातंत्र्यास्तव लढाईची शिकस्त केली. पण अखेरीस त्यांना देवाची करुणा भाकल्याशिवाय गत्यंतरच राहिलें नाहीं. पारीस तर हातचें गेलें, ऑरलेन्सलाही वेढा पडला. इतक्यांत हिची मदत आल्यानें फ्रेंच सैन्यास जरासा धीर आला. अर्ल ऑफ सॅलीसबरी युद्धामध्यें पडल्यानें इंग्लिश लोकही लढाईला कंटाळले होते. अशा वेळीं जोन ऑफ आर्क हिनें इंग्लिश लोकांस आपल्या अतुल पराक्रमानें मागें हटविलें व सातवा चार्लस यास राज्याभिषेक करविला. तिच्या मनांत होतें तें झालें. आतां आपल्या आईबापांस भेटण्याची तिला इच्छा झाली. आपलें लहानपण, घरांतील शेळ्या व गाई, यांची तिला आठवण होऊं लागली; पण फ्रान्सच्या राजानें तिला सोडिलें नाहीं. तिनें आपल्या लष्करांतच असावें अशी त्याची मनीषा होती. यामुळें तिचा उत्साह कमी झाला व पुढील लढायांत तिला जय मिळाला नाहीं. एका लढाईत तर बरगंडीच्या सैन्यांनीं तिला धरून कैद केलें व इंग्लिशांकडे पाठविलें. त्यांनीं तिला **रुअँग** येथील इन्क्विझिशनच्या कोर्टांत पाठविलें. त्या ठिकाणीं तिला चेटकी ठरविण्यांत आलें. नंतर **सोरबोन** नांवाच्या कोर्टाकडे फिर्याद करण्यांत आली. पण तेथेंही ती सैतानाच्या राज्यांतील चेटकी आहे असें ठरविण्यांत आलें. जो चार्लस राजा या तरुण स्त्रीच्या शौर्यानें तक्तारूढ झाला, जिनें स्वयंस्फूर्तीनें फ्रेंचांसारख्या परदेशस्थ बांधवांच्या स्वातंत्र्याखातर येवढा अट्टाहास केला, त्या राजानें अगर जनतेनेंही तिजकरितां सहानुभूतीचा एकही शब्द न काढितां निर्लज्जपणें मूकवृत्ति स्वीकारिली. ह्यापेक्षां कृतघ्नतेचें उदाहरण जगाच्या इतिहासांत

कोणतें सांपडणार ? अशा तऱ्हेनें फ्रान्ससारख्या स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रानें या शूर, सात्विक, व धार्मिक अबलेची नीचपणें फसवणूक करावी हें आश्चर्य नव्हे काय ? बिचारीला कोर्टानें जिवंतपणें जाळण्याची शिक्षा दिली व हें कृत्य धर्माच्या नांवाखालीं करण्यांत आलें. नशीब त्या अबलेचें कीं, जीं धर्मतत्त्वें तिनें आपल्या उराशीं बांधिलीं होतीं, ज्या न्यायाकरितां ती अहर्निश तळमळत होती, त्याच्याच नांवावर तिचें पवित्र शरीर पेटविण्यांत आलें. फ्रान्सनें तिला जाळलें असें म्हणण्यापेक्षां सर्व धर्म आणि नीतीच्या तत्त्वांना त्यानें उघडपणें आग लाविली असें म्हणणें जास्त सयुक्तिक होईल. कोणी देशाकरितां मरतो तर कोणी धर्माकरितां मरतो, तर कोणास केवळ निरपराधी म्हणूनच जाळण्यांत येतें. सुदैवाची गोष्ट ही कीं, फ्रान्सची तरुण पिढी या साध्वीस विसरली नाहीं. तिच्या स्मरणार्थ जिकडे तिकडे स्मारकें व पुतळे उभारण्यांत आले. फ्रेंच शिपायांस पिढ्यानुपिढ्या ही आदरार्ह व पूजार्ह झाली. अजूनही फ्रेंच शिपायांच्या फौजा तिच्या पुतळ्याजवळून जातांना त्यास लष्करी मुजरा करितात हें पाहून सहृदय माणसास एक प्रकारचें समाधान वाटल्याशिवाय रहात नाहीं.

## मेरी वुलस्टोन क्रॅफ्ट गॉडविन.

हिचेंही उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पोर्तुगालहून परत येतांना एक फ्रेंच जहाज भर समुद्रांत शिडें तुटून जर्जर होऊन बुडण्याच्या बेतांत असलेलें तिनें पाहिलें. या बुडत्या जहाजावरील फ्रेंच अधिकाऱ्यांनीं इंग्लिश जहाजाच्या कप्तानांस ‘ आम्हांला आपला आश्रय मिळेल का ?’ अशी विनंति केली. परंतु इंग्लिश कप्तानानें ती ऐकिली नाहीं. कांहीं लोक, मग परराष्ट्रीय असले म्हणून काय झालें, आपल्या डोळ्यांदेखत समुद्रांत बुडत आहेत हें पाहून कोणत्या सहृदय माणसास दया येणार नाहीं ? विशेषतः त्यांना वांचाविणें सहज शक्य असल्यावर कोणता मनुष्य मागें घेईल ? पण इंग्लिश कप्तानास त्यांची दया आली नाहीं.

अशा आणीबाणीच्या वेळीं मेरी पुढें आली व तिनें कप्तानास "तुम्हीं या बुडत्या लोकांस वांचविलें नाहीं तर साऱ्या इंग्लंडभर तुमच्या निर्दय वर्तनाचा डंका पिटवून तुमची नाचक्की करीन हें पक्कें लक्षांत ठेवा" असें सांगितलें. क्वचित् आर्जव, क्वचित् विनंति व क्वचित् धमकी देऊन तिनें त्याचें मन वळविलें व पुष्कळ लोकांचा जीव वांचविला. फ्रेंच लोकांच्या स्वातंत्र्याखातर जोन ऑफ आर्कला स्फूर्ति झाली व आणीबाणीच्या प्रसंगीं तिनें त्यांस मदत केली. जहाज फुटून सर्वजण तळ गाठणार तोंच मेरीला दया येऊन तिनें त्यांस वांचविलें हीं दोन उदाहरणें एकादा इंग्लिश मनुष्य आपल्या स्त्रियांच्या उदात्ततेचीं म्हणून जगापुढें अभिमानानें सांगूं लागला तर त्यांत नवल तें काय?

## कांहीं शूर राण्या—

स्त्री व युद्ध हा शब्दप्रयोग कित्येकांस जरा विसंगत वाटण्याचा संभव आहे, पण तसा तो वाटण्याचें बिलकूल कारण नाहीं. कारण स्त्रियांनीं समरांगणावर वीरालाही लाजविण्यासारखे पराक्रम प्रत्यक्ष गाजविले आहेत. आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत तर अशा शूर स्त्रिया कित्येक होऊन गेल्या आहेत.

## वीरपत्नी ताराबाई.

हिला लहानपणींच तिच्या बापानें युद्धास लागणारें सर्व शिक्षण उत्तमप्रकारें देवविलें होतें. आपलें राज्य अफगाणापासून परत मिळण्यासाठीं ही पाठीवर भाता व कमरेस तरवार अशा शिपाईवेषानें लढाईस निघाली. पृथ्वीराजाच्या शौर्यास व धैर्यास भुलूनच ताराबाईनें त्यास वरिलें होतें. टंक थोदा शहरावर हल्ला करण्याचे वेळीं तिनें पतीसह युद्धावर मोठें शौर्य गाजविलें. मोहरमच्या गर्दीतून बेधडक घुसून अफगाण सरदाराच्या उरांत हिनें एक बाण मारला; तो त्याच्या छातींतून आरपार उतरला. इच्छित हेतु साधल्यावर किल्ल्यावर परत जाते वेळीं, हत्तीचा पहारा असलेला तिला दिसला. राणीनें तरवारीच्या घावानें

हत्तीची सोंड उतरली. राणीच्या या पराक्रमामुळेंच तिला व राजास आपल्या सैन्यास जाऊन मिळता आलें. पुन्हां मोठा संग्राम होऊन राणीनें कमालीचें शौर्य दाखविलें. पुढें कांहीं दिवसांनीं तिनें आपल्या चुलत्याशींही लढाई केली. कालवशात् पृथ्वीराजास विषप्रयोग होऊन तो मरण पावला, व ताराबाईनें आपल्या निस्सीम प्रेमास व शौर्यास साजेल अशा तऱ्हेचें दिव्य केलें.

## गनोरची राणी.

गनोरच्या रजपूत राणीनें पठाणांच्या सैन्याला किती दिवस तरी तोंड दिलें, पण अखेर तिला तहाचें बोलणें सुरू करणें भाग पडलें. खानसाहेब तिच्या सौंदर्यामुळें भुलले असल्यानें त्यांनीं बेशरमपणें एकदम तिला महाराणी होण्याविषयीं विनंति केली. राणीनें या अपमानाचा सूड उगविण्याकरितां त्यास वरपांगी अनुमति दिली, व विषाच्या रंगानें रंगविलेला पोषाख त्यास अर्पण करून त्याला मारून टाकलें, व आपण नर्मदेमध्यें उडी घेतली. पठाण लोक चवताळून गेल्यानें इतर स्त्रियांच्या अंगावर त्यांनीं चाल केली. पण स्त्रियांच्या हातांत दिवट्या असल्यानें पठाण लोक आपली अब्रू घेणार या भीतीनें त्यांनीं जवळचीं दारूचीं पोतीं पेटवून दिलीं. या दारूच्या स्फोटानें कित्येक स्त्रिया व पठाणही जळून खाक झाले.

## राणी दुर्गावती.

राणी दुर्गावतीचीही गोष्ट अशीच आहे. हिनें ५०० हत्ती व ७०० घोडेस्वार घेऊन अकबराचा सरदार असफखान याशीं निकराची लढाई केली. लढाईमध्यें तिचा मुलगा ठार झाला. तरी तिनें माघार खाल्ली नाहीं. 'ठीक आहे कुमारास तंबूंत न्या. मी मात्र येथून हलावयाची नाहीं.' असें तिनें सांगितलें. खरोखर अर्जुनासही आणीबाणीच्या प्रसंगीं व्यामोह झाला. पण स्त्रीचें हृदय असूनही तें किंचितूही डगमगलें नाहीं. पुढें शत्रूचा बाण लागून ती मूर्च्छित पडली.

सावध झाल्यावर तिला आपण शत्रूच्या हातीं सांपडणार अशी खातरी वाटल्यानें जवळच्या सरदारास, तिनें आपल्या पोटांत बर्ची मारण्यास सांगितलें. त्यानें तें केलें नाहीं. तेव्हां तिनें आत्महत्या करून घेतली. सरदारांनीं तिच्या प्रेतासही शत्रूंच्या हातीं लागू दिलें नाहीं.

## राणी कुंवरसाहेब.

पतियाळा संस्थानची शीखराणी कुंवरसाहेब ही शूर, धाडसी व स्वातंत्र्यप्रिय होती. राज्यव्यवस्था व सेनापतित्व हीं दोन्हीं कामें तिनें चोख केलीं. आपला पति संकटांत आहे असें कळल्याबरोबर सैन्यानिशीं फत्तेगडावर स्वारी करून मोठ्या पराक्रमानें तिनें त्याची सुटका केली. पुढें इ. स. १७९४ मध्यें मराठे लोकांनीं शिखांकडून खंडणी वसूल करण्याचें ठरविलें. राणीनें खंडणी देण्याचें नाकारलें. सैन्याची तयारी करून ती लढाईला सज्ज झाली. इतर सरदारांसही स्फूर्ति येऊन ते तिला मदत करण्यांस धावले. ‘ तुम्ही वाटेल तें करा पण खंडणी मिळणार नाहीं.’ असें तिनें निक्षून सांगितलें. नंतर युद्ध सुरूं झालें. शीख लोकांचा पराजय होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं व कांहीं लोक युद्ध सोडून जाऊं लागले. राणी रथांतून खालीं उतरली व हातांत तरवार घेऊन ती सर्व लोकांस म्हणाली, ‘ बायकांसारखें पळतां काय? जातीचे पुरुष असाल तर मागें फिरा ’ हें ऐकतांच लाज वाटून लोक परतले. मराठ्यांवर रात्रीं छापा घालून तिनें त्यांचें बरेंच नुकसान केलें. मराठ्यांना या तरुण राणीचें फार आश्चर्य वाटलें. व त्यांनीं तिचा नाद सोडून दिला. राज्यव्यवस्था व सैन्यव्यवस्था उत्तम राखून तिनें पुष्कळ दिवस सुखांत घालविले.

## राणी चंद्रावती.

प्रसिद्ध रणजितसिंह याची बायको चंद्रावती ही फारच धाडसी, बुद्धिमान् व शूर होती. हिनें पतिनिधनानंतर जे जे बखेडे माजले होते ते सर्व आपल्या हुशारीनें मोडले व पुढें सरहद्दीबद्दल इंग्लिशांशीं मोठ्या

निकराचें युद्ध केलें पण पुढें इंग्रजांच्या अधिक सैन्यबलामुळें तिला तह करावा लागला. पुढें पुष्कळ कुलंगडीं उपस्थित होऊन तिला कैद करण्यांत आलें. तेथें ती आजारी पडली, हें तिच्या लोकांस कळतांच त्यांनीं बंड उभारलें. इंग्रजांनीं तें मोडून राज्य खालसा केलें. पुढे तिला वायु झाला व त्यांतच ती 'वीरहो युद्ध करा. शीख राष्ट्राचें संरक्षण करा,' असें बरळत असे. याच झटक्यामध्यें पुढें ती मरण पावली. आजारी असतांही देशाच्या स्वातंत्र्याखातर तळमळणारी चंद्रावतीसारखी राणी खरोखरच दुर्मिळ होय.

## राणी राजबाई.

गुजराथेंतील वढवाण संस्थानची राणी राजबाई हिनें आपलीं राज्यसूत्रें सुनबाईच्या हातीं देऊन आपण म्हातारपणापर्यंत तीर्थयात्रा केली. म्हातारपणीं परत आल्यावर मत्सरानें सुनबाईनें तिला गांवांत येऊं दिलें नाहीं. या रागानें त्या म्हातारीनें अत्यंत परिश्रमानें सैन्य जमवून युद्ध केलें, व आपलें राज्य पुन्हां परत मिळविलें.

## राणी लक्ष्मीबाई.

झांशीची राणी लक्ष्मीबाई इची गोष्ट तर सुप्रसिद्धच आहे. पतिनिधनानंतर मोठ्या धैर्यानें कित्येक अंतस्थ शत्रूशीं तिनें लढाया केल्या. इंग्रजांनीं राज्य बेवारसा ठरवून खालसा केलें, व राणीस ६०००० ची नेमणूक करून दिली. राज्यनाशाबद्दल राणीस अत्यंत दुःख झालें. पुढें तर तिच्या राज्यांतच गोवध सुरू झाला. इकडे शिपायांचें बंड सुरू झालें. ही संधि साधून लक्ष्मीबाईनेंही सैन्य जमा केलें व राणीसारखीच ती वागुं लागली. इंग्रजांनीं तिच्या सैन्याचा बीमोड केला. पण तिनें त्यांच्याशीं पुष्कळ दिवस टक्कर दिली. तेथून ती काल्पी येथें गेली, तेथेंही इंग्रजांनीं धुमाकूळ उडाविला. अखेर ग्वाल्हेर येथें भयंकर निकराची लढाई झाली. त्या लढाईत लक्ष्मीबाईनें बरीच कत्तल केली; पण इंग्रजांच्या सैन्यबला-

मुळें बंडवाल्यांचें कांहींही चाललें नाहीं. या युद्धांत लक्ष्मीबाई अत्यंत पराक्रम गाजवून समरांगणावर पडली.

## प्रशियाची राणी लुइझा.

प्रशियाची राणी लुइझा अशाच तऱ्हेची मानी व करारी राणी होती. नेपोलियनच्या अपमानास्पद अटी ऐकून तिला फारच संताप आला. आपल्या दोन मुलांस जवळ बोलावून तिनें " बाळांनों, तुम्ही अद्यापि लहान आहां, पण माझ्या गळ्याची तुम्हांस शपथ आहे कीं, तुम्ही या अपमानाबद्दल केव्हांना केव्हां तरी फ्रान्सचा सूड उगविलाच पाहिजे." धाकटा मुलगा वुइल्यम हा पुढें जर्मनीचा बादशहा झाला. १८७० च्या लढाईंत त्यानें फ्रान्सचा पुरता सूड उगवून घेतला. नेपोलियननें बर्लिन शहर घेतलें, त्या प्रसंगीं त्यानें लुइझाच्या पातिव्रत्यावर खोटेनाटे आरोप केले; याचा प्रशियन लोकांस संताप आला. आपली राणी अत्यंत शूर अशी साध्वी असून तिजवर असले आरोप केलेले त्यांस ऐकवले नाहींत; पण अटी कबूल करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. अटी सौम्य करण्याकरितां तिनें बरेच प्रयत्न केले, पण कांहीं एक उपयोग झाला नाहीं. तिचा देशाभिमान, व लोकप्रियता, असाधारण होती. आपल्या अदबीच्या व सभ्यपणाच्या वागणुकीनें तिनें नेपोलियनास थक्क केलें. पुढें वुइल्यमनें लिपजिकच्या जयानंतर आपली आई लुइझा हिच्या थडग्याचें दर्शन घेतलें व त्यास विजय-माला घातली. खरोखर आपल्या पुत्राचा पराक्रम पाहून तिच्या आत्म्यास संतोष झाला असेल. दुसरा वुइल्यम् हाही फ्रान्सवर स्वारी करण्याचे वेळीं आधीं हिच्या कबरीसमोर भाविकपणें प्रार्थना करून नंतरच लढाईवर निघाला. अद्यापिही तिची तसबीर नाहीं असें घर जर्मनीमध्यें सांपडणार नाहीं.

## सेव्हरिना.

रोमच्या इतिहासांतही अशा शूर राण्या सांपडतात. सेव्हरिना ही राणी आपल्या पतीबरोबर सर्व स्वाऱ्यांवर जात असे. तिनें शिपाई लोकां-

वर फारच उपकार केले. अत्यंत शेवटच्या दर्जाचा शिपाईही तिजशीं बोलण्यास लाजत नसे. सैन्याबरोबर सर्व तऱ्हेचीं संकटें तिनें सोसलीं. तिचें आपल्या सैन्यावर फार वजन असे. कटाच्या कल्पनेपासून आपल्या सैन्यास ती चातुर्यानें परावृत्त करीत असे.

## नॅब्रिया.

ही राणीही आपल्या पतीबरोबर युद्धांत जात असे. इराणच्या स्वारी-मध्यें बराच त्रास तिनें सहन केला. तिच्या औदार्यानें रोमन शिपायांमध्यें ती फारच विख्यात झाली होती. ते तिला 'सैन्यमाता' असें म्हणत.

प्रत्येक देशाच्या इतिहासामध्यें ज्या ज्या ठिकाणीं शूर स्त्रियांनीं आपल्या स्फूर्तीनें लोकाखातर, स्वाभिमानाखातर व देशाखातर लढाई केली त्या त्या ठिकाणीं इतिहासांचीं पानें मोठ्या अक्षरांतच लिहिलीं गेलीं. ऐतिहासिक वाङ्मयात मौज तर हीच आहे कीं तें वाचीत असतां अशा विभूतींचीं चरित्रें व पराक्रम इतस्ततः विखुरले असल्यानें त्या वाङ्मयास एक प्रकारचा चटकदारपणा आला आहे; व तो वाचकांच्या मनावर परिणाम घडवून आणून त्यांस स्फूर्तिदायक होतो. लक्ष्मीबाईची समशेर इतिहासाच्या पानांवर चकाकूं लागलीं कीं कित्येक पानें त्या समशेरीच्या लखलखाटानें प्रकाशमान झालेलीं दिसतात. इतिहास अशाच विभूतींनीं रमणीय होतो, व त्या त्या देशाला त्या विभूतींचा अभिमान वाटतो. अहिल्याबाई व राणी भवानी या धार्मिक व राजकारणी स्त्रियांविषयीं हिंदुस्थानवासीयांस अभिमान वाटत नाहीं काय ? अहिल्या-बाईनें राघोबादादास आपल्या मार्मिक उत्तरानें लाजवलें इतकेंच नव्हे पण त्याच्या बरोबर लढण्याकरितां एक स्त्रियांची पलटणही तिनें तयार केली. गरीबगुरिबांस जेवूं घालणें, वस्त्रें देणें, पाणपोया घालणें, क्षेत्रांमध्यें घाट, देवळें बांधणें, अन्नछत्रें उभारणें, इतकेंच काय पशुपक्षांसही धान्य व चारा वाटणें इत्यादि असामान्य दानशूरतेचीं कामें तिनें केलीं. राणी भवानीची दानशूरता आपण मागील एका प्रकरणांत पाहिलीच आहे.

अहिल्येला लिहितां वाचतां येत असे व महाभारतादि ग्रंथ वाचून ती राज्य कसें चालवावें हेंही शिकली होती. तिला अहंकाराचा लेशही नव्हता.

कोणी एका ब्राह्मणानें तिजवर एक स्तुतीपर ग्रंथ रचून तिजकडे आणला; तो तिनें नर्मदेमध्यें बुडवून टाकला व त्या ब्राह्मणास ती म्हणाली, 'माझ्यासारख्या क्षुल्लक मनुष्याची स्तुति करून तुम्ही काय मिळविलेत ? यापेक्षां परमेश्वराची स्तुति करा, मालकम साहेब तिजविषयीं म्हणतात 'ती अत्यंत धार्मिक होती. व अन्य धर्मीयांचा तिनें कधींही छळ केला नाहीं. प्रजेवर समदृष्टी ठेवूनच ती राज्यकारभार करीत असे.'

राणी भवानी ही देखील मोठी धूर्त व शहाणी होती. नबाबाच्या सैन्यानें ज्या वेळीं नटोरवर हल्ला केला त्यावेळीं हिच्याच अप्रतिम रणशौर्यामुळें शत्रूची दाणादाण झाली व पुढें बंगालमधील इतर मांडलिकांनीं नबाबास च सार्वभौमत्व द्यावें असें ठरविलें. भवानीला तें पसंत नव्हतें. तिचें मत एकाद्या हिंदू राजाला तें द्यावें असें होतें. इंग्रजांचें साहाय्य घेऊन मिरजाफरास गादीवर बसविल्यास आपणास मराठ्याची धास्ती राहणार नाहीं असें इतरांचें ह्मणणें होतें. राणी भवानी म्हणे कीं "तुम्ही आपल्याच मराठ्यांना भिऊन मिरजाफरास गादीवर बसवाल तर त्याचा परिणाम असा होईल कीं परद्वीपस्थ इंग्रज लोकच राज्य बळकावून बसतील, त्यापेक्षां मराठ्याकडे राज्य गेलेलें काय वाईट ? " पुढील राज्यक्रांतीनें हें तिचें भाकितच खरें झालें, व इंग्रजांनीं बंगाल प्रांत बळकाविला.

अशा धूर्त व मुत्सद्दी राण्या प्रत्येक देशांत झाल्या आहेत. एलिझाबेथ, व्हिक्टोरिया, स्पेनची इझाबेला, एलिझाबेथ फार्नेसी, कॅथराईन दी सेकन्ड ऑफ राशिया व मराया थेरेसा. या अशाच धूर्त व मुत्सद्दी राण्या होऊन गेल्या.

स्त्री ही जशी घरामध्यें राणी तशीच ती राष्ट्रामध्यें व विश्वामध्येंही राणीच आहे. सार्वजनिक कामें निःस्वार्थबुद्धीनें करणारी स्त्री ही राणी-

पदासच योग्य नाहीं काय ? वंशपरंपरागत आलेलें राज्यवैभव व त्यामुळें प्राप्त झालेलें राणीपद हें मनुष्य जातीची कळकळीनें सेवा करून तिची उन्नती करण्यास झटणाऱ्या स्त्रीच्या अनभिषिक्त राणीपदापेक्षां खात्रीनें कमी दर्जाचें आहे. एकीचा राजदंड सोन्याचा तर दुसरीचा प्रेमाचा, एकीचें सिंहासन रत्नाचें तर दुसरीचें जनतेच्या हृदयाचें. एकीला मान तिच्या देशांत तर दुसरीला सर्व विश्वांत. असा जरी भेद असला तरी राणी भवानीसारखी अगर राणी अहिल्येसारखी साध्वी निसर्गदत्त राणीपदही भोगून जनतेच्या हृदय–सिंहासनावरही विराजमान होते. रूमानिआची राणी मेरी, प्रसिद्ध व कर्तबगार व्हिक्टोरियाची नात, हिला एका प्रवाशानें विचारलें कीं 'आपण राणी असून अशा साध्या व गरिबी पोषाखांत कां दिवस काढतां ?' तिनें उत्तर दिलें 'हे सभ्य गृहस्था, माझीं लक्षावधी मुलें युद्धामुळें अन्नवस्त्राशिवाय उघडीं पडलीं असतां मीं रत्नहार व भरजरी पोषाख घालावे यासारखें लाजिरवाणें मला दुसरें कांहींही नाहीं. हृदयांचे नैसर्गिक कोमल विकार, स्वभावाचा चांगुलपणा, मनाची उदात्तता वगैरे अमोलिक गुण सोन्यारुप्याच्या भांडारांतून हिंडणाऱ्या माणसाच्या अंगीं नसतात असें नाहीं. ते क्वचितच–असतात हें जितकें खरें तितकेंच ते अशा ठिकाणीं असल्यानें त्यापासून जनतेचें हित द्विगुणित होतें, हेंही खरें आहे. दान देण्याला साधनें भरपूर व द्यावयाची इच्छाही अपरिमित असा मिलाफ झाला कीं काय विचारतां ? कित्येकांच्या दुःखाचे डोंगर हलके होतील व मानवजात सुखी होईल.

## साधु स्त्रिया

मागें एका प्रकरणामध्यें आपण स्त्रियांची राष्ट्रीय कामगिरी पाहिली. त्या प्रकरणांत वर्णिलेल्या सर्वच स्त्रियांना संतमालिकेमध्यें बसविण्याला मला तर कांहींच दिक्कत वाटत नाहीं.

आतां आपण स्त्रियांनीं धर्मप्रसाराच्या कामीं केवढी बहुमोल कामगिरी केली हें पाहूं. धर्मप्रसार हा जसा स्त्रियांनींच केला, त्याचप्रमाणें धर्म-

रक्षणही त्यांनींच केलें; व त्याच अद्यापि करीत आहेत. कोणताही धर्म घ्या, मग तो ख्रिस्ती असो, बौद्धधर्म असो अगर महंमदी धर्म असो. त्या त्या धर्मसंस्थापकांच्या स्त्रीभक्तांनीं धर्माचा प्रसार केलेला आढळेल. **मार्था व मेरी** या ख्रिस्ताच्या जिवलग मैत्रिणी होत्या. ख्रिस्ती धर्माचा प्रसार, प्रथम तो स्त्रियांनीं स्वीकारिला म्हणून झाला. त्यांच्याच प्रेमसामर्थ्यानें त्यांचे पतीही ख्रिस्ती होऊं लागले. फ्रांक लोकांचा राजा प्रथम ख्रिस्ती झाला, याचें कारण त्याची बायको **क्लाटिलडा** हिनें तो धर्म स्वीकारला हें होय. केंथ **एथलबर्गा** नांवाच्या राजानें मूर्तिपूजन झुगारून देऊन बाप्तिस्मा घेतला याचें कारण फ्रांक राजाची कन्या **बर्गा** हिला त्यानें वरिलें होतें. व ती ख्रिस्तीधर्मी होती. एथलबर्गा ही फारच धार्मिक व सदाचरणी अशी स्त्री होती. हिच्याच प्रेमपाशानें अडदांड असलेला नार्थंब्रियाचा राजाही ख्रिस्ती झाला. इंग्लंडमधील मर्सियाप्रांत बायकांनींच ख्रिस्ती केला. रशियांतही असाच प्रकार घडून आला. तेथेंही स्त्रियांनींच प्रथम बाप्तिस्मा घेतला.

महंमद पैगंबरास देखील अनुयायी प्रथम स्त्रीच मिळाली. ती त्याची बायको **खाडिजा** ही होय. नवऱ्याच्या मनांतील धर्मांकुरास तिनेंच प्रेमानें वाढविलें. बौद्धधर्म तर प्रसिद्धच आहे. त्याचा प्रसार बुद्धपरिव्राजिकांनींच केला. याचा थोडासा वृत्तांत आपण मागील प्रकरणांत पाहिलाच आहे.

भागवतधर्माच्या प्रसाराकरितां स्त्रियांनीं बराच हातभार लाविला. **रामदासास** वेणूबाई ही शिष्यीण मिळाली. **नामदेवास जनाबाई** मिळाली. **मुक्ता, जना, मिराबाई** अशा स्त्रीरत्नांनीं भागवतधर्म घरोघरीं नेला व आज मितीलाही घरोघरीं पाहिल्यास धर्माचा अवशिष्ट भाग म्हणून स्त्रियांच्याच आचरणांत विशेषतः दिसतो. त्यांचें धर्मवेड पुरुषांपेक्षांही फारच बलवत्तर असतें. संसारसुखाचाही धर्मप्रसारार्थ त्याग करण्यास त्या कधींही माघार घेत नाहींत. धर्मप्रसाराकरितां ज्या स्त्रिया बाहेर पडल्या त्यांनीं

ब्रह्मचर्य अगर संन्यास यांची दीक्षा घेतली होती. ख्रिस्ती धर्माचा प्रसार ब्रह्मचारी स्त्रियांकडूनच ज्यास्त प्रमाणांत घडून आला. बुद्ध भिक्षुणींनीं पर संन्यास घेऊनच धर्मप्रसार केला. संसारत्याग करून केवळ हरिभजनांतच निमग्न राहून भागवतधर्माचा प्रसार उत्तर हिंदुस्थानांत करणाऱ्या स्त्रियां-पैकीं मिराबाई ही श्रेष्ठ होय. विशेषतः मेवाड प्रांतांत तिच्या मूर्तीची अजून पूजा करणारे लोकही आहेत.

महाराष्ट्रांत **जनाबाई, मुक्ताबाई, कान्हुपात्रा**सारखीं भगवद्भक्त स्त्रीरत्नें आपल्या तेजानें चमकत आहेत. तेलंगणांत **पेरी अलवारची कन्या अंदाला** व **करैकलम्माई** अशासारखीं स्त्रीरत्नें होऊन त्या देशास ललामभूत झालीं आहेत. **करैकलम्मा** ही एका धनाढ्याची मुलगी होती व तशीच एका धनाढ्य पतीची पत्नी होती. असें असतांही शिवभक्तींत तिनें आपलें सर्व आयुष्य खर्चिलें. शिवभ-क्तीच्या अत्यानंदांत तिनें शारीरिक व मानसिक असे सर्व तऱ्हेचे हाल आनंदानें सहन केले व तत्कालीन पुरुषांसही आपल्या जाज्वल्य शिव-प्रेमानें लाजविलें तसेंच संसाराची सुंदर चित्रें डोळ्यापुढें दिसत असतां रंगमहाल, सुंदर बगीचे, गाड्याघोडी सर्व कांहीं हुकमतींत असतां **मिरा-बाईनें** या सर्व सुखावर लाथ मारून एकाच श्रीकृष्णाची मनोभावानें भक्ति केली.

धर्मकार्य हें राष्ट्रकार्य आहे. भागवतधर्म हा राष्ट्रधर्म आहे. त्याच्या प्रसारार्थ **मिराबाई**सारख्या विभूती निर्माण झाल्यास अजूनही हव्याच आहेत. अशा तऱ्हेनें समाज सुधारणेबरोबरच धर्मप्रसार करणाऱ्या भगिनी महाराष्ट्रांत निपजतील तो सुदिनच होय.

## कांहीं विदुषी स्त्रिया.

**हॅरिएट मार्टिनो** हिचें चरित्र म्हणजे विद्वत्ता व कर्तृत्व या गुणांचा एक सुंदर आदर्शच होय. ही लहानपणीं फारच भित्री होती. ‘मुलांचे कोमल मनोविकार लक्षांत घेतां त्यांस भीति म्हणजे काय याची कल्प-

नाहीं न येऊं देणें बरें' असें ती म्हणे. ती सात वर्षांची असतां तिला 'पॅरॅडाईज लॉस्ट' हें मिल्टनचें महाकाव्य मुखोद्गत होतें. यावरून तिची अलौकिक स्मृति दृष्टोत्पत्तीस येते. वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं तिनें एक निबंध लिहिला व तो छापविल्यानंतर तिला फारच आनंद झाला. पण बिचारीवर पुढील जीवितामध्यें बरीच संकटें आलीं. बाप, भाऊ व नवरा अशीं तिघेंही मरण पावलीं. या दुर्दैवामुळें तिला पोटाची फारच पंचाईत पडूं लागली. पण या आपत्तीमुळें तिला एक प्रकारचा आनंदच झाला. ती म्हणे कीं 'या आपत्तीच्या धक्क्यामुळें मी उद्योगी बनलें.' कित्येक दिवस तिनें कोंड्याचा मांडा करून काळ घालविला. सरस्वतीचें व लक्ष्मीचें वांकडें असतें असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. पुढें तिनें आपल्या विद्वत्तेच्या जोरावरच आपला चरितार्थ सुखानें चालविला. कॅथॉलिक धर्म, यहुदी धर्म व इस्लामी धर्म यांची तुलना करून तिनें तीन बक्षिसें मिळविलीं. पुस्तकें खपतील कीं न खपतील या भीतीनें प्रथमतः तिचें पुस्तक छापविण्याचें धाष्टर्य कोणी करीत नसे; पण पुढें तिची लेखक या नात्यानें जेव्हां प्रसिद्धी झाली तेव्हां सर्व प्रकाशकांकडून मागण्या येऊं लागल्या. इतकी विद्वत्ता अंगीं असूनही तिच्या ठिकाणीं गर्वाचा लेशही नव्हता. अमेरिकेंतील गुलामांचा व्यापार बंद करण्याकरितां तिनें अत्यंत परिश्रम घेतले.

हिजविषयीं फार्स्टर नामक प्रसिद्ध ग्रंथकार म्हणतो, "इंग्लंड देशामध्यें गुलामांचा व्यापार बंद करण्याचें बरेंचसें श्रेय हॅरिएटलाच दिलें पाहिजे. म्हातारपणींही ती गरीबांकरितां झटत राहिली"

## मेरी सोमरव्हील.

स्त्री विद्वान् असली म्हणजे सांसारिक बाबतींत बऱ्याच अडचणी येतात, असा कित्येकांचा समज असतो. लेडी सोमरव्हील हिचें चरित्र वाचल्यानंतर हा समज चुकीचा आहे अशी खातरी होईल. लहानपणापासून हिची बुद्धी फारच चौकस असे. समुद्रकिनाऱ्यावरील शंख व

तऱ्हतऱ्हेच्या शिंपा गोळा करण्याचा तिला नाद असे. नाना जातीच्या वनस्पतीही ती जमवून ठेवीत असे. तिचें सर्व शिक्षण स्वतःच्या हिंमतीवरच झालें. लॅटीन व ग्रीक या भाषा केवळ स्तकावरून ती शिकली. व्हर्जिलचीं काव्यें तिनें उत्तम तऱ्हेनें वाचून काढलीं. अशी एक कला अगर शास्त्र नव्हतें कीं ज्यांत हिची बुद्धि चालत नसे. चित्रकलाही तिला पूर्ण अवगत होती. तिला चित्रकला शिकवणारा शिक्षक म्हणे कीं इतक्या विशाल बुद्धीची मुलगी मी अजून कधींही पाहिली नाहीं. पक्षांवर तिचें फारच प्रेम असे. जिवंत पक्षी मारून त्यापासून ज्ञान मिळविणें तिला बिलकूल पसंत नसे. ही आपुला नवरा वुइल्यम ह्याविषयीं म्हणे, 'मत्सर ही काय वस्तु आहे हें त्यांस माहीत नव्हतें. माझ्या कार्यांमध्यें ते मला मनापासून उत्तेजन देत.' ती स्वातंत्र्याची पक्की अभिमानी होती. आपण पैसा मिळवावा हें तिच्या कधीं मनांतही आलें नाहीं. तिचा विद्याव्यासंग इतका दांडगा होता तरी सांसारिक कार्यांमध्येंही ती फार हुशार होती. स्वयंपाक करण्यांत तर तिचा हातखंडा होता. वेळांत वेळ काढून ती मुलांस शिकवीत असे. 'आकाशांतील गृहांची स्थिति' हें तिचें पुस्तक फारच लोकप्रिय झालें. तिनें ज्ञानप्रसारक मंडळीला न्यूटनच्या प्रिन्सीपियासारखा ग्रंथ लिहून देण्याचें आश्वासन दिलें होतें. बऱ्याच प्रापंचिक अडचणी आल्या असतांही तिनें वचनाप्रमाणें ते पुस्तक लिहिलें. ॲस्ट्रॉनॉमिकल व रॉयल सोसायटीकडून तिला बरींच बक्षिसें व मान मिळाला. राबर्ट पीलनें तिला २००० पौंडांचें वर्षासन करून दिलें. स्त्रियांच्या सामाजिक व राजकीय उन्नतीकरितां तिनें अत्यंत परिश्रम घेतले. मरणाच्या आधीं दोन तीन दिवसपर्यंतचीही रोजनिशी तिनें लिहून ठेविली आहे. ती म्हणते 'अजून जे अनेक शोध लागणार आहेत ते बघण्यास मी जगणार नाहीं याचें मला फार वाईट वाटतें.' पुढें ती म्हणते 'माझें तारु सज्ज झालें आहे. शिडें व पताका फडकूं लागल्या आहेत. आतां हं म्हणण्याचा अवकाश कीं माझी परलोक यात्रा सुरूं होणार.' मरणसमयीं ती म्हणाली 'माझें मन मी या वेळीं

शांत ठेवतें. मी पूर्ण सुखी आहें व परमेश्वरावर माझा पूर्ण भरंवसा आहे.

अशा रीतीनें संसार व विद्याव्यासंग यामध्यें कसूर न करतां विनय, दक्षता, व पत्नीभाव या सर्व गुणांचें जिनें उदाहरण घालून दिलें त्या **सोमरव्हील**ची स्तुती करावी तेवढी थोडीच आहे.

## डोरोथी वर्डस्वर्थ व कॅरोलाईन हर्शल.

या दोघींनीं आपल्या बंधूंना उत्तेजन देऊन त्यांस उच्चपदास पोहों-चविलें. आपल्या बंधूंच्या काव्यात्म्याचा विकास करण्याची **डोरोथी** नेहमीं खटपट करीत असे. **वर्डस्वर्थ** आपल्या उतार वयांत तिजविषयीं म्हणतो, " ताईच्या नजरेखालीं मी माझे पहिले दिवस घालविले. तिनेंच माझा काव्योद्धार होण्यासाठीं प्रयत्न केला व तिनेंच माझी काव्य-स्फूर्ति जागृत ठेविली. तिचें गद्यकाव्य फारच हृदयंगम आहे. तिच्या जीविताचें सार तिच्या बंधुप्रियतेंतच आहे. फ्रेंच रेव्हो-ल्युशनच्या वेळीं वर्डस्वर्थ नास्तिक होण्याच्या पंथास लागला होता. जगांत भलेपणा नाहीं, देवपणा नाहीं अशीं त्याचीं मतें होऊं लागलीं. यावेळीं ' माझ्यामध्यें ' सत्यमेवजयते ' हा विश्वास डोरोथीनेंच उत्पन्न केला. ' असें तो म्हणे. ' माझ्या काव्यामध्यें जें जें उत्तम आहे तें तें सर्व तिच्यामुळेंच वठलें आहे, ' असें तो एका ठिकाणीं म्हणतो. डोरोथी आपल्या बंधूकरितां अविवाहितच राहिली. कॅरोलाईन हर्शलचा भाऊही ज्योतिष शास्त्रामध्यें निष्णात होता. या अभ्यासामध्यें कॅरोलाईननें त्याला फारच मदत केली. ती स्वतः फारच बुद्धिमान होती. तिनें ७।८ धूमकेतूंचा शोध लावला. ज्योतिष संस्थेची ती सभासद होती. तिला या संस्थेनें सुवर्ण पदक बक्षिस दिलें. आपल्या विद्वत्तेचा तिला यत्किंचित्‌ही गर्व नव्हता. ' मला जें जें येतें त्याचें श्रेय आण्णाला आहे. एकादें कुत्रेंही शिकण्यानें माझ्या इतकें तयार होईल. ' असें ती म्हणे. कोण हा विनय ! वयाच्या ९८ वे वर्षीं ती मरण पावली. हॅनोव्हर येथें असतां रात्रंदिवस मोलकरणीसारखें तिला राबावें लागे. तिला गाण्याची कला

अवगत होतां. तिच्या भावानें व तिनें पुष्कळ वर्षे श्रम करून नक्षत्रांचे वेध घेतले व त्यांची सविस्तर माहिती जुळवून व नकाशे काढून तिनें एक नवीन ग्रंथ तयार केला. तिची बंधुप्रीति फार विलक्षण होती. तरी पण तिला भावाजवळ पैसे मागण्याचें जिवावर येई. इतकी ती स्वावलंबी व भिडस्त होती मरणसमयीं तिनें सांगितलें कीं, ' माझ्या प्रेतावर माझा भाऊ वुइल्यम् याच्या केंसाची एक बट मी जपून ठेवली आहे ती ठेवून मग काय करायचें तें करा.' धन्य त्या भावाची कीं अशी अमोलिक ताई त्यास लाभली.

## मेरी वुल स्टोन क्रॉफ्ट गॉडविन्.

हिचें चरित्र फारच हृदयंगम आहे. स्त्रीजातीविषयीं इतक्या कळकळीची स्त्री विरळा, असें तिच्या चरित्रकारांनीं लिहून ठेवलें आहे. हिचें जीवित म्हणजे एक लढाईच होय असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. तिनें ज्या काळामध्यें आपलीं मतें प्रदर्शित केलीं तो काळ तिला फारच प्रतिकूल होता पण ती धैर्यानें लोकनिंदेला भीक न घालतां आपल्या मताप्रमाणें बोलत असे व वर्तनही ठेवीत असे. तरुणांस तिची पुस्तकें वाचूं नका असें सांगण्यांत येई. शेले व सौदी या कवींनीं मात्र तिची प्रशंसा केली. कौटुंबिक स्थिति अत्यंत हलाखीची असल्यानें तिला फार त्रास होई. तिनें बर्कच्या ' रिफ्लेक्शन्स ऑन दी फ्रेंच रेव्होल्यूशन्' या ग्रंथास उत्तर म्हणून एक लेख लिहिण्याचें ठरविलें पण या बाबतींत तिला एक विलक्षण अनुभव आला. लेख अर्धा लिहून झाला असतां तिची सर्व स्फूर्ति मावळल्यासारखी झाली. तिला पुढें काय लिहावें हेंच सुचेना. हें तिनें जॉनसन यास सांगितलें. मी तुमचा अर्धा लेखच छापण्याचें रद्द करतों म्हणजे झालें असें तो म्हणाला. या म्हणण्यानें तिला फारच वाईट वाटलें. व तिनें तो लेख ताबडतोब संपविला. बर्कच्या ग्रंथावर विद्वानामध्यें रणें माजून राहिलीं होतीं. सार्वजनिकरीत्या बर्कचीं मतें खोडून काढण्याचें धाडस करणाऱ्यांत मेरीचा नंबर पहिला होता. पुढें तिनें

' व्हिंडिकेशन ऑफ दी राइटस ऑफ वुइमेन ' या नांवाचें एक पुस्तक लिहीलें. ह्यामध्यें भावी काळचीं सुंदर कल्पनामय चित्रें रेखाटलीं आहेत. यांत पुष्कळ ठिकाणीं केवळ अरण्यरुदनेंही आहेत. स्त्रिया म्हणजे जनावरें नसून माणसें आहेत व त्यांच्या नैसर्गिक शक्तींचा विकास होण्यास पूर्ण मुभा दिली पाहिजे असें तिनें या पुस्तकांत फार जोरदार रीतीनें प्रतिपादिलें होतें. स्त्रियांच्या नाजूकपणाबद्दल तिला फार तिटकारा वाटे. स्त्रीपुरुषांच्या समान हक्काची ती पुरस्कर्ती होती. पुराण मताभिमान्यांस तिचा फार राग येई. ' वालपोल ' तिला अकलेचे तारे तोडणारी नागीण असें म्हणत असे. फ्रान्स येथील राज्यक्रांतीमुळें तिचें फ्रान्स देशावर फारच प्रेम जडलें. तिनें फ्रान्स देशामध्यें प्रवासही केला होता. लोकांचे उद्दाम मनोविकार, स्वातंत्र्याच्या नांवाखालीं केलेले अनन्वित अन्याय, सभोंवार चाललेल्या अन्यायांचें निरसन करण्याची तळमळ व असमर्थता अशा परिस्थितींत फ्रान्समध्यें तिनें काळ कंठला. अशाच रीतीनें तिनें आपलें जीवित स्त्रियांच्या हक्काकरितां भांडण्यांत घालविलें.

कित्येक स्त्रियांनीं आपल्या दीर्घोद्योगानें, स्त्रीजातींत कोणत्याही विषयामध्यें प्रावीण्य मिळविण्याची पात्रता आहे हें ठाम सिद्ध केलें आहे. गेल्या शतकांत व चालू शतकामध्यें अशा असंख्य स्त्रिया निपजल्या व त्यांनीं स्त्रियांची उन्नती केली. ती इतकी कीं आतां स्त्रियांच्या बुद्धीविषयीं, सामर्थ्याविषयीं, कर्तबगारीविषयीं व अधिकाराविषयीं कोठेंही मतभेद रहाण्यास जागाच राहिली नाहीं. शिक्षणाच्या प्रसारामुळें कित्येक विद्वान् स्त्रीरत्नें चमकलीं व चमकत आहेत. जेन् आस्टिन, चार्लोटी, ब्रॉटी, जार्ज इलियट, इलिझबेथ ब्राउनिंग, इलिझबेथ कॅटर, गॅस्केल, हेन्री वुड, सोन्हा गॅट, हॅम्प्रेवार्ड व बावीस वर्षांची असतांना अबाउट दी सीनियर रँगलर ही पदवी मिळविणारी मिस् फॉसेट अशा कित्येक विद्वान स्त्रिया होऊन गेल्या. मेरी कॉरेली या प्रसिद्ध कादंबरीकार परवां नुकत्याच वारल्या.

त्या सर्वांचीं चरित्रें येथें देणें शक्य नाहीं व तें इष्टही नाहीं. उदाहरणादाखल म्हणून वर जीं कांहीं चरित्रें दिलीं आहेत तीं स्त्रीचें सामर्थ्य दृष्टोत्पत्तीस आणण्यास पुरेशीं आहेत. हिंदुस्थानांतही अशीं विद्वद्रत्नें आतां निर्माण होऊं लागलीं आहेत. सरोजनी नायडू, श्रीमती वासंतीदेवी दास, डॉ. आनंदीबाई जोशी, अवंतिकाबाई गोखले, रमामाई रानडे, पंडिता रमाबाई, सरलादेवी चौधरी अशा स्त्रिया हल्लीं होऊं लागल्या आहेत हें हिंदुस्थानचें भाग्य होय. या सर्वांच्या चरित्राशीं महाराष्ट्र भगिनींचा परिचय असल्यानें त्याविषयीं लिहिणें नलगे.

## परवांचें महायुद्ध व स्त्रिया.

बदलत्या कालाबरोबर बदलते रीतिरिवाज, बदलत्या कल्पना व बदलतीं कर्तव्यें उत्पन्न होतात. बेल्जमच्या रणभूमीवर जर्मनीच्या राक्षसी तोफांचा भडिमार सुरू झाला, नामूरसारखे अजिंक्य व अभेद्य किल्ले तोफेच्या गोळ्यांनीं उडवून दिले, व सर्वत्र एकच दंगा माजवून दिला. ज्या महायुद्धाच्या केवळ बातमीनेंच सर्व जगांतील राष्ट्रांची छाती दणाणली त्याचें प्रत्यक्ष रूप पाहणाऱ्या युरोप खंडांतील राष्ट्रांमध्यें काय झालें याची नुसती कल्पनाच करणें बरें. जर्मनीनें बरेच दिवस राष्ट्रांमध्यें धुमसत असलेल्या द्वेषाग्नीस उद्दीप्त केलें व आतां सर्व युरोपास आग लागून तें बेचिराख होतें कीं काय अशी सर्वत्र भीति वाटूं लागली. जसजसा महायुद्धाचा रंग खुलूं लागला व नवीन राष्ट्रें त्यांत सामील होऊं लागलीं तसतसें प्रत्येक राष्ट्रांतील लोकांनीं आपलें सर्वस्व युद्धसामग्री तयार करण्यांत व प्रत्यक्ष रणांगणावर काम करण्यांत खर्च करण्याचें ठरविलें. पुरुषांस तर घरीं राहणेंच शक्य नव्हतें. त्यांतल्यात्यांत तरुण रक्त तर समरांगणाकडे धांव घेऊं लागलें. प्रत्येक तरुण व धडधाकट मनुष्य लष्करी पोषाक घालून रणभूमीवर दाखल झाला. कोणी उमरावाचा मुलगा, तर कोणी अधिकाऱ्याचा मुलगा, कोणी शेतकरी, तर कोणी व्यापारी, कोणी अत्यंत हलका धंदा करणारा, तर कोणी उच्च दर्जाचा असे सर्वजण आपपर व उच्चनीच भाव सोडून रणभूमीवर दाखल झाले.

साहजिक रीत्याच राष्ट्रांतील पुरुषांनीं चालविलेले धंदे बंद पडतात कीं काय अशी भीति वाटूं लागली व हे धंदे जर का बंद पडले तर युद्धसामग्रीची वाण पडून युद्धामध्यें पराजित होण्याची पाळी येते कीं काय असें सर्व राष्ट्रांस वाटूं लागलें; पण अशा आणीबाणीच्या वेळीं स्त्रियांनीं उत्कृष्ट कामगिरी बजाविली. उच्चनीच व आपपर भाव सोडून त्यांनीं आपण होऊनच कामास सुरुवात केली. थोडक्याच वेळांत सर्व कारखाने, आफिसें, रेल्वे, पोस्ट आफिसें व शेतें स्त्रियांनीं गजबजून गेलीं. राष्ट्राभिमान तो हाच. स्त्रिया असल्या म्हणून काय झालें ? राष्ट्राचे सर्व उद्योगधंदे, व सरकारी कामें सुरळीत चालूं ठेवणें त्यांनाही शक्य आहे, हें त्यांनी प्रत्यक्ष कृतीनें सिद्ध करून दाखविलें पाश्चात्य स्त्रियांविषयीं वाईट कल्पना असणाऱ्यांनीं गेल्या महायुद्धामध्यें त्यांनीं आपल्या अंगच्या सामर्थ्यानें,जाज्वल्य कर्तव्य बुद्धीनें,स्वातंत्र्यास्तव अहोरात्र काया झिजवून केवढी कल्पनातीत कामगिरी केली आहे हें पहावें. त्यांनीं शरीराकडे पाहिलें नाहीं; जिवांवरील प्रेम सोडून दिलें; बारा बारा चौदा चौदा तास अंगमेहनतीचीं कामें केलीं; रेल्वे, आगबोटीच्या कारखान्यांत अंगमेहनतीचेंच फार काम असतें पण तेथेंही कित्येक स्त्रिया काम करीत असत. दारुगोळ्याचा पुरवठा करण्याकरितां त्यांनीं फारच परिश्रम घेतले. कित्येक दारुखान्यांत स्फोट होत व पुष्कळ प्राणहानी होई; तरी त्यांनीं तें काम धैर्यानें चालूं ठेविलें.

नोमी लौधनान याविषयीं म्हणतात, " दारुगोळयाचें काम करीत असतां शरीराचे स्नायू दुखूं लागत. डोळयांसही त्रास होई. पण त्यांतही एक प्रकारची आत्मिक व मानसिक उन्नति व व्यायाम होतो. कारखान्यांत सर्वांची योग्यता सारखी असे. मग कोणी मोठी श्रीमंताची असो अगर गरिबाची असो." कधीं कधीं त्यांना रात्रींही काम करावें लागे. त्यावेळीं मात्र फारच त्रास होई; पण आंतील कर्तव्यबुद्धीच त्यांस उत्साह देत असे. तसेंच शेतकीचें. त्यांना शेतांतून पुरुषांसारखें अंगमेहनतीचें काम फार

करावें लागत असे. टपाल वाटण्याचें कामही त्याच करीत. ह्या कामांतही त्यांस फार त्रास झाला. कित्येक लोक नानातऱ्हेच्या तक्रारी करून त्यांस त्रास देत. कांहीं लोक त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन घरगुती कामेंही त्यांजकडून करून घेत. ट्रॅम कंडक्टरच्या कामाकरितांही कित्येक स्त्रिया पुढें आल्या. त्यांतही त्यांनीं प्रशंसनीय कामगिरी करून दाखविली. हीं सर्व कामें केवळ कर्तव्य म्हणून, नोकरी म्हणून नव्हे, त्या करीत. या कर्तव्यमार्गामध्यें कोणतीही अडचण आल्यास त्यांनीं जुमानली नाहीं. एकंदरींत उन्हाची, थंडीची, स्वच्छास्वच्छतेची, पोटाची, इतकेंच नव्हे, पण जिवाचीही पर्वा सोडून त्यांनीं समरांगणांतून येणारी नवीन मागणी वेळच्या वेळीं व व्यवस्थेशीर पुरविली. अशा तऱ्हेनें अविश्रांत काम केल्यावर सैनिकांकडून त्यांस अंतःकरणापासून आभारप्रदर्शक तारा येत. त्यानें तर त्यांचा उत्साह द्विगुणित होत असे. खांद्यावर बंदूक टाकून देशाकरितां लढणारा योद्धा व त्याच्या मदतीखातर व सुखाखातर हाडांचीं काडें करणारी वीरस्त्री अशी जोडी जमल्यावर कोणतें राष्ट्र स्वातंत्र्यास मुकेल ? रक्तानें न्हालेल्या वीरभाईस त्याच्या वीर भगिनीनें प्रेमानें पाठविलेली शिदोरी मिळाल्यावर त्याचा उत्साह पंचवीस पट वाढला तर त्यांत नवल तें काय ? व हा झगडा संपल्यानंतर रुधिरानें माखलेल्या पोशाखानेंच मायभूमीकडे धांव घेऊन आलेल्या वीरबंधूंपुढें त्यांच्या भगिनी आरती घेऊन आल्या व त्यांत त्यांच्या बंधूनीं स्वातंत्र्याची ओवाळणी घातली.

प्रिय हिंदु भगिनींनो, अशा तऱ्हेच्या दिमाखांत तुमचे बंधू स्वातंत्र्याची तुम्हांस कधीं ओवाळणी घालतील व तुम्ही आरती घेऊन त्यांस ओवाळण्याकरितां उत्साहानें व हंसतमुखानें केव्हां याल ? असा सोन्याचा दिवस लवकरच उगवेल काय ?

## 'प्रकरण ६ सहावें'

### उषा व संध्या.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥

मनुस्मृति

अखिल चराचर विश्वामध्यें क्षणोक्षणीं बदल होत आहे असें आधुनिक शास्त्रज्ञ आम्हांस सांगत आहेत. बाह्य सृष्टीमध्यें हा फेरबदल आपल्यां दृष्टोत्पत्तीस स्पष्टपणें येतो. मानससृष्टीमधील उलथापालथ मात्र इंद्रियगोचर नसून केवळ बुद्धिगम्य आहे.

मनुष्याच्या मनांतील विचारामध्यें कालगतीबरोबर फेरबदल होत आला आहे. विचारशक्ती ही निसर्गदत्त आहे. वस्तु पाहिल्यानंतर त्याविषयीं विचार सुरूं होतो. त्या वस्तूचा उपयोग काय ? त्यामध्यें कोणता गुण आहे वगैरे गोष्टी मनुष्यास हळूं हळूं कळूं लागतात. ज्याप्रमाणें दृश्य वस्तूविषयींचे विचार बदलतात त्याचप्रमाणें मनुष्याचे स्वजातीयांविषयींचे विचार बदलत जातात. मनुष्यांतील परस्पर स्नेहसंबंधींचे विचार इतिहासांत असेच बदलत आलेले आपण पाहातों. स्त्रीजातीच्या मानसिक व शारीरिक उन्नतीविषयींच्या कल्पना अशाच उत्क्रान्त होत आल्या आहेत. विशिष्ट देशकालपरिस्थिति जर सोडली तर बहुतेक राष्ट्रांच्या इतिहासामध्यें विचारांची उत्क्रान्ति होऊन निरनिराळया तऱ्हेच्या चळवळी व संस्था उत्पन्न झाल्या व अजूनही होत आहेत. हिंदुस्थानच्या बाबतींत मात्र याच्या उलट प्रकार दृष्टीस पडतो. कारण हिंदुस्थानचा इतिहास आम्हांस असें सांगतो कीं, पूर्व-

कालीन स्त्रीविषयक कल्पना बऱ्याच उच्च होत्या. ज्या वेळीं इतर देश समाजसुधारणेचा ओनामा शिकत होते त्या वेळीं आम्ही उन्नतीच्या शिखरावर होतों, परंतु आज आम्हांस याच्या उलट स्थिति प्राप्त झाली आहे.

अलीकडे ज्ञानप्रसारामुळें, ज्या कल्पना आमच्या पूर्वजांना सुचल्या होत्या त्याच सर्वांस पटूं लागल्या आहेत. आपली फार अवनती झाली आहे हें प्रत्येकास कळूं लागलें आहे. आर्यावर्तांतील स्वराज्य नष्ट होऊन परकीयांचे अंमल सुरू झाल्यापासून पुरुषानांच मुळीं परवशता आली, मग स्त्रियांच्या परवशतेविषयीं कोण विचार करतो? पुरुषच दास बनले अर्थात स्त्रिया दासानुदास झाल्या यांत नवल नाहीं.

आपण या प्रकरणामध्यें आपली आर्यकालीन सुधारणा, व अलीकडील पाश्चात्य सुधारणा, मध्ययुगीन भारतांतील कांहीं अद्भुत स्त्रीरत्नें व त्यानंतरचा अज्ञानांधकार, पूर्व व पश्चिम यांच्या अकल्पित संयोगानें होणारा किंचित् चमत्कृतिजनक पण हितकारक व महत्त्वाचा परिणाम वगैरे गोष्टींचा सर्वसाधारणपणें विचार करून सत्याच्या समांतर भूमीवर उभे राहून पूर्वेकडील व पश्चिमेकडील स्त्रीसमाजामध्यें कोणकोणते विशिष्ट गुणदोष आहेत त्यांचेही आपल्या अत्यल्प बुद्धीप्रमाणें विवेचन करूं. असें करितांना दोहोंकडील विचारक्रांतीचा थोडा थोडा कां होईना पण विषयास पोषक असा इतिहासांतील वृत्तांत आपल्यास पाहावा लागेल. कारण, विचारक्रांतीनेंच आचारक्रांती घडते व या आचारक्रांतीमध्यें बऱ्यावाईटांचा जो भाग असतो त्यावरूनच कोणीही सत्यान्वेषी त्याची कमी अधिक किंमत ठरवितो.

ज्याप्रमाणें निरभ्र अंबरांतील तारका कांहीं वेळ चकाकल्यानंतर अकस्मात् उत्पन्न झालेल्या मेघमंडळाच्या दाट पडद्यांत लोपून जातात, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील तत्वतारका मध्यंतरीच्या संकटरूपी मेघांनीं पूर्ण

लोपून गेल्या; परंतु सुदैवानें पश्चिमेकडील वाऱ्यांनीं मेघ थोडथोडे विरळ होऊं लागून निरभ्र आकाशाचा भाग कोठें कोठें दिसूं लागला आहे.

वेदकाल घ्या, भारतकाल घ्या, त्यांत स्त्रीसमाजाविषयीं उच्च भावना त्या त्या वेळीं लोकांत होत्या हें स्पष्ट आढळून आल्याविना राहणार नाहीं. मागील प्रकरणामध्यें ऋग्वेदांतील कांहीं उतारे देऊन त्या वेळच्या उच्च कल्पनांचें विवेचन केलेंच आहे. पौराणिक कालींही स्त्रियांना बराच मान होता असें दिसतें. विकास-वादाच्या अध्ययनानें मनुष्यास अशी एक कल्पना करितां येते कीं, मानवी इतिहासांत एक काल असा असला पाहिजे कीं, त्या काळीं विवाहनिर्बंध नव्हते; परंतु या काल्पनिक कालाचा विचार आपणांस कर्तव्य नाहीं. मनुष्यच मुळीं एका काळीं माकड होता मग त्या वेळची त्याची नीति कशी होती याची कल्पना माकडाकडे पाहूनच केली पाहिजे. माकडाचा मनुष्य झाल्यावरही कांहीं कालपावेतों तो आपल्या पूर्वजांचें अनुकरण करीत असला पाहिजे हें साहजिकच आहे. कारण माकड हें जनावर अत्यंत अनुकरणशील आहे. त्यामुळें मनुष्यसुद्धां आनुवंशिक संस्कारानें तसाच झाल्यास त्यांत नवल नाहीं. शिवाय पुराणप्रियता व पूर्वजांच्या मार्गानें जाण्याची आदरबुद्धि हे नवे गुण मनुष्यांत आल्यामुळें तो आपल्या पूर्वकालीन सामान्य पितरांच्या चालीरीतीस चिकटून राहिला असल्यास त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. म्हणूनच एकाकाळीं कदाचित् दहावीस स्त्रियांच्या कळपांत एखादा पुरुष असूं शकेल. स्त्री अपत्य जन्मास आल्याबरोबर ठार मारण्याची चाल अद्यापि कांहीं ठिकाणीं आहे. तर त्या काळीं पुरुषसंतति मारण्याकडे पुरुषाची प्रवृत्ति असली पाहिजे हें आपणास आपल्या पूर्वजांच्या स्पृहणीय चालीकडे पाहिलें म्हणजे सहज कळेल. पण आपणांस अनुमानिक प्रमाणांशीं एथें कांहीं कर्तव्य नाहीं. इतिहासांत असा कांहीं पुरावा आर्यावर्तांत सांपडतो काय हें पाहिल्यास आमचें अत्यंत प्राचीन वाङ्मय जो

ऋग्वेद त्यांत सांपडत नाहीं. विवाहपद्धति त्या वेळीं पूर्णत्वास आली होती याविषयीं शंका नाहीं. उद्दालक पुत्राची कथा अगर सत्यकाम जाबालीचें उदाहरण अशासारख्या अपवादक गोष्टींवरून रूढ विवाहपद्धतीच्या नास्तित्वाविषयीं अनुमान काढणें धोक्याचें आहे.

आतां हें खरें कीं, त्या कालीं म्हणजे ऋग्वेदकालीं जरी विवाहपद्धति होती तरी त्या विवाहपद्धतीचा अमुकच प्रकार होता हें मात्र निश्चयानें सांगतां येत नाहीं. स्वयंवराची चाल त्या कालीं होती हें सूर्याच्या विवाहावरून दिसून येतें. " सूर्यां यत्पत्ये शंसंतीं मनसा सविता ददात् " ( ऋ० १०।७।८५।९ ) परंतु धर्मशास्त्रांत जे आठ प्रकारचे विवाह सांगितले आहेत ते सर्व वेदकालीं अस्तित्वांत होते किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. " नियोगा"ची चालही होती असें स्पष्ट दिसून येतें; परंतु तीही कलियुगांत बंद झाली. ऋग्वेदकालीन विवाह प्रौढ विवाह असत हेंही वरील मंत्रावरून कळून येईल. पौराणिक कालांतही असेच प्रौढ विवाह होत असत असें दिसतें. सीता, द्रौपदी, रुक्मिणी इत्यादि अनेक स्त्रियांचें स्वयंवरच अर्थात् प्रौढ विवाहच झालेले दृष्टीस पडतात. तसेंच तत्कालीन स्त्रिया चांगल्या सुशिक्षित असत असेंही दिसून येतें. सुलभा, मैत्रेयी, गार्गी यांच्यासारख्या ब्रह्मवादिनी स्त्रिया वेदकालीं या भरतखंडांत निर्माण झाल्या आहेत. मागील प्रकरणांत मंत्रद्रष्ट्या स्त्रियांचा उल्लेख केलाच आहे. आतां पौराणिक कालांतील स्त्रिया सुशिक्षित होत्या कां नाहीं हें पाहूं. द्रौपदीस " ब्रह्मवादिनी " व ' पंडिता " अशा संज्ञा महाभारतांत दिल्या आहेत, अशाबद्दल रा. चिंतामणराव वैद्य यांनीं उल्लेख केला आहे. तसेंच रुक्मिणीपत्रिकेचा स्पष्ट निर्देश भागवतांत केलेला आहे ( दशम स्कंध अध्याय ५२ ). साक्षरता म्हणजे सुशिक्षितपणा असा शिक्षणाचा संकुचित अर्थ वास्तविकपणें त्या कालच्या समाजस्थितीस लागूं पडणार नाहीं. कारण लिहिण्याची कला त्या वेळीं हल्लींइतकी

घातलेली नव्हती. बहुतेक ज्ञान कर्णपरंपरेनेंच शिकलें जात असे. यामुळें हल्लींच्या साक्षरतेसारखी साक्षरता असेलच असें म्हणवत नाहीं. तथापि पुराणांतून स्त्रियांच्या तोंडीं नीतितत्वें व धर्मज्ञान कवींनीं घातलें आहे त्यावरून स्पष्ट दिसतें कीं, त्यावेळच्या प्रचलित ज्ञानांत स्त्रिया कांहीं पुरुषांपेक्षां फार मागें नव्हत्या.

त्यांनीं आपल्या अत्यंत उज्ज्वल पावित्र्यानें तत्कालीन आर्यांची पिढी बलवान्, तेजस्वी, धीमान् अशी बनविली व आर्यांचा इतिहास आपल्या शौर्याच्या व बुद्धीच्या अतुल चमत्कारांनीं सजवून टाकला. ही गोष्ट सर्वस्वी स्त्रियांच्याच शालीनतेनें शक्य झाली असें बिनदिक्कत म्हणण्यास हरकत नाहीं. कोणत्याही देशाचा इतिहास पाहिला तरी पातिव्रत्यधर्मामध्यें हिंदू स्त्रियांची बरोबरी करणाऱ्या स्त्रिया सांपडतच नाहींत नाहीं म्हणण्यास त्या थोड्याबहुत एका जर्मनींत सांपडतात. आर्यावर्तांतील स्त्रियांविषयीं डॉ. ॲनीबेझंट या पाश्चात्य विदुषींचें मत खालीलप्रमाणें आहे.

'आर्यावर्तांतील ग्रंथसंग्रहांत किंवा वाङ्मयांत उपलब्ध होणाऱ्या स्त्रियांहून अधिक सुंदर, तेजस्वी स्त्रिया कोठेंही सांपडत नाहींत. मला वाटतें कीं, प्रत्येक सद्गुण व हरएक जातीचें सौंदर्य एकवटून मनुष्यरूपी मुशींत ओतून तयार केलेल्या त्या पुतळ्याच आहेत. व जणूं काय त्यांना देवानें मुद्दाम उच्चस्थानीं ठेवून दिल्या आहेत. अजूनपर्यंत देखील त्या हिंदुधर्माच्या योगानें शुद्ध राहिल्या आहेत.' पातिव्रत्य व सात्त्विकता या गुणांनीं आर्यस्त्रिया विभूषित झाल्या आहेत. समाजरचना या दोन गुणांनीं किती सुखकर व उच्च तऱ्हेची होते हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. पातिव्रत्य हाच प्रेमाचा अलंकार आहे. प्रेमाला पावित्र्याची जोड नसती तर त्या प्रेमाला कोणीही विचारलें नसतें. एकाद्या स्फटिकाच्या शुभ्र व आदर्शतुल्य स्तंभावर हिरव्यागार पाचेची वेलपत्ती चढविली तर त्या देखाव्याची अप्रतिम शोभा काय वर्णावी ? प्रेमाच्या स्तंभावर पातिव्रत्याची मनोरम वेष्टनें किती हृदयंगम दिसतील ? प्रेम हें स्फटिकासारखें निर्मल, शुद्ध, स्वच्छ व आदर्शतुल्य असतें. प्रेमळ स्त्रीच्या विचारांची

निर्मलता, उच्चारांतलें शुद्धत्व, आचारांतील स्वच्छता, हृदयाचा निष्कपटपणा हे गुण स्फटिकाच्या स्तंभांत दृग्गोचर होणाऱ्या गुणांशीं बरेच जुळतात. पण पातिव्रत्य वल्लीनें त्या प्रेमास आलिंगन दिल्यावर त्या दिव्य संमिश्रणाची शोभा अवर्णनीयच असणार. भक्तिशास्त्रांत ज्याप्रमाणें भक्ति अनन्य असावी लागते त्याप्रमाणेंच प्रेम अनन्य असावें लागतें. नाहीं तर तें प्रेम गौणच होय. सीता देवीनें श्री. रामचंद्रास आपल्या पावित्र्याचा प्रभाव दाखविला नाहीं काय? सकलगुणसंपन्न जानकीपतीला सीतेच्या पवित्र व सुकुमार देहास कलंक लागला असला पाहिजे असा संशय येणेंच आधीं वाईट. पण अग्निनारायणानें आपल्या ज्वालामुखांनीं रामाची सीतेच्या पावित्र्याविषयीं खातरी करून दिली, अग्निनारायणाच्या धगधगीत कुंडांत सीतेच्या पावित्र्यानें सोनें बावन्न कशी उतरलें. पुरुषाच्या संशयात्म्यावर स्त्रीच्या निर्मल आत्म्याचा हा विजयच नव्हे काय? दुष्ट दुर्योधनाच्या मदांधपणाला द्रौपदीच्या सोज्ज्वल भगवद्भक्तीनें चीत केलें नाहीं काय?

**" त्वां फेडिलेंचि त्यांचें तत्संगें कृश करून देहऋण**
**हो मद्दयिता देइन मन तुज गानासि जेविं दे हरिण "**

असें त्या पापमय जयद्रथानें द्रौपदीस विचारिलें त्यावेळी तिनें उत्तर दिलें.

**" कृष्णा म्हणे कुबुद्धे खद्योतीं कीटकाधमीं मलिनीं**
**द्युमणिपती सोडुनि प्रियभाव धरील कायरे नलिनी ॥**

अशा खडखडीत व निशित बाणासारख्या उद्गारांनीं जयद्रथ जास्तच चिडला व त्या साध्वीचा पदर धरण्यासही तो शरमला नाहीं. भारतांतील हा केवढा महत्वाचा प्रसंग होता पहा बरें! मूर्तिमंत पाप व मूर्तिमंत पावित्र्य यांमधीलच हा संग्राम नव्हे काय? पापाच्या हातांतील शस्त्रें पहिल्या चकमकींतच गळून पडतात व पुढील संग्रामाची तर वार्ताच नको. जयद्रथानें त्या साध्वीचा पदर धरला खरा, पण " म्हणुनि कृष्ट–निजोत्तरपट आसुडतांचि दुष्ट पडलाहो ' अशी त्या अध-

मची स्थिती झाली. पापप्रवृत्त आत्म्याला पावित्र्यानें फटकारा दिल्या-बरोबर तो तोंडघशीं पडून त्याची फजीती कशी होते याचें हें महा-भारतांतील अत्यंत उत्तम उदाहरण आहे. याच पुण्यमय पावित्र्याचा प्रभाव दाखविण्याकरितां मिल्टननें ' कोमस ' व गडकऱ्यानें ' पुण्यप्रभाव ' लिहिलें. पावित्र्याच्या प्रभावानें कवींची प्रतिभा प्रस्फुरित होऊन त्यांच्या हातून उत्तम काव्यें लिहिलीं गेलीं. एवढें मात्र खास कीं, हिंदुस्थानच्या ऐतिहासिक व इतर वाङ्मयामध्यें स्त्रीदानतीचे जितके उत्कृष्ट मासले सांपडतात तितके इतर देशाच्या वाङ्मयामध्यें सांपडत नाहींत. जणूं काय पातिव्रत्य देवीला हिंदुस्थान देशच जास्त आवडतो. रोमच्या राण्यांचीं चरित्रें वाचून पाहा. गलिच्छपणाचा व घाणेरडेपणाचा जिकडे तिकडे सुकाळ असलेला दिसेल. पुष्कळ रोमन राणींचें शील उघड उघड रीतीनें वाईट व बदफैली होतें असें दिसेल. या सर्व राण्यां-मध्यें एकादें दुसरें रत्न सांपडतें खरें; पण सर्व साधारणपणें पाहतां रोमन राण्यांचें शील बरेंच वाईट होतें असें दिसेल. यावरून सर्व रोमन शह-रच्या स्त्रियाही तशाच होत्या असें म्हणण्याचें कोणी धाडस करील तर तें मूर्खपणाचें होईल. पण ज्याला तुलनात्मक दृष्टीनें पाहावयाचें आहे त्याला असें स्पष्ट म्हणणें भाग आहे कीं, इटलींतील राण्या व हिं-दुस्थानांतील राण्या यांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे. पाश्चात्य वाङ्मयांतही हीच स्थिति दृष्टोत्पत्तीस येते. होमर हा महाकवि ग्रीस-मध्यें होऊन गेला. आपल्याकडे जसा वाल्मीकि तसाच तिकडे होमर मानिला जातो. त्याचें काव्य फार उत्कृष्ट आहे. वाल्मीकीचें रामायण व होमरचें इलियड् यांमधील पात्रांचें व त्यांतील हकीकतींचें बरेंच साम्य आहे. रावण व लंका जशीं रामायणांत आहेत तशीं इलियडमध्यें पारीस व ट्रॉय हीं आहेत. रामायणामध्यें जशी सीता तशी इलियडमध्यें ' हेलन. ' " पण दोन्हीं काव्यें वाचल्यानंतर मनाची अशी खात्री होते कीं, रामायणांतील दैदीप्यमान तत्वरत्नें इलियडमध्यें नाहींत. पातिव्रत्य,

एकपत्नीव्रत इत्यादि उच्च ध्येयें त्यामध्यें मनुष्यास उपदेशिलेलीं नाहींत व रामायण वाचल्यानंतर जे जे पवित्रतेचे ठसे मनावर उमटले जातात तें इलियडनें उमटत नाहींत. " असें रा. चिंतामणराव वैद्य यांचें मत आहे. सारांश, युरोप खंडांतील स्त्रीसंबंधीं वाङ्मयांत व इतिहासांत स्त्रीचें ध्येय हिंदुस्थानच्या स्त्रीविषयक वाङमयांतील ध्येयाहून कमी प्रतीचें आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. आतांपर्यंत आपण वेदकालीन व भारतकालीन स्त्रियांची स्थिति पाहिली. यापुढील कालांत स्त्रियांना जास्त जास्त परवशता येऊं लागली असें दिसतें. " न स्त्री स्वातंत्र्य-मर्हति " या तत्वाचा पुरस्कार आर्य समाजांत मोठ्या प्रमाणावर होऊं लागला व स्त्रियांना तत्कालीन शिक्षण देण्याचें बंद होऊन घरकामांतच त्यांची कायमची नेमणूक झाल्याचें आढळून येतें. प्रौढ विवाह बंद झाले व " अष्टवर्षाभवत् कन्या पुत्रवत् पालिता मया " या विवाहमंत्राप्रमाणें मुलींचीं आठ वर्षांच्या आंतच लग्नें होऊं लागलीं. या कालींच एका नव्या वर्धिष्णु धर्मसमाजांत स्त्रियांनीं जी उत्कृष्ट कामगिरी बजावली तिचा येथें उल्लेख केला पाहिजे. अखिल भरतखंडांत कर्मकांडाचें स्तोम माजून यज्ञयागादि हिंसायुक्त धर्माचा फारच मोठ्या प्रमाणावर प्रसार होऊं लागला. अशा प्रसंगीं गौतमबुद्धाचा अवतार होऊन त्या हिंसासत्रास जोराचा धक्का बसला. बुद्धांनीं कांहीं कांहीं बिनमोल नीति-तत्वें जगापुढें मांडिलीं व त्या तत्वांच्या प्रभावानें भरतखंडांतील बरेचसे पंडीतही बौद्धधर्माचा स्वीकार करूं लागले. आर्यधर्माच्या परंपरेला धक्का बसेल अशीं यांत कोणतींही नीतितत्वें नव्हतीं. फक्त हिंसायुक्त धर्माविरुद्ध " अहिंसा परमोधर्मः " या सारखीं तत्वें मांडलीं गेलीं. गौतम बुद्धास त्याच्या धर्मप्रसारार्थ पुष्कळ सेविका मिळाल्या. त्यांना संसार-त्याग करावा लागे व धर्मप्रसाराकरितां अत्यंत परिश्रम घ्यावे लागत. प्रोफे-सर भागवत आपल्या "भिक्षुणी रत्नें " या ग्रंथांत म्हणतात ' ख्रिस्ताच्या सेविकांचीं चरित्रें व बौद्ध भिक्षुणींचीं चरित्रें यांत पराकाष्ठेचें साम्य

दृष्टीस पडतें. व यावरून दिक् व काल यांनीं विभक्त असलेली मानवी प्रजा कशी समानशीला, समानधर्मा, व समानरूपा आहे याचेंही प्रत्यंतर येतें.' या गौतम बुद्धाच्या सेविका समाजकार्याकरितांच सर्वस्व अर्पण करीत असत. त्यांची गृहसंसारापासूनची निवृत्ति विश्वसंसार-प्रवृत्तीमध्यें परिणत होत असे. जशा पाश्चात्य देशामध्यें रोग्यांच्या शुश्रुषेकरितां, कैदी व गुन्हेगार यांच्या उन्नतीकरितां, युद्धांत मदत करण्याकरितां, स्त्रिया सज्ज असत; त्याचप्रमाणें या पौर्वात्य स्त्रियाही आपला गृहसंसार सोडून रानटी अवस्थेंत असलेल्या जातींचा उद्धार करण्याकरितां, गरिबांस मदत करण्याकरितां, गौतम बुद्धानें जे धर्मप्रसारार्थ मठ स्थापन केले होते त्यांत शिरत असत. जगामध्यें अनंत दुःखांच्या डोंगराखालीं मानवी जात चिरडून जाते, तिचा उद्धार करणें जास्त श्रेयस्कर आहे असें त्यांस वाटे बौद्धधर्म हा निवृत्तिधर्म आहे. ही विश्वांतील सुखदुःखापासून होणारी अंतिम निवृत्ति, आरंभीच्या प्रवृत्तीधर्माचरणानें व जगांतील सुखदुःखांच्या प्रत्यक्ष अनुभवानें, रोमरोमांत बाणावी लागते. जगांत दिसणारें द्वैत मृगजलासारखें आहे, त्यानें कधींही तृष्णा तृप्त होणार नाहीं. सृष्टींत सत्याचा लेशही नाहीं, हें ज्ञान झाल्यानंतरच या स्त्रिया जगाच्या व्यापारापासून आपलीं मनें निवृत्त करीत. प्रोफेसर भागवत यांनीं एकंदर तेरा स्त्रीरत्नांचा हार गुंफलेला आहे. या तेरा स्त्रिया अर्हत्पदापर्यंत पोंचल्या होत्या. याखेरीज हजारों स्त्रिया या धर्मसंघांत प्रविष्ट झाल्या होत्या. त्यांनीं धर्मप्रसारार्थ व नीतितत्त्वाचा उपदेश करण्यांत अत्यंत परिश्रम केले, असें दिसून येतें. मी मी म्हणणाऱ्या पुरुषांना सुद्धां जी खडतर तपश्चर्या, इंद्रियदमन - मनोजय करितां येत नाहीं तो या भिक्षुणींनीं करून दाखविला. यावरून स्त्रियांच्या अंगीं परमार्थ साध्य करून घेण्याची योगता आहे हें पूर्ण सिद्ध होतें. असो. या भिक्षुणीसंघावरून तत्कालीन स्त्रीवर्गाची सर्वत्र हीच योग्यता होती असें दर्शविण्याचा माझा हेतू नाहीं. त्या कालीं पुरुषांच्याही स्वतंत्र विचाराची वाढ खुंटली होती. पूर्वजांनीं केलेले विचार

हेच भविष्यकालीं प्रमाणभूत मानले पाहिजेत, इतकेंच नव्हे तर ते विचार त्रिकालाबाधित आहेत अशी तत्कालीन पंडितांची समजूत झाली व ते विचार ज्या वाङ्मयांत प्रसिद्ध झाले होते त्या वाङ्मयावरच निरनिराळीं वार्तिकें, भाष्यें, व टीका उत्पन्न होऊं लागल्या. तत्कालीन सुशिक्षितांचें बुद्धिसर्वस्व अशाच कामीं खर्च झाल्यामुळें स्वतंत्र विचाराचे पाझर बंद झाले व उपलब्ध असलेल्या प्रमाणांची ओढाताण होऊं लागून शब्दावडंबर माजत चाललें. अशा वेळीं स्त्रियांची स्थिति फारशी चांगली असणें संभवनीय नाहीं. पूर्वीच्या वाङ्मयाचें अज्ञान वाढत गेल्यामुळें दिवसेंदिवस समाजांत नवीन विचार बंद पडले व पूर्वीच्या वाङ्मयांत प्रक्षिप्तें होऊं लागलीं. अशा रीतीनें जुन्या-नव्यांची एकच भेसळ होऊन परस्पर विरुद्ध गोष्टी प्रमाणभूत मानण्यापर्यंत मानासिक अवनति झाली. यामुळें स्त्रियांना घरकाम व वेडगळ धर्मसमजुती याशिवाय दुसरा व्यवसायच राहिला नाहीं. उपवास, व्रतें, वैकल्यें, नवस, सायास इत्यादि गोष्टींचें ज्ञान त्यांना कर्णपरंपरेनेंच मिळूं लागलें व तेंच त्यांचे शिक्षण होऊन बसलें. अर्धवट शिकलेल्या, आपमतलबी व दांभिक अशा भिक्षुक वर्गाच्या तोंडूनच हें ज्ञान त्यांना होई व घरकामाव्यतिरिक्त त्यांचा काल या भूदेवसंतर्पणांतच जाई. अशा कालांतही पुढें मिराबाई, मुक्ताबाई, जनाबाईसारखीं स्त्रीरत्नें झालीं.

आतां आपण पाश्चिमात्य देशांतही स्त्रीविषयक कल्पनांची कशी उत्क्रांति होत आली तें पाहूं. उदाहरणादाखल आपण इंग्लंड देशच घेऊं. आपण पाहिलेंच कीं, हिंदुस्थान ज्यावेळीं सुधारणेच्या शिखरावर होतें, त्यावेळीं इंग्लंड जवळ जवळ रानटी अवस्थेमध्यें होतें. पण पुढें थोडथोडी सुधारणा होत गेली व इ. स. च्या पहिल्या शतकांत आपणास बोडेकासारख्या स्त्रिया इंग्लंडच्या इतिहासांत सांपडूं लागल्या. या स्त्रीनें पतिनिधनानंतर, रोमन लोकांनीं राज्य बळकावून लोकांना गुलाम बनविल्यामुळें आपल्या मूठभर लोकांनिशीं त्यांच्यांशीं युद्ध केलें. युद्धांत

तिला यश आलें नाहीं. परंतु हताश होऊन गुलामगिरीला न कवटाळतां ती विषप्राशन करून मरण पावली. बोडेकानंतर नांव घेण्यासारखी स्त्री म्हणजे ॲनिस हिल्डा ही होय. हिच्याच विद्वत्तेनें व उत्तेजनानें कीडमन् कवीला कवित्वाची स्फूर्ति झाली. हिच्यानंतर आल्फ्रेड दी ग्रेट याची मुलगी इयलफ्रेडा ही होय. हिनें आपला पति वारल्यानंतर देखील मोठ्या चतुराईनें राज्य केलें. इतकेंच नाहीं तर आपल्या भावाला राज्यविस्तार करण्यास मदत केली. तिनें कित्येक शहरें वसविलीं, शत्रूला आपल्या ताब्यांत ठेविलें व प्रजेची प्रीति संपादिली. तिला ऐष-आरामाचा मनापासून तिटकारा होता. राजघराण्यांत स्त्रीरत्नें इतिहासांत पदोपदीं सांपडतात, परंतु मध्यम अगर कनिष्ठ घराण्यांतील माहिती पोवाडे व गाणीं यांतच मिळते. चॉसर कवीनें आपल्या यात्रेकरूंच्या वर्णनांत तीन स्त्रियांचीं वर्णनें दिलीं आहेत, त्यांतील एक स्त्री कोष्टी जातींतील होती. हिनें घेंट व एप्रिस येथील कोष्ट्यांना सुद्धां आपल्या धंद्यांत मागें सारिलें. परंतु तिला आपल्या धंद्याचा फार गर्व असे. तसेंच उंची कपडयालत्याचा तिला शोक असे. तिनें फार दूरदूरचा प्रवास केला होता. रोम आणि जेरूसलेमपर्यंत ती एकदां गेली होती. ग्राम्य विनोद व संभाषण यांत ती बरीच प्रवीण होती. चॉसरनें वर्णिलेल्या तीन स्त्रियांपैकीं राहिलेल्या दोन स्त्रिया जोगिणी होत्या. त्यांची चालचलणूक सभ्यपणाची व टापटिपीची होती. लहान लहान गोष्टींतूनही त्या कालच्या रीतीरिवाजाची बरीच माहिती मिळते. एका सरदाराच्या मुलीनें आपल्या लग्नाची तयारी केली. मुहूर्त मुकर करून बापास आपलें लग्न करण्यास सांगितलें. बापानें तिच्या निश्चयाची बळकटी व प्रेमाची कसोटी पाहाण्याकरितां तिचा नानाप्रकारें छळ केला. परंतु तो तिनें निमूटपणें सहन केला. त्यावेळीं पत्नीनें पतीच्या अध्यी वचनांत राहिलें पाहिजे, अशी समाजांत दृढ समजूत होती. स्त्रीचा जन्म दुःखाकरितां असतो व तिनें कष्ट सोसिलेच पाहिजेत असा त्या वेळचा ग्रह होता. या वरील गोष्टीवरून प्रौढ विवाहाबद्दल संशयच राहात नाहीं. परंतु स्वयंवराची चाल नसावी

असें दिसतें. हेंच अनुमान खरें असें पुढें दिलेल्या मार्गारेट पॉस्टनच्या गोष्टीवरून दिसून येईल.

चॉसरनंतर बऱ्याच वर्षांनीं म्हणजे इ. स. १५७५ मध्यें एक डच गृहस्थ आंग्ल स्त्रियांविषयीं म्हणतो:—“आंग्ल स्त्रिया पूर्णपणें नवऱ्याच्या ताब्यांत असतात. छानछुकीचा पोषाख करून जाणाऱ्या येणारांच्या दृष्टीस पडावें म्हणून त्या दरवाज्यांत बसतात. भोजनसमयीं त्यांना अग्रासन असतें. आपला वेळ त्या इकडे तिकडे हिंडण्यांत, पत्ते खेळण्यांत अगर इतर करमणुकींत घालवितात.”

मध्ययुगांत नाईट्स म्हणून एक वीरांची शाखा निघाली. त्यांनीं स्त्रियांना कसें वागवावें यासंबंधीं कांहीं नियम केले. ते “लॉज ऑफ शिव्हल्‍री” या नांवानें प्रसिद्ध आहेत. रोमन शिव्हल्‍रीचे चार नियम होते ते असे, १ स्त्रियांस कोणतेंही दुःख न देणें, २ त्यांना जाचांतून सोडविणें, ३ त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानणें, ४ त्यांच्या हस्तें शूरत्वाचीं बक्षिसें मिळविणें. प्रत्येक सरदारास नाईट व्हावयाचें आधीं पुढील शपथ घ्यावी लागे. “ एकाच कुमारिकेवर मी प्रेम करीन. तिच्या एकाच पाशांत मी गुंतून राहीन. तपेंच्या तपें आपल्या पराक्रमानें तिची आराधना करीन व शेवटीं तिला प्रसन्न करून घेईन.” या चालीपासूनच पुढें ऐव्हॅनो, रिचर्डसारखे स्त्रियांचे रक्षक व सेवक उत्पन्न झाले. कांहीं कालानंतर या चालीची बरीच चेष्टा होऊं लागली. प्रसिद्ध स्पॅनिश कादंबरीकार सरव्हेंटिस यानें आपल्या डॉन् क्विग्झोट् या कादंबरींत शिव्हल्‍रीची बरीच रेवडी उडविली आहे. असें म्हणतात कीं, या कादंबरीच्या प्रभावानें शिव्हल्‍रीचें बंड बरेंच कमी झालें. या ‘ स्त्रीदाक्षिण्य ’ कालांत कुलीन व विशेषतः सुंदर स्त्रियांना फाजील आदर दाखविण्यांत येई. अशा स्त्रियांची गद्य व पद्य वाङ्मयांत बरीच स्तुति केलेली आढळते. परंतु हेच नाइट्स आपल्या गरीब व हीन कुलांतील भगिनींना अंगावर शहारे येण्यासारख्या क्रूरतेनें वागवीत.

इ. स. १३७९ मध्यें जॉन अरुंडेलचें जहाज वादळांत सांपडलें असतां जहाजावरच्या सुमारें ६० स्त्रियांना, ओझें कमी करण्याकरितां, निर्दयपणें जलसमाधी देण्यांत आली. यांत कित्येक जोगिणी व त्यांच्या बालशिष्यिणी होत्या. सन १३७९ सालीं स्त्रियांविषयीं इतकी बेपर्वाई दिसून येई यावरून आपणास स्त्रीदाक्षिण्य हें केवळ वरपांगी होतें व तें केवळ कुलीन व सुंदर स्त्रियांपुरतेंच दाखविलें जात असे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

'वॉरस् ऑफ दी रोजेस'च्या वेळीं मार्गरेट पॉस्टन नांवाच्या स्त्रीनें लिहिलेल्या पत्रावरून ती एक चतुर व उद्योगी स्त्री होती असें आढळून येतें. तिनें या लढाईच्या धामधुमींतही कुटुंबाची सुरक्षितता मोठ्या चातुर्यानें राखिली. तिच्याच पत्रावरून तिनें लग्नापूर्वी नवऱ्याचें मुखही पाहिलें नव्हतें असें आढळून येतें. तिचा नवरा आजारी असतांना तिनें लिहिलेल्या पत्रांत पतीच्या आरोग्याकरितां निरनिराळ्या देवतांना केलेल्या नवसांचाही उल्लेख आहे. तसेंच तिच्या मुलीच्याही लग्नाच्या वाटाघाटीचा इतिहास एका पत्रांत सांपडतो.

यावरून इकडील चालीप्रमाणेंच मुलीच्या बापास वराचा शोध करावा लागे असें दिसतें. लग्नापूर्वी स्त्रियांची बरीच कठीण स्थिति असे. जेन पॉस्टन आपल्या बहिणीविषयीं लिहितांना म्हणते 'लग्नापूर्वी पुरुषाशीं बोलण्याबद्दल तिला बराच वेळ मार खावा लागे. एके दिवशीं या मारामुळें डोक्यांत दोन तीन ठिकाणीं खोंकाही पडल्या.' यावरून तरुण कुमारिकांना वाटेल त्या पुरुषाशीं बोलण्याचा मज्जाव असे, असें दिसतें.

पंधराव्या शतकांतील स्त्रिया सामाजिक बाबतींत बराच भाग घेत असत. कारण त्यावेळीं एका क्रॉनिकलमध्यें हंम्रे ऑफ ग्लस्टरकडे एक शिष्टमंडळ गेल्याची हकीगत असून त्यावेळीं इंग्लंडांतील सर्व

स्त्रियांच्या वृतीनें अशी विनंति करण्यांत आली होती कीं, मिसेस हंम्रे यांना कुमकेशिवाय हॉलंड देशांत लढाविण्यास लावणें लान्छनास्पद आहे. या एका गोष्टीवरून सामाजिक बाबतींत तिकडील स्त्रियांमध्यें केवढी प्रगती झाली होती हें दिसून येतें.

'रिनॅसन्स' म्हणजे युरोपखंडभर झालेल्या बौद्धिक पुनरुज्जीवनानंतर मात्र मार्गरेट शेपर, लेडी जेनग्रे, इलिझाबेथ, थॉमस मूरची कन्या वगैरे विदुषी होऊन गेल्या. त्यांना ग्रीक, इटालियन, हिब्रू, फ्रेंच, जर्मन वगैरे भाषांचें चांगलें ज्ञान होतें. याशिवाय राजकारणांतही त्यांची बरीच प्रगती होती.

पंधराव्या शतकांतील त्यांची कर्तबगारी, त्यांची विद्वत्ता व त्यामुळें त्यांस मिळणारा सन्मान हीं पाहिलीं म्हणजे आठराव्या शतकांत पुन्हां आंग्ल स्त्रिया कशा कर्तव्यहीन झाल्या याचें मोठें आश्चर्य वाटतें. त्या वेळच्या स्त्रियांविषयीं ॲडिसन म्हणतो, " नट्टापट्टा करणें हा यांचा मोठा उद्योग. केशकलापाची नटवी रचना करणें हाच त्यांच्या जीवितांचा अंतिम उद्देश. सकाळचा मोठा उद्योग म्हणजे वस्त्रें नीट ठेवणें, एखाद्या जवळच्याच दुकानापर्यंत जाऊन येण्याच्या श्रमामुळें दिवसभर, इतर कांहींही उद्योग न सुचण्यासारखी नाजुक प्रकृति असणें, मोठा उत्तम उद्योग म्हणजे कशीदा काढणें..." इ. इ.

वरील वर्णनास अपवादात्मक कांहीं स्त्रिया होत्या. यांतच लेडी मेरी वार्टले मॉटेग्यू या विदुषीची गणना होते. ही मोठी ग्रंथकर्त्री होती. स्त्रीस्वातंत्र्याकरितां हिनें बरीच खटपट केली.

जेन ऑस्टिननें 'प्राइड ॲन्ड प्रेज्युडिस' या प्रसिद्ध कादंबरीमध्यें वर्णन केलेल्या बेनेट घराण्यांतील स्त्रिया ॲडिसनच्या वर्णनास बऱ्याच उतरतात. मुलींचीं लग्नें, त्यांचा पोषाख, दुसऱ्याच्या घरीं जाणें, भेटी घेणें याशिवाय त्यांना कांहीं उद्योगच नव्हता.

चॅर्लोटी ब्रॉंटी ही विदुषी एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेली. तिनें आपल्या ' जेन आयर ' नांवाच्या पुस्तकांत विद्यार्जनासाठीं आपल्या बहिणींनीं कशी खटपट केली व इतकी खटपट करूनही मनाजोगें शिक्षण कसें मिळालें नाहीं हें लिहिलें आहे.

१८५० साली कॅमेडन शहरीं कॉलेजियेट स्कूल स्थापन झाल्यानंतर स्त्रियांना उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला. त्या वेळच्या लेखकांनीं अशा शिक्षणास बरीच मदत केली. १८६९ सालीं जॉन स्टुअर्ट मिल् यानें ' स्त्रियांची परवशता ' हा निबंध प्रसिद्ध केला. त्यांत त्यानें स्त्रियांना खाजगी व्यवहारांत व राजकारणांत समान हक्क दिला पाहिजे, असें प्रतिपादिलें आहे.

जॉर्ज मेरिडिथच्या कादंबऱ्यांत व काव्यांत आपणाला एक नव्याच स्त्रीची प्रतिमा आढळते. त्याविषयीं ट्रेव्हेलीन म्हणतो, "मेरिडीथचा आवडता विषय म्हणजे स्त्रियांचा समान हक्क होय. त्याच्या मतें समान हक्क हा खऱ्या प्रीतीचा पाया आहे. स्त्रियांनाही विचारस्वातंत्र्य पाहिजे, त्याशिवाय खरी प्रीति उद्भूत होत नाहीं त्याच्या कादंबरींतील स्त्रिया कर्तृत्ववान् व विद्वान् असून, पुरुषांशीं वादविवाद करण्यांत पटाईत आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे उच्च शिक्षणाच्या संस्कारानें साहजिकच जी मनाची ठेवण होते ती मनाची ठेवण असलेल्या स्त्रिया मेरिडिथनें वर्णिल्या आहेत.

आतांपर्यंत आपण इंग्लंडमधील स्त्रियांची उत्क्रांती कशी होत आली हें पाहिलें. कालाच्या ओघाबरोबर कोणकोणत्या क्रांत्या घडून येतील हें सांगणें शक्य नाहीं. त्या ओघानें मैदानेच्या मैदानें जमीन सुपीक होईल व धान्यधुन्य भरपूर मिळूं लागेल, तर कधीं मैलच्या मैल जमीन कातरून जाऊन हातांतोंडास आलेलीं पिकेंही वाहून जातील. कधीं दिव्य तत्वरत्नें बाहेर येतील तर कधीं कधीं असलेलीं वाहूनही जातील. भारतीय इतिहासाचें क्षितिज जरी दाट धुक्यानें आच्छादिलें असलें तरी

पुढें पुढें निवळत जाऊन स्वच्छ उजेडही दिसूं लागतो. पुन्हां मध्यंतरीं अंबर मेघाच्छादित होतें. कांहीं वेळांनीं तें पुन्हां निरभ्र होतें. वेदकाल व भारतकाल झाल्यानंतर जो काल लागतो त्यांतील स्त्रीविषयक कल्पना कशा होत्या हें पौराणिक वाङ्मयाशिवाय अन्यत्र पाहावयास मिळतच नाहीं. नंतर बौद्धकालांत कांहीं बुद्ध भिक्षुकी रत्नें चकाकूं लागतात. पुन्हां अंधार दिसूं लागतो. वेदकालीं व भारतकालीं, स्वयंवराची उत्तम चाल होती, स्त्रियांना लोकसंस्थांमध्यें भाग घेतां येत असे, इतकेंच नव्हे पण पुरुषाबरोबर धार्मिक व सामाजिक समारंभास त्या हजर राहात असत व तत्कालीन जें शिक्षण मिळण्यासारखें होतें तेंही घेत असत. ग्रिफिन म्हणतो कीं, "त्यावेळीं जें शिक्षण दिलें जाई तें हल्लींच्या सरकारी शाळेमध्यें मिळणाऱ्या शिक्षणापेक्षां अधिक फलदायी व योग्य होतें." भारतकाल निघून गेला. बौद्धकालापर्यंतही मजल आली. पण पुढें मात्र मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या सुरूं झाल्या. हे लोक साम्राज्यसत्तेस लाचावलेले व स्त्रीस्वातंत्र्याच्या विरुद्ध असल्यानें हिंदु लोकही आपल्या स्त्रियांना विशेष स्वातंत्र्य देत नसत हें अगदीं स्वाभाविक आहे. व वस्तुस्थितीही पण तशीच होती. दिल्लीपतींचे झनाने हिंदू स्त्रियांनीं गजबजलेले असत. पण हा दोष सर्वस्वीं मुसलमान लोकांच्या स्त्रीलंपटत्वाचा होय. यावरून मुसलमान स्त्रियाही तशाच होत्या असें म्हणण्याचें धाडस कोणीं करूं नये. महंमद पैगंबराचे स्त्रियांविषयींचे नियम त्यावेळच्या अरबी लोकांकडे पाहिल्यास किती उत्तम होते हें उघड होईल.

पैगंबरानें स्त्री जातीची जुलमापासून सुटका केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. अलीकडील मुसलमान स्त्रियांच्या योग्यतेविषयीं ग्रिफिन म्हणतो 'असें बिनदिक्कत म्हणण्यास हरकत नाहीं कीं, मुसलमान स्त्रीची स्थिति सामाजिक दृष्टीनें व कायद्याच्या दृष्टीनें इंग्लिश स्त्रियांपेक्षांही सुरक्षित आहे.' मुसलमान स्त्रियांचा साग्र इतिहास देण्याचें हें स्थलही नव्हे व त्याची आपणांस फारशी जरूरीही नाहीं. हल्लींच्या

मुसलमान स्त्रीविषयीं जें ग्रिफिन म्हणतो तें मात्र लक्षांत ठेवण्गासारखें आहे. रजपूत स्त्रियांविषयीं तर आह्मीं फार लिहावें असें नाहीं. त्यांचें सविस्तर गुणदोषवर्णन आह्मीं पती व सती या प्रकरणांत केलेंच आहे. येथें इतकेंच सांगून ठेवणें जरूर आहे कीं, स्त्रीचे उत्तमोत्तम गुण ओतप्रोत अंगीं असलेली व खऱ्या स्त्रीत्वाच्या पूर्णत्वास पोहोंचलेली अशी स्त्री राजपुतान्याच्या इतिहासाव्यतिरिक्त कोठेंही सांपडणार नाहीं. रजपूत स्त्रियांच्या बरोबरीस बसविण्यास जर कोणच्या स्त्रिया योग्य असतील तर त्या महाभारत रामायणांतीलच होत, अशी आमची सात्विक व प्रामाणिक समजूत आहे. हिंदुस्थानांत रजपुतान्याव्यतिरिक्त इतर भागांतही कोठें कोठें या तोडीचीं रत्नें सापडतात. पण तीं सर्व मिळूनही रजपूत स्त्रीरत्नां इतकीं होतील, कां नाहीं याबद्दल आम्हांस संशय वाटतो.

येथपर्यंत आपण भूतकालाचा विचार केला. आतां वर्तमानकालीन पौर्वात्य व पाश्चिमात्य स्त्रियांची स्थिति काय आहे हें पाहूं.

पाश्चात्य राष्ट्रांमध्यें अत्यंत सुधारणाप्रिय असें अमेरिकेशिवाय दुसरें राष्ट्र नाहीं. अमेरिकेचा इतिहास फारच उज्ज्वल आहे. पण त्या देशाची आपण जर आजची सामाजिक स्थिति पाहूं लागलों तर आपला हिंदुस्थान देश बरा ह्मणण्याची वेळ येईल. अमेरिकेमध्यें आज १ कोट ७० लाखांवर स्त्रिया अविवाहित आहेत. त्यांत १५ वर्षांच्या ९० लाख, व वीस व ४४ च्या दरम्यान ८१०२००० आणि ४५ व ५४ वर्षांच्या दरम्यानच्या ५ लाख अशा स्त्रिया आहेत. हे आंकडे वाचून माझ्या स्त्रीवाचकांना तर फारच आश्चर्य वाटेल; पण तसें वाटण्याचें कांहींही कारण नाहीं. अमेरिकेमध्यें अलीकडे अशी एक टूम स्त्रियांमध्यें निघाली आहे कीं, विवाहित झाल्यास आपल्याला कलाभिज्ञ या नात्यानें कांहींही स्वतंत्र धंदा करतां येत नाहीं. नवऱ्याची शुश्रूषा व गृहव्यवस्था यांतच आपला सगळा वेळ निघून जाईल व

आपलें स्वातंत्र्य नष्ट होईल. ही कल्पना अमेरिकन स्त्रियांमध्यें जास्त जास्त फैलावत आहे. या अविचारानें जें राष्ट्रीय, सामाजिक व नैतिक नुकसान होतें त्याकडे त्यांचें सर्वस्वीं दुर्लक्ष झालें आहे. अमेरिकन युवतींना ब्रह्मचर्याश्रमिणी कुमारी असें ह्मटल्यानें फार आनंद होतो. अमेरिकन समाजामध्यें प्रत्येक स्त्रीनें विवाह केलाच पाहिजे असा सामाजिक कायदा नाहीं. स्वतंत्र धंदा तिनें खुशाल करावा अशी मुभा असल्यानें व स्त्री ही स्वभावतः भावनाप्रधान असल्यानें, तिला योग्य स्वातंत्र्य म्हणजे काय हें समजत नाहीं. खऱ्या विवाहसंबंधाची तिला कल्पनाच नसल्यानें तिला तो करूंच नयेसा वाटतो. कारण विवाहानें स्वातंत्र्य नष्ट होतें व नवऱ्याच्या कह्यांत आपणास रहावें लागतें अशा भावना असल्यानें नैतिक हीनत्वाची भीति असतांही विवाहास त्या भितात. अमेरिकेमध्यें बायका स्वतंत्र धंदा करून पुरुषापेक्षां जास्त पगार मिळवितात. कोणताही धंदा घ्या. लोहार, सुतार, गवंडी वगैरे सर्व शारीरिक सामर्थ्याचे धंदेही स्त्रिया करूं लागल्या आहेत. अलीकडे यांत्रिक शक्तीनें जी साधनविपुलता झाली आहे तीमुळें अमेरिकन स्त्री जास्तच स्वतंत्र होऊं इच्छिते व तें तिला तेथील सामाजिक स्थितीचा विचार करितां शक्यही आहे.

वाङ्मयांतही हीच स्थिति आढळते. स्त्रिया असें म्हणतात कीं " आम्ही स्त्रियांनींच लिहिलेलीं काव्यें वाचणार. नेपोलियनच्या शौर्यापक्षां जोन ऑफ आर्कचें शौर्य आम्हांस जास्त वाटतें." एकंदरींत पाहतां पुरुषांशीं प्रत्येक बाबतींत बरोबरी करण्याची अमेरिकन स्त्रियांची मोठी इच्छा आहे.

## अमेरिकन विवाहपद्धति.

श्रीमंताच्या मुलीशीं लग्न लावणें म्हणजे आपण श्रीमंत होणें असें अमेरिकन लोक समजतात. सामाजिक स्थिति वरीलप्रमाणें जरी असली तरी अमेरिकन लोक प्रेमाचा व्यापार मात्र करीत नाहींत. सुवर्णानें अलंकृत असलेल्या वधूपेक्षां ते सद्गुणांनीं सुशील झालेल्या वधूंशीं लग्न करूं

इच्छितात. एकाद्या तरुणाचें व तरुणीचें परस्पर प्रेम असल्यास तीं ताबडतोब लग्न करून टाकतात. विवाहसमारंभांत फारसे मंत्र नाहींत. तो फारच थोड्या वेळांत उरकतो. विवाहाच्या आरंभीं नवराबायकोला कांहीं शपथा घ्यावयाच्या असतात. 'मी आजपासून आमरणान्त संकटकालीं किंवा आनंदसमयीं, गरिबींत अगर श्रीमंतींत, आरोग्यावस्थेंत अगर रुग्णावस्थेंत तुझ्यावरील प्रेम अढळ ठेवीन, असें मी तुला वचन देतों.' अशा तऱ्हेचा परस्पर शपथ-विधि झाल्यानंतर नवरानवरी एकमेकांच्या हातांत आंगठी घालतात. वरील विवाहविधींत जर कोठे विषमता असेल तर ती फक्त नवरीच्या मंत्रांत आहे. तिच्या मंत्रांत 'ओबे' म्हणजे आज्ञा पाळणें हा शब्द आहे. या शब्दप्रयोगाच्या विरुद्ध कित्येक अमेरिकन लोक आहेत. अशा तऱ्हेची शपथ नवरीकडून घेणें म्हणजे न्यायाचें होणार नाहीं व असें करणें हा स्त्रीजातीचा अपमान करणें असें ते समजतात. विवाहानंतरच्या पहिल्या महिन्यांत एक मजेचा विधि असतो. यास 'नव मधु वसंत' असें म्हणतात. हा समारंभ मोठा मजेदार होतो. वधूवरांची मिरवणूक निघते व असें म्हणतात कीं, यावेळीं या दांपत्यावर विनोदाखातरच कां होईना बूट जोडे वगैरेंचा वर्षाव सुरू होतो. इतकेंच काय पण वधूवरांच्या पाठीवर त्यांस न कळत कांहीं विनोदी वाक्येंही लिहिलीं जातात. या विधीनंतर हें जोडपें वेगळें बिऱ्हाड करून राहूं लागतें; पण असें तें राहूं लागल्यानंतर वधूला गृहशिक्षण कांहींच नसल्यानें मोठी पंचाईत पडते. गृहशिक्षणाविषयीं अमेरिकन स्त्रिया फारच उदासीन व बेफिकीर असतात. याचें कारण फाजील यांत्रिक साधनें हें होय. घराच्या साफसुफीपासून तो भांडीं धुण्यापर्यंतचीं कामें यंत्रेंच करितात. याशिवाय अमेरिकन स्त्रियांच्या कांहीं विशेष कल्पना खालीं देतों.

१ विवाह म्हणजे एकमेकांस फायदा व्हावा व जीवित सुखकर व्हावें याकरितां केलेला करार.

२ प्रेम जुळेल त्याच्याशीं आईबापांच्या सम्मतीशिवाय विवाह करावयाचा.

३ आपलें व पतीचें जुळत नाहींसें वाटल्यास एकदम काडीमोड करणें

४ पॅरिसमध्यें पोषाखांत जो जो फरक होईल तो आपल्या पोषाखांत करणें.

५ मातृपद प्राप्त करून घेण्याची इच्छा न ठेवणें. माता झाल्यास सर्व सुखाचा नाश होतो असें त्यांस वाटतें.

६ त्यांची धर्मावर मुळींच श्रद्धा नाहीं. धर्माचरण, व्रतवैकल्यें परमेश्वरभक्ति, पातिव्रत्य यांची त्यांना कल्पनाच नाहीं.

अमेरिकन 'चर्च'मध्यें हल्लीं धार्मिक विषयांवर प्रवचनें फारच कमी होतात. तेथें सामाजिक, राजकीय अगर प्रेमविषयक बाबतींचाच खल होतो. येथवर पाश्चात्य देशांतील अत्यंत सुधारलेल्या देशांतील स्त्रियांची स्थिति आपण पाहिली. आतां इतर देशांतील स्थिति आपण थोडक्यांत पाहूं. पाश्चात्य देशामध्यें स्त्रियांच्या शैक्षणिक व सामाजिक बाबतींत जरी पुष्कळसें साम्य असलें तरी वैवाहिक स्थितीमध्यें कांहीं देशांमध्यें थोडी थोडी तफावत आहे. अधिक स्पष्ट म्हणावयाचें झाल्यास 'कायद्याच्या दृष्टीनें' स्त्रीपुरुषांचा परस्पर संबंध निरनिराळा आहे. येथें आपण फक्त वैवाहिक स्थितिच घेऊं. कारण इतर बाबतींत जवळ जवळ सर्व पाश्चात्य देशामध्यें स्त्रीपुरुषांचें समत्वाचेंच नातें आहे. स्त्रिया डॉक्टर आहेत, शिक्षक आहेत, निरनिराळया संस्था चालवीत आहेत, वकील आहेत, व्यापारी आहेत, इंजीनियर आहेत, किंबहुना क्वचित् ठिकाणीं त्या न्यायाधीशही झाल्या आहेत. पुरुष जे जे धंदे करितात ते सर्व धंदे स्वतंत्र रीतीनें स्त्रिया करूं लागल्या आहेत. त्या स्थानिक, प्रांतिक व राष्ट्रीय प्रातिनिधिक संस्थांमध्यें निवडून येतात. शिक्षणविषयक संस्थांमध्यें तर त्यांची अलीकडे फारच

भरती होऊं लागली आहे व आमचे पंजाबचे सिंह दे. भ. लाला लज-पतराय यांनीं हिंदुस्थानांतही अशा तऱ्हेची सुधारणा इष्ट आहे असें आपलें मत प्रदर्शित केलें आहे. स्त्रियांना मताधिकाराच्या चळवळींतही हल्लीं बरेंच यश आलें आहे. या सर्व बाबतींतील बऱ्या वाईटाचा आपण नंतर विचार करूं. तूर्त वैवाहिक संबंधाचाच विचार केलेला बरा. पहिल्यानें आपण जर्मनीकडे पाहूं. तेथें कायद्याच्या दृष्टीनें स्त्रियांची स्थिति बरी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. विवाह झाल्यानंतरही स्त्रियांचा आपल्या मालमत्तेवर हक्क असतो. संततीवर पुरुषाइतकाच स्त्रीचाही हक्क आहे. पति निवर्तल्यास तिला तिच्या कौटुंबिक स्थितीप्रमाणें संपत्तीचा वांटा मिळतो.

फ्रान्स देशांत कायद्याच्या दृष्टीनें स्त्रीचा दर्जा बराच हलका आहे. स्त्रियांना विवाह झाल्यानंतर पतीच्या आज्ञेंत राहावें लागतें. त्याची संमती असेल तरच तिला स्वतंत्र धंदा करितां येतो. संततीवर पित्याचाच विशेष हक्क मानला जातो.

इटलीमध्यें हीच स्थिति आहे. येथेंही स्त्रीला पतीच्या परवानगीशिवाय कांहींच करितां येत नाहीं. पैशाची देवघेव करण्याचा तिला हक्क नाहीं. सर्व पाश्चात्य देशांत स्पेनमधील स्त्रियांची स्थिति फारच वाईट आहे. त्यांना दिलेलें शिक्षणही कुचकामाचें असतें. स्वीडनमध्यें स्त्रियांची स्थिति चांगली आहे. लहानपणीं भावाबरोबरच तिलाही शिक्षण दिलें जातें. येथें स्त्रियांना उपयुक्त असें शिक्षण मिळतें. डेन्मार्कमध्यें विवाहित स्त्रियांचा दर्जा बिलकूल चांगला नाहीं. स्त्रीच्या मालमत्तेवर पतीचाच ताबा असतो व मुलावरही तिचा अधिकार चालत नाहीं. वयांत न आलेल्या मुलामुलींच्या विवाहाच्या बाबतींत पित्याप्रमाणें मातेचीही परवानगी आवश्यक धरली आहे. तुर्कस्थानमध्यें स्त्रीची सांपत्तिक स्थिति चांगली आहे. विवाहप्रसंगीं पतीला पत्नीस स्वतंत्र मालमत्ता तोडून द्यावी लागते. आपल्या आईबापांच्या मिळकतींतून भावाबरोबरीनें तिला

हिस्सा मिळतो. तुर्की स्त्रीला वैवाहिक अनीतीच्या निमित्तानें घटस्फोट करतां येत नाहीं. कोर्टापुढें पुरावा मांडल्यास तिला वेगळें राहतां येतें. पाश्चात्य देशासारखी घटस्फोटाची पद्धति येथें नाहीं. अमेरिकन न्याय-कोर्टामध्यें काडीमोडीचे खटले सर्वांत जास्त असतात; म्हणून तेथें त्या कोर्टांना ‘ विवाहभंजक गिरण्या ’ असें विनोदानें म्हणतात. अमेरिकेमध्यें विवाहभंगाचें प्रमाण बेसुमार वाढलें आहे. विवाहसंस्थेविषयीं अमेरिकन तत्त्वज्ञांपुढें मोठा बिकट प्रश्न उपस्थित झाला आहे.

वरील थोड्याशा माहितीवरून, यूरोप व अमेरिकेचा सामाजिक चित्रपट मनःश्चक्षूंपुढें उभा रहावयास हरकत नाहीं. या चित्रपटाकडे पाहतांना पाहणारांच्या तोंडावर क्वचित् आश्चर्य, क्वचित् आदर, क्वचित् अनुकंपा तर क्वचित् हंसेंही झळकूं लागेल. अशा तऱ्हेच्या नाना मनोविकारांच्या लहरी उद्भूत करणारा हा चित्रपट मनुष्यकृतीचाच आहे काय असा क्षणभर विस्मय वाटतो. चित्रपटांतील रंग इतके उठावदार रीतीनें दिलेले आहेत कीं, निसर्गमातेलासुद्धां आपल्या कलेची स्पर्धा करणाऱ्या मानव जातीचा हेवा वाटूं लागेल. या नानारंगी चित्रपटांतील प्रत्येक रंग वेगवेगळा व दाट असल्यामुळें स्पष्ट दिसतो. त्यांत व्यक्तिस्वातंत्र्य, जातिस्वातंत्र्य हे प्रश्न उपस्थित झाले आहेत. स्वातंत्र्य म्हणजे मनास वाटेल तसें वागणें असा त्याचा जवळ जवळ अर्थ केला जात आहे. म्हणूनच आज पाश्चात्य तत्त्वज्ञांची तिकडील स्त्रियांच्या अनीतिमत्तेविषयीं ओरड ऐकूं येते. फाजील स्वातंत्र्याचा जसा परिणाम व्हावयास पाहिजे तसाच होत आहे. नीतीविषयीं विशेष दक्षता फक्त हिंदुसमाजांत आढळून येते असें म्हणण्यास हरकत नाहीं. पाश्चात्यांत नीतिविषयक कल्पनाच नाहींत असा आमच्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. पण नुसत्या उच्च कल्पना असून काय उपयोग ? त्यांची समाजरचनाच तशी बनून गेली आहे. कालमानानें, भौतिक क्रांतीमुळें ते देश अनीतीच्या मार्गाचें आक्रमण स्वातंत्र्याच्या गोड नांवाखालीं नकळत

करूं लागले आहेत. विचारस्वातंत्र्य पाहिजे व आचारस्वातंत्र्यंही पाहिजे खरें, पण व्यभिचार व अविचारस्वातंत्र्य मात्र सर्वथैव निंद्यच होत. आचार व विचार स्वातंत्र्याचीं तत्त्वें आमच्या हिंदुस्थानांत अजून विकास पावलेलीं नाहींत. व आर्यांची पूर्वींची समाजरचना बरीचशी जाचक स्थितींत कां होईना पण अद्याप आपल्यामध्यें अस्तित्वांत आहे. तथापि आपल्याकडेही हल्लीं कालमाहात्म्यानें तिकडील फाजील स्वातंत्र्यासारखे कांहीं कांहीं प्रकार दिसूं लागले आहेत. आपल्याकडील कडकपणानें केवळ वरपांगी नीति राहून आमच्या सोंळ्या धाबळींतही अनीतिचे सर्प दिसूं लागले आहेत. ज्याप्रमाणें फाजील स्वातंत्र्यापासून पुष्कळ तोटे आहेत त्याचप्रमाणें योग्य स्वातंत्र्यापासून फायदेही आहेत. स्वातंत्र्यांत वाढलेलीं माणसें विचारानें फार मोठीं उदात्त असतात. आणि कडकपणांत वाढलेलीं माणसें करारी व दृढनिश्चयी असतात. फाजिल स्वातंत्र्यानें जसें अधिकारबाह्य व नीतिबाह्य वर्तन होतें तसें फाजील कडकपणानें मन आकुंचित होऊन मनुष्य पाळीव पशूसारखा बनतो. अशा रीतीनें एकानें उल्लूपणा व दुसऱ्यानें मनोदौर्बल्य प्राप्त होतात. स्वातंत्र्य व नियंत्रण यांचा योग्य मिलाफ कोठेंच पाहावयास मिळत नाहीं. विचारस्वातंत्र्य आवश्यक आहे, कांहीं अंशीं आचारस्वातंत्र्यही आहे पण या दोन्ही प्रकारच्या स्वातंत्र्यांचा अतिरेक झाल्यास त्याचे दुष्परिणाम टाळण्याइतकें त्यांत नियंत्रणाचें मिश्रण केलें पाहिजे. ही समतोल स्थिति प्राप्त झाल्यास समाजरचना फार सोज्वल व पवित्र होईल इतकेंच नव्हे पण ती सर्वांगसुंदरही होईल. तसा काळ येईल तो दिवस सोन्याचा असें म्हणण्यास हरकत नाहीं. योग्य ठिकाणीं स्वातंत्र्य व योग्य ठिकाणीं कडकपणा नीतीच्या दृष्टीनें, समाजाच्या सुव्यवस्थित-पणाच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे.

ज्ञानावांचून जर कांहीं पवित्र नाहीं, स्वातंत्र्यावांचून जर कांहीं गोड नाहीं, नीतीइतकें जर कांहीं आवश्यक नाहीं, तर त्या त्रयींचेंही

योग्य संमिश्रण व्हावयास नको काय ? ज्ञान व स्वातंत्र्य नीतीला परिपोषक होतील अशींच पाहिजेत. असें सुसंमिश्रण व्यक्तीला उज्ज्वल करील, कौटुंबिक सौख्याला निर्भेळता आणील, समाजास सुयंत्रित करील व राष्ट्राला लौकरच उन्नतीच्या शिखराला पोहोंचवील.

वरीलसारख्या समतोल विचाराकडे हल्लींचें पाश्चात्य वाङ्मय झुकूं लागलें आहे. मेरी वुड् ॲलेन्. एम. डी. या विद्वान् स्त्रीनें ' व्हॉट ए यंग् वूमन् ऑट् टु नो' या नांवाचें एक अत्यंत उपयुक्त पुस्तक लिहिलें आहे. त्यांत अशा तऱ्हेची समतोल विचारसरणी आढळून येते. या पुस्तकांत तिनें अलीकडील पाश्चात्य समाजरचनेवर बरेच तडाखे मारले आहेत. अमेरिकेची नीतिमत्ता फाजिल स्वातंत्र्यानें बिघडली आहे असें तिचें मत आहे. व ती सुधारण्याकरितां काय काय केलें पाहिजे वगैरे मुद्यांचा या पुस्तकांत चांगला विचार केला आहे. नाटकें पाहणें, तरुणाबरोबर हिंडणें, व थट्टामस्करी करणें, कादंबऱ्या वाचणें, पोषाकांत छानछुखी करणें, हें स्त्रिया जर न सोडतील तर समाजाची घडी व्यवस्थित बसणें शक्य नाहीं असें तिचें मत आहे. सन्मार्गानें व्यक्ति उन्नतीप्रत पोहोंचते व व्यक्तींचें राष्ट्र बनलें असल्यानें, व्यक्तीच्याच उन्नतीबरोबर समाजाची व राष्ट्राचीही उन्नति होते. सर्व मानसव्यापार निर्मल व पवित्र कसा ठेवावा, ईश्वरास्तित्वावर दृढ विश्वास ठेवणें किती आवश्यक आहे वगैरे सर्व विषय या पुस्तकांत उत्तम तऱ्हेनें सांगितले आहेत. तिनें स्त्रियांकरितां व विशेषतः तरुण मुलींकरितां कांहीं उपदेश केला आहे. तो अमेरिकन तरुणींनाच पुष्कळसा लागू असला तरी त्यापासून हिंदी तरुणींनाही बरेंच घेण्यासारखें आहे, म्हणून संक्षेपरूपानें तो मी खालीं देतों:—

" तरुणांशीं बोलावयाचें झाल्यास भावनाप्रधान असें कांहींही बोलूं नका. विनोद करा पण तो बुद्धिप्रधान असूं दे. जगाची मी रहिवाशी आहें, व एका जगांतील रहिवाश्याशीं बोलत आहें अशी कल्पना करा.

स्वतःविषयीं मग ती कोणतीही गोष्ट असो एक अक्षरही बोलूं नका. कोणतें तरी शास्त्रविषयक अगर इतिहासविषयक भाषण करा. आपण कोणी अबला आहों व आपल्याहून श्रेष्ठ अशा एका व्यक्तीशीं बोलत आहों अशी कधींही कल्पना करूं नका. तुम्हीं अबला खात्रीनें नाहीं. तुम्हीं अस्सल प्रबला आहां हें लक्षांत ठेवा. तरुणाशीं एकटेंच बोलत बसणें फार वाईट. तुम्हांस जर त्याच्या स्वभावाची खरी परीक्षा करावयाची असेल तर तो तुमच्या आईबापांशीं, भावांशीं व लहान मुलाशीं कसें वागतो हें बारीक रीतीनें पहा. तुम्हीं एकट्याच त्याच्याशीं बोलत बसाल तर त्याचा स्वभाव तुम्हास कधींही समजणार नाहीं. कारण तुम्हाशीं तो कांहीं तरी भावनामय, वरवर गोड, असें भाषण करून तुम्हांस फसविण्याचा संभव आहे. तुम्हीं त्याच्याशीं केवळ स्नेही या नात्यानें वागा. मात्र घरांतील सर्व कामें केल्याशिवाय व आईबापांच्या आज्ञेशिवाय कधींही बाहेर जाऊं नका.

आधीं नवऱ्याची पूर्ण पारख करूनच विवाह करा. तो कसा आहे, त्याची बुद्धि, मनाचे कल, स्वभाव, त्याच्या आईबापांचा स्वभाव या सर्व गोष्टींचा विचार करून मग जें करावयाचें तें करा. ”

मनुष्याचे गुणावगुण हे बरेचसे आनुवंशिक असतात. असें असल्यानें यांचें फार महत्त्व आहे.

प्रत्येक जातीचे, प्रत्येक देशाचे लोक शारीरिक बांध्यामध्यें थोडेतरी निराळे असतातच. जपानी लोक, हिंदु लोक, रशियन, पर्शियन, निग्रो, हे लोक केवळ चेहऱ्यावरूनच ओळखूं येतात. हें फक्त शरीरापुरतेंच आहे असें नाहीं. मानसिक शक्ति ही बऱ्याच अंशीं पिढीजादच असते. बेरड, रामोशी इत्यादि गुन्हेगार जातींच्या टोळ्यांचा विचार केल्यास त्यांना खून पाडणें, जबर दुखापती करणें, दरोडे घालणें इत्यादि गुन्ह्यांची दिक्कत वाटत नाहीं. परंतु शांतताप्रिय व सुशिक्षित लोकांच्या हातून असलीं कृत्यें जुलमानेंही होऊं शकत नाहींत. पोलिस रिकॉर्डमध्यें त्याच

त्याच कुटुंबाचीं नांवें पुन्हां पुन्हां त्याच गुन्ह्यांच्या सदराखालीं आढळतात. गुणावगुण पिढानुपिढ्या असतात ही गोष्ट नित्य व्यवहारांत आपणास दृष्टीस पडते.

साधारणपणें मनुष्य अनुकरणप्रिय असल्यामुळें त्याच्या भोंवतीं ज्या ज्या गोष्टी होतात आणि ज्या तऱ्हेचा आदर्श त्यापुढें ठेवला जातो त्यासारखेच त्याचे स्वभाव बनत जातात. दृश्य जात व मानस व्यापार यांचा निकट संबंध आहे. चोराचा मुलगा अनुकरणानें चोरी करूं लागतो. मुलाच्या ज्ञानपेशी बापासारख्याच असतात. ज्या तऱ्हेचे राजस, तामस, सात्त्विक मनोविकार पित्यामध्यें असतील त्या तऱ्हेचे मनोविकार मुलांमध्येंही साधारणतः असतात. शारीरिक शास्त्राचा अभ्यास केलेले लोक ज्ञानपेशी वंशानुवंश कशा उतरतात हें चांगलें जाणतात. शरीराचा बांधा, हातपाय, डोळे जसे नैसर्गिक रीत्याच बनलेले असतात तसाच मेंदूही बनलेला असतो.

वरील विवेचनानें लग्नाआधीं किती तऱ्हेचा विचार करावा लागतो हें कळून येईल. अशा पूर्ण विचारांतीं केलेला विवाह खातरीनें चिरस्थायी, निष्कंटक व सुखमय होतो. प्रेमाच्या नाजुक विषयामध्यें हा सूक्ष्म विचार उपयोगी नाहीं असें कोणी म्हणेल; पण त्यांनीं खूप लक्षांत ठेवावें कीं, अविचारी प्रेम पुढें भयंकर आपत्तीस व पश्चात्तापास कारण होतें असा अनुभव आहे. पाश्चात्य देशांतील काडीमोडीची चाल पाहिली म्हणजे तिकडे 'दिव्य प्रेमाचा करारनामा करून' तो बाजारांत मांडलेला दिसतो. प्रेमाच्या बाजार करणाऱ्या युवयुवतींची कींव करावी तितकी थोडीच. या चालीनें समाज किती अस्थिर होतो हें सहज कळून येईल. दिव्य प्रेमाच्या भक्कम पायावर जर कोणत्याही देशांतील विवाहसंस्था स्थिर होतील तर त्या देशाचें स्वातंत्र्य कायम राहील, त्याची संस्कृति पवित्र राहील, व त्याचा इतिहास उज्ज्वल राहील. समाजाची सुखवृद्धि होण्याला सर्व तऱ्हेचें योग्य संमिश्रण पाहिजे. पूर्व व पश्चिम या दोहोंकडील समाजशास्त्राचे

जे सिद्धांत विवेक बुद्धीस ग्राह्य असतील, जे समाजरचना पवित्र, सुस्थिर व सुखकर करतील ते एकवटून त्याप्रमाणें कोणत्याही राष्ट्रानें आपली उन्नति करून घेतली पाहिजे.

पूर्वेकडील अरुणोदयकालचें उषेचें पावित्र्य, तिची तेजोमयता व गांभीर्य तीं दिवसाभिमुख असल्यानें पूजार्ह आहेत, तर पश्चिमेकडील संध्येचें पावित्र्य, तिची रक्तिमा व सौंदर्य तीं दिवसानुगामी असल्यानें वंदनीय आहेत.

# प्रकरण ७ वें.

## शिक्षण व शील.

वह्निस्तस्य जलायते, जलनिधिः कूल्यायते तत्क्षणात् ।
मेरुस्स्वल्पशिलायते, मृगपतिः सद्यः कुरंगायते ॥
व्यालो माल्य–गुणायते, विषरसः पीयूष–वर्षायते ।
यस्याङ्गेऽखिल लोक–वल्लभतमं शीलं समुन्मीलति ॥

निसर्गाच्या चित्रशाळेंतील सर्वांत सुंदर व परिणत कलेचा आदर्श अशी जर कोणती वस्तु असेल तर ती मनुष्य ही होय. निसर्गाची चित्रकला सजीव व प्रगमनशील आहे. सृष्टीच्या भव्य व सुंदर दिवाणखान्यांत चैतन्यपूर्ण व मनोहर अशीं असंख्य चित्रें आहेत. किंबहुना सर्व दृश्यजात एका विशाल व अतर्क्य बुद्धीच्या कारागिरानें चितारलेला एक मनोहर चित्रपट आहे. खरोखरच ज्याप्रमाणें एका कारागिराचें स्वतःच तयार केलेल्या स्त्रीच्या पुतळ्यावर प्रेम बसलें व प्रेमवश होऊन त्याकडे तो पहातच राहिला, त्याचप्रमाणें कोणीतरी या सृष्टिसुंदरीस निर्माण करणारा कारागीर तिच्याच मोहकसौंदर्यानें दिङ्मूढ झाला असेल. कांहींही असो पण हें सर्व जादूमय आहे, वेड लावणारं आहे हें खास. मनुष्यप्राणी हा या जादूमय पसाऱ्यांतील अत्यंत अजब अशी चीज आहे. तो ज्ञानप्रिय व समाजप्रिय आहे. इतर प्राणिमात्रांत व मनुष्यकोटींत जर कोणता महत्त्वाचा फरक असेल तर तो मनुष्याची ज्ञानप्रियता हा होय. या अद्वितीय व अनुपमेय वैशिष्ट्यानें मानवानें अनेक चमत्कार घडवून आणले आहेत. या ज्ञानलालसेच्या आत्यंतिक तीव्रतेनें त्यास कित्येक शास्त्रें व कला यांचे शोध करतां आले. इतर प्राण्यांचा जीवितेत्यर्थ प्राणरक्षणा-

ग्रंथ संग्रहालय

अलीकडे नसतो. अन्न खाणें, कोणी मारावयास आल्यास स्वतःचा बचाव करण्याकरितां प्रयत्न करणें इत्यादि जीवजातीच्या नैसर्गिक गुणधर्मांखेरीज त्यांत कांहीं विशेष असें दिसत नाहीं. मनुष्यप्राणी मात्र कलाप्रिय आहे. पोटाची खळगी भरण्याकरितां जरी त्यास उद्योग करावा लागतो व त्यांतच जरी त्याचा बराच वेळ जातो तरी त्यानें आपल्या फुरसतीच्या वेळीं उदात्त व निर्भेळ असा आनंद देणारी, अशी कला शोधून काढली. जीवनकलह जेथें संपतो तेथें कलेचा उगम होतो. म्हणूनच मनुष्य आपल्या कलेनेंच इतर प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ ठरतो. बुद्धिचापल्यानें त्यास पोट सहज, सुखानें व थोडच्या वेळांत भरण्याची शक्ति प्राप्त झाली. कलेची किल्ली मिळाल्यानें त्यास एका ज्ञानाच्या अफाट व तेजोमय प्रासादाचीं द्वारें उघडतां आलीं. व अलीकडे तर राष्ट्राराष्ट्रांत तुलनात्मक विचार करावयाचा असल्यास त्या त्या राष्ट्रांतलि लोकांच्या कलाभिज्ञतेचा विचार मुख्यत्वें करण्यांत येतो. मनुष्य जसजसा विकास पावत आला तसतशी कला हें त्याचें पोट भरण्याचें साधनच होऊन बसलें. स्पर्धा व ईर्षा यांस अंत नसतो. त्यांची धांवपळ कोणत्याही क्षेत्रावर असनेच असते. म्हणूनच ‘मनुष्य’ जाति विकाससमवेत विकास पावलेल्या ‘राष्ट्र’ या संस्थेंतही कलेचें महत्त्व फार व्यापक होऊन राहिलें; पण आपल्यास येथें कला कशी वाढत गेली, तिची आज काय महती आहे हें पहावयाचें नसून तिच्या उत्पत्तीचा, अस्तित्वाचा वर्धनशीलत्वाचा व नानाविधतेचा मानवी मनावर काय परिणाम झाला हें पहावयाचें आहे.

ज्ञान हें पवित्र असल्यानें त्याचा परिणामही पवित्रच होतो. ज्ञानापासून कलोत्पत्ति होत असल्यानें तीही पवित्रच राहणार. पवित्र कला ज्ञानापासून झाली व अपवित्र कला अज्ञानापासून झाली. कलेच्या पावित्र्यांतच तिचें सर्व महत्त्व आहे असें नाहीं. तिच्या गर्भांत अनेक गुण समाविष्ट झाले आहेत. ती व्यापक आहे, मनोरंजक आहे, आनंददायी आहे व अनंत

आहे. कला ही ज्ञानगम्य जरी आहे तरी ती स्फूर्तीनेंच उत्पन्न होते. नाहीं तर ती समजण्यास त्रासदायक होईल व तींतील आनंद नष्ट होईल. कलासृष्टि ही राष्ट्राच्या मनाचें प्रतिबिंब आहे. तीवरून कलाभिज्ञाचे उच्चनीच मनोविकार कळून येतात. चित्र चित्रकाराचेंच मनोचित्र असतें. भक्कम बुरुजांचा किल्ला बळकट व भीमसेनी शक्तीखेरीज उठत नाहीं तर अत्यंत झिरझिरीत अशा दुकूलवसनाची वीण नाजुक हाताशिवाय बसत नाहीं. शक्तिभेद व प्रकृतिभेद यांबरोबर कलाभेदही आहेच.

मनुष्यमात्राचे सामान्यतः दोन भेद पडतात. एक स्त्री दुसरा पुरुष. सृष्टीची कला या दोन तऱ्हेचा शक्तिभेद व प्रकृतिभेद असलेल्या प्राण्याकडूनच अधिकाधिक पूर्ण व मनोरम झाली आहे. स्त्री व पुरुष दोघेही मनानें व शरीरानें समसमान नाहींत. तीं दोघें वेगवेगळीं असतां अपूर्णच आहेत. एका ठिकाणीं आल्यावरच तीं पूर्ण होतात. म्हणजे त्यांचा संबंध अन्योन्यपूरकत्वाचा आहे. निसर्गानें त्यांचें कलाक्षेत्र विशिष्ट तऱ्हेनें केलें आहे. याही पुढें जाऊन आजचे विकासवादी शास्त्रज्ञ "स्त्री ही निसर्गाची अत्यंत विकसित कृति आहे" असें म्हणतात. 'मनुष्य हा अनुत्क्रान्त स्त्री आहे' 'पुरुष ही भावी स्त्रीची पहिली प्रत आहे' असें आलब्रेक्ट सारखे जर्मन शास्त्रज्ञही म्हणूं लागले आहेत. आपण हा विकासवाद बाजूस ठेवूं व स्त्रीपुरुषसंबंधाविषयीं सामान्य मतें काय आहेत तें पाहूंः--

त्यांची शरीररचना व मनोरचना या दोन्हींमध्यें भेद असतो, ही गोष्ट लक्षांत घेतल्यास त्यांचें कर्तव्यक्षेत्रही भिन्न आहे हें सहज लक्षांत येईल.

सती व पति या प्रकरणामध्यें या प्रश्नांचा आपण बराचसा विचार केला आहे. चार्लस् गॉड्फ्रे लीलंड आपल्या 'दी ऑल्टरनेट सेक्स' या ग्रंथामध्यें म्हणतोः–'दोघांमध्यें मूलतःच अत्यंत सूक्ष्म व महत्त्वाचे भेद आहेत व ह्यांच्या सर्वांगीण वाढीस दोघांची संगमता अवश्यक आहे.

अलीकडील बहुतेक सर्व शरीरशास्त्रज्ञांच्या मतें स्त्रीपुरुषांमध्यें शारीरिक व मानसिक बाबींमध्यें पूर्ण भेद आहे. अपवादाचा विचार आपण

जे सिद्धांत विवेक बुद्धीस ग्राह्य असतील, जे समाजरचना पवित्र, सुस्थिर व सुखकर करतील ते एकवटून त्याप्रमाणें कोणत्याही राष्ट्रानें आपली उन्नति करून घेतली पाहिजे.

पूर्वेकडील अरुणोदयकालचें उषेचें पावित्र्य, तिची तेजोमयता व गांभीर्य तीं दिवसाभिमुख असल्यानें पूजार्ह आहेत, तर पश्चिमेकडील संध्येचें पावित्र्य, तिची रक्तिमा व सौंदर्य तीं दिवसानुगामी असल्यानें वंदनीय आहेत.

## प्रकरण ७ वें.

## शिक्षण व शील.

वह्निस्तस्य जलायते, जलनिधिः कूल्यायते तत्क्षणात् ।
मेरुस्त्वल्पशिलायते, मृगपतिः सद्यः कुरंगायते ॥
व्यालो माल्य-गुणायते, विषरसः पीयूष-वर्षायते ।
यस्याङ्गेऽखिल लोक-वल्लभतमं शीलं समुन्मीलति ॥

निसर्गाच्या चित्रशाळेंतील सर्वांत सुंदर व परिणत कलेचा आदर्श अशी जर कोणती वस्तु असेल तर ती मनुष्य ही होय. निसर्गाची चित्रकला सजीव व प्रगमनशील आहे. सृष्टीच्या भव्य व सुंदर दिवाणखान्यांत चैतन्यपूर्ण व मनोहर अशीं असंख्य चित्रें आहेत. किंबहुना सर्व दृश्यजात एका विशाल व अतर्क्य बुद्धीच्या कारागिरानें चितारलेला एक मनोहर चित्रपट आहे. खरोखरच ज्याप्रमाणें एका कारागिराचें स्वतःच तयार केलेल्या स्त्रीच्या पुतळ्यावर प्रेम बसलें व प्रेमवश होऊन त्याकडे तो पहातच राहिला, त्याचप्रमाणें कोणीतरी या सृष्टिसुंदरीस निर्माण करणारा कारागीर तिच्याच मोहकसौंदर्यानें दिङ्मूढ झाला असेल. कांहींही असो पण हें सर्व जादूमय आहे, वेड लावणारें आहे हें खास. मनुष्यप्राणी हा या जादूमय पसाऱ्यांतलि अत्यंत अजब अशी चीज आहे. तो ज्ञानप्रिय व समाजप्रिय आहे. इतर प्राणिमात्रांत व मनुष्यकोटींत जर कोणता महत्त्वाचा फरक असेल तर तो मनुष्याची ज्ञानप्रियता हा होय. या अद्वितीय व अनुपमेय वैशिष्ट्यानें मानवानें अनेक चमत्कार घडवून आणले आहेत. या ज्ञानलालसेच्या आत्यंतिक तीव्रतेनें त्यास कित्येक शास्त्रें व कळा यांचे शोध करतां आले. इतर प्राण्यांचा जीवितेत्यर्थ प्राणरक्षणा-

वलीकडे नसतो. अन्न खाणें, कोणी मारावयास आल्यास स्वतःचा बचाव करण्याकरितां प्रयत्न करणें इत्यादि जीवजातीच्या नैसर्गिक गुणधर्मा-खेरीज त्यांत कांहीं विशेष असें दिसत नाहीं. मनुष्यप्राणी मात्र कलाप्रिय आहे. पोटाची खळगी भरण्याकरितां जरी त्यास उद्योग करावा लागतो व त्यांतच जरी त्याचा बराच वेळ जातो तरी त्यानें आपल्या फुरसतीच्या वेळीं उदात्त व निर्मळ असा आनंद देणारी, अशी कला शोधून काढली. जीवनकलह जेथें संपतो तेथें कलेचा उगम होतो. म्हणूनच मनुष्य आपल्या कलेनेंच इतर प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ ठरतो. बुद्धिचापल्यानें त्यास पोट सहज, सुखानें व थोड्या वेळांत भरण्याची शक्ति प्राप्त झाली. कलेची किल्ली मिळाल्यानें त्यास एका ज्ञानाच्या अफाट व तेजोमय प्रासादाचीं द्वारें उघडतां आलीं. व अलीकडे तर राष्ट्राराष्ट्रांत तुलनात्मक विचार करावयाचा असल्यास त्या त्या राष्ट्रांतलि लोकांच्या कलाभिज्ञतेचा विचार मुख्यत्वें करण्यांत येतो. मनुष्य जसजसा विकास पावत आला तसतशी कला हें त्याचें पोट भरण्याचें साधनच होऊन बसलें. स्पर्धा व ईर्षा यांस अंत नसतो. त्यांची धांवपळ कोणत्याही क्षेत्रावर असतेच असते. म्हणूनच 'मनुष्य' जाति विकाससमवेत विकास पावलेल्या 'राष्ट्र' या संस्थेंतही कलेचें महत्त्व फार व्यापक होऊन राहिलें; पण आपल्यास येथें कला कशी वाढत गेली, तिची आज काय महती आहे हें पहावयाचें नसून तिच्या उत्पत्तीचा, अस्तित्वाचा वर्धनशीलत्वाचा व नानाविधतेचा मानवी मनावर काय परिणाम झाला हें पहावयाचें आहे.

ज्ञान हें पवित्र असल्यानें त्याचा परिणामही पवित्रच होतो. ज्ञानापासून कलोत्पत्ति होत असल्यानें तीही पवित्रच राहणार. पवित्र कला ज्ञानापासून झाली व अपवित्र कला अज्ञानापासून झाली. कलेच्या पावित्र्यांतच तिचें सर्व महत्त्व आहे असें नाहीं. तिच्या गर्भांत अनेक गुण समाविष्ट झाले आहेत. ती व्यापक आहे, मनोरंजक आहे, आनंददायी आहे व अनंत

आहे. कला ही ज्ञानगम्य जरी आहे तरी ती स्फूर्तीनेंच उत्पन्न होते. नाहीं तर ती समजण्यास त्रासदायक होईल व तींतील आनंद नष्ट होईल. कलासृष्टि ही राष्ट्राच्या मनाचें प्रतिबिंब आहे. तींवरून कलाभिज्ञाचे उच्चनीच मनोविकार कळून येतात. चित्र चित्रकाराचेंच मनोचित्र असतें. भक्कम बुरुजांचा किल्ला बळकट व भीमसेनी शक्तीखेरीज उठत नाहीं तर अत्यंत झिरझिरीत अशा दुकूलवसनाची वीण नाजुक हाताशिवाय बसत नाहीं. शक्तिभेद व प्रकृतिभेद यांबरोबर कलाभेदही आहेच.

मनुष्यमात्राचे सामान्यतः दोन भेद पडतात. एक स्त्री दुसरा पुरुष. सष्टीची कला या दोन तऱ्हेचा शक्तिभेद व प्रकृतिभेद असलेल्या प्राण्याकडूनच अधिकाधिक पूर्ण व मनोरम झाली आहे. स्त्री व पुरुष दोघेही मनानें व शरीरानें समसमान नाहींत. तीं दोघें वेगवेगळीं असतां अपूर्णच आहेत. एका ठिकाणीं आल्यावरच तीं पूर्ण होतात. म्हणजे त्यांचा संबंध अन्योन्यपूरकत्वाचा आहे. निसर्गानें त्यांचें कलाक्षेत्र विशिष्ट तऱ्हेनें केलें आहे. याही पुढें जाऊन आजचे विकासवादी शास्त्रज्ञ "स्त्री ही निसर्गाची अत्यंत विकसित कृति आहे" असें म्हणतात. 'मनुष्य हा अनुत्क्रान्त स्त्री आहे' 'पुरुष ही भावी स्त्रीची पहिली प्रत आहे' असें आलब्रेक्ट सारखे जर्मन शास्त्रज्ञही म्हणूं लागले आहेत. आपण हा विकासवाद बाजूस ठेवूं व स्त्रीपुरुषसंबंधाविषयीं सामान्य मतें काय आहेत तें पाहूं:--

त्यांची शरीररचना व मनोरचना या दोन्हीमध्यें भेद असतो, ही गोष्ट लक्षांत घेतल्यास त्यांचें कर्तव्यक्षेत्रही भिन्न आहे हें सहज लक्षांत येईल.

सती व पति या प्रकरणामध्यें या प्रश्नांचा आपण बराचसा विचार केला आहे. चार्लस् गॉड्फ्रे लीलंड आपल्या 'दी ऑल्टरनेट सेक्स' या ग्रंथामध्यें म्हणतो:--' दोघांमध्यें मूलतःच अत्यंत सूक्ष्म व महत्त्वाचे भेद आहेत व ह्यांच्या सर्वांगीण वाढीस दोघांची संगमता अवश्यक आहे.

अलीकडील बहुतेक सर्व शरीरशास्त्रज्ञांच्या मतें स्त्रीपुरुषांमध्यें शारीरिक व मानसिक बाबींमध्यें पूर्ण भेद आहे. अपवादाचा विचार आपण

प्रसंगानुसार पुढें करूंच. सर्व साधारण नियम काय हेंच आपण पाहिलें पाहिजे. येथवर आपण मानवी जातीचें वैशिष्ट्य, तिची प्रवृत्ति, कलेचें महत्त्व कलेची प्रकृतिभेद व शक्तिभेद यावरील उभारणी यांचा विचार केला. त्याच दृष्टीनें व तेच सूक्ष्म तत्त्वभेद लक्षांत घेऊन आपण स्त्रीपुरुषांचा कर्तव्यभेद पाहिला पाहिजे. रास्किननें स्त्रीपुरुषांच्या कर्तव्याचें फार मार्मिक विवेचन केलें आहे. तो म्हणतो ' पुरुषांची शक्ति सजीव, वर्धनशील व रक्षणशील असते. तोच कर्ता, निर्माता, शोधक, व रक्षक आहे. त्याची बुद्धि विचारी व शोधक, त्याची प्रवृत्ति धाडसी, युद्धप्रिय व विजयाभिलाषी असते. पण स्त्रीची शक्ति व्यवस्थेकरितां आहे, युद्धाकरितां नव्हे. तिची बुद्धि, शोध व उत्पत्ति यांकरितां नसून सुव्यवस्था, पद्धत व स्थैर्य याकरितां असते. तिला वस्तूचे गुणधर्म, पात्रापात्रता व योग्यस्थल वगैरे समजतें. अशीं जरी त्यांचीं कर्तव्यें निरनिराळीं आहेत तरी तीं अन्योन्याश्रयी असल्यानें दोघांच्या परस्पर सहानुभूतीची त्यांना अत्यंत अवश्यकता आहे. पुरुष श्रेष्ठ का स्त्री श्रेष्ठ हा प्रश्नच मुळीं संभवतच नाहीं. उभयतांचीं कामें निरनिराळीं आहेत; एक दुसऱ्यावर अवलंबून आहे; ' एक दुसऱ्यास पूर्ण करितें व स्वतः तत्समागमानें पूर्ण होतें. ' त्या दोघांमध्यें कांहीं साम्य नाहीं. पण एका अद्वितीय मोहिनीनें त्यांची समरसता घडवून आणून जगदीशानें या जगत्संसाराची उभारणी केली आहे.

मागील प्रकरणांमध्यें थोरथोर स्त्रियांनीं आयुष्याच्या निरनिराळ्या अवस्थेमध्यें व वेगवेगळ्या परिस्थितींत मानवी जातीची सेवा कसकशी केली हें आपण पाहिलें. आत्मोन्नतिकारक व राष्ट्रोन्नतिकारक अश गृहशिक्षणानें मुलांचीं मनें तयार करणारी माता, निष्कलंक चारित्र्यानें, जाज्वल्य पातिव्रत्यानें व अनुपमेय प्रेमानें पतिसेवा करणारी साध्वी, स्वसुखावर पाणी सोडून आपद्ग्रस्तांची सेवा करणारी विश्वभगिनी, स्वातंत्र्याखातर प्राणाहुति देणारी देशसेविका, रणांगणावर लढणारी वीरस्त्री

धर्मप्रसारार्थ संन्यास घेणारी साधुस्त्री, विद्वत्तेनें दिपविणारी विदुषी, दर्यावर व रणक्षेत्रांवर प्रसंगावधान दाखविणारी धाडसी-स्त्री अशा हरतऱ्हेनें लोकसेवा करून योग्यतेस चढलेल्या कित्येक स्त्रियांचीं चरित्रें आपण पाहिलीं. यामध्यें आपल्याला साधारण स्त्री-स्वभावास अपवादात्मक असलेले गुणही प्रगट केलेल्या कांहीं स्त्रिया सांपडतील.

थोर थोर पुरुषांच्या चरित्रांचें अवलोकन केल्यास आपल्यास हीच स्थिति दृष्टीस पडेल; कारण मानवी स्वभाव हा अगाध व विविध आहे.

वेगवेगळे प्रकृतिधर्म एकाच मनुष्याचे ठिकाणीं वास करितात. या मानवी स्वभावाच्या वैशिष्ट्याकडे लक्ष देऊनच भिन्न भिन्न कलोद्यानें अनियंत्रित ठेवावीं लागतात. तशीं तीं न ठेविलीं तरी त्या नियंत्रणाचा दाब कालांतरानें कां होईना कमी करावा लागतो व अखेर तो नष्टही होतो. पात्रता आहे तेथें नियंत्रण उपयोगी नाहीं. तें जाचक व अन्यायी होतें आणि एकंदर मानवी जातीच्या विकासास बाधक होतें; म्हणूनच कोणत्याही कलोद्यानास कृत्रिमतेचें कांटेरी कुंपण न घालतां निसर्गाच्या स्वाभाविक नियंत्रणावरच अवलंबून राहिलें पाहिजे. नाहींतर कलोद्यानास विविधतेची मनोरमता येणार नाहीं आणि तें पूर्णत्वासही पोहोंचणार नाहीं. स्त्रीपुरुषांच्या प्रकृतिभेदाकडे लक्ष देऊन उभयतांस योग्य कलोद्यानाकडे जाण्याची समाजानें मुभा दिली पाहिजे.

उदाहरणार्थ, मिस फॉसेटसारखी एखादी गणितज्ञ होणार असेल तर तिला पूर्ण मुभा पाहिजे. लेडी सोमरव्हीलसारखी कोणी पदार्थ, विज्ञानी होणार असेल तिलाही आडकाठी उपयोगी नाहीं. एखाद्या स्त्रीचे कल सर्वसाधारण स्त्रीहून निराळ्या तऱ्हेचे असल्यास त्यांचा विकास होण्यास समाजानें निर्बंध घालणें अनिष्ट आहे हें पक्कें लक्षांत ठेवावें. असो.

स्त्रीजातीच्या कर्तव्यविस्ताराविषयीं निरनिराळीं मतें आज प्रतिपादिलीं जातात. या विविध प्रश्नांचा आपल्याला सविस्तर विचार करणें शक्य नाहीं व तो करण्याचें हें स्थलही नव्हे. कारण कांहीं कांहीं प्रश्न असे आहेत कीं, त्यांची सिद्धासिद्धता ठरविण्याकरितां कित्येक मेंदू थकले, व अनेक युगें खर्ची पडलीं म्हणून त्यांचा सांगोपांग, मुद्देसूद व तर्कशास्त्राच्या छाननीनें विचार करणें शक्य नाहीं.

मागील प्रकरणें वाचल्यानंतर साधारणत: वाचकांना स्त्रीकर्तव्याची व्यापकता लक्षांत आलीच असेल. कर्तव्य जसजसें व्यापक तसतशी जबाबदारी जास्त. कोणत्याही कर्तव्यामध्यें सेवा व त्याग या द्वयीचा समावेश होतो. या द्वयीनें आत्मविकसन व आत्मसंयमन होतें. सेवा नानातऱ्हेची असते. बालसंगोपन, शिक्षणदान, पतिसेवा, व समाजसेवा अशा सेवेच्या चढत्या पायऱ्या आहेत. या चढत्या सेवाव्रताकरितां अधिकाधिक योग्यतेचीं माणसें लागतात. आपद्ग्रस्तांची सेवा हें एकच ध्येय डोळ्यांपुढें ठेवून, आजन्म ब्रह्मचर्य राखून, आपल्या उज्ज्वल ध्येयांकरितां तनमनधन अर्पण करणाऱ्या स्त्रिया पहिल्या प्रतीच्या होत. अशा तऱ्हेचीं उदाहरणें आपण पुष्कळ पाहिलीं. संसार नीटनेटका करून, सुगृहिणी या पदास पात्र होऊन फावल्या वेळीं लोकसेवा करणाऱ्या स्त्रिया दुसऱ्या प्रतीच्या म्हणण्यास हरकत नाहीं. पहिलीस ब्रह्मचर्याचें असिधाराव्रत कडकडीत पाळून सर्वकाल परमार्थ करण्यांत घालवावा लागतो, तर दुसरीस जाज्वल्य पातिव्रत्य राखून, संसार गोड करून हातून होईल ती देशसेवा करावी लागते. असो.

अलीकडे 'ते के न जानीमहे' अशा तऱ्हेचा एक तृतीयपंथ निघाला आहे. उषा या प्रकरणामध्यें त्याचा विचार आम्हीं केला आहे. या पंथांतील स्त्रियांना स्वातंत्र्याच्या फाजील कल्पनेनें पछाडलें आहे. त्यांस माता होणें आवडत नाहीं. माता झाल्यास आपल्या सर्व सुखाचा नाश होतो अश य कीं कल्पना झाली आहे. माता होणें एवढेंच मात्र त्यांस आवडत नाहीं. बा

सर्व कांहीं त्यांस आवडतें. या योगानें त्यांच्या समाजांत नीतिभ्रष्टता फार होऊं लागली आहे. पुरुष जें जें करितात तें तें आपण करणें व समतेचा ध्वज रोंवणें हाच आपला जीवितेत्यर्थ अशा विकृत कल्पना तिकडे बळावत चालल्या आहेत. कोणतेंही काम करून दाखविण्यास सर्व मनुष्यमात्रास मुभा असणें हें जरी समतेचें साधारण तत्त्व असलें तरी त्याचा अर्थ " निसर्गाचा नियम झुगारून देणें व भावी राष्ट्रोन्नतीकडे दुर्लक्ष करून नीतिभ्रष्टतेची भीति असतांही 'स्वतंत्र धंदा स्वतंत्र धंदा' अशी बाष्कळ बडबड करून केवळ स्वतःचें कोड पुरविण्याकरितां धडपडणें " असा करून उपयोगी नाहीं. स्वतंत्र धंदा हेंच ध्येय ठरवून त्याची जर स्त्रियांनीं सार्वत्रिक ओरड सुरूं केली तर संसारांतील दिव्य सुखें नाहींशीं झाल्याशिवाय राहणार नाहींत. बिचारीं अर्भकें प्रेमप्रधान व भावी आयुष्यांत आधारभूत अशा मातेच्या शिक्षणास मुकतील इतकेंच नव्हे तर मनुष्याच्या जीवितामधील कित्येक तेजोमय व प्रेममय दिवस नाहींसे होऊन मनुष्य केवळ कोरड्या व निरस व्यवहाराकरितां घडविलेला हाडामांसाचा सजीव पुतळाच बनेल. तात्पर्य इतकेंच कीं, जिला खरोखरीच स्वतंत्र रहावयाचें असेल तिनें खुशाल अविवाहित रहावें. पण कडकडीत ब्रह्मचर्य राखून तिनें राष्ट्राखातर कांहीं तरी चांगलीं कामें केलीं पाहिजेत. नाहीं तर माता व्हावयास नको, स्वतंत्र धंदा पाहिजे व देशसेवाही नको अशी स्थिति सार्वत्रिक झाल्यास मनुष्यसृष्टि नष्टच होईल. एक कडकडीत ब्रह्मचर्य, नाहीं तर सुगृहिणी, यामधील अवस्था राष्ट्रास सर्वथा हानिकारकच होईल. तुम्ही न्यायाधीश व्हा, डॉक्टर व्हा, एंजीनियर व्हा, अगर कौन्सिलाच्या सभासद व्हा, पण या धंद्यांत तुम्ही पडलां कीं ब्रह्मचर्य त्याबरोबरच आलें. नाहीं तर मी गृहव्यवस्था व शिशुसंगोपनही करीन व खटल्याचा निकालही वेळेवर देईन असें म्हणून चालावयाचें नाहीं. तें शक्य व व्यवहार्यही नाहीं. केव्हांही कर्तव्याची विभागणी ही झालीच पाहिजे. त्यांतल्यात्यांत स्त्री व पुरुष

यांचीं कर्तव्यें विभागलींच पाहिजेत. तीच गोष्ट मताधिकाराची स्त्रियांना मताधिकार जरूर पाहिजे. पण मताधिकार मिळवून निवडून येऊन मी लोकसंस्थेची सभासद होईन असें स्त्रीजातीपुढें सार्वत्रिक ध्येय ठेवणें अनिष्ट आहे. त्याचा राष्ट्रावर वाईट परिणाम होईल तशीच अपवादात्मक व राज्यकारभाराच्या बुद्धिप्रधान व्यवसायास लागणारी विशिष्ट तऱ्हेची मनोरचना असणारी स्त्री प्रतिनिधी म्हणून सार्वजनिक संस्थांमध्यें भाग घेऊं शकेल. पण येथेंही अविवाहितपणाचा प्रश्न येतोच. कारण विवाहित स्थिति पत्करली कीं गृहव्यवस्थेकडे स्त्रीला पाहिलें पाहिजे. बालसंगोपन व शिक्षण तिजकडूनच झालीं पाहिजेत. हें काम पुरुषांनीं कां करूं नये असा प्रश्न सूज्ञ स्त्री कधींही करणार नाहीं. कारण या प्रेमप्रधान व कोमल कार्याला पुरुष सर्वस्वी नालायक आहे; कारण 'आई आई मला भरीव' असें म्हणण्याऐवजीं जर 'बाबा मला भरवा' असें म्हणण्याची पाळी लहान मुलावर आली तर त्याच्यासारखें दुर्दैवी तेंच. आणि मातेच्या नैसर्गिक अत्यंत पवित्र, अत्यंत उच्च, सर्वांत उदात्त व महत्त्वाच्या कर्तव्याची ज्या स्त्रीस टाळाटाळी करण्याची अस्पष्ट व अंधुकही बुद्धि होईल, तिची कींव करावी तेवढी थोडीच. तात्पर्य स्वतंत्रधंदा सार्वजनिक व सरकारी कामें ज्या स्त्रियांना करावयाचीं असतील त्यांनीं ब्रह्मचारी राहून प्रामाणिकपणें नोकरी करावी अगर आजन्म देशसेवा करावी. पुरुषांना सार्वजनिक कामें करावयाचीं असल्यास त्यांनीं कां अविवाहित राहूं नये असा कोणी प्रश्न केल्यास त्याचें उत्तर सोपें आहे. सार्वजनिक कार्यांत अगर नोकरींत काल कंठणाऱ्या स्त्रिया जर विवाहित असल्या तर जसा संसार–सुखांत घोटाळा उत्पन्न होतो, व गृहांतील दिव्य वातावरण विषमय होतें; * तशी स्थिति सार्वजनिक व सरकारी कामें करणारे

*टीप—परवां नुकतेंच आपण पार्लमेंटांतील आठ स्त्री सभासदांपैकीं मिसेस फिलिप्सन ह्या घरांतील तीन लहान मुलांची अव्यवस्था होते, या सबबीवर राजिनामा देणार असें ऐकलेंच असेल.

पुरुष विवाहित असल्यानें होत नाहीं. पुरुषांचीं बहुतेक कर्तव्यें घराबाहेरील असतात. त्यांस त्याच तऱ्हेची शरीरचना व मनोरचना निसर्गानें दिली आहे. बरें एखादा तसें ब्रह्मचर्य पाळूनच देशकार्य करणार म्हणूं लागला तर फारच उत्तम झालें. येथें याचा अधिक विस्तार करणें नलगे.

वरीलसारख्या प्रश्नांमुळें स्त्रीध्येय काय हें मुक्रर ठरविणें दुरापास्त आहे हें सर्वांना सहज कळेल. तथापि स्थूलमानानें एवढें निश्चितपणें सांगतां येईल कीं, समाज सुस्थितींत जेणेंकरून राहील अशा मार्गाचा आश्रय करून स्त्रियांनीं आपल्या समतेच्या हक्काची बजावणी अवश्य करावी.

याच मार्गानें उच्चतेप्रत पोहोंचलेल्या स्त्रियांचीं चरित्रें आपण पाहिलींच. त्यांनीं जीं ध्येयें डोळ्यांपुढें ठेविलीं तींच आपल्या शक्त्यनुरूप इतर स्त्रियांनीं ठेवावयाचीं आहेत व अशा तऱ्हेचीं चरित्रें सतत डोळ्यांपुढें वागवून स्त्रियांनीं आपला, आपल्या भगिनींची व तद्द्वारा राष्ट्राची उन्नति केली पाहिजे.

आतांपर्यंत आपण स्त्रीध्येय काय असावें, पहिल्या प्रतीची स्त्री कोण, दुसऱ्या प्रतीची कोण ? हल्लीं उत्पन्न झालेले व्यापक प्रश्न कोणते, त्यांचा कसा विचार केला पाहिजे, वगैरे गोष्टींचा विचार थोडक्यांत केला. आतां अशा उज्ज्वल ध्येयास अगर साध्यास अगदीं आरंभींचें व महत्त्वाचें साधन जें शिक्षण तें कसें असावें याचा थोडक्यांत विचार करूं. अर्थात् एकाद्या शिक्षणपद्धतीचा सविस्तर मसुदा तयार करून तो वाचकांपुढें ठेवण्याचें धाडस मी करीत नाहीं. फक्त शिक्षणांत समावेश करण्यासारख्या अवश्य बाबींचाच तेवढा विचार थोडक्यांत करून हें प्रकरण संपविणार आहें.

शिक्षण हें मनुष्याचा कमी अधिक विकास दाखविणारें चिन्ह आहे. मानवी जातीचे सर्व व्यवहार कोणत्यातरी शिक्षणानेंच सुसंबद्ध

झाले आहेत. स्त्रीचें व्यवहारक्षेत्र अत्यंत व्यापक असल्यानें तें सुव्यवस्थित करण्यास या व्यापकतेकडे लक्ष देऊन तिचें शिक्षण कसें असावें हें ठरविलें पाहिजे. मात्र मागें सांगितलेले प्रकृतिभेद व शक्तिभेद यांकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

शिक्षणामध्यें तीन चढत्या पायऱ्या आहेतः प्राथमिक, दुय्यम व उच्च. या तीनहीं शिक्षणक्रमामध्यें कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो हें ठरविणें कठीण आहे. प्राथमिक शिक्षणाची मर्यादा ३–४ वर्षेंपर्यंत असावी व दुय्यम शिक्षणाची मर्यादाही ३–४ वर्षांचीच ठेवण्यास हरकत नाहीं. साधारण मुलीला वयाच्या ६ व्या वर्षापासून शाळेंत घातलें जातें. जर्मनींतील स्त्रीशिक्षणक्रम मुलीच्या ६ व्या वर्षापासून तो १६ व्या वर्षापर्यंत असतो. ३ वर्षें प्राथमिक, ३ वर्षें दुय्यम व ४ वर्षें उच्च शिक्षण. या दहा वर्षांमध्यें मुलीला चित्रकला, शिवणकाम, गायन व गृहव्यवस्थेस लागणाऱ्या सर्व गोष्टींचें ज्ञान मिळतें. तिला स्वतःची जन्मभाषा व दुसरी एक भाषा अशा दोन भाषांचें उत्तम ज्ञान होतें. स्त्रीशिक्षणप्रसाराकरितां, स्त्रियांनीं स्वतःच्या जबाबदारीवर कित्येक संस्था काढल्या आहेत. एकंदर स्त्रीवर्गाच्या उन्नतीकरितां एक मध्यवर्ति संस्था स्थापन करण्यांत आली आहे, व तिच्या शाखा सर्व देशभर पसरल्या आहेत. फ्रॉडक्लारा रीस्टर व औगुष्ट श्मिट या दोन विद्वान् व दीर्घोद्योगी जर्मन स्त्रियांनीं या बाबतींत फार प्रयत्न केले. किंडर गार्टन शिक्षणपद्धति ( बालोद्यान पद्धति ) अमलांत आणण्याचाही त्यांनीं अतोनात प्रयत्न केला. बुद्धीपेक्षां भावना प्रज्वलित करणारें शिक्षण स्त्रियांना जास्त दिलें जातें. वनस्पतिशास्त्राचें ज्ञान त्यांस उत्तम तऱ्हेनें दिलें जातें. बागेच्या फुलोऱ्यांत, विहंग-संगीतांच्या सान्निध्यांत, वनश्रीच्या अगदीं अंकावर बसवून त्यांस शिक्षणामृत पाजलें जातें. अशा पद्धतीनें स्त्रीत्वाची कोमलता, माधुर्य व सौजन्य हीं वृद्धिंगत होतात; व निसर्गाचे रमणीय देखावे पाहावयाची हौस उत्पन्न होऊन, त्याच्या सान्निध्यानें शरीर सुदृढ होतें व मन निर्मळ राहतें.

जपानांतही मुलीस गृहिणी व माता या पदवीस पात्र करणारें शिक्षण दिलें जातें. आत्मसंयमन, सहनशीलता ह्या गुणांची महती मुलीस विशेष शिकविण्यांत येते. शिवणकाम व गायन या कलांचें ज्ञान त्यांस दिलें जातें. जवळ जवळ सर्व पाश्चात्य देशांमध्यें स्त्रीशिक्षणाचा प्रसार अतिशय मोठ्या प्रमाणांत होत आहे. आपल्या देशामध्यें मुंगीच्या पावलानें कां होईना, पण तो होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. साधारणपणें स्त्रियांना शिकाविण्यांत येणारे विषय सर्व देशांत सारखेच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. आरोग्यशास्त्राचीं मूलतत्त्वें, सूपशास्त्र, वनस्पतिशास्त्र, शिवणकाम, भाषाज्ञान, गायन वगैरे विषय स्त्रियांना अवश्यच आहेत; याहीपेक्षां उच्च शिक्षण म्हणजे रोग्यांच्या शुश्रूषेचें शास्त्र, व सुइणीचें काम हीं होत. या शिवाय कविता, प्रवास–वर्णनें, नीतिप्रबंध, थोडेंसें भूगोलशास्त्र, स्वदेशाच्या इतिहासाचें सामान्य ज्ञान वगैरे विषयांचा अभ्यासही अवश्यक आहे.

या सर्व शिक्षणक्रमामध्यें धर्मनीतिविषयक शिक्षण मात्र अत्यंत आवश्यक आहे. याच्या अभावीं कित्येक देशांमध्यें अनीतीचा प्रसार होऊन राष्ट्राची अवनति झाली असा अनुभव आहे. रोममध्यें व ग्रीसमध्यें ज्या वेळीं मोठमोठीं नीतितत्त्वें प्रतिपादिलीं जात, त्या वेळींही पावित्र्याच्या शिक्षणाकडे कानाडोळा केला जाई. आत्मनिरीक्षणानें व सदसद्विवेक बुद्धीच्या साहाय्यानें खरें बोलण्याची व खरेपणानें वागण्याची आवश्यकता सिद्ध करण्यामध्यें, रोम व ग्रीसच्या तत्त्ववेत्त्यांनीं आपली बरीच बुद्धि खर्च केली. पण त्यानें राष्ट्राची नैतिक उन्नत्ति मात्र झाली नाहीं. यासंबंधीं फ्रॅंसिस स्विनी यांनीं लिहिलेला ‘ स्त्री जागृति अगर मानवीजातीच्या विकासामध्यें स्त्रियांनीं घेतलेला भाग ’ या नांवाचा एक अत्यंत अमोलिक ग्रंथ लिहिला आहे. तो जिज्ञासूंनीं अवश्य वाचावा.

ख्रिश्चन धर्मस्थापनेनें स्त्रीजातीचें पुनरुज्जीवन झालें. पण पुढें पुढें ढोंगी पुरोहितांनीं कित्येक स्त्रियांना फसवून मानवी जातीची नैतिक दृष्ट्या फार हानि केली. याचीं कारणें ढोंगी धार्मिकांचा बदमाषपणा व धर्मसंस्थेंतील एकतंत्री अंमल हीं होत. हीं दोन्ही नष्ट होऊन जर धर्माचें व धर्मसंस्थांचें स्वरूप समतेच्या, अधिकाराच्या, योग्यतेच्या व पावित्र्याच्या पायावर उभारलें तरच मानवी जातची प्रगति होण्याची आशा आहे. नीति व पावित्र्य हीं धर्माचीं मुख्य अंगें आहेत. नीति व पावित्र्य हेंच खरें आरोग्य. म्हणूनच शाळांतून नीतीचे व पावित्र्याचे ठसे मुलींच्या कोमल मनांवर उमटविले पाहिजेत. असें शिक्षण जर लहानपणीं स्त्रीस न मिळेल तर राष्ट्राची नीतिमत्ता खालावल्याशिवाय रहाणार नाहीं. पाश्चात्य देशांमध्यें कित्येकांच्या लक्षामध्यें ही गोष्ट आली असून त्यांनीं आंकडेशास्त्रांच्या मदतीनें जसजसा व ज्या प्रमाणांत नीतिशिक्षणाचा व धर्मशिक्षणाचा ऱ्हास झाला तसतसें व तितक्याच वेगानें राष्ट्र नीतिभ्रष्ट झालें हें सिद्ध करून दाखविलें आहे.

सेंट पॉल या ख्रिश्चन धर्माच्या पुरस्कर्त्यानें स्त्रीजातीची उन्नति केली. स्त्रियांपुढें ब्रह्मचर्याचें व सदाचरणाचें ध्येय ठेवून त्यांना नीतीची महती समजावून दिली. पण पुढें झालेल्या ढोंगी लोकांनीं पुन्हां सर्वत्र अनाचार सुरू केला व आजमितीला तो फारच वाढला आहे. अमेरिकेंतील मोठमोठीं शहरें बदफैली लोकांनीं गजबजलीं आहेत. फ्रान्सची तर हीच स्थिति झाली आहे. पॅरिसमध्यें एकंदर १ लक्ष देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया आहेत. शिकॅगोमध्यें ३००००, न्यूयार्कमध्यें ५००००, बर्लिनमध्यें ३००००, लंडनमध्यें ८०००० व एकंदर युरोपमध्यें अदमासें चार कोटी स्त्रिया या धंद्यावर जगतात. हे आंकडे वर निर्दिष्ट केलेल्या स्त्रिनीच्या ग्रंथावरूनच घेतले आहेत. जर्मनीमध्यें धार्मिक शिक्षण दिलें जातें खरें, पण स्त्रीच्या पावित्र्याविषयीं अगर पूज्यतेविषयीं एक अक्षरही

शिकविलें जात नाहीं. हॉलंडमध्येंही हीच स्थिति दृष्टोत्पत्तीस येते. आणि या सर्वांचें मुख्य कारण धर्म व नीति-शिक्षणाची अनास्था हें होय, असें स्विनीनें सिद्ध केलें आहे. *ग्रँट व्हाईट यानें शिक्षणसंस्थांशीं ६० वर्षें संबंध ठेवला व हेंच सांगितलें.

वरील माहितीवरून नीति व पावित्र्य यांचे ठसे लहानपणींच मुलांमुलींच्या मनांवर उमटाविणें किती आवश्यक आहे हें कळून येईल. लहान मुलांमुलींकडून सदाचरणी, सुशील व पवित्र असे थोर स्त्री-पुरुषांचे पवाडे गावून घेतले पाहिजेत. आपल्या धर्मग्रंथांमधून, पुराणांमधून, इतिहासामधून जीं कित्येक उदाहरणें सांपडतात, तीं सतत त्यांच्या डोळ्यांपुढें ठेविलीं पाहिजेत. साध्वी स्त्रियांचीं चरित्रें वाचल्यानें मुलींचें शील अत्यंत निर्मल राहील. वाचन व शील यामध्यें अत्यंत निकट संबंध आहे. वाचनानें शीलावर हटकून परिणाम होतो, म्हणून पुस्तकांची निवड फार दूरदर्शीपणानें केली पाहिजे.

हें सर्व धर्मनीतीचें शिक्षण आरंभापासून, म्हणजे प्राथमिक शिक्षणापासून दिलें पाहिजे हें उघड आहे. प्राथमिक शिक्षण फारच महत्त्वाचें आहे. तें व्यक्तीच्या पुढील सर्व आयुष्याचा पाया आहे; व राष्ट्राचा आधारस्तंभ आहे. सर्व स्त्रीपुरुषांना प्राथमिक शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे हें भारतसेवक गो. कृ. गोखले यांनीं हिंदी राष्ट्राच्या पाहिल्यानें निदर्शनास आाणिलें. या प्राथमिक शाळेंत दिल्या जाणाऱ्या दिव्य शिक्षणानेंच आपल्या उदयोन्मुख राष्ट्राची सर्वांगीण उन्नति होणार आहे. तेव्हां प्राथमिक शिक्षणक्रम पुष्कळ विचारानें ठरवावयास पाहिजे. असो.

येथें आणखी एक हल्लीं उद्भवलेला अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे सहशिक्षणाचा होय. त्याचा निर्देश केल्याशिवाय राहवत नाहीं. हा प्रश्न अत्यंत विचारार्ह आहे. अमेरिकेमध्यें या प्रश्नाचे बरेच

---

* Government statistics prove this to the hilt.

प्रयोग करून पाहून सहशिक्षण हल्लीं सार्वजनिक प्रचारांत आलेलें आहे. माझ्या अल्प बुद्धीप्रमाणें मला असें वाटतें कीं, प्राथमिक शिक्षण तेवढेंच मुलांमुलींस मिळून द्यावें. कारण मुलांमुलींचें सर्वच शिक्षण सारखें असणें शक्य नाहीं व तें इष्टही नाहीं. प्राथमिक शिक्षणक्रम मात्र उभयतांचा बराच सारखा ठेवणें शक्य आहे. कारण प्राथमिक शिक्षणामध्यें, लिहितां वाचतां येणें, साधी बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार फार झालें तर त्रैराशिकापर्यंत गणित शिकणें, बरेंचसें मोकळ्या हवेंमध्यें फिरणें, खेळणें व बागडणें, साधारणपणें गोष्टीरूपानें, व त्रास न होईल अशा साहजिक रीतीनें इतिहास-भूगोलांतील, लहान मुलांस मनोरंजक वाटतील, ध्यानांत ठेवण्यास बिलकुल कठीण पडणार नाहींत, अशा गोष्टी सांगणें-इत्यादि गोष्टींचा समावेश होतो. या पहिल्या शिक्षणाचा सर्व काल आनंदांत गेला पाहिजे. अभ्यासाचा त्रास वाटेल अशा रीतीनें कधींही शिकवून उपयोगी नाहीं. लहान मुलांस परीक्षा तर मुळींच उपयोगी नाहीं. फार झाल्यास प्राथमिक शिक्षणाच्या शेवटल्या वर्षी नुसती वरवर चाचण घेतल्यास बस्स आहे. तेव्हां असें निर्भेळ व आनंदमय प्राथमिक शिक्षण बहीणभावंडांस मिळूनच देणें अत्यंत आवश्यक आहे. या कालामध्यें सहशिक्षण झाल्यास बहीणभावंडांमध्यें निर्भेळ व निःस्वार्थी सहानुभूति व प्रेम यांची वृद्धि होईल व पुढील पुढील कालांत याचा अतिशय मनोहर असा परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. या शुद्धप्रेममय वातावरणांत उत्पन्न झालेली निःस्वार्थी सहानुभूति पुढें पवित्र अशा पतिपत्नीप्रेमांत परिणत होईल. मी हें सुखस्वप्न येथेंच थांबवितों, कारण वाचकांनीं त्या स्वप्नाचा आपल्याशींच विचार करणें बरें.

दुय्यम शिक्षणक्रम मात्र यापेक्षां निराळा पाहिजे. या शिक्षणक्रमांत स्त्रीपुरुषांना लागणाऱ्या विशिष्ट तऱ्हेच्या अभ्यासक्रमाकडे विशेष लक्ष देणें जरूरीचें आहे. मुलींच्या शिक्षणाचा ओघ सुगृहिणी व सुमाता

बनविण्याकडे पाहिजे व मुलांचा शिक्षणक्रम उत्तम नागरिक बनविण्याकडे पाहिजे. अर्थात् दोघांपुढेंही देशसेवा हें सामान्य ध्येय ठेवलेंच पाहिजे. पण मागें सांगितल्याप्रमाणें उभयतांचे देशसेवेचे मार्ग मात्र निरनिराळे आंखून दिले पाहिजेत. तेव्हां दुय्यम शिक्षण मिळून देण्याचें कारण नाहीं व तें इष्टही नाहीं; कारण दोघांचाही त्यांच्या नैसर्गिक कर्तव्यानुरूप व स्वाभाविक ध्येयानुरूप हा दुय्यम अभ्यासक्रम आंखला पाहिजे. असो.

याप्रमाणें चार वर्षें प्राथमिक व चार वर्षें दुय्यम शिक्षणक्रम झाल्यावर मुलगी साधारण १४।१५ वर्षांची होते. या पंधराच्या अदमासाला विवाहित होण्यास तिला हरकत नाहीं. आठ वर्षांच्या शिक्षणक्रमानें त्यांची बुद्धि सतेज होईल व त्यांस सारासार बुद्धिही प्राप्त होईल. मुलींची शारीरिक व मानसिक वाढ मुलांपेक्षां झपाट्यानें होते. उदाहरणादाखल शिक्षण दिलेलीं अशीं समान वयाचीं दोन बहीणभावंडें घेतल्यास त्यांत बहीणच जास्त समजुतदार असते असा प्रत्यक्ष अनुभव आहे. या स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक वाढीच्या वैशिष्ट्यास अनुसरून १४।१५ वर्षें ही मुलीची विवाहमर्यादा घालण्यास कांहीं हरकत नाहीं. मुलांची विवाहमर्यादा २२—२३ वर्षें व मुलीची १४—१५ वर्षें अशी असणें अत्यंत सयुक्तिक आहे. अलीकडील बऱ्याच विद्वानांचेंही मत असेंच पडूं लागलें आहे. बरें, या विषयाचा येथें जास्त विचार नलगे. आपण स्त्रीशिक्षणापरताच विचार करूं. विवाहित झाल्यानंतरही रोज कांहीं वेळ तरी शिक्षणक्रम सुरूच असला पाहिजे. यासंबंधीं माझें मत असें आहे कीं, प्रौढ व विद्वान् अशा थोर स्त्रियांनीं विवाहित स्त्रीस शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या पाहिजेत. साधारण रोज २—३ तास या संस्थेमध्यें कोणत्या तरी एका कलेचें विशिष्ट ज्ञान व इतर स्त्रीधर्मनीति व जगांतील उलाढालींची साधारण माहिती यांचें ज्ञान विवाहित स्त्रीस दिलें पाहिजे. विवाहित स्त्रीच्या शिक्षणाची जबाबदारी पतीवरही आहे. नुसती जबाबदारी आहे असें नव्हे तर अशा रीतीनें जर शिक्षण देण्याकडे तो

दुर्लक्ष करील तर त्याच्या सुखामध्यें न्यून येईलच. पण कदाचित् असें न केल्यानें तो पातकीही ठरेल. तेव्हां विवाहित स्त्रीस शिक्षण देण्याच्या संस्था निघून त्या नियमित रीतीनें चालणें फार आवश्यक आहे. या संस्थांचा अभ्यासक्रम ३।४ वर्षांचा असावा. असो. येथवर सर्व ठीक आहे. पण येथें आणखी एक मोठा महत्त्वाचा व नाजुक प्रश्न पुढे येतो. तो म्हणजे विधवा स्त्रियांसंबंधीं होय. आठ वर्षांचा शिक्षणक्रम होऊन विवाहित झाल्यानंतर दुर्दैवानें जर एकाद्या स्त्रीवर वैधव्याचा प्रसंग आला तर तिचें पुढील सर्व आयुष्य अंधारमय होऊन बसतें.* तिनें काय करावें हें तिलाही समजत नाहीं व समाजही तिला योग्य मार्ग दाखवीत नाहीं अशा प्रसंगीं तिला दोन माग मोकळे असतात. एक दुःखाचा विसर पडल्यावर पुनर्विवाह करणें व दुसरा विवाह न करितां आजन्म भगिनीसेवा करणें. यांपैकीं कोणता मार्ग स्वीकारावयाचा हें जिच्या तिच्या मनावर अवलंबून राहील. पहिला मार्ग स्वीकारण्यास वर सांगितलेल्या संस्थांमधून तिला शिक्षण मिळतेंच आहे. दुसरा मार्ग स्वीकारलेल्या स्त्रियांकरितां ३–४ वर्षांचा अभ्यासक्रम असलेल्या मोफत शिक्षणसंस्था काढल्या पाहिजेत. स्वतःचें पोट भरून भगिनी–सेवाही करतां येईल अशा तऱ्हेचा तो अभ्यासक्रम पाहिजे. प्राथमिक शिक्षण व त्याचें महत्त्व, प्राथमिक शिक्षण मुलांमुलींस मिळून देण्यानें होणारा फायदा, सुगृहिणी व सुमाता तयार करणारे दुय्यम शिक्षण, अखेर विवाहानंतरचें उच्च शिक्षण, वगैरे गोष्टींचा आपण विचार केला. वरील तऱ्हेची व्यवस्था करणें कांही कठीण नाहीं व तशी व्यवस्था हल्लीं कोठें कोठें आहेही. ‘ सुवासिनी शिक्षण-संस्था ’ मात्र नाहींतच म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात् हें सर्व शिक्षण देणारे शिक्षकही सदाचारी, सुशील, व विद्वान् असे पाहिजेत. स्त्री-शिक्षणाची सर्व जबाबदारी स्त्रियांनींच घेतलेली बरी. आरंभीं आरंभीं हें

---

*कायद्याच्या दृष्टीनेंही हिंदू स्त्रीची स्थिति हलाखीची आहे. तेव्हां ती सुधारणें हें सार्वजनिक कामांत पडणाऱ्या स्त्रियांचें आद्य कर्तव्य आहे.

शक्य होणार नाहीं पण कांहीं काळ लोटल्यावर तें खात्रीनें शक्य होईल. मात्र दीर्घोद्योग, स्वार्थत्याग, व कळकळ या गुणांखेरीज तें शक्य नाहीं. जर्मनींतील स्त्रीशिक्षणसंस्था स्त्रियांनींच स्थापल्या आहेत व त्याच अजून चालवीत आहे. इतकेंच करून त्या थांबल्या नाहींत. त्यांनीं इतर मानव जातींच्या दुःखनिवारणार्थ परोपकार व लोकसेवा हींच ध्येयें आजन्म डोळ्यांपुढें ठेवून कित्येक राष्ट्रोपयोगी संस्था काढल्या आहेत. प्रत्येक पाश्चात्य देशांतील स्त्रीविषयक संस्था केवळ स्त्रियांनींच चालविल्या आहेत. आज सेंट व्हिन्सेंट डीपॉलच्या २०००० भगिनी लोककल्याणार्थ सर्व जगभर काम करीत आहेत. सन १८४१ सालापासून पॅरीस येथील डीकनेसिसूची संस्था अव्याहत चालू आहे व ती आपद्ग्रस्तांची सेवा करण्याचें महत्कार्य करीत आहे. मिस् ॲग्निस वेस्टन, मिस मेरिडिथ यांसारख्या गुन्हेगारांच्या उन्नतीकरितां अहर्निश झटणाऱ्या स्त्रिया तिकडे निपजत आहेत. गुलाम स्त्रियांचा व्यापार आपल्या अहर्निश तळमळीनें बंद करणाऱ्या मिसेस बिचर स्टोव्हसारख्या देवी तिकडे अवतरत आहेत. इतक्या झपाट्यानें इतर राष्ट्रांतील स्त्रिया आपली उन्नति करून घेत असतां—हिंद भगिनींनो, तुम्हांस स्वस्थ बसून चालावयाचें नाहीं. कालचक्राचें परिभ्रमण सारखें चाललें आहे. ईर्षेनें, स्पर्धेनें एकंदर मानव—जात धडपडत आहे. दिवसानुदिवस हा जीवनकलह फारच जाचक होऊं लागला आहे. आपल्या राष्ट्रांत तर अर्धे लोक एक वेळ जेवून काल कंठीत आहेत. हिंदुस्थानांत अनेक भानगडीचे प्रश्न पुढें येऊन पडले आहेत. आपआपसांतील तंट्यांनींच तर आम्ही परतंत्र झालों व अजूनही त्याच कारणांनीं पारतंत्र्यांत लोळत आहोंत. इतर देशांमध्यें शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होऊन त्यांतील पुष्कळ लोक साक्षर झाले आहेत. टीचभर जपाननें दीर्घोद्योगानें जगांतील प्रमुख राष्ट्रांत अग्रस्थान पटकावण्याचा घाट घातला आहे. अवघ्या ५०।६० वर्षांच्या काळांत जपाननें आपली केवढी बरें उन्नति करून घेतली?

प्रो. धोंडो केशव कर्वे यांनीं जेव्हां जपानांतील स्त्रीशिक्षणप्रसाराची प्रचंड चळवळ पाहिली तेव्हां त्यांस स्फूर्ति होऊन त्यांनीं हिंदुस्थानांत त्याच तऱ्हेनें अव्याहत प्रयत्न सुरू केले व आज आखिल भारतवर्षांत पहिल्या नंबरची स्त्रीशिक्षण संस्था स्थापून राष्ट्राची अत्यंत मोठी सेवा केली आहे. नुकत्याच परलोकवासी झालेल्या रमाबाई रानडे यांनींही अशाच तऱ्हेची महत्त्वाची राष्ट्रसेवा केली आहे. राष्ट्राच्या शिक्षणक्रमांत भारतसेवक गोखल्यांच्या कार्याचें फल आज उद्यां थोड्याच दिवसांत मिळेल अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. या वेळीं तुम्हांस स्वस्थ बसून भागणार नाहीं. तुम्हांस राष्ट्रोन्नतीखातर कंबर बांधलीच पाहिजे. अतोनात स्वार्थत्याग केला पाहिजे. अविश्रांत दीर्घोद्योग केला पाहिजे. राष्ट्रकार्याखातर अहर्निश झटलें पाहिजे.

तीं पहा पश्चिमेकडील स्त्रियांनीं आपल्या अविरत श्रमानें केवढालीं समाजमंदिरें स्थापिलीं आहेत ! त्यांचीं झळाळणारीं उत्तुंग शिखरें तुम्हांस लाजवीत नाहींत काय ? इकडे केमालपाशाच्या पत्नीच्या अध्यक्षतेखालीं हजारों स्त्रिया सभेमध्यें जमून जुलमी समाजरूढींना मूठमाती देत आहेत तर त्या पहा दूरवर अमेरिकेंतील स्त्रिया एकदिलानें पुरुषाच्या अरेरावीस कायमचा अर्धचंद्र देत आहेत. तीं पहा पश्चिमेकडील मावळत्या भगवानाच्या किरणांनीं सुवर्णरंगी दिसणारीं समाजमंदिरांचीं शिखरें ! पाहिल्यांत कां त्या जर्मनींतील बालोद्यान शाला ! हंसऱ्या, गुटगुटीत बालकांची चमू त्यांमधून कशी स्वैर संचार करीत आहे. चला, त्या आंग्ल भूमीमध्यें चला. तुम्हांस फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या शिष्यिणींनीं स्थापलेल्या अनेक संस्थांच्या टोलेजंग इमारती दिसतील. कोठेंही चला, तुम्हांस आश्चर्यचकित करून सोडणारे असे कितीतरी देखावे दिसतील. नको. हें पहा. तें पहा असें करीत बसल्यानें कदाचित् त्या दिङ्मूढतेंत आपल्या गरीब आर्यभूमीला तुम्ही विसराल. त्या अनेक शतकांच्या म्हाताऱ्या हिमाचलाला जाऊन विचारा

कीं बा हिमाचला ! इतक्या शतकांचा तूं अनुभव घेतला आहेस. सांग पाहूं आम्हांस थोडी या दुबळ्या भारतभूमीची कथा.

भगिनींनो, ताईनो, त्या गंगेचें पाणी आपल्या अश्रूंनीं गढूळ केल्या-खेरीज त्यास ही कथा कशी सांगतां येईल ? तो हुंदक्यामागून हुंदके देऊं लागेल. तो पहा त्या हस्तिनापुराकडे बोट दाखवून सारखा विव्हल होतो आहे. दक्षिणेच्या हस्तिनापुराची कहाणी माझा भाऊ विंध्याचलाला विचारा असें तो सांगतो आहे. अरेरे ! त्या विजयनगराकडे बोट दाखवितांना म्हाताऱ्याचा हात किती कांपूं लागला पहा ! त्याचें बोट बंगालच्या उपसागरापासून अरबी समुद्रापर्यंत हेलकावत आहे; पण त्या विजय-नगरावर कांहीं त्याला रोख धरतां येईना. सोन्याची द्वारकापुरी—अरेरे—राखेची झाली ना ? ती एकाकाळीं रत्नमण्यांनीं खचित असलेली अयो-ध्यानगरी आज पारतंत्र्याच्या पिंजऱ्यांत पकडलेल्या पशूंचा कोंडवाडा झाली ना ? ती सीतादेवीची साक्ष पटविणारी दण्डकारण्यांतील वृक्षश्रेणी जाऊन तेथें कांटेरी झुडपें माजून राहिलीं ना ? त्या मथुरेंतील मंजुल मुरलीचा नाद मावळून, मुक्या व मऊ मेंढरांचा मेंगळा स्वर ऐकूं यावा ना ? एक कां दोन असंख्य गोष्टींची परंपरा मनांमध्यें उभी राहून हृदय पिळवटून येतें. पण नको ' गतं न शोच्यं '. पण काय ? विद्यमान स्थितीकडे पाहूं लागल्यास याहीपेक्षां शोचनीय स्थिति! नको! गतकालच्या आठवणींतच क्षणमात्र होणारा आनंद पुरवला, पण ही स्थिति पाहणें नको ! तीं पहा तिकडे गोजिरवाणीं अर्भकें पटापट मृत्युमुखीं पडून त्यांची रास आकाशाला भिडली आहे. तारकांनो, तुमच्या दिव्य तेजामध्यें तरी त्या राशी-मध्यें चैतन्य चपला जागृत करण्याची शक्ति आहे काय ? मागें पहाल तर बाविस तेविशीच्या उमरीच्या तरुणांना जरा आलेली दिसेल. भगिनींनो ! महाराष्ट्रभगिनींनो ! तुम्ही पहाल तिकडे राष्ट्रीय आपत्तींच्या राशींच्या राशी दिसतील. त्या पहा अर्धवट सुशिक्षित पण गर्भश्रीमंत भगिनी नाटकी ढंगांतच गर्क झाल्या आहेत. पण आपली व आपल्या भगिनींची

सेवा करण्याचें त्यांच्या मनांतसुद्धां कधीं येत नाहीं. भगिनींनो, आपले बंधु आपली उन्नति आपल्याकरितां घडवून आणितील अशी परावलंबी आकांक्षा धरून कालक्षेप करूं नका. श्रीकृष्णांनीं " उद्धरेदात्मनात्मानं " असें सांगितलेलें तुमच्या लक्षांत आहेना? तर मग तुमची तुम्हीच लढाइची तयारी करा. प्रत्येक क्षण फुकट जात आहे. यापुढें तुम्हांस स्वस्थ बसून कधींही भागावयाचें नाहीं. ताईनो, सीता, सावित्री तुम्हांस हंसत आहेत. करा, आतांच्या आतां निश्चय करा. म्हणजे तुम्हांस त्या यशः-प्राप्तीचा आशीर्वाद देतील. या स्वर्गीय आशीर्वादाच्या जोरावर तुम्हांस पाहिजे तें करण्याची शक्ति येईल. क्षणोक्षणीं बदलणाऱ्या काळाबरोबर नवीन नवीन जबाबदारींचीं कामें तुम्हांस करावीं लागतील. तुम्हांवरच राष्ट्राची सर्व मदार आहे. मात्र कोणत्याही तऱ्हेचा अविचार करूं नका. राष्ट्रांतील दूरदर्शी मुत्सद्यांनीं दाखविलेल्या मार्गानें चला. आत्मोन्नति व समाजोन्नतीशिवाय राष्ट्रोन्नति होणें शक्य नाहीं हें पक्कें लक्षांत ठेवा! किंबहुना आत्मोन्नत्ति व समाजोन्नति हीच राष्ट्रोन्नति आहे. केवळ अज्ञानानें तुमच्या कित्येक भोळ्या भगिनी आपल्या पैशाचा व श्रमाचा दुरुपयोग करीत आहेत. या अज्ञानपंकांतून त्यांस काढण्यास तुम्हींच पुढें आलें पाहिजे. ज्याला प्रबलेच्छा आहे, त्याला मार्ग सुचतोच सुचतो. कोणत्याना कोणत्या मार्गानें तुम्हीं लोकसेवा केलीच पाहिजे. आपल्या देशांत देहविक्रय करणाऱ्या हजारों स्त्रिया आहेत. त्यांचें मन सन्मार्गीकडे वळवून हा स्त्रीजातीवरील अत्यंत घाणेरडा डाग तुम्हीं धुवून टाकिला पाहिजे. अखिल मानवी जात विकास पावत आहे असें कित्येक लोक म्हणतांना आपण ऐकतों. पण देहविक्रयासारखे अमानुष प्रकार राजरोसपणें करणारी मानवी जात विकास पावत आहे असें म्हणणें अत्यंत लाजिरवाणें आहे. स्त्रीजातीची उत्क्रांति व्हावयाची असल्यास तुम्हांसच पुढें येऊन जगाला उदाहरण घालून दिलें पाहिजे. हिंद भगिनींनो, तुमची परंपरा, तुमची नैतिक परंपरा सर्व राष्ट्रांपेक्षां अत्यंत उज्ज्वल आहे. पण

परंपरेच्या पावित्र्याचें केवळ पुण्यस्मरण करून कसें भागणार ? भगवान् श्रीकृष्णानें सांगितलेला प्रेममय ' भागवत धर्म ' तुम्ही आपल्या रोमरोमीं बाणविला पाहिजे. हिंदुस्थान जर कशानें श्रेष्ठ असेल तर तें त्याच्या धर्माचरणानेंच होय, आणि हेंच श्रेष्ठत्व तुम्हांस कायम ठेवावयाचें असल्यास तुम्ही आपल्या कर्माचरणानें पतित भगिनींस लाजवून त्यांचा उद्धार केला पाहिजे. सर्व जगाला धर्मनीतीचा उपदेश करण्याची पात्रता तुम्हीं मिळविली पाहिजे. ती निष्कलंक आचरणाशिवाय कधींही मिळत नाहीं. तुकाराममहाराजांनीं स्त्रीस खालीलप्रमाणें उपदेश केला आहेः—

किंचित् हें सुख टाकी वो थुंकोनी
पावसील धणी परमानंद
नको चिंता करूं वृथा या पोटाची
माउली आमुची पांडुरंग
होई वळकट घालूनिया कांस
हाचि उपदेश तुज आतां
वैष्णवांची दासी होइ सर्वभावें
मुखीं नाम घ्यावें विठोबाचें ॥

हा अमोलिक उपदेश प्रत्येक हिंदू स्त्रीनें लक्षांत ठेविला पाहिजे व तो आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इतकेंच नव्हे,तर आसेतुहिमाचल याच प्रेमप्रधान धर्माचा घोष करीत राहिलें पाहिजे. भगिनींनो, याच प्रेमधर्माची पताका हातांत घेऊन गांवोगांवीं व खेडोखेडीं फिरून धर्मजागृति करा. या जयघोषानें मोठमोठे साधुसंत तुमच्या उदरीं जन्म घेतील. व्यवहाराच्या वैराण वाळवंटावर भटकणाऱ्यांस प्रेमधर्माच्या मंत्रानें मागें परतवून सदाचरणाकडे व सन्मार्गाकडे वळवा. भोंदू व ढोंगी धर्मगुरूंचें सिंहासन या प्रीतिमंत्राच्या गर्जनेनेंच उडवून द्या. निर्मळ सत्याकरितां प्राणत्यागाची पर्वा करूं नका. प्रेम, पावित्र्य व सेवा, हें दिव्य ध्येय पुढें ठेवून आपला मार्ग आखा. मग त्या मार्गांत कसलींही संकटें येवोत;

बेदरकार पुढें पाऊल असूं द्या. ' प्रेम, पावित्र्य व सेवा ' हा दिव्य मंत्र तुमच्या धर्मपताकेवर कोरून—भगिनींनो ती दिव्य पताका हिमगिरीच्या अत्यंत उत्तुंग शिखरांवर रोवून—ती सर्व जगाला सहज दिसेल अशी प्रस्थापित करा. व आपल्या ध्येयांचा घोष करा. अशा अद्भुत रमणीय जयघोषानें त्या पर्वतराजाचीं गव्हरें निनादित होतील व जगभर त्याचा प्रतिध्वनि—उमटून अखिल जगतांतील जनसंमर्द त्या तेजोमय पताके-कडे आश्चर्यानें टकमकां पाहूं लागेल. इतकेंच काय, पण गगनवितानांत एक तेजोमय मेघ पडून, नंदनवनांतील एका नयन मनोहर कुंजांतून, सीता, सावित्री तुम्हांवर पुष्पवृष्टि करूं लागतील.

भगिनींनो, मन वज्रासारखें कठीण करून या पवित्र कार्यास प्रवृत्त व्हा म्हणजे स्वयंस्फूर्तीनें नाहीं तरी लज्जेनें तरी तुमचे बंधु तुम्हांस मदत करण्यास धांवतील.

असो; नानाविचारांच्या काहुरानें शेवटीं शेवटीं माझें मन अगदींच भडकलें. वाङ्मय शास्त्राच्या नियमाच्या बांधास न जमानतां तें स्वैर वाहात सुटलें. या स्वैर व वरवर नाटकीही दिसणाऱ्या प्रेमोद्गारांचें समर्थन प्रेमाशिवाय अन्य तऱ्हेनें मला करतां येत नाहीं. आपल्या स्त्रीसमाजाची उन्नति व्हावी याविषयीं उत्कट इच्छा व आपणांविषयीं असलेले भगिनीप्रेम या दोहींनीं अखेर मला थोडें वहावयास लाविलें. असो.

माझी ही अल्पसेवा आपण तशीच खुळ्या प्रेमानें गोड करून घ्याल अशी आशा आहे. दिवाळसण जवळ आला म्हणून भाऊबिजे-करितां इतिहासाच्या भांडारांतून मूठभर मोत्यें चोरून आणून त्यांची तुम्हांस मीं ओवाळणी घातली आहे. विद्यार्थिदशेंतील विचारांच्या अपरिपक्वतेमुळें धूर्त जवाहिऱ्यांसारखी पारख मजकडून झाली नसेल पण हंसक्षीर न्यायानें ही ओवाळणी तुम्ही सप्रेम स्वीकाराल अशी माझी पक्की खातरी आहे.

**उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ॥**

**समाप्त.**

REFBK-0002455